म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

टेरेन्स मॅक्स्विनीकृत

स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें

REFBK-003283


स. आ. जोगळेकर, एम्. ए.



माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें ।
परि अमृतातेंही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरें रसिकें मेळवीन ॥ १ ॥

—ज्ञानेश्वर.

स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें



भाषांतरकर्ता

श्रीयुत सदाशिव आत्माराम जोगळेकर,

एम्. ए.

REFBK-0003283

१ ऑगस्ट १९२७

गणेश महादेव आणि कंपनी, मुंबई

किंमत दीड रुपया

प्रकाशक

गणेश महादेव वीरकर,

मालक गणेश महादेव कंपनी,


चौबळवाडी, गिरगांव–मुंबई ४


[सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन]

मुद्रक

अनंत सखाराम गोखले,

'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणे.







स्वातंत्र्यवीरांस समर्पित

3263

या भाषांतरकर्त्याची प्रस्तावना

प्रस्तुत निबंधांचा लेखक टेरेन्स मॅकस्विनी याचा जन्म १८७९ सालीं कॉर्क शहरीं झाला. त्याचा बाप लवकरच मरण पावल्यामुळें कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी त्याच्या आईवर पडली. दारिद्र्याच्या अपेष्टा



भोगाव्या लागत असूनही तिनें आपल्या मुलांच्या मनाला जडवादाचा स्पर्श होऊं दिला नाहीं. टेरेन्सचें शिक्षण ज्या शाळेंत झालें तेथें आयरिश भाषा व आयर्लंडचा इतिहास हे विषय विशेष कळकळीनें शिकविण्यांत येत. या विषयांत विशेष प्राविण्य मिळवून त्यानें १८९४ सालीं शाळा सोडली आणि त्याच वर्षीं कॉर्क येथील डायर कंपनींत त्यानें नोकरी धरली. नोकरी करून फावल्या वेळांत त्यानें वाङ्मयाचा आणि क्रमिक पुस्तकांचा अभ्यास करून १९०७ सालीं बी.ए. ची पदवी मिळविली. १९११ सालीं कॉर्क परगण्याच्या धंदेशिक्षण कमिटीनें त्याला व्यापारी शिक्षक व प्रचारक नेमिलें. १९१४ सालीं त्यानें कॉर्क येथें 'फियाना-फेल' नांवाचें एक साप्ताहिक सुरू केलें, पण त्याच वर्षीं सरकारनें तें बंद केलें. १९१५ सालीं आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन तो स्वयंसेवक जमविण्याच्या कामाला लागला. १९१६ सालीं राजद्रोही भाषण केल्याच्या आरोपावरून त्याच्यावर खटला करण्यांत आला, पण बेंचानें त्याला फक्त बारा आणे दंड करून सोडून दिलें. या खटल्यामुळें स्वयंसेवकांची भरती करणें कायदेशीर ठरलें. या वर्षीं झालेल्या बंडाचा पुढारी म्हणून त्याला गिरफदार करण्यांत आलें होतें; पण नेमस्तांच्या मध्यस्थीमुळें सरकारनें सर्व बंडवाल्यांची सुटका केली. १९१७ सालीं त्याला पुन्हा पकडण्यांत व हद्दपार करण्यांत आलें. हद्दपारीची मुदत संपतांच त्यानें पुन्हा चळवळ सुरू केली, म्हणून त्याला पुन्हा पकडण्यांत आलें. या वेळीं त्याला सहा महिन्यांची सजा मिळाली. तुरुंगांत गेल्यापासून त्यानें अन्नपाणी वर्ज्य केलें व एका महिन्यांतच त्याची सुटका झाली; पण सजा पुरी करण्यासाठीं

१९१८ सालीं त्याला घुन्हा पकडण्यांत आलें. मुदत संपली तेव्हां त्याला फक्त तुरुंगाच्या दरवाजापर्यंत जाऊं देऊन घुन्हा पकडून हद्दपारीची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्याच्या गैरहाजिरींतच आयरिश पार्लमेंटांत तो निवडून आला. याच वर्षीं मे महिन्यांत सरकारनें सर्व आयरिश घुढाऱ्यांना सोडून दिलें. परत येतांच त्यांनीं चळवळीला घुन्हा सुरुवात केली. लगेच प्रजा-सत्ताक संस्थांना विलक्षण बळकटी आली. ही चळवळ चिरडून टाकण्या-साठीं सरकारनें जुलमाचा कहर उसळून दिला. १९२० सालीं टेरेन्सची कॉर्कच्या नगराध्यक्षाच्या जागीं निवडणूक झाली. थोडक्याच दिवसांनीं त्याला पुन्हा कैद करण्यांत आलें. खटल्याचे वेळीं नगराध्यक्ष व सर न्याया-घीश या नात्यानें त्यानें ब्रिटिश कोर्टाच्या अधिकाराचा इन्कार करून आपला बचाव करावयाचें नाकारलें. कोर्टानें त्याला दोन वर्षांची शिक्षा दिली. लगेच त्याला ब्रिक्स्टनच्या तुरुंगांत नेण्यांत आलें. पकडण्यांत आलें त्या दिवसापासूनच त्यानें अन्न वर्ज्य केलें होतें. हळुहळू त्याच्या शक्ति क्षीण होऊं लागल्या. ७३ दिवसांच्या अन्नत्यागानंतर त्यानें देहत्याग केला! त्याचें शव त्याच्या नातेवाइकांच्या ताब्यांत देतांना सरकारनें अनेक आढेवेढे घेतले. शव कॉर्क येथें आल्यानंतर तें नगरभवनांत ठेवलें होतें. त्याच्या दर्शनासाठीं हजारों लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या होत्या.

१९०१ सालीं स्थापन झालेल्या सेल्टिक वाङ्मय-मंडळाचा तो प्रमुख सभासद होता. अशीं अनेक मंडळें ठिकठिकाणीं स्थापन झालीं व त्यांनीं क्रान्तिकारक चळवळीची भूमिका तयार केली. आयरिश भाषेचा अभ्यास व इतर परिश्रम करून त्यानें आपल्या अंगीं असलेल्या लेखनशक्तीचा पूर्ण विकास केला. १९०७ सालीं त्यानें आपल्या कविता 'स्वातंत्र्यसंगीत' या नांवानें प्रसिद्ध केल्या. थोडक्याच दिवसांनीं राष्ट्रीय नाटकें लिहून तीं रंगभूमीवर आणण्या-साठीं कॉर्क येथें नाट्यसमाजाची स्थापना झाली. टेरेन्स या समाजाचा सभासद होता. नाट्यशास्त्राचा व टीकाग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यानें 'कूलचे अखेरचे वीर' हें नाटक लिहिलें. खरा वीर यशाची आशा नसतांही देहपाता-पर्यंत लढत राहतो, या तत्त्वावर ह्या नाटकाची उभारणी केलेली होती. हें नाटक लोकांना फार आवडलें आणि नंतर लिहिलेलीं त्याचीं नाटकें अशींच लोकप्रिय झालीं. १९१० सालीं आयरिश तरुणांनीं 'आयरिश स्वातंत्र्य'

नांवाचें वर्तमानपत्र काढलें. इंग्लंडपासून आयर्लेंड पूर्ण विभक्त झालें पाहिजे आणि आयर्लेंडांत प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें पाहिजे हें या पत्राचें ब्रीदवाक्य होतें. या पत्रांतच टेरेन्सनें 'स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें' ही लेखमाला लिहिली. या लेखांमुळें त्या पत्राच्या वाचकवर्गांत अतिशय जागृति झाली.

अल्स्टरमधील लोकांनीं पार्लमेंटच्या संमतीनें स्वयंसेवकांचीं पथकें उभारावयाचें ठरवितांच आयरिश देशभक्तांनीं आपलीं पथकें उभारावयास सुरवात केली. १९१३ सालीं डब्लिन येथें पहिलें पथक उभारण्यांत आलें. लवकरच ही चळवळ देशभर पसरली. कॉर्क शहरीं खुद्द टेरेन्सच्या नेतृत्वाखालीं स्वयंसेवकांचीं पथकें तयार होऊं लागलीं. आणि त्यांच्या कवाइती खुल्या मैदानावर होऊं लागल्या. महायुद्ध सुरू झालें त्यावेळीं इंग्लंडला मदत करावी किंवा नाहीं या विषयावर मतभेद झाल्यामुळें या चळवळीची वाताहत झाली. स्वातंत्र्यवाद्यांच्या पक्षांत फक्त आठ हजार स्वयंसेवक राहिले; तरी टेरेन्सनें हिम्मत सोडली नाहीं. आपलें काम त्यानें पूर्वीच्याच उत्साहानें चालू ठेवलें. १९१५ सालीं त्याच्या एकनिष्ठेला यश आलें व १९१६ सालीं कॉर्क परगणा या चळवळीच्या दृष्टीनें अग्रगण्य ठरला. या वर्षीं क्रान्तिकारकांनीं उभारलेलें बंड फसलें; मात्र १९१८ पासून त्यांची चळवळ पुन्हा जोरांत आली. देशांत प्रजासत्ता स्थापण्याचें काम सुरू झालें. डी व्हॅलेरा यास लोकशाहीचा पहिला अध्यक्ष निवडण्यांत आलें. राष्ट्रीय कर्जाची उभारणी झाली आणि प्रजासत्तेचे हुकूम लोक पाळूं लागले, यामुळें ब्रिटिश कोर्टें ओस पडलीं. लवकरच प्रजासत्ताक सैन्यानें ब्रिटिश शिपायांना ठिकठिकाणांहून हुसकावून लावलें. हें पाहून सरकारनें दडपशाहीला एकदम सुरवात केली. या वेळीं उडालेल्या कल्लोळांतच मॅक्स्विनीनें आत्मसमर्पण केलें.

श्री० नारायण सीताराम फडके, एम्. ए. यांनीं लिहिलेलें मॅक्स्विनीचें चरित्र विजय-साहित्यामार्फत प्रसिद्ध झालें आहे. हें चरित्र स्वातंत्र्याच्या मूलतत्त्वांबरोबर वाचावें, म्हणजे त्या काळांतील प्रमुख व्यक्तींची माहिती होऊन तत्त्वबोध स्पष्टपणें होईल. इटलीच्या राज्यक्रान्तीचा आद्यप्रणेता जोसेफ मॅझिनी यानें आपल्या तत्त्वज्ञानाचें सारसर्वस्व 'मानवी कर्तव्यें' या निबंधसंग्रहांत ग्रथित केलें आहे. त्यानंतर साठ वर्षांनीं आयरिश क्रान्तिकारकांचा पुढारी मॅक्स्विनी यानें 'स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें' हा निबंधसंग्रह लिहिला. क्रान्तिकारकांचे अग्रणी व

राष्ट्रधर्माचे प्रवर्तक या दृष्टीनें या दोघां महात्म्यांची व त्यांच्या तत्त्वांची तुलना करणें येथें अस्थानीं होणार नाहीं.

'मानवी कर्तव्यां'चा लेखक जोसेफ मॅझिनी आणि स्वातंत्र्याच्या मूलतत्त्वांचा कर्ता टेरेन्स मॅक्स्विनी यांच्या जीवनक्रमांत, मनोरचनेंत व कार्यक्रमांत कांहीं ठिकाणीं भिन्नता तर कांहीं ठिकाणीं एकवाक्यता असलेली दिसून येते. लहानपणापासून मॅझिनीला आईचा लळा अधिक होता; तिचें नैतिक सामर्थ्य व निष्ठाशक्ति हीं मॅझिनीमध्यें पूर्णपणें उतरलेलीं होतीं. वडील लहानपणींच मृत्यु पावल्यामुळें मॅक्स्विनीच्या पालनपोषणाची व शिक्षणाची जबाबदारी त्याच्या आईवर पडली होती आणि तिनें ही जबाबदारी इतक्या उत्तम रीतीनें पार पाडली कीं, दारिद्र्याशीं झगडावें लागत असूनही तिनें आपल्या मुलाच्या मनाला जडवादाचा स्पर्श होऊं दिला नाहीं. दोघांचींही कुटुंबें पूर्ण लोकसत्तावादी होतीं. दोघांनींही विद्यार्थिदशेंत असतांना मातृभाषा, वाङ्मय व इतिहास या विषयांचें अध्ययन केलें. कुटुंबपोषणाची जबाबदारी शिरावर असल्यामुळें मॅक्स्विनीला बालवयांतच नोकरी धरावी लागली. वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबरोबर मॅझिनी राजकारणांत पडला; कुटुंबाची जबाबदारी त्याच्यावर नसल्यामुळेंच त्याला हें शक्य झालें. गुप्त क्रान्तिकारक समितींत समाविष्ट होणें म्हणजेच राजकारणांत प्रवेश करणें अशी त्या वेळची परिस्थिति असल्यामुळें मॅझिनीनेंही तसेंच केलें; पण यामुळें त्याच्यावर सरकारची इतराजी होऊन त्याला सहा माहिने तुरुंगांत रहावें लागलें आणि सुटका झाल्यानंतर बिनमुदतीची हद्दपारी स्वीकारावी लागली. कोणत्याही प्रकारची संघटना करावयाची मुभा नसल्यामुळें स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं गुप्त मंडळ्यांच्या द्वारें त्याला लोकजागृतीचें कार्य करणें भाग पडलें. मॅक्स्विनीला आपली सारी चळवळ उघडपणें करतां आली याचें मुख्य कारण म्हणजे आयर्लंडांत विशिष्ट मर्यादेपर्यंत संघटना-स्वातंत्र्य होतें हेंच होय. तारुण्याच्या आरंभींच मॅझिनीवर तुरुंगवासाचा प्रसंग आला तर मॅक्स्विनीवर तसा प्रसग त्याच्या आयुष्याच्या शेवटीं आला. आजन्म हद्दपारीच्या सुरवातीपासून अगदीं शेवटपर्यंत एकतंत्री राज्यकर्त्यांनीं मॅझिनीला नाना प्रकारें छळलें; हस्तकांच्या विश्वासघातामुळें त्याच्या कार्याचा वारंवार बिघाड झाला; नाना देशांत निवास करावा लागल्यामुळें त्याच्या आयुष्याला स्थायिकपणा शेवटपर्यंत आला नाहीं;

त्याला जन्मभर दारिद्र्याशीं झगडावें लागलें. मॅक्स्विनीवर इतके कठ प्रसंग आले नाहींत; म्हणून त्याचा उत्साह शेवटपर्यंत टवटवीत होता; ही आनंदी वृत्ति त्याच्या लेखनांतही प्रकट झालेली आहे. अनेक आशाभंगांमुळें व विश्वासघातामुळें उत्पन्न झालेली विषण्णता मॅझिनीच्या लेखांमध्यें दिसून येते. तारुण्यांत दोघांचीही ओढ वाङ्मयाकडे होती. ऐतिहासिक नाटकें व कादंबऱ्या यांचीं अनेक संविधानकें मॅझिनीच्या मनासमोर उभीं रहात, पण स्वदेशाच्या निकृष्टावस्थेची लाज वाटून तो राजकारणाच्या खटाटोपांत शिरला. मॅक्-स्विनीला मात्र कविता व नाटकें लिहावयास वेळ मिळाला; मात्र हीं नाटकें मॅझिनीच्या लेखांप्रमाणेंच देशभक्तीनें ओथंबलेलीं आहेत. कॉर्कच्या धंदे-शिक्षण कमिटीनें मॅक्स्विनीला व्यापारी शिक्षक नेमलें होतें. मॅझिनीनेंही थोडे दिवस शिक्षकाचें काम केलें होतें; पण तो ज्या संस्थेंत काम करीत होता ती त्यानें स्वतःच संघटित केलेली होती. दोघांनींही बंडांत प्रत्यक्षपणें भाग घेतलेला होता. मॅक्स्विनीनें आपल्या आयुष्यांत बंडाची उभारणी अशी एकदांच केली. कट व बंडाळ्या उभारण्यांत मॅझिनीचा सारा जन्म गेला. दोघांच्याही बंडांना यश आलें नाहीं. मॅक्स्विनी हा अगदीं थोडे दिवस कॉर्क शहराचा नगराध्यक्ष होता. राज्यक्रान्तीचे वेळीं रोम शहरांतील ट्रिमु-व्हरेटचा अध्यक्ष या नात्यानें सर्व अधिकार व कामें मॅझिनीच्याच हातीं होतीं. मुत्सद्देगिरीचा दुटप्पी व धीमा कार्यक्रम दोघांनाही पसंत नव्हता. मॅक्स्विनीचें नांव त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या सहा वर्षांतच आणि तेंही फक्त आयर्लंडांतच विशेष दुमदुमलें. शेवटच्या तुरुंगांतील आत्मसमर्पणानें मात्र त्याचें नांव जगभर झालें. वयाच्या सव्विसाव्या वर्षापासूनच मॅझिनीचें नांव इटली व फ्रान्स या देशांमध्यें गाजूं लागलें आणि त्याच्या नुसत्या नामोच्चारानें युरोपियन सिंहासनें लवकरच डळमळूं लागलीं. दोघेही स्वातंत्र्य-लक्ष्मीचे प्रेषित होते. मॅझिनी हा राष्ट्रधर्माचा आद्यप्रवर्तक व इटलीचा जनक होता. हीं अभिधानें मॅक्स्विनीला तेवढ्या अन्वर्थकपणें लावतां येत नाहींत. मॅझिनीच्या अभावीं इटलीला स्वातंत्र्यप्राप्ति झाली असती किंवा नाहीं याबद्दल संशय आहे; मॅक्स्विनीबद्दल असें म्हणतां येईलच असें नाहीं. या तुलनेवरून दिसून येईल कीं, या दोघांमध्यें अग्रपूजेचा मान मॅझिनीलाच द्यावा लागेल; पण दोघेही पहिल्या दर्जाचे देशभक्त असल्यामुळें त्यांच्या-

मध्यें डावे-उजवे ठरविण्यांत अर्थ नाहीं. देशकालपरिस्थित्यनुरूप दोघांनींही देशासाठीं आपापल्या परीनें नेटानें व आजन्म कार्य केलें. त्यांचे हातून प्रत्यक्ष कार्य किती झालें हें पहावयासाठींच वरील तुलनात्मक प्रमाणें दिलेलीं आहेत.

अशीच भिन्नता व साधर्म्य त्यांच्या शिकवणुकींतही आहे; मात्र येथें भिन्नतेपेक्षां साधर्म्य अधिक आहे; आणि हें योग्यच आहे. कारण थोर पुरुष अंतर्यामीं नेहमीं समसमानच असतात. दोघांनींही प्रचलित राजसत्तेविरुद्ध बंड उभारलें होतें. दोघेही भावनाप्रधान व ध्येयवादी होते. स्वावलंबन, आत्मविश्वास व निष्ठाशक्ति यांवर दोघांनींही जोर दिलेला आहे. हक्क व सुख यांना दोघांचाही विरोध असून कर्तव्य व आत्मयज्ञ हींच तत्त्वें दोघांनाही अधिक प्रिय होतीं. त्यांच्या शिकवणुकींतील मुख्य भेद गुप्त मंडळ्यांच्या बाबतींत आहे. राजकीय परिस्थिति विपरीत असली म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं गुप्त-संघटना निर्माण करणें अपरिहार्य असतें, म्हणून अशा संस्था निर्माण कराव्या असें मॅझिनीचें सांगणें होतें; पण मॅक्स्विनीला गुप्त-मंडळ्यांचा मोठ तिटकारा होता. पिंडरचनेंतील त्याचप्रमाणें देशकालपरिस्थितींतीले भिन्नतेमुळेंच हा विरोध उत्पन्न झाला, हें उघड आहे.

'मानवी कर्तव्यें' या निबंधसंग्रहाच्या आरंभींच मॅझिनीनें आपण कर्तव्यांची मीमांसा कां करीत आहों याचें विवेचन केलें आहे. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीनंतर युरोपांतील लोकांनीं मानवी हक्कांसाठीं चळवळ केली. पण हक्कांच्या हव्यासामुळें अहंकार व अभिलाष उत्पन्न झाले. सर्व लोक सुखाच्यामागें लागल्यामुळें श्रद्धा लयाला गेली व सर्वत्र नैतिक अनाचार माजले. जीवनार्थ कलहाची तीव्रता वाढूं लागल्यामुळें जीवनाचें ध्येय नष्ट झालें. एकमेक एकामेकांना चिरडून टाकण्याचा प्रयत्न करूं लागले. हक्कांच्या तत्त्वज्ञानानें चिरस्थायी सुधारणा होत नाहीं व संस्कृति नष्ट होते असें सिद्ध झाल्यामुळें मानवी जीवनाचें नियंत्रण करण्याकरितां हक्कांपेक्षां उच्चतर शक्तीची जरूर भासूं लागली. मॅझिनी म्हणतो, कर्तव्यपालनाशिवाय हक्कांचा उद्भवच होत नाहीं, म्हणून हक्क मिळविण्यासाठीं कर्तव्यपालनापासूनच सुरवात झाली पाहिजे. स्वार्थ साधावयाची इच्छा नसेल तर प्रपंचांतून लक्ष काढून तें परमार्थाकडे लावावें असें प्रतिपादणारे लोक स्वर्ग व पृथ्वी यांमध्यें

भेदभाव आहे असें कल्पून देव व दैव यांबद्दल विपरीत कल्पना प्रसृत करतात. मॅझिनी म्हणतो, प्रपंच ही परमार्थाची प्रस्तावना आहे, जग ही कर्मभूमि आहे व ती पवित्रतर करणें हें आपलें कर्तव्य आहे. लोकमत व विवेकबुद्धि यांच्या साह्यानें व्यक्तिमात्रानें आपलीं कर्तव्यें ओळखावीं व सत्य जाणावें. कर्तव्याकर्तव्याची ही कसोटी दिल्यानंतर त्यानें मानवी कर्तव्यांचे चार प्रमुख वर्ग केले आहेत. यांमधील अग्रस्थान त्यानें मानवजातिसंबंधींच्या कर्तव्यांना दिलें आहे; कारण व्यक्तिमात्राचे ठायीं नारायणाचा निवास असल्यामुळें परस्परांना परस्परांबद्दल सहानुभूति वाटते; कारण हीं कर्तव्यें समजल्याशिवाय इतर कर्तव्यें पार पाडतां येत नाहींत. नंतर त्यानें राष्ट्रकर्तव्यांचें विवेचन केलें आहे. राष्ट्राशिवाय व्यक्तीला संरक्षणशक्ति नाहीं, नांवनिशाणी नाहीं व कुलीनपणाही नाहीं. मानव-जातीचीं हीं वेगवेगळीं पथकें एकाच ध्येयाकडे मोर्चा धरून चाललेलीं असल्यामुळें राष्ट्रकर्तव्यें पाळणें म्हणजे मानवजातीच्या प्रगतीला व परमेश्वराच्या शासनाच्या विकासाला मदत करणेंच होय. तिसरें स्थान कुटुंबकर्तव्यांना दिलेलें असून अगदीं शेवटलें स्थान स्वतःसंबंधींच्या कर्तव्यांना दिलेलें आहे. राष्ट्रांचा मानवजातींशीं जो संबंध आहे तोच कुटुंबांचा राष्ट्राशीं असल्यामुळें कौटुंबिक जीवन पवित्रतर व राष्ट्राशीं अधिक निगडित करणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य आहे; आणि मनुष्यानें स्वतःसंबंधींचीं कर्तव्यें योग्य रीतीनें पार पाडलीं नाहींत तर स्वार्थ माजेल, आणि जुलमाला अप्रत्यक्षपणें उत्तेजनच मिळेल, म्हणून मनुष्यमात्रानें हीं सर्व कर्तव्यें पालन केलींच पाहिजेत. कर्तव्यपालनाचें व्रत एकदां स्वीकारलें म्हणजे केव्हांही त्याचा त्याग करतां येत नाहीं. हें व्रत स्वीकारण्यासाठीं स्वातंत्र्य अवश्य आहे. कारण ज्यांना स्वातंत्र्य नसतें त्यांना त्यांच्या वर्तनाबद्दल जबाबदार धरतां येत नाहीं. म्हणून स्वातंत्र्याशिवाय नीतीला व समाजालाही अस्तित्व नाहीं. कारण स्वतंत्र व गुलाम यांमध्यें बंधुभाव अशक्य आहे. पारतंत्र्यांतील जीवन म्हणजे नुसता इंद्रियांचा व्यापार होय; अर्थात् ज्यानें आपलें स्वातंत्र्य गमावलें आहे, त्यानें आपल्या मनुष्यत्वावर पाणी सोडलें आहे; आणि परमेश्वराच्या आज्ञेचा भंग केला आहे; म्हणून सत्कार्य करावयासाठीं मनुष्याला स्वातंत्र्य अवश्य आहे. स्वातंत्र्य शिक्षणावर अवलंबून असतें; कारण त्यावांचून

मनुष्याला आपल्या हक्कांचें ज्ञान होत नाहीं, राष्ट्रीय जीवनांत भाग घेतां येत नाहीं व जीवितकार्याची मांडणी नीटपणें करतां येत नाहीं. म्हणून प्रत्येक नागरिकानें प्राथमिक व नैतिक शिक्षण प्राप्त करून घेतलेंच पाहिजे. आणि त्याच्या साह्यानें समता व बंधुप्रीति या भावनांचा विकास करून घेतला पाहिजे. प्रगति हेंच मानवजातीचें ध्येय असल्यामुळें प्रत्येक कार्य-क्षेत्रांत आपल्या बांधवांशीं संघटित होऊन शक्य तितकी प्रगति साधणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य आहे. कारण संघटनेमुळें सामर्थ्य वाढतें. संघटनेच्या साह्यानें कामकरी वर्गाचा प्रश्नही सोडवितां येण्यासारखा आहे, हें दाखवून मॅझिनीनें मानवी कर्तव्यांचा उपसंहार केला आहे. मनुष्याला आपल्यावरील नैतिक जबाबदारीची जाणीव होतांच तो शिक्षण घेतो, आपलें स्वातंत्र्य अबाधित ठेवतो, आपलीं कर्तव्यें पाळूं लागतो, यामुळें मानवजातीची प्रगति होते आणि उच्चतर संस्कृति उत्क्रांत होते, असें मॅझिनीनें या निबंधांत स्पष्टपणें दाखवून दिलें आहे.

'स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें' या निबंधमालेच्या आरंभींच मॅक्स्विननें प्रश्न टाकला आहे कीं, आम्हीं स्वातंत्र्यासाठीं कां लढावें ? कारण पारतंत्र्यामुळें नैतिक अधःपात होतो म्हणून राष्ट्रभक्ति हीच स्वातंत्र्ययुद्धाची स्फूर्ति आहे. स्वातंत्र्य सन्मार्गानें मिळविलें तरच तें मनुष्यजातीला कल्याणप्रद होईल. उच्च मनोवृत्ति व उदात्त ध्येय हाच आमच्या स्वातंत्र्याचा ताम्रपट होय. स्वातंत्र्यासाठीं आपण जें कार्य करूं त्याचें फल आपल्याला याच जन्मांत दिसलें पाहिजे असा आपण आग्रह धरतां कामा नये. कारण राष्ट्रकार्य हें भविष्यकालासाठींच करावयाचें असतें. ध्येयाबरील निष्ठा दृढ असेल तरच आमचें उच्च ध्येय साध्य होईल. नैतिक सामर्थ्य हेंच विजयाचें बीज आहे. आमचे शत्रु हेही आमचे बंधूच आहेत. आम्ही स्वतंत्र झालों म्हणजे हा बंधुभाव आम्हांला प्रत्यक्षपणें प्रस्थापित करतां येईल. स्वातंत्र्य मिळविण्या-साठीं आपण सामर्थ्य मिळविलें पाहिजे. वैयक्तिक शिस्त व सामुदायिक संघटना हेंच सामर्थ्याचें रहस्य आहे, आणि चालू क्षण हाच निर्वाणीचा क्षण आहे या भावनेनें आपण सदैव तयारी ठेवली पाहिजे. कारण स्वातंत्र्याला अनुकूल संधि केव्हां येईल याचा नेम नाहीं. आमचीं तत्त्वें आमच्या आयुष्यांत प्रत्यक्षपणें प्रकट होऊं लागतील तेव्हांच

स्वातंत्र्ययुद्धाला खरी सुरुवात होईल. निष्ठाशक्तीचें सामर्थ्य अपरंपार आहे. अंतःकरणपूर्वक आणि एकनिष्ठेनें कार्य केल्यानें हीनांतला हीन मनुष्य महात्म्यांच्या अग्रस्थानींही अधिष्ठित होऊं शकतो. गृहस्थाश्रमाची सबब पुढें करून तत्त्वांची उपेक्षा करण्याचा विचारही कोणाच्या मनांत येतां कामा नये. मागें हटून कातडी बचावावी कीं मर्दासारखें पुढें व्हावें या विचारांत पुरुष घुटमळूं लागला, कीं खऱ्या वीरासारखें वागण्याबद्दल स्त्रीनें त्याला उत्तेजन व पाठबळ दिलें पाहिजे. आमचीं तत्त्वें आमच्या आयुष्यांत त्याचप्रमाणें आमच्या सारस्वतांतही प्रकट झालीं पाहिजेत. कारण वाङ्मय हा स्वातंत्र्याचा बालेकिल्ला व ताम्रपट आहे. तीव्र मतभेदांकडे दिखाऊ ऐक्यासाठीं दुर्लक्ष करणें घातुक आहे. कारण, राष्ट्रस्वातंत्र्याच्या महासंग्रामांत दिखाऊ एकी पुरी पडणार नाहीं. सहानुभूतीनें व विवेकपूर्वक विचार केला असतां मतभेदांची तीव्रता कमी होऊन आपल्याला अंतःकरणपूर्वक एकजूट होतां येईल. आयुष्यांत तत्त्वांशीं एकनिष्ठ राहतां येण्यासाठीं खऱ्या विचारस्वातंत्र्याची जरूर आहे. गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं अगर असलेल्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीं राष्ट्रानें व प्रत्येक नागरिकानें सशस्त्र प्रतिकाराला नेहमीं तयार असलें पाहिजे. शस्त्रसंन्यासाच्या भ्रामक नांवाखालीं समर्थ राष्ट्रें जगाच्या अधिराज्याची आपसांत वांटणी करून घेण्याचा कट करीत आहेत, म्हणून आपण राष्ट्ररक्षणासाठीं नेहमीं सिद्ध असलें पाहिजे. साम्राज्य ही संघटना राष्ट्रापेक्षां अधिक उपयुक्त अतएव अधिक हितकारक आहे असें सिद्ध करण्याचा आधुनिक साम्राज्यवाद्यांचा प्रयत्न फोल आहे, आणि साम्राज्य ही संघटना मूलतःच घातुक आहे असें अनेक तत्त्वज्ञांच्या लेखांतील उतारे देऊन मॅक्स्विनीनें सिद्ध करून दाखविलें आहे. नंतर तीन प्रकरणांत त्यानें सशस्त्र प्रतिकाराची मीमांसा केली आहे. कारण स्वातंत्र्याच्या मीमांसेंत ह्या प्रश्नाचा विचार अपरिहार्य आहे. निकराचा मार्ग स्वीकारण्यापूर्वी कोणत्या अटी पुऱ्या झालेल्या असल्या पाहिजेत याचें साधार विवेचन केल्यानंतर आक्षेपांचें निरसन करून त्यानें उपसंहार केला आहे.

'मानवी कर्तव्यें' व 'स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें' या दोन ग्रंथांच्या वर दिलेल्या सारांशावरून दिसून येईल कीं, मॅझिनी व मॅक्स्विनी यांच्या तत्त्वनिष्ठेमध्यें वैधर्म्यापेक्षां साधर्म्यच अधिक आहे. दोन्ही ग्रंथ समग्र वाचणारांस हें साधर्म्य

अधिक स्पष्टपणें दिसून येईल. मॅझिनीनें गुप्त मंडळ्यांचें समर्थन मानवी कर्तव्यांत फारसें केलेलें नाहीं; उलटपक्षीं मॅक्स्विनीनें सशस्त्र प्रतिकाराची मुद्देसूद चर्चा सांगोपांग रीतीनें करून प्रतिपक्षीयांकडून उपस्थित करण्यांत येणाऱ्या मुद्द्यांचें खंडन केलें आहे. मानवी कर्तव्यांमध्यें व्यापक तत्त्वांच्या विवेचनावर आणि वैयक्तिक कर्तव्यपालन हें मानवजातीच्या प्रगतीला व परमेश्वराच्या संकेताच्या पूर्ततेला पोषक आहे हें सिद्ध करण्यावर विशेष भर दिलेला आहे. आपलीं कर्तव्यें कोणतीं हें व्यक्तीला दाखवून देणें हें मॅझिनीच्या ग्रंथाचें वैशिष्ट्य आहे. हीं तत्त्वें कृतींत आणण्यासाठीं व्यक्तीनें तयारी कशी करावी, कर्तव्यपालनाच्या मार्गांत कोणते अडथळे आडवे येतात व त्यांपासून च्युत करण्यासाठीं कोणते मोह भुरळ घालतात याचें मॅक्स्विनीनें विशेष बारकाईनें विवेचन केलेलें आहे. नैतिक सामर्थ्य व एकनिष्ठा या गुणांच्या संवर्धनाबर त्यानें अधिक भर दिलेला असून स्वातंत्र्याच्या लढ्यासाठीं व्यक्तिमात्रानें सदैव खडी तयारी ठेवली पाहिजे अशी त्याची मुख्य शिकवण आहे. वैयक्तिक तयारीच्या दृष्टीनें मूलतत्त्वांची योग्यता अधिक आहे. मॅक्स्विनीचे शब्द अत्यंत तिखट असून त्यांची घोषणा खड्या स्वरांत झालेली आहे. मॅझिनीचीं वचनें शांत ऋषीच्या मुखांतून प्रकट झाल्यासारखीं वाटतात तर मॅक्स्विनीचे शब्द स्वातंत्र्ययुद्धासाठीं सज्ज झालेल्या सैन्याला उद्देशून सेनापतीनें केलेल्या रणगर्जनेसारखे दणदणतात. आत्मिक सामर्थ्य, ऐतिहासिक परंपरा, धर्मश्रद्धा व तत्त्वनिष्ठा या महातत्त्वांवर दोघांचीही निष्ठा असल्यामुळें हे दोन्ही ग्रंथ तरुण महाराष्ट्रास स्फूर्तिदायक व मार्गदर्शक होतील असा आम्हांस भरंवसा आहे. आयर्लंडच्या, त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या स्वराज्यसाधनाच्या मार्गांत ब्रिटिश साम्राज्याचाच विरोध असल्यामुळें मूलतत्त्वांतील बोल आम्हांला अधिक पटण्यासारखे आहेत हें उघड आहे. शेवटीं एवढेंच सांगावयाचें, हे दोन्ही ग्रंथ शब्द सोडलेल्या घड्यांसारखे आहेत. कांहीं ठिकाणीं शब्द बदलले व कांहीं ठिकाणीं थोडेबहुत शब्द कमीअधिक केले म्हणजे त्यांमधील अर्थबोध स्पष्टपणें होऊं लागतो. देश, काल व स्थल यांनीं अबाधित असलेल्या तत्त्वांचें माहात्म्य यांतच आहे, आणि ह्याच दृष्टीनें हे ग्रंथ वाचण्यांत येतील अशी आम्हांस आशा आहे.

आतां फक्त भाषांतराबद्दल सांगावयाचें राहिलें; पण ह्यांत सांगण्यासारखें

असें कांहींच नाहीं. 'मानवी कर्तव्यें' प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं माझे मित्र श्री० विष्णु सखाराम कुलकर्णी, बी. ए., मुं० निप्पाणीकर यांनीं मूलतत्त्वांचें भाषांतर करण्याचा विशेष आग्रह केल्यामुळे मीं हें काम हातीं घेतलें. अनेक वैयक्तिक अडचणींमुळें हें काम तसेंच रेंगाळत राहिलें; तें आज पुरें झालें आहे. मानवी कर्तव्यांच्या तोडीच्याच एका ग्रंथाचें हें भाषांतर महाराष्ट्रवाचकांपुढें ठेवण्याची संधि मिळाल्याबद्दल मला एक प्रकारचें समाधान होत आहे. भाषांतर कसें झालें आहे हें वाचकांनींच ठरवावयाचें आहे. मूळांतील विचारांचा व भावनांचा जोरदारपणा कायम ठेवण्यासाठीं मीं शक्य तेवढी खबरदारी घेतलेली आहे व मजकुरांतील उल्लेखांवर टीपाही दिलेल्या आहेत. गैरसमजुतीमुळें अगर अज्ञानामुळें झालेल्या चुका कोणाच्या नजरेस आल्या तर त्यांनीं त्या मला कळविल्यास मी त्यांचा फार आभारी होईन आणि पुढील आवृत्तीचे वेळीं त्या अवश्य विचारांत घेईन.

कामाची अत्यंत निकड असतांही माझे विद्वान् हितचिंतक देश० अण्णासाहेब भोपटकर यांनीं प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

माझी ही तृतीय कृति महाराष्ट्रास प्रिय होईल अशी मला आशा आहे

मुंबई
ता. २५ जुलै १९२७

स. आ. जोगळेकर

प्रस्तावना

सुप्रसिद्ध आयरिश देशभक्त टेरेन्स मॅक्स्विनी याच्या Principles of Freedom या नांवाच्या पुस्तकाचें भाषांतर करून श्रीयुत सदाशिव आत्माराम जोगळेकर यांनीं मराठी वाङ्मयांत एका उत्कृष्ट ग्रंथाची भर घातलेली आहे, यांत संशय नाहीं. सुमारें सात वर्षांपूर्वीं अद्भुतरम्य अशा आत्मत्यागाबद्दल मॅक्स्विनीचें नांव दररोज वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊन त्याच्या प्रकृतीबद्दलच्या सविस्तर बातम्या दिल्या जात असत. तो आत्मत्याग आतां जरी भूतकालाचा विषय बनून राहिलेला असला, तरी आयर्लंडाच्या भावी पिढ्यांना तो खचित अत्यंत उज्ज्वल, उत्तेजक व आकर्षक असाच वाटत राहील !



" स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें " या मॅक्स्विनीच्या पुस्तकाचें अंतरंग समजण्यासाठीं त्याच्या चारित्र्याची थोडीफार माहिती असणें जरूर आहे. त्याचीं सर्वच मूलतत्त्वें सर्वांनाच सारखीं पटण्यासारखीं नसतील व नाहींतही. परंतु त्याच्या चारित्र्याची रूपरेखा जी त्यानें आंखलेली होती किंवा परिस्थितीनें त्यास आंखून दिलेली होती तिचा विचार करतां, त्यांचीं कांहीं कांहीं मूलतत्त्वें कांहीं अंशीं एकांगी व एककल्लीपणाचीं असणें स्वाभाविक होतें; तथापि, साधारणतः तीं सर्वांना व विशेषतः परतंत्र राष्ट्रांतील देशभक्तांना मार्गदर्शक होतील हें खास !

मॅक्स्विनीचा जन्म सन १८७९ सालीं झाला. घरच्या गरिबीमुळें मध्यंतरीं जरी त्याला जुजबी नोकरी करावी लागली, तरी सन १९०७ सालीं विश्वविद्यालयांतील शिक्षणक्रम पुरा केल्यामुळें त्यास बी. ए.ची पदवी देण्यांत आली. कॉलेजमध्यें असल्यापासूनच त्याचें लक्ष आपल्या मायदेशाच्या स्थितीकडे व तो स्वतंत्र करण्याच्या मार्गाकडे वळलेलें होतें ! देशाचें वाङ्मय प्रथम दास्यांतून मुक्त केल्याशिवाय बाकीचे प्रयत्न फोल होत, अशी

त्याची ठाम समजूत झाल्याकारणानें, मायभाषेचा उद्धार करण्याविषयीं स्थापन झालेल्या मंडळाचा तो सभासद झाला, व स्वभाषेंत ग्रंथरचना निर्माण करूं लागला. त्याचें 'क्रान्तिकारक' नांवाचें नाटक तर इतकें लोकप्रिय झालें कीं, त्याच्या हजारों प्रति हांहां म्हणतां उडून गेल्या !

अशा प्रकारें मॅक्स्विनी एका दृष्टीनें शांतपणानें आपला जीवनक्रम चालवीत असतां, महायुद्धाचा वणवा पेटला गेला व त्याबरोबरच मॅक्स्विनीसह कांहीं आयरिश देशभक्तांच्या अंतःकरणांत बीजरूपानें असलेले स्वातंत्र्याचें विचार अंकुरित होऊन वाढीस लागले, व शेवटीं सन १९१६ सालीं सार्वत्रिक बंडाची सिद्धता झपाट्यानें होऊं लागली. परंतु ऐन वेळीं कांहींतरी बिघाड होऊन बंडाची इतिश्री गर्भांतच झाली !

सन १९१४ ते १९२० या अवधींत एका बाजूस ब्रिटिश सार्वभौमसत्ता व दुसऱ्या बाजूस सीनफीन पक्ष या दोघांमध्यें तुमुल घनचक्कर जुंपून राहिलेली होती व या लढ्यांत मॅक्स्विनी सीनफीन पक्षातर्फे प्रामुख्यानें भाग घेत असे. यामुळें तो अर्थात् ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या डोळ्यांवर आल्याकारणानें त्याला तीनदां तुरुंगवास भोगावा लागला. परंतु यामुळें त्याचा धीर खचत जाण्याऐवजीं त्यास अवसान मात्र चढत गेलें; इतकें कीं, कॉर्क शहर सीनफीन चळवळीचें केंद्रस्थान होऊन तो लोकांचा जीव कीं प्राण असा बनला ! स्वयंसेवकांच्या पलटणी तयार करणें व त्यांना कवाइत शिकविणें, जागजागीं हिंडून फिरून जनतेमध्यें जागृति करणें, वर्तमानपत्रांतून लेख लिहिणें, निवडणुकी लढविणें, वगैरे कामें करण्याचा तर त्याचा नुसता सपाटा चाललेला होता ! सन १९१८ सालीं झालेल्या स्थानिक कौन्सिलच्या निवडणुकींत सीनफीन पक्षाचें सर्वत्र हमखास बहुमत झालें व टॉमस कर्टिन यास कॉर्क शहराचा नगराध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें. कर्टिनची कारकीर्द इतकी लोकप्रिय व लोकोपयोगी झाली कीं, आपणांस उत्तमांतील उत्तम नगराध्यक्ष लाभला, अशी सर्वांची खात्री झाली. परंतु ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना व त्याच्या कैवाऱ्यांना हें खपावें कसें ? सन १९२० च्या मार्च महिन्याच्या १९ व्या तारखेस भर मध्यरात्रीं तोंडावर बुरखे घेतलेल्या मारेकऱ्यांनीं कर्टिनच्या घरांत प्रवेश करून त्याला गोळ्या घालून ठार केलें ! यामुळें कॉर्क शहरांत एकच हाहाःकार उडून गेला !

कर्टिनची अशी गत झाल्यावर लोकप्रतिनिधींनीं एकमतानें मॅक्स्विनीची नगराध्यक्षाच्या जागेवर निवड केली. पण त्यालाही हा मान फार दिवस लाभला नाहीं. ऑगस्टच्या १६ व्या तारखेस त्याला कांहीं आरोपांवरून गिरफदार करण्यांत येऊन व ता. १८ रोजीं त्यास शिक्षा फर्मावण्यांत येऊन त्याची इंग्लंडांतील ब्रिक्स्टन तुरुंगांत रवानगी करण्यांत आली. खटल्याचे वेळीं त्यानें आपला बचाव करण्याचें साफ नाकारलें ! परंतु शिक्षा सुनाविल्यानंतर तो कोर्टास उद्देशून म्हणाला, "मी एवढेंच सांगतों कीं, तुमच्या सरकारनें कांहींही केलें तरी माझ्या बंदिवासाची मुदत माझी मी ठरविलेली आहे; जिवंत किंवा मेलेला, पण मीं एका महिन्यांत बंधमुक्त होण्याचा निश्चय केलेला आहे." या त्याच्या भाषणांतच त्यानें आपलें पुढील धोरण सूचित केलेलें होतें ! तुरुंगांत पाय ठेवल्यापासून त्यानें जें अन्न वर्ज्य केलें, तें अनेक यातना सोसाव्या लागल्या तरी शेवटपर्यंत ग्रहण केलें नाहीं ! त्याचें हे प्रायोपवेशन पुरे त्र्याहत्तर दिवस होऊन चौऱ्याहत्तराव्या दिवशीं त्याचा अमर आत्मा त्याच्या नश्वर कुडींतून निघून गेला ! मॅक्स्विनीच्या या भयंकर दिव्याची बातमी वाचून नुसतें आयर्लंडच नव्हे, तर सर्व जग नानाविध विचारांनीं व विकारांनीं हादरून गेलें !

मॅक्स्विनीचें हें लोकोत्तर कृत्य त्याच्या विशिष्ट विचारसरणीचा परिपाक होता ! या विचारसरणीचें प्रतिबिंब त्याच्या 'स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें' या ग्रंथांत स्वच्छ पडलेलें आपणांस दिसून येतें. या ग्रंथाचीं एकंदर एकोणीस प्रकरणें असून, त्यांमध्यें मॅक्स्विनीनें निरनिराळ्या विषयांवरील आपले विचार प्रगट केलेले आहेत. परंतु ते सर्व विचार एका सोनेरी सूत्रानें त्यानें एकत्रित केल्याचें कोणाच्याही तेव्हांच दृष्टोत्पत्तीस येईल. प्रतिपाद्य विषय साम्राज्याशीं फारकत असो, नाहींतर स्त्रीधर्म असो, लष्करी सामर्थ्य असो वा सशस्त्र प्रतिकार असो, त्या सर्वांचा विचार त्यानें एका विवक्षित भूमिकेवरच अधिष्ठित होऊन केलेला आपल्या नजरेस येतो. ती भूमिका म्हणजे अढळ ध्येयाची व अत्युच्च नीतिमत्तेची होय ! परतंत्र राष्ट्राला स्वातंत्र्य कां हवें, याचें उत्तर मॅक्स्विनी असेंच देतो कीं, पारतंत्र्यामुळें नैतिक अधःपात होतो व दुर्गुणाला उत्तेजन मिळतें म्हणून ! तो सत्तेच्या विरुद्ध नव्हता, किंबहुना आपल्या अमलाखालीं राहणाऱ्यांना आत्मोद्धाराकडे प्रवृत्त करणाऱ्या सत्तेचा

तो कैवारीच होता. मात्र हीनतेला पोहोंचविणाऱ्या सत्तेचा तो कट्टा शत्रु होता ! ब्रिटिश साम्राज्यापासून अलग झाल्याविना आयर्लंडांत ऐक्य उत्पन्न होणार नाहीं व आयर्लंडास आपलें नियोजित भवितव्य साध्य करण्याची पात्रता संपादन होणार नाहीं, असा त्याचा ठाम समज होता व म्हणूनच तो वारंवार असें म्हणे कीं, ब्रिटिश साम्राज्याशीं अल्पसाही संबंध असणें म्हणजे पारतंत्र्यच होय ! स्वातंत्र्याचें युद्ध हें धर्मयुद्ध आहे, व तें प्रत्येक आयरिश देशभक्तानें निर्धारानें व चिकाटीनें लढलें पाहिजे ! स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर, आयर्लंडानें इतर राष्ट्रांप्रमाणें स्वातंत्र्याचा दुरुपयोग न करतां त्याचा सदुपयोगच केला पाहिजे, आणि वैयक्तिक विकास व सार्वत्रिक सौजन्य यांना पूर्ण वांव मिळेलशी खटपट केली पाहिजे. परंतु हा सर्व खटाटोप धार्मिकतेच्या व नैतिक सामर्थ्याच्या शुद्ध पायावरच करण्यांत आला पाहिजे; कारण, उच्च मनोवृत्ति व उदात्त ध्येय हाच स्वातंत्र्याचा ताम्रपट होय ! आयर्लंडानें दृढ निश्चय, सुसंगति, सरलता व निर्भयता हे गुण आपल्या अंगीं बाणून घेण्याची शिकस्त केली पाहिजे; कारण, यांमुळें आयर्लंडाचें मन करारी व अजिंक्य होईल, व तें तसें झाल्यावर आयर्लंड स्वतःसच स्वातंत्र्य पैदा करूं शकणार नाहीं, तर खऱ्या स्वातंत्र्याची वृद्धि अखिल जगांत करूं शकेल ! हे व असलेच अनेक विचार अत्यंत मननीय नाहींत, असें कोण म्हणेल ?

राष्ट्रीय मन करारी व तेजस्वी बनण्यास राष्ट्राचें वाङ्मयही तसेंच ओजस्वी व स्फूर्तिदायक असलें पाहिजे ! मॅक्स्विनी म्हणतो, "सारस्वत हें राष्ट्राच्या अंतःकरणाचें सूचिपत्र आहे, राष्ट्रीय विकासाचें परिमाण आहे. स्वातंत्र्ययुद्ध निर्वाणीचें आहे का अंगचोरपणाचें आहे, हें राष्ट्राच्या वाङ्मयावरून सहज ताडतां येतें." केवळ रचनाचातुर्य व शब्दलालित्य यांत गुरफटून जाणाऱ्या कवींबद्दल व लेखकांबद्दल मॅक्स्विनीस तिरस्कारच वाटत असे. त्याच्या मतें कवि किंवा लेखक राष्ट्रीय असावा, राष्ट्रीय विचारांचा असावा, राष्ट्राला जिवंत करणाऱ्या व जिवंत ठेवणाऱ्या प्रतिभेनें संपन्न असा असावा !

धर्मासंबंधाचीं मॅक्स्विनीचीं मतें हिंदुस्थानच्या सद्यःस्थितींत विशेष चिंतनीय अशीं आहेत. या बाबतींत त्याचा असा ठाम सिद्धान्त कीं, ज्यासंबंधीं तीव्र मतभेद पूर्वीं अस्तित्वांत होते आणि आजही ज्यांबद्दल रणें

माजलेलीं आहेत असे महत्त्वाचे धार्मिक प्रश्न केवळ तात्पुरत्या तडजोडीसाठीं केव्हांहीं दृष्टिआड करूं नयेत किंवा दिखाऊ ऐक्यासाठीं बाजूला सारूं नयेत. तात्पुरत्या एकीच्या जोरावर फारतर लहानसहान कामें उरकतां येतील; परंतु राष्ट्रविमोचनाच्या महासंग्रामांत विजयी होण्याला अशी जुजबी एकी कधींही पुरी पडणार नाहीं. धर्म ही एक अशी महत्त्वाची, गुंतागुंतीची व जिव्हाळ्याची बाब आहे कीं, त्यावर घाला घालणाराबरोबर निकरानें लढण्यास कोणताही समाज नेहमींच सिद्ध असतो! तेव्हां धर्मासंबंधीं जी एकी व्हावयाची ती अंतःकरणपूर्वकच झाली पाहिजे! नाहींतर जुजबी एकीमुळें राष्ट्राचें कल्याण होण्याऐवजीं अखेरीस सपशेल फसगतच झाल्याशिवाय राहत नाहीं!

स्त्रीधर्मासंबंधीं लिहितांना तो म्हणतो, "राज्यकारभारासाठीं प्रतिनिधींची निवडणूक करतांना मत देण्याचा हक्क मिळविण्याची चळवळ करण्यापेक्षां आपल्या भगिनींना तेजस्वी व स्वावलंबी करण्याची खटपट करणें, संकट टाळण्याची तजवीज करण्यापेक्षां संकटाला तोंड देण्याची अगोदरपासूनच तयारी ठेवणें, हीं स्त्रियांचीं अधिक महत्त्वाचीं कार्यें होत. या दिशेनें स्त्रियांनीं शिक्षण मिळविलें म्हणजे कोणत्याही देशांत त्यांच्या चळवळीला मान्यता देण्यांत येईल आणि त्यांचा समान दर्जा नाकारण्यांत येणार नाहीं." स्त्री ही गृहलक्ष्मी व वैय्यक्तिक संसाराची अधिष्ठात्री देवता तर खरीच, व संसारास उचित अशा भावनांनीं तिनें अलंकृत असणें यांतही कांहीं वावगें नाहीं. परंतु यापलीकडेसुद्धां तिनें वस्तुतः कामगिरी करावयाची असते. जीवन-कलहामध्यें–मग तो वैय्यक्तिक असो वा राष्ट्रीय असो, पण विशेषतः राष्ट्रीय कलहामध्यें–आपला पति, मुलगा, बाप, भाऊ जर्जर होऊन भांबावून गेलेला असतांना त्याच्या अंतःकरणांत पुन्हा वीरश्री उत्पन्न करून त्यास कार्यप्रवण करणें हें स्त्रियांचें कर्तव्य अत्यंत महत्त्वाचें व निकडीचें आहे! मागें हटावें कां पुढें रेटावें, या विचारांत पुरुष गोंधळलेला असतांना, स्त्री त्यास ज्या-प्रकारचें प्रोत्साहन देईल त्याचाच अवलंब तो बहुशः करतो व या प्रोत्साहनाच्या स्वरूपांत व प्रकारांतच राष्ट्राचा उदय वा अधोगति अवलंबून असते! इतिहासांत अशीं अनेक उदाहरणें आहेत कीं, मोठमोठाल्या क्रान्तिकारक लढाया रणांगणावर वीर्योत्साहानें लढणाऱ्या पुरुष सैनिकांपेक्षां घरीं बसणाऱ्या स्त्रियांच्या उत्तेजनानेंच जिंकलेल्या आहेत!

सारांश, 'स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें' या पुस्तकांत मॅक्स्विनीनें नेहमीं समजल्या जाणाऱ्या स्वातंत्र्य या बाबीचाच विचार केलेला नसून ओघानें निघालेल्या अनेक विषयांवर आपलीं मतें ग्रथित करून ठेवलेलीं आहेत. अशा अत्यंत उपयुक्त, स्फूर्तिकारक व विचारशक्तीस मधून मधून जबर धक्का देणाऱ्या पुस्तकाचें मराठी भाषांतर माझे मित्र श्रीयुत सदाशिवराव जोगळेकर यांनीं करून, व श्रीयुत गणेश महादेव वीरकर यांनीं तें प्रसिद्ध करून खरोखरीच मराठी वाचकवर्गास उपकृत केलें आहे. श्री० जोगळेकर हे मराठी भाषेचे एक प्रख्यात व कसलेले लेखक असल्यामुळें साहजिकपणें त्यांचे हातून भाषांतर उत्कृष्ट झालें असून कांहीं कांहीं ठिकाणीं तर फारच बहारीचें वठलेलें आहे.


पुणें,
ता. २३ जुलै १९२७

ल. ब. भोपटकर

अनुक्रमणिका

प्रकरण	विषय	पृष्ठ
१	स्वातंत्र्याची प्रेरकशक्ति	१
२	साम्राज्याशीं फारकत	९
३	नैतिक सामर्थ्य	१९
४	बंधु व शत्रु	३०
५	सामर्थ्याचें रहस्य	४३
६	तत्त्वांचें कार्य	५८
७	निष्ठा	७६
८	स्त्रीधर्म	८९
९	सरहद्द	१०२
१०	सारस्वत व स्वातंत्र्य	११०
११	सारस्वत व स्वातंत्र्य [कलेसाठीं कला]	११८
१२	धर्म	१२६
१३	विचारस्वातंत्र्य	१३८
१४	लष्करी सामर्थ्य	१४७
१५	साम्राज्य	१५३
१६	सशस्त्र प्रतिकार–प्रास्ताविक	१६४
१७	सशस्त्र प्रतिकार–कायद्याचा खरा अर्थ	१७०
१८	सशस्त्र प्रतिकार–आक्षेप	१७८
१९	उपसंहार	१८४

स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें



मूळ ग्रंथकार

टेरेन्स मॅक्स्विनी

स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें

प्रकरण पाहिलें

स्वातंत्र्याची प्रेरकशक्ति

आम्हीं स्वातंत्र्यासाठीं कां लढावें? असा प्रश्न उपस्थित व्हावा आणि त्याला उत्तर देण्याची पाळी यावी हेंच विलक्षण नाहीं काय? स्वातंत्र्याचा लढा आज अनेक शतकें चाललेला आहे, आणि आजही हा लढा जागोजाग चालू आहे; पण या लढ्याचें खरें स्वरूप आणि या युद्धाला प्रेरणा देणारी आदिशक्ति यांचा उमज कित्येकांना अजूनही स्पष्टपणें झालेला नाहीं. या गैरसमजामुळें एक नैसर्गिकच पण विकृत परिस्थिति उत्पन्न झालेली आहे. एकाच पक्षाचे अनुयायी गणल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्तींचीं ध्येयें व कार्याच्या दिशा भिन्न असतात, आणि परस्परविरोधी गणल्या जाणाऱ्या पक्षांत सामील झालेल्या व्यक्तींमध्यें आपली कल्पनाही होणार नाहीं इतकें साधर्म्य असतें.

ह्याच प्रश्नाचा मी ऊहापोह करणार आहें. ध्येय उच्च असलें म्हणजे झालें, तें साधण्यासाठीं हव्या त्या व हव्या तितक्या हीन साधनांचा उपयोग केला तरी तें योग्यच आहे, हें तत्त्व आजकाल फार बोकाळलें आहे. आयर्लंडांत ह्या तत्त्वाचा बराच प्रसार झालेला असून आयर्लंडबाहेर तर त्यानें भयंकर धुडगूस मांडला आहे.

एका पक्षानें नामर्दपणाचे डावपेंच लढविले तर दुसरा पक्ष त्यावर तुटून पडतो; पण तसलेच डावपेंच लढवून जय मिळविणें शक्य असेल, तर त्यांचाच उपयोग करण्यास हा पक्ष मागेंपुढें पहात नाहीं. म्हणून, या परिस्थितींत रोखठोक सवाल-जबाबाची फार जरूर आहे. अधर्मानें मिळविलेला जय कोणत्याही पराजयापेक्षां अधिक लज्जास्पद आहे. ह्या तत्त्वाचें स्पष्टपणें विवरण झालें पाहिजे, कारण आज आम्ही ब्रिटिश साम्राज्यांतून फुटून बाहेर पडण्यास उद्युक्त झालों आहों.

एखाद्या परकी सत्तेचें साह्य मिळणें शक्य असल्यास तें स्वीकारून येथील ब्रिटिशांची सत्ता उडवून द्यावी, मग ज्या परकी सत्तेचें साह्य घ्यावयाचें ती इतरत्र इतरांच्या स्वातंत्र्याचीच गळचेपी करीत असेल तरी हरकत नाहीं; असें प्रतिपादन करणारे कित्येक लोक आपणांमध्यें आहेत. हा प्रयोग करून पहावयाची वेळ अजून आलेली नाहीं; पण हा मार्ग जबाबदार पुढाऱ्यांकडून सुचविला जात असल्यामुळें त्याच्या युक्तायुक्ततेचा विचार होणें जरूर आहे. इतरांच्या स्वातंत्र्यघाताला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें मदत करून आयर्लंडनें स्वातंत्र्य मिळविलें, तर त्या स्वातंत्र्यानें आयर्लंडचें कलंकित मुख उज्ज्वल होणार नाहीं; कारण आमचें स्वातंत्र्य हरण करणारांवर आज आम्ही ज्या शिव्याशापांचा वर्षाव करीत आहों ते सर्व शाप आमचे आम्हांवरच उलटतील. हीन साधनें उपयोगांत आणलीं तर आयर्लंडला सहज स्वातंत्र्य मिळेल अशी माझी खात्री झालेली आहे. म्हणूनच, भोंवतालच्या परिस्थितीचें परीक्षण करून आम्ही कोठें आहोंत व आमच्या निष्ठेचीं मूलतत्त्वें कोणतीं आहेत हें स्पष्टपणें जाहीर करणें अपरिहार्य झालें आहे. ऐहिक विजय, मग तो कितीही वैभवशाली असो, त्यामुळें नैतिक अधःपाताची भरपाई होणें अशक्य आहे, हीच माझी निष्ठाप्रतिज्ञा. हें महातत्त्व ज्या पक्षाला अमान्य असेल त्याशीं माझा काडीइतकाही संबंध नाहीं.

मग स्वातंत्र्यावर आमचा हक्क कोणत्या तत्त्वाच्या आधारानें पोंचतो? स्वातंत्र्याकडे पाहण्याच्या दोन दृष्टि आहेत. दुय्यम शिक्षण नुकतेंच पुरें झालेलें असतें व वयाची विशीही उलटलेली नसते अशा वेळीं तारुण्याच्या ताज्या दमांत मनुष्याचें मन प्रतिकाराकडे उसळ्या मारीत असतें, कानाला गोड वाटणाऱ्या कल्पना बोलून दाखविण्यांतच त्याला खरी मौज वाटत असते. अशा गोड कल्पना तरुणांच्याच मुखांतून वारंवार सशब्द होत असतात. या दिवसांत आपले शब्द खऱ्या मर्दाच्या मुखीं साजण्यासारखे आहेत असें दिसतांच मनुष्याच्या मनाला खरें समाधान होतें. स्वातंत्र्याची इच्छा प्रकट होण्याचा आणखी एक काल असतो. या वेळीं विशी उलटलेली असते; परिस्थितीचें परीक्षण करून मनुष्यानें आपल्या आयुष्याची दिशा ठरविलेली असते; अशा वेळीं मनुष्य आपलें

ध्येय साधण्यासाठीं पवित्र्यांत तयार असतो. जीवनकलहांत बऱ्याच झटापटी होऊन गेलेल्या असतात, पुष्कळ कडू अनुभव येऊन गेलेले असतात आणि जीवन स्थिर झालेलें असतें; वरवर उसळणाऱ्या खळबळीनें मनाची चलबिचल होत नाहीं; पण मानवी कार्याच्या मुळाशीं असलेल्या आद्यप्रेरक शक्तीशीं अंतःकरण समरूप झालेलें असतें. आपले शब्द मर्दाच्या मुखीं साजतील असे आहेत, या नाटकी देखाव्यानें आतां मनाला समाधान वाटत नाहीं; तर आपले शब्द हे खऱ्या मर्दाचेच शब्द आहेत अशी स्वतःची खात्री पटली तरच मनाला समाधान वाटतें. तरुणांचें स्वातंत्र्यस्वप्न रोमन सैन्याच्या विजयोन्मादानें नटलेलें असतें; शत्रूला तुडवीत जाणारे वीर त्यांचा जयजयकार करणारा लोकसमुदाय, फडफडणारीं निशाणें—एका दृष्टीनें पाहिलें असतां हें सुखस्वप्नही वाईट नाहीं. पण परिणत पुरुषाचें स्वातंत्र्यस्वप्न याहून भिन्न असतें; आणि तें तसें नसेल तर त्यासाठीं आत्मयज्ञ करावा अशी महती त्याला प्राप्तच होणार नाहीं.

धर्मरक्षणांतच स्वातंत्र्याची खरी महती आहे; ऐहिक दृष्टीनेंही स्वातंत्र्य फायदेशीर आहे; पण हा विचार अगदीं दुय्यम आहे. सजीव व्यक्ति-मात्राच्या शरीराला त्याचप्रमाणें आत्म्यालाही परमेश्वरानें कमी अधिक सामर्थ्य दिलेलें असतें. या ईश्वरदत्त शक्तींचा विकास करण्याची व्यक्तिमात्राला संधि मिळावी आणि संसारांतलें आपापलें स्थान योग्य रीतीनें अलंकृत करतां यावें हें व्यक्तीच्या दृष्टीनेंच नव्हे तर समाज-कल्याणाच्या दृष्टीनेंही अत्यंत महत्त्वाचें आहे. स्वतंत्र राष्ट्रांमध्यें आत्म-विकासाला अनुकूल अशी परिस्थिति असते. परतंत्र देशांतली परि-स्थिति याच्या अगदीं उलट असते. पारतंत्र्यामुळें देशांतील लोकांचा ऐहिक व नैतिक अधःपात होतो. परतंत्र देशांत सत्ताधाऱ्यांनीं लूट मांडलेली असते, म्हणून त्या देशांतील लोकांची ऐहिक स्थिति दिवसानुदिवस खालावत जाते. स्वतःची सत्ता दृढतर करण्यासाठीं परकी सत्ताधारी लांचलुचपतीसारखीं हलकीं साधनें उपयोगांत आणीत असल्यामुळें परतंत्र देशांतील लोकांचा नैतिक अधःपात होतो. पारतंत्र्यामुळें नैतिक अधःपात होतो, आणि दुर्गुणाला प्रत्यक्षपणें उत्तेजन मिळतें. म्हणूनच राष्ट्रीय पारतंत्र्याविरुद्ध चढाई करणें अवश्य आहे;

एखाद्या परकी सत्तेचें साह्य मिळणें शक्य असल्यास तें स्वीकारून येथील ब्रिटिशांची सत्ता उडवून द्यावी, मग ज्या परकी सत्तेचें साह्य घ्यावयाचें ती इतरत्र इतरांच्या स्वातंत्र्याचीच गळचेपी करीत असेल तरी हरकत नाहीं; असें प्रतिपादन करणारे कित्येक लोक आपणांमध्यें आहेत. हा प्रयोग करून पहावयाची वेळ अजून आलेली नाहीं; पण हा मार्ग जबाबदार पुढाऱ्यांकडून सुचविला जात असल्यामुळें त्याच्या युक्तायुक्ततेचा विचार होणें जरूर आहे. इतरांच्या स्वातंत्र्यघाताला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें मदत करून आयर्लंडनें स्वातंत्र्य मिळविलें, तर त्या स्वातंत्र्यानें आयर्लंडचें कलंकित मुख उज्ज्वल होणार नाहीं; कारण आमचें स्वातंत्र्य हरण करणारां-वर आज आम्ही ज्या शिव्याशापांचा वर्षाव करीत आहों ते सर्व शाप आमचे आम्हांवरच उलटतील. हीन साधनें उपयोगांत आणलीं तर आयर्लंडला सहज स्वातंत्र्य मिळेल अशी माझी खात्री झालेली आहे. म्हणूनच, भोंवतालच्या परिस्थितीचें परीक्षण करून आम्ही कोठें आहोंत व आमच्या निष्ठेचीं मूलतत्त्वें कोणतीं आहेत हें स्पष्टपणें जाहीर करणें अपरिहार्य झालें आहे. ऐहिक विजय, मग तो कितीही वैभवशाली असो, त्यामुळें नैतिक अधःपाताची भरपाई होणें अशक्य आहे, हीच माझी निष्ठाप्रतिज्ञा. हें महातत्त्व ज्या पक्षाला अमान्य असेल त्याशीं माझा काडीइतकाही संबंध नाहीं.

मग स्वातंत्र्यावर आमचा हक्क कोणत्या तत्त्वाच्या आधारानें पोंचतो? स्वातंत्र्याकडे पाहण्याच्या दोन दृष्टि आहेत. दुय्यम शिक्षण नुकतेंच पुरें झालेलें असतें व वयाची विशीही उलटलेली नसते अशा वेळीं तारुण्या-च्या ताज्या दमांत मनुष्याचें मन प्रतिकाराकडे उसळ्या मारीत असतें, कानाला गोड वाटणाऱ्या कल्पना बोलून दाखविण्यांतच त्याला खरी मौज वाटत असते. अशा गोड कल्पना तरुणांच्याच मुखांतून वारंवार सशब्द होत असतात. या दिवसांत आपले शब्द खऱ्या मर्दाच्या मुखीं साजण्यासारखे आहेत असें दिसतांच मनुष्याच्या मनाला खरें समाधान होतें. स्वातंत्र्याची इच्छा प्रकट होण्याचा आणखी एक काल असतो. या वेळीं विशी उलटलेली असते; परिस्थितीचें परीक्षण करून मनुष्यानें आपल्या आयुष्याची दिशा ठरविलेली असते; अशा वेळीं मनुष्य आपलें

ध्येय साधण्यासाठीं पवित्र्यांत तयार असतो. जीवनकलहांत बऱ्याच झटापटी होऊन गेलेल्या असतात, पुष्कळ कडू अनुभव येऊन गेलेले असतात आणि जीवन स्थिर झालेलें असतें; वरवर उसळणाऱ्या खळबळीनें मनाची चलविचल होत नाहीं; पण मानवी कार्याच्या मुळाशीं असलेल्या आद्यप्रेरक शक्तीशीं अंतःकरण समरूप झालेलें असतें. आपले शब्द मर्दाच्या मुखीं साजतील असे आहेत, या नाटकी देखाव्यानें आतां मनाला समाधान वाटत नाहीं; तर आपले शब्द हे खऱ्या मर्दाचेच शब्द आहेत अशी स्वतःची खात्री पटली तरच मनाला समाधान वाटतें. तरुणांचें स्वातंत्र्यस्वप्न रोमन सैन्याच्या विजयोन्मादानें नटलेलें असतें; शत्रूला तुडवीत जाणारे वीर त्यांचा जयजयकार करणारा लोकसमुदाय, फडफडणारीं निशाणें—एका दृष्टीनें पाहिलें असतां हें सुखस्वप्नही वाईट नाहीं. पण परिणत पुरुषाचें स्वातंत्र्यस्वप्न याहून भिन्न असतें; आणि तें तसें नसेल तर त्यासाठीं आत्मयज्ञ करावा अशी महती त्याला प्राप्तच होणार नाहीं.

धर्मरक्षणांतच स्वातंत्र्याची खरी महती आहे; ऐहिक दृष्टीनेंही स्वातंत्र्य फायदेशीर आहे; पण हा विचार अगदीं दुय्यम आहे. सजीव व्यक्तिमात्राच्या शरीराला त्याचप्रमाणें आत्म्यालाही परमेश्वरानें कमी अधिक सामर्थ्य दिलेलें असतें. या ईश्वरदत्त शक्तींचा विकास करण्याची व्यक्तिमात्राला संधि मिळावी आणि संसारांतलें आपापलें स्थान योग्य रीतीनें अलंकृत करतां यावें हें व्यक्तीच्या दृष्टीनेंच नव्हे तर समाजकल्याणाच्या दृष्टीनेंही अत्यंत महत्त्वाचें आहे. स्वतंत्र राष्ट्रांमध्यें आत्मविकासाला अनुकूल अशी परिस्थिति असते. परतंत्र देशांतली परिस्थिति याच्या अगदीं उलट असते. पारतंत्र्यामुळें देशांतील लोकांचा ऐहिक व नैतिक अधःपात होतो. परतंत्र देशांत सत्ताधाऱ्यांनीं लूट मांडलेली असते, म्हणून त्या देशांतील लोकांची ऐहिक स्थिति दिवसानुदिवस खालावत जाते. स्वतःची सत्ता दृढतर करण्यासाठीं परकी सत्ताधारी लांचलुचपतीसारखीं हलकीं साधनें उपयोगांत आणीत असल्यामुळें परतंत्र देशांतील लोकांचा नैतिक अधःपात होतो. पारतंत्र्यामुळें नैतिक अधःपात होतो, आणि दुर्गुणाला प्रत्यक्षपणें उत्तेजन मिळतें. म्हणूनच राष्ट्रीय पारतंत्र्याविरुद्ध चढाई करणें अवश्य आहे;

इतकेंच नव्हे तर पारतंत्र्याविरुद्ध मोहीम पुकारण्याबांचून गत्यंतरच रहात नाहीं. सैतानाशीं तडजोड अशक्य आहे. सत्ता धारण करण्याची खरी योग्यता त्याच शक्तीला आहे, कीं जी आपल्या अंमलाखालीं राहणारांना आत्मोद्धाराकडे प्रवृत्त करते. सत्ता बळकावून बसणाऱ्या शक्तीचा हा गुणच आहे, कीं ती नीचांत नीच अशा हीनतेला उत्तेजन देते. आमच्या इतिहासांत अशीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. आमचे राज्यकर्ते आमच्या देशांत दौरे काढतात तेव्हां ते आपल्या सत्तेला पाठबळ देणाऱ्या लोकांना पदव्या व थैल्या यांची खैरात करतात—पण त्यांपैकीं अधिक वजनदार थैल्या व वरिष्ठ पदव्या कोणाला मिळतात? परकी सत्तेशींही प्रामाणिकपणें वागणाऱ्या राजनिष्ठांना हीं बक्षिसें मिळत नाहींत; सार्वजनिक कार्य हातीं घेतांना राष्ट्राशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ घेऊन नंतर त्या शपथेचा भंग करणाऱ्या राष्ट्रघातक्यांनाच मोठ-मोठ्या पदव्या व मौल्यवान् नजराणे मिळतात. सन्मानाला खरोखर पात्र असणाऱ्या सज्जनांना खड्यासारखें निवडून बाजूला ठेवण्यांत येतें; आणि खरें पाहिलें असतां सर्वांनीं छीः थूः करावी अशी ज्यांची कवडीमोल किंमत त्यांना मोठ्या मानमरातबाला चढविण्यांत येतें. राष्ट्राशीं बेइमान होणाऱ्या त्या कारस्थान्यांच्या अंगीं मूळचे कांहीं सद्गुण असलेच पाहिजेत. हा मनुष्य स्वतंत्र देशांत जन्माला येता तर त्या गुणांच्या विकासाला अनुकूल अशी परिस्थिति लाधल्यानें त्याचा उद्धार झाला असता; पण दुसऱ्यांचा देश पादाक्रान्त करून बसलेल्या परकी सत्तेनें त्याच्या हीन भावनांनाच उत्तेजन दिलें. लांचलुचपतीनें कोणाचाही अधःपात होईल. मनुष्य हा कांहीं परमेश्वराचा पूर्णावतार नाहीं; सर्वस्वीं अनुकूल परिस्थिति असतांही सत्कार्य करणें जड जातें; अधःपातासाठीं चढाओढ लावून बक्षिसें ठेवल्यावर मोहाला बळी पडणार नाहींत असे संत आढळणें विरळा. आजपर्यंत आम्ही सर्वच सैतानाच्या आधीन झालों नाहीं हेंच भाग्य.

परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें ध्येयावरील निष्ठा डळमळीत होते; मनुष्याच्या अंगीं बीजरूपानें अस्तित्वांत असलेल्या शक्तीची मशागत होत नाहीं व त्या जागच्या जागीं सुकून जातात. निसर्गतः हृदयामध्यें उदात्त व भव्य

भावना स्फुरण पावाव्या, पण आज सर्वत्र पसरलेल्या निराशेच्या भयाण वातावरणांत आमचीं हृदयेंच निर्जीव होऊन सुकून जात आहेत. पारतंत्र्यामुळें आमचें चैतन्य नष्ट झालें आहे, आणि म्हणूनच आम्हांला स्वातंत्र्य हवें आहे.

एकूण, धर्माच्या हांकेनेंच मनुष्य जागृत होतो. उदात्त ध्येयामुळेंच मनुष्याला कार्याची स्फूर्ति होते. ध्येयाप्रमाणेंच ही प्रेरकशक्तिही भव्य व उदात्त असली पाहिजे. राष्ट्रभक्ति हीच आमची स्फूर्ति आहे. परक्यांचा द्वेष आणि भूतकालांतील अपमानांचा सूड घेण्याची बुद्धि, यांमुळें अशी स्फूर्ति प्राप्त होणें अशक्य आहे. नीट विचार करून पहा, कधीं कधीं मन चिरडीला गेलेलें असतें तेव्हां या प्रेरकशक्तीबद्दल विकृत कल्पना मनासमोर उभ्या राहतात. संकटांवर विजय मिळविण्याऐवजीं तीं कशींबशीं टाळणें हेंच या शक्तीचें कार्य आहे, अशी त्या वेळीं गैरसमजूत होण्याचा संभव असतो. प्रीति व भक्ति या भावना समर्थ, चैतन्यपूर्ण व दमदार आहेत; प्रीति हा फिकट व बुळबुळीत मनोविकार नाहीं हें लक्षांत ठेवा. एखाद्या कादंबरींत प्रीतीचें विकृत स्वरूप दाखविलेलें असेल, म्हणून युगायुगांना आनंदित करणाऱ्या उच्च प्रेमगीतांचा आपण तिरस्कार करावा कीं काय ? मूर्ख लोकांनीं पावित्र्याचें हंसें मांडलें, तरी आपण आपलें डोकें ताळ्यावर ठेविलें पाहिजे. पावित्र्याच्या साक्षात्कारासाठीं तळमळ लागलेला मनुष्य आपल्या हजारों बांधवांच्या निःशब्द मनोभावनांना सशब्द करीत असतो. काव्यांतील उन्माद, झुळझुळ वाहणाऱ्या निर्झराचें संगीत, संध्येचें वैभव आणि उषःकालाचें गंभीर दृश्य अशा भव्य व उदात्त सौंदर्याच्या अभावीं समर्थ हृदय संजीव राहणेंच अशक्य आहे. आज आमचा देश निःसत्त्व झालेला आहे, आमचें जीवन व्यर्थ आहे; असें होऊं नये आणि स्वदेश भव्य, उदात्त व चैतन्यमय व्हावा, यासाठीं कार्य करण्याकडे प्रवृत्त करणारी राष्ट्रभक्ति हीच एक मनोभावना आहे. राष्ट्रभक्ति या भावनेंत याहूनही खोल अर्थ भरलेला आहे.

भूतकालांतील अपमानांचा खरा सूड उगविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे आपण आहों त्याच स्थितींत राहणें हें होय. सद्यःस्थितींतलें आयर्लंड हा

इतकेंच नव्हे तर पारतंत्र्याविरुद्ध मोहीम पुकारण्याबांचून गत्यंतरच रहात नाहीं. सैतानाशीं तडजोड अशक्य आहे. सत्ता धारण करण्याची खरी योग्यता त्याच शक्तीला आहे, कीं जी आपल्या अंमलाखालीं राहणारांना आत्मोद्धाराकडे प्रवृत्त करते. सत्ता बळकावून बसणाऱ्या शक्तीचा हा गुणच आहे, कीं ती नीचांत नीच अशा हीनतेला उत्तेजन देते. आमच्या इतिहासांत अशीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. आमचे राज्यकर्ते आमच्या देशांत दौरे काढतात तेव्हां ते आपल्या सत्तेला पाठबळ देणाऱ्या लोकांना पदव्या व थैल्या यांची खैरात करतात—पण त्यांपैकीं अधिक वजनदार थैल्या व वरिष्ठ पदव्या कोणाला मिळतात? परकी सत्तेशींही प्रामाणिकपणें वागणाऱ्या राजनिष्ठांना हीं बक्षिसें मिळत नाहींत; सार्वजनिक कार्य हातीं घेतांना राष्ट्राशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ घेऊन नंतर त्या शपथेचा भंग करणाऱ्या राष्ट्रघातक्यांनाच मोठ-मोठ्या पदव्या व मौल्यवान् नजराणे मिळतात. सन्मानाला खरोखर पात्र असणाऱ्या सज्जनांना खड्यासारखें निवडून बाजूला ठेवण्यांत येतें; आणि खरें पाहिलें असतां सर्वांनीं छीः थूः करावी अशी ज्यांची कवडीमोल किंमत त्यांना मोठ्या मानमरातबाला चढविण्यांत येतें. राष्ट्राशीं बेइमान होणाऱ्या त्या कारस्थान्यांच्या अंगीं मूळचे कांहीं सद्गुण असलेच पाहिजेत. हा मनुष्य स्वतंत्र देशांत जन्माला येता तर त्या गुणांच्या विकासाला अनुकूल अशी परिस्थिति लाधल्यानें त्याचा उद्धार झाला असता; पण दुसऱ्यांचा देश पादाक्रान्त करून बसलेल्या परकी सत्तेनें त्याच्या हीन भावनांनाच उत्तेजन दिलें. लांचलुचपतीनें कोणाचाही अधःपात होईल. मनुष्य हा कांहीं परमेश्वराचा पूर्णावतार नाहीं; सर्वस्वीं अनुकूल परिस्थिति असतांही सत्कार्य करणें जड जातें; अधःपातासाठीं चढाओढ लावून बक्षिसें ठेवल्यावर मोहाला बळी पडणार नाहींत असे संत आढळणें विरळा. आजपर्यंत आम्ही सर्वच सैतानाच्या आधीन झालों नाहीं हेंच भाग्य.

परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें ध्येयावरील निष्ठा डळमळीत होते; मनुष्याच्या अंगीं बीजरूपानें अस्तित्वांत असलेल्या शक्तीची मशागत होत नाहीं व त्या जागच्या जागीं सुकून जातात. निसर्गतः हृदयामध्यें उदात्त व भव्य

भावना स्फुरण पावाव्या, पण आज सर्वत्र पसरलेल्या निराशेच्या भयाण वातावरणांत आमचीं हृदयेंच निर्जीव होऊन सुकून जात आहेत. पारतंत्र्यामुळें आमचें चैतन्य नष्ट झालें आहे, आणि म्हणूनच आम्हांला स्वातंत्र्य हवें आहे.

एकूण, धर्माच्या हांकेनेंच मनुष्य जागृत होतो. उदात्त ध्येयामुळेंच मनुष्याला कार्याची स्फूर्ति होते. ध्येयाप्रमाणेंच ही प्रेरकशक्तिही भव्य व उदात्त असली पाहिजे. राष्ट्रभक्ति हिच आमची स्फूर्ति आहे. परक्यांचा द्वेष आणि भूतकालांतील अपमानांचा सूड घेण्याची बुद्धि, यांमुळें अशी स्फूर्ति प्राप्त होणें अशक्य आहे. नीट विचार करून पहा, कधीं कधीं मन चिरडीला गेलेलें असतें तेव्हां या प्रेरकशक्तीबद्दल विकृत कल्पना मनासमोर उभ्या राहतात. संकटांवर विजय मिळविण्याऐवजीं तीं कशींबशीं टाळणें हेंच या शक्तीचें कार्य आहे, अशी त्या वेळीं गैरसमजूत होण्याचा संभव असतो. प्रीति व भक्ति या भावना समर्थ, चैतन्यपूर्ण व दमदार आहेत; प्रीति हा फिकट व बुळबुळीत मनोविकार नाहीं हें लक्षांत ठेवा. एखाद्या कादंबरींत प्रीतीचें विकृत स्वरूप दाखविलेलें असेल, म्हणून युगायुगांना आनंदित करणाऱ्या उच्च प्रेमगीतांचा आपण तिरस्कार करावा कीं काय ? मूर्ख लोकांनीं पावित्र्याचें हंसें मांडलें, तरी आपण आपलें डोकें ताळ्यावर ठेविलें पाहिजे. पावित्र्याच्या साक्षात्कारासाठीं तळमळ लागलेला मनुष्य आपल्या हजारों बांधवांच्या निःशब्द मनोभावनांना सशब्द करीत असतो. काव्यांतील उन्माद, झुळझुळ वाहणाऱ्या निर्झराचें संगीत, संध्येचें वैभव आणि उषःकालाचें गंभीर दृश्य अशा भव्य व उदात्त सौंदर्याच्या अभावीं समर्थ हृदय संजीव राहणेंच अशक्य आहे. आज आमचा देश निःसत्त्व झालेला आहे, आमचें जीवन व्यर्थ आहे; असें होऊं नये आणि स्वदेश भव्य, उदात्त व चैतन्यमय व्हावा, यासाठीं कार्य करण्याकडे प्रवृत्त करणारी राष्ट्रभक्ति हिच एक मनोभावना आहे. राष्ट्रभक्ति या भावनेंत याहूनही खोल अर्थ भरलेला आहे.

भूतकालांतील अपमानांचा खरा सूड उगविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे आपण आहों त्याच स्थितींत राहणें हें होय. सद्यःस्थितींतलें आयर्लंड हा

इंग्लंडच्या उरावरला धोंडाच आहे याबद्दल कांहीं शंका वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. इंग्लंडलाही हें कबूल आहे, नाहीं तर आमच्या संतोषासाठीं त्यानें इतके प्रयत्न—मग ते कितीही मूर्खपणाचे असोत—केले नसते. येथील असंतोषाची इंग्लंडला फिकीर वाटली नसती तर त्यानें आमच्याकडे ढुंकूनही पाहिलें नसतें. उलटपक्षीं आमचा इंग्लंडबरोबरचा संबंध तुटला तर त्यांत आमचें हित तर आहेच; पण आमच्या खालोखाल हें इंग्लंडलाही फायदेशीर होणार आहे. प्रथमदर्शनीं हें खरें वाटणार नाहीं, पण तें तसें आहे यांत बिलकूल संदेह नाहीं, आणि हें खुद्द इंग्लंडच्याही ध्यानांत आलेलें नाहीं. आयर्लंडच्या संरक्षणाची हल्लींची तजवीज अगदींच हास्यास्पद आहे. स्वतंत्र आयर्लंड स्वसंरक्षणाला समर्थ आहे; स्वतंत्र आयर्लंडवर स्वारी करण्याची कोणाचीही छाती होणार नाहीं. आम्ही स्वतंत्र झाल्यावर ज्यांत आमचा संबंध नाहीं अशा लढ्यांत आम्ही भाग घेऊं अशी मूर्खपणाची कल्पना कोणाच्याही मनांत येईल असें मला वाटत नाहीं. आयर्लंड तटस्थ वृत्तीचाच स्वीकार करील. आपल्या हक्कांची जाणीव झाल्यावर आणि आमची बुद्धि ताळ्यावर आल्यावर आम्हांला असेंच वाटेल यांत शंका नाहीं. राष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त झालें, कीं इतरांच्या स्वातंत्र्याचा घात करावयाचा नाहीं ही जबाबदारी त्याच्या शिरावर येते. सर्वांना स्वातंत्र्य असावें यांतच सर्वांची सुरक्षितता आहे. जगांत कोठें ना कोठें जुल्मजबरदस्ती चालू राहणारच, संपूर्ण जगाचें गाडें सुरळीतपणें चालविण्याची जबाबदारी एकाच राष्ट्राला स्वतःच्या अंगावर घेणें अशक्य आहे. पण प्रत्येक राष्ट्रानें आपला व्यवहार अशाच रीतीनें चालविला पाहिजे कीं, त्यामुळें सार्वत्रिक स्वातंत्र्य व सलोखा यांची वृद्धि होईल. इंग्लंडपासून आमची फारकत झाली तरच आयर्लंड व इंग्लंड यांची मैत्री होईल; हें प्रमेय प्रथमदर्शनीं दिसतें तितकें विचित्र नाहीं. इंग्लंडबरोबर आयर्लंडचा खडा लढा असावा असें वेड कोणी डोक्यांत घेऊन बसेल हें संभवत नाहीं. अशी कल्पना करणें हेंही अशक्य आहे. हेंच आमच्या स्वातंत्र्येच्छेचें समर्थन. आमच्या स्वातंत्र्यामुळें आमच्या शत्रूंचा तोटा नाहीं, फायदाच आहे. आम्ही आहों त्याच स्थितींत राहण्यांतच इंग्लंडचें खरें अहित आहे. इंग्लंडवर घाव घालण्याची संधि

आम्हांला मिळेल पण त्यामुळें आम्हांला मात्र सुख मिळावयाचें नाहीं. मानवजातीच्या हिताला स्वातंत्र्य कसें अपरिहार्य आहे हें यावरून दिसून येईल, स्वयंपूर्ण व अलग अशा अनेक राज्यसंस्था जागोजाग निर्माण करणें एवढेंच स्वातंत्र्याचें कार्य आहे असें नाहीं. वेगवेगळ्या राष्ट्रांमध्यें सलोखा उत्पन्न करणें व जगांत बंधुभाव प्रसृत करणें हेंही स्वातंत्र्याचेंच कार्य आहे.

हा मुद्दा इतक्या स्पष्टपणें सांगण्याचें कारण एवढेंच कीं, कोठेंही गैर-समजाला जागा राहूं नये. आम्ही स्वातंत्र्यासाठीं लढत आहों; या लढ्याला आम्ही पोकळ अभिमानानें प्रवृत्त झालेलों नाहीं. स्वातंत्र्य मिळवून आम्हांला इंग्लंडइतकें वाईट, किंवा हाच अर्थ दुसऱ्या शब्दांनीं व्यक्त करावयाचा म्हणजे, इंग्लंडइतकें मोठें व्हावयाचें नाहीं. व्यक्तिमात्राच्या ठायीं अस्तित्वांत असलेल्या गूढ चित्-शक्तीपासून आम्हांला स्फूर्ति मिळालेली आहे. आमचा वैयक्तिक व राष्ट्रीय विकास व्हावा अशी आम्हांला तळमळ लागलेली आहे. आम्हीं प्रगतीच्या मार्गाला तरी लागलें पाहिजे किंवा अधःपात तरी पत्करला पाहिजे. जगावयाचें तर स्वातंत्र्यासाठीं, आणि मरावयाचें तरीही स्वातंत्र्यासाठींच, इतका हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे; यांतच आमचा मोक्ष आहे. सर्व राष्ट्र स्वातंत्र्यासाठीं छाती ठोकून उभें राहिलें तर त्यांतच आमचा आनंद आहे; आम्हांला केवळ अद्वितीय यश मिळेल. स्वातंत्र्यासाठीं सज्ज झालेले वीर संख्येनें थोडे असले तरी त्यांची संख्या लहान आहे म्हणूनच त्यांनीं अत्यंत तत्त्वनिष्ठ असलें पाहिजे. स्वातंत्र्य हा व्यक्ति-मात्राचा हक्क आहे, हा हक्क व्यक्तीपासून हिरावून घेणें अशक्य आहे, आणि या हक्कासाठींच ते वीर सज्ज झाले आहेत. केवळ बहुमताच्या जोरावर हा हक्क चिरडून टाकणें अशक्य आहे आणि कोणींही कितीही तडफड केली तरी स्वातंत्र्य चिरडलें जाणें केवळ अशक्य आहे. स्वातंत्र्याच्या कैवाऱ्यांना छळ सोसावा लागेल—हद्दपार व्हावें लागेल, वेळप्रसंगीं फांशींही जावें लागेल—पण सुलतानांनीं स्वातंत्र्यवाद्यांचा कितीही छळ केला तरी स्वातंत्र्याचा उच्छेद होणें अशक्य आहे. स्वातंत्र्या-च्या रक्षणासाठीं पलटणींची जरूरी नाहीं, आणि स्वातंत्र्याची महती

गाण्यासाठीं महाकवींची आवश्यकता नाहीं—पण आजपर्यंत स्वातंत्र्याची महती अनेक कवींनीं गाइली आहे, व शेवटीं सर्व सैन्यें स्वातंत्र्याच्याच बाजूचीं होतील. स्वातंत्र्याचा फक्त एकच भक्त जिवंत राहिला तरी तो आपल्या निष्ठेचें माहात्म्य गाजवूं शकेल. असा एकही पुरुष निपजणार नाहीं इतकें आयर्लंड आज वांझ झालेलें नाहीं. आजपर्यंत आम्ही इतकीं शतकें जिवंत राहिलों ते कांहीं आतां घराभूत होण्यासाठीं नव्हे. पण या युद्धाचा खोल अर्थ व दैवी स्वरूप, जीविताची भव्य उदात्त प्रेरक-शक्ति, सन्मार्गानें स्वातंत्र्य मिळविणें म्हणजे मनुष्यजातीच्या कल्याणा-साठींच प्रयत्न करणें ही भावना—या सर्वांचा खरा अर्थ लक्षांत येतांच, मनुष्याला सत्याचाच स्वीकार करावा लागतो; मग तो मार्ग बहुमताला नापसंत असला तरी त्याला त्याची फिकीर वाटत नाहीं. सत्यासाठीं बहुजनसमाजाला विरोध करणें ही फार गंभीर गोष्ट आहे; पण बहुजन-समाज आज ज्या कल्पनेनें हुरळलेला आहे, त्यापेक्षां उच्चतर असें ध्येय आपल्या विजयानें त्यांना प्राप्त होईल या निष्ठेनेंच तो बहुमताला विरोध करीत असतो. असा मनुष्य अप्रसिद्ध असला तर त्याला कोणाचें साह्य मिळत नाहीं; तो प्रसिद्ध असला तर त्याच्या बद्दल अनेक गैरसमज पसर-तात, त्याची स्थिति कितीही खालावली तरी त्याला स्वतःला फिकीर वाटत नाहीं; परिस्थिति अनुकूल असेल तर तो तिचा आपल्या कार्या-साठीं प्रत्येक बाजूनें फायदा घेतो; तो केव्हांही चिरडला जात नाहीं, त्याला कोणीही गप्प बसवूं शकत नाहीं, तो कधींही निराश होत नाहीं. उद्यां आपणांस जें यश मिळणार आहे त्याच्या सिद्धीसाठीं तो आपल्या सहकाऱ्यांना उत्तेजन देत असतो. स्वातंत्र्यासाठीं तळहातावर शिर घेऊन जिवावर उदार झालेल्या या अल्पसंख्याक वीरांचा या युद्धांत जरी देहपात झाला, तरी त्यांच्या अंतकालींच त्यांच्या कार्याला यश येतें; कारण त्यांच्या अंतःकरणांत जें स्वप्न स्फुरण पावलें होतें तें त्यांच्या आत्मार्पणानें त्यांच्या देशबांधवांच्या चित्तासमोर उभें राहतें; आपल्या देशबांधवांच्या विरोधाला न जुमानतां त्यांना ज्यानें त्या ध्येयाची स्फूर्ति दिली त्याच्या कार्याचें समर्थन होतें. आत्मार्पणाचे बेळींच तो आपल्या बांधवांना आत्मोद्धाराचा संदेश निवेदन करून त्यांचा रक्षणकर्ता होतो.

प्रकरण दुसरें
साम्राज्याशीं फारकत

ब्रिटिश साम्राज्यांतून फुटून निघाल्यावांचून आमचा उद्धार होणें अशक्य आहे, आणि आम्ही स्वतंत्र झालों तरच आमचें इंग्लंडशीं कायमचें सख्य होईल, असें आम्ही प्रतिपादन करतों तेव्हां वेगवेगळ्या मतांचे लोक आम्हांला विरोध करण्यासाठीं पुढें सरसावतात. या विरोधकांचीं मतें कितीही भिन्न भिन्न असलीं तरी एका बाबतींत मात्र त्यांची पूर्ण एकवाक्यता असते. शांतपणें व मुद्देसूद वादविवाद करून आमचीं मतें खोडून काढण्याची त्यांपैकीं एकाही पक्षाची तयारी नसते. या विरोधकांपैकीं कोणींही ह्या प्रश्नाचा खोल विचार केलेला नसतो, व त्यांचें डोकें वादविवादाच्या भरांत ताळ्यावर रहात नाहीं. कांहीं लोक हा विषय नुसता हंसण्यावारी उडवून देतात. मि० रेडमंड* किंवा मि० ओ ब्रिएन† यांच्या ज्वलत्-जहाल अनुयायांबरोबर विचारविनिमय करण्यासारखी परिस्थिति आज नाहीं—पण या लोकांची फिकीर करण्याचें कारण नाहीं; कारण

---

*रेडमंड (१८५१–१९१८) आयरिश पुढारी. १९०० सालीं यानें राष्ट्रीय पक्षांत एकी घडवून आणली. १९०० व १९०६ सालीं झालेल्या पार्लमेंटाच्या निवडणुकींत अनुक्रमें युनियानिस्ट व इंडिपेंडंट लिबरल्स् या इंग्रजी पक्षांना हमखास बहुमत मिळाल्यामुळें आयरिश प्रतिनिधींना अडवणूक करतां आली नाहीं. पूर्वीं पार्नेल व ओकोनेल या आयरिश प्रतिनिधींनीं आपल्या मताच्या जोरावर पार्लमेंटांत महत्त्व मिळविलें होतें; कारण त्या वेळीं दोनही पक्षांचीं मतें बहुधा सारखींच असल्यामुळें ज्याला आयरिश प्रतिनिधि मिळतील त्या पक्षाला जय मिळत असे. या परिस्थितीच्या जोरावर पूर्वीं पुढाऱ्यांनीं आयर्लंडचा पक्ष पुढें आणला होता. १९१० सालच्या निवडणुकींत रेडमंडला पुनः महत्त्व प्राप्त झालें; कारण या वेळीं लिबरल व युनियनिस्ट लोकांना सारखेच प्रतिनिधि मिळाले. १९१२ सालीं आयरिश बिल पार्लमेंटपुढें यावयाचें ठरलें तेव्हां अल्स्टरनें सवता सुभा मागितला, आणि आपल्या मागणीला जोर यावा

स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें

कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचें सार्वजनिक कार्य करण्याची त्यांची तयारी असते. स्वदेशांत एखादें महत्कार्य अथवा महान् आत्मयज्ञ होईल त्या दिवशीं एकाएकीं विद्युत्संचार झाल्याप्रमाणें आमच्या देश-बांधवांचा आळस व पूर्वापार चालत आलेल्या गैरसमजुती एकदम नाहींशा होतील; त्या दिवशीं सर्व लोक स्वातंत्र्यासाठीं आरोळी ठोकून अघाडीवर येतील, आणि त्यांच्या अंतःकरणांत जागृत झालेलें स्वातंत्र्याचें ध्येय सत्य, धरिोदात्त व भव्य असेल. त्या दिवसाची पूर्वतयारी करणें हें आजचें कार्य आहे. आमचे कांहीं मित्र तत्त्वज्ञानांत गर्क होऊन बसले आहेत. ते माझें प्रतिपादन शांतपणें ऐकून घेतील, अशी माझी अपेक्षा आहे. माझीं सर्वच तत्त्वें त्यांना मान्य होतील असें नाहीं. फार काय, माझें एकही तत्त्व त्यांना पटणार नाहीं; पण ते माझ्यावरोबर आले तर त्यांना मी दाखवून देईन, कीं हंसण्यावारी घालविण्याइतका हा प्रश्न हलका नाहीं.

हा प्रश्न किती गंभीर आहे, हें लोकांच्या अजून लक्षांत आलेलें नाहीं; हा दोष लोकांचा नव्हे. आमचें धोरण उच्च व हितकारक आहे हें आम्हींच त्यांना दाखवून दिलेलें नाहीं. स्वातंत्र्य हा आमचा हक्क

म्हणून स्वयंसैनिकांचें सैन्य उभारलें. याला प्रत्युत्तर म्हणून आयरिश लोकांनीं १९१४ सालपर्यंत एक लाख स्वयंसैनिक उभे केले. ही सर्व चळवळ ज्वलज्जहाल पक्षानें केली. या पक्षाच्या वाढत्या बळामुळें रेडमंड-चें वजन कमी झालें. महायुद्ध सुरू झालें तेव्हां राष्ट्रीय पक्षाच्या वतीनें रेडमंडनें साम्राज्याला मदत करावयाची तयारी दाखविली. पण सिनफेन पक्षानें विरोध केल्यामुळें लोक सैन्यांत येईनात; या पक्षानें १९१६ सालीं डब्लिन येथें बंड उभारलें. या बंडानें रेडमंडचा धीर खचला. त्यानें आयर्लंडच्या फाळणीला संमति दिली तेव्हांपासून त्याचें वजन सारखें कमी होत गेलें. १९१८ सालीं तो हृदयक्रिया बंद पडून मृत्यु पावला.

‡. **ओब्रिएन**—ज्वलज्जहाल पक्षाचा पुढारी. रेडमंडच्या मवाळ प्रवृत्तीला यानें कसून विरोध केला.

आहे असें गृहीत धरून तें मिळविण्यासाठीं हवी ती किंमत द्यावी लागली तरी हरकत नाहीं, आम्ही स्वातंत्र्य मिळवूंच, अशी प्रतिज्ञा करून आम्ही लढलों; पण जीविताच्या तत्त्वज्ञानांतील स्वातंत्र्याचें स्थान आम्हीं निश्चित केलें नाहीं. या विषयाबद्दलची लोकांची अनास्था हेंच दाखवीत आहे. आपण या विषयाचा तात्त्विक दृष्टीनें विचार केला पाहिजे संपूर्ण सृष्टि नियमबद्ध व एकतान आहे, मानवी ज्ञान वाढेल तसतसे सृष्टि-व्यापाराचे नियम आपणांस अवगत होतील आणि सृष्टीची एकतानता व नियमबद्धता यांचा आपणांस बोध होईल, असें तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ यांचें म्हणणें आहे. स्वातंत्र्यामुळें स्वदेशांत ऐक्य उत्पन्न होईल, राष्ट्रीय जीवन एकतान होईल व या राष्ट्राचा उद्धार होईल, राष्ट्राराष्ट्रांच्या बंधुसमाजांत आम्हांला योग्य स्थान प्राप्त होईल. आमच्या राष्ट्राचें नियोजित भवितव्य साध्य करण्याची पात्रता आमच्या अंगीं येईल—हें भवितव्य दिव्य असून तें या लढ्यामुळेंच साध्य होणार आहे—हें तटस्थ लोकांना सिद्ध करून दाखविणें हें आमचें, साम्राज्यांतून फुटून निघावें असें म्हणणारांचें, काम आहे. स्वातंत्र्य हें महत्तत्त्व इतकें जहाल आहे कीं, तें सिद्ध होण्यापूर्वीच सगळ्यां-च्या जीवनावर पगडा बसवितें, आणि आचाराचे कडक नियम घालून देतें. स्वातंत्र्यासाठीं स्वार्थत्याग, जीवापाड श्रम, अखंड सहनशीलता आणि कदाचित् ध्येयसिद्धीपूर्वीं देहत्यागही करावा लागतो. एवढा आत्मयज्ञ करावा लागला तरी बेहेत्तर, स्वातंत्र्य मिळविलेंच पाहिजे, एवढी स्वातंत्र्या-ची महती आहे हें आपण सृष्टिनियमांच्या आधारानें सिद्ध करून दाखविलें पाहिजे—स्वातंत्र्याचें समर्थन व नियंत्रण करणारीं तत्त्वें बुद्धीला पटतील अशा रीतीनें आपणांस मांडून दाखवितां आलीं तरच लोक स्वातंत्र्यानुयायी होतील. नुस्त्या वाक्पांडित्यानें हुरळण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत. आतां आपण केलेल्या स्वातंत्र्याच्या परीक्षणामुळें स्वातंत्र्य स्फूर्तिदायक व चित्तवेधक आहे असें आपणांस आढळून येईल; मात्र आपल्या मनांत पूर्वापार रुजलेल्या गैरसमजुती सोडून द्यावयास आपण तयार असलें पाहिजे. परंपरेनें रूढ झालेलें असत्य सोडावयाची तयारी नसल्यास सत्याचा त्याग करावयाची पाळी येईल. प्रगति होत जाईल तसतसें धैर्य वाढेल; स्वातंत्र्य हें सकलांच्या बंधमोचनासाठीं व कल्याणासाठीं आहे;

संपूर्ण जग—जगाचा एकादा कोंपरा नव्हे—सर्वांना नांदण्याजोगें आनंदभुवन व्हावें हें स्वातंत्र्याचें उद्दिष्ट आहे, हें आपण ध्यानांत बाळगलें पाहिजे. म्हणजे शेवटीं आपणांस खात्रीनें यश मिळेल.

ह्या दृष्टीनें या विषयाची मांडणी केली तर गंभीर वृत्तीच्या माणसांना स्वातंत्र्याची महती कळून त्यांचें चित्त त्यावरच खिळून राहील. हा प्रश्न हंसण्यावारीं नेणारा मनुष्य त्याबद्दल विचार करण्यास तयार होईल, पण त्याची खात्री पटणार नाहीं. आमच्या दुर्बलतेची शत्रूच्या सामर्थ्याशीं तुलना करून तो म्हणेल, "तुमचें तत्त्वज्ञान सुंदर आहे; पण तें एक सुखस्वप्न आहे, इतकेंच." एवढें मात्र खरें कीं, ह्या स्वप्नाचा त्याच्याही मनावर परिणाम झालेला आहे; आम्ही ज्या आदितत्त्वाचें समर्थन करितों त्याचा त्यानें पुरस्कार करीपर्यंत, त्याची समजूत घालीत घालीत त्याला हळुहळू पुढें नेणें आतां सोपें झालेलें असतें.

त्याच्या मनासमोर स्वातंत्र्यासंबंधीं एकच मुख्य अडचण उभी राहते; स्वातंत्र्यासाठीं केलेल्या कार्याचें फल मनुष्याला याच जन्मांत दिसलें पाहिजे असा त्याचा आग्रह असतो. हें अशक्य आहे. मनुष्याचें आयुष्य वर्षांनीं मोजतात तर राष्ट्राचें जीवन शतकांनीं मोजावयाचें असतें. राष्ट्र-कार्य हें भविष्यकालासाठींच करावयाचें असतें; अर्थात् फल पुढल्या पिढीपर्यंत दिसलें नाहीं तरी हरकत नाहीं. मनुष्यानें राष्ट्रकार्य करण्यास तयार असलें पाहिजे. व्यक्तिशः मनुष्य तरी असेंच करीत असतो. लहानपणीं व तारुण्यांत मनुष्य जो विद्याभ्यास अगर कामधंदा करतो त्याचें फळ त्याला वयांत आल्यावरच मिळतें. लहानपणचें त्याचें कार्य जितकें एकाग्रपणें व सर्वांगपरिपूर्ण झालेलें असेल तितकें त्याचें भावी आयुष्य यशस्वी होतें. मोठेपणीं उत्कृष्ट फळें प्राप्त व्हावींत म्हणून मनुष्य लहानपणीं जीवनक्षेत्राची मशागत करून यशाचें बीजारोपण करतो. राष्ट्राचेंही असेंच आहे. राष्ट्राच्या भावी यशाचें बीजारोपण आपण आज केलें पाहिजे आणि हें करीत असतांना भावी यश पुढल्या पिढीलाच नव्हे तर अनेक पिढ्या लोटल्यानंतर राष्ट्राला प्राप्त होणार आहे हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. भावी यशाचा एक अंशही आपल्या हयातींत दिसणार नाहीं व जन्मभर आपणांस प्रतिकूल परिस्थितीशीं झगडावें लागेल असें

मात्र नव्हे. आपल्या कार्याचें थोडेंबहुत फळ आपणांस दिसेल; पण राष्ट्राचें संपूर्ण वैभव पाहणें मात्र आपल्या नशिबांत दिसत नाहीं. राष्ट्राच्या भावी स्वातंत्र्याप्रीत्यर्थ आपण कांहीं कार्य केलें आहे ही जाणीव होऊं लागतांच मनाला अपरिमित समाधान मिळतें. भावी वैभवाचें दिव्य दर्शन अंतश्चक्षूंना होतें; राष्ट्रीय ध्येयाची योग्य जाणीव झाली, कीं कोणत्याही जुलुमाच्या धाकानें मनुष्य त्यापासून परावृत्त होत नाहीं आणि राष्ट्राचें ध्येय खास खास सिद्ध होईल अशी त्याची खात्री होते. त्याच्या या निष्ठेविरुद्ध कोणी कसलेही मुद्दे पुढें आणो, त्यामुळें त्याची निष्ठा अधिकच दृढ होते आणि शेवटीं त्याचेंच दूरदर्शित्व सिद्ध होतें. भूतकालाची शिकवण त्याला स्पष्टपणें समजून येते, आणि वर्तमानकाळांतील गलबल्यांतही इतिहासाच्या घडणीची दिशा त्याला स्पष्टपणें दिसून येते. या अनुभवाच्या अनुरोधानें तो आपल्या जीवितकार्याची मांडणी करतो, इतरांच्या मतांना न जुमानतां त्याचें कार्य चालू राहतें, व शेवटीं अपेक्षेपेक्षां शतपटीनें अधिक यश त्याला प्राप्त होतें. आपल्या जीवनाचा उपयोग तो उदात्त ध्येयांच्या सिद्धीसाठीं करतो, देशाला चिर यश मिळावें म्हणून तो आपल्या आयुष्यघटिकेचा यज्ञ करतो. मरतेवेळीं तो प्राचीन महात्म्यांच्या जोडीला जाऊन बसलेला असतो व लोक त्याचें नांव कधींही विसरत नाहींत. खऱ्या दृष्टीनें पाहिलें असतां ह्यालाच व्यावहारिक मनुष्य म्हणतां येईल. व्यावहारिक मनुष्य या शब्दाचा जगांत आज दुसराच एक विपरीत अर्थ रूढ झालेला आहे. या नागव्या व्यावहारिकाला वाटत असतें कीं, राष्ट्राच्या व्यवहारासाठीं आपल्या संसाराचा होम करणें हा केवळ मूर्खपणा आहे. केवळ चालू घटकेसाठीं जिवंत राहणारा मनुष्य हा जगांतला अत्यंत निरुपयोगी प्राणी होय. जगाच्या इतिहासांतल्या वाळवंटांत स्वार्थी व क्षणिक फायद्यावर नजर ठेवणाऱ्या लोकांच्या प्रेतांचे अनेक सांगाडे पडलेले आहेत, त्यांचे सारे श्रम फुकट गेलेले आहेत–याचा त्यानें विचार करून पहावा.

चालू घटकेकडे नजर लावून बसलेले लोक नेहमीं बाह्य देखाव्याकडेच लक्ष देत असतात. ते म्हणतील, "ब्रिटिश साम्राज्याच्या सामर्थ्याकडे

पहा आणि स्वदेशाच्या दौर्बल्याकडे पहा; म्हणजे स्वातंत्र्याची आशा च्यर्थ आहे हें तुमचें तुम्हांलाच दिसून येईल." जनता चिरंजीव आहे, साम्राज्यें क्षणभंगुर आहेत; ह्या एकाच महान् सत्याचा त्यांनीं विचार करावा. प्राचीन काळचीं साम्राज्यें आज कोठें आहेत ? आणि आज जीं साम्राज्यें हयात आहेत त्यांच्या नाशाचीं बीजें त्यांच्या वैभवांतच वाढत असलेलीं आढळून येतील. प्राचीन साम्राज्यें अस्तित्वांत आलीं व विस्तार पावलीं, त्यांची सत्ता व जुलूम हीं आज नष्ट झालीं आहेत. पण त्यांची सत्ता ज्या समाजावर होती ते अजून जिवंत आहेत. आज ते संघटित झाले आहेत व आजच्या साम्राज्यांबरोबर स्वातंत्र्यासाठीं झगडत आहेत. कांहीं दिवसांनीं तीं साम्राज्यें धुळीला मिळतील, पण हीं राष्ट्रें स्वतंत्र होऊन चिरंजीव होतील. असें अढळपद आपणांस प्राप्त होणार आहे. ध्येयावरील निष्ठा जितकी दृढ असेल तितकें उच्च स्थान आम्हांला भविष्य-काळांत प्राप्त होईल.

आमचें स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या शत्रूंबरोबर आज अनेक वर्षें आमचा लढा चाललेला आहे. हें युद्ध बंद व्हावें, आमच्या देशांत शांतता नांदावी आणि आमच्या शत्रूंनीं आम्हांला सन्मानानें वागवून आमच्याशीं तह करावा, असें आज कोणत्या पक्षांतील विचारी माणसांना वाटत नाहीं ? जनतेला विसावा मिळून देशाच्या सर्व शक्तींचें पुनरुज्जीवन व्हावें आणि राष्ट्राचा आत्मा सशब्द व्हावा; काव्य, संगीत व कला यांच्या विकासानें राष्ट्राचें अंतःकरण प्रफुल्ल व्हावें; आज अनेक वर्षें भोगीत असलेल्या पारतंत्र्याच्या अपेष्टांमधून सुटका होऊन आम्हांला स्वातंत्र्याचा सवैभव व संपूर्ण आनंद प्राप्त व्हावा असें कोणाला वाटत नाहीं ? आज सर्वांच्या चित्तचक्षूंसमोर हेंच सुखस्वप्न खेळत आहे. सर्वांगपरिपूर्ण स्वातंत्र्य मिळेपर्यंत देशांत शांतता नांदणें शक्य आहे अशी कोणाची कल्पना आहे काय ? ब्रिटिश साम्राज्याशीं अल्पसाही संबंध असणें म्हणजे पारतंत्र्यच होय. बाह्यतः क्षुद्र दिसणारे हे संबंधच पुढेंमागें आमचा घात करतील. या बंधनामुळें पुढेंमागें ब्रिटिश पार्लमेंटबरोबर दोन हात करण्याचा प्रसंग आमच्यावर येणार हें उघड आहे. इंग्लिशलोक स्वतःच्या फायद्याकडे पाहणार आणि आम्ही आमच्या फायद्याकडे पाहणार, तेव्हां त्यांचे

आमचे वारंवार खटके उडणार यांत संशय नाहीं. एकाच देशांतले वेगवेगळे पक्ष लहानसहान बाबतींतही हमरीतुमरीवर येतात; एका पक्षाचा कार्यक्रम दुसऱ्या पक्षाला हानिकारक व पीछेहाटीचा वाटतो; पण कोणत्याही कार्यक्रमावर दोनही पक्ष एक होत नाहींत; कधीं कधीं तर दोन्ही पक्ष एकमेकांवर विश्वासघाताचा आरोप करीत असलेले दिसून येतात. पक्षयुद्धांचा हा नियमच आहे; त्यांचें भांडण मिटणें अशक्य आहे. आमचा ब्रिटिश साम्राज्याबरोबरचा झगडा यापेक्षां कितीतरी पटींनीं अधिक निकराचा आहे. त्यांची जात वेगळी, आमची जात वेगळी; इतकेंच नव्हे तर त्यांचे व आमचे देशही अगदीं भिन्न आहेत; जणुं काय परमेश्वरानें या दोन मानववंशांना वेगवेगळीं घरेंच बांधून दिलीं आहेत; इंग्लंडचें व आमचें रक्त एकच असतें तरीही त्यांचें आमचें पटलें नसतें. हें समजण्याला एकट्या अमेरिकेचें उदाहरण पुरें आहे. मुलें वयांत आलीं म्हणजे तीं विभक्त होतात व स्वतंत्रपणें बिऱ्हाड करून राहतात; त्यांचें आपल्या आईबापांवर पुष्कळ प्रेम असतें; पण बाप जर आपल्या मुलाच्या संसारात ढवळाढवळ करूं लागेल व लहानसहान बाबतींतही त्याच्यावर हुकमत गाजवूं लागेल, तर बापलेकांचा खात्रीनें खटका उडेल. हा मुद्दा आणखी स्पष्ट करून दाखविण्याची जरूर नाहीं. आयर्लंडचे रहिवासी झालेले सर्व लोक जन्माचे इंग्रज असते आणि तेवढ्या जोरावर इंग्लंडनें आमच्यावर हुकमत गाजाविण्याचा हट्ट धरला असता, तरी त्यांची आमची झटापट झाली असती, आणि याचा परिणाम म्हणजे इंग्लंडची व आमची फारकत झाली असती. आमची जात कोणतीही असती तरी आम्ही इंग्लंडबरोबर शेजारधर्मानेंच वागलों असतों; पण इंग्लंडनें आम्हांला फसवून खोड्यांत घातलें, आमचे हाल केले. इंग्लंडांतील व आयर्लंडांतील अनेक पिढ्या यापुढें गुण्यागोविंदानें नांदतील तेव्हां कदाचित् आम्हीं भोगलेल्या हाल-अपेष्टांची आठवण आमच्या अंतःकरणांतून नाहींशी होईल. इंग्लंडबरोबर जो तहनामा व्हावयाचा त्याबद्दलही मनांत कांहीं संशय राहतां कामा नये. इंग्लंडचें आयर्लंडवर एखादेंही औपचारिक बंधन अस्तित्वांत आहे तोंपर्यंत असा तहनामा होणें अशक्य आहे. राष्ट्रीय तेज एकदां जागृत

झालें, कीं त्याला पारतंत्र्याचीं अगदीं पारदर्शक व झिरझिरीत बंधनेंहीं सहन होत नाहींत; राष्ट्राचें पौरुष या बंधनांना सारखा विरोध करीत असतें. फारकत व समान दर्जा यांमुळेंच आमच्या मनांत इंग्लंडबद्दल स्नेहभाव उत्पन्न होईल. दुसऱ्या कोणत्याही साधनांनीं दिलजमाई होणें शक्य नाहीं. कारण वैयक्तिक विकास आणि सार्वत्रिक सौजन्य हींच मानवी जीविताची शिकवण आहे. आम्ही शेजाराला उत्कृष्ट आहोंत; पण आमचें शत्रुत्व मात्र फार भयंकर आहे. वंशपरंपरेनें आमच्याशीं शत्रुत्व करणाऱ्या आमच्या शेजाऱ्यांना आमचें शत्रुत्व सहन होणार नाहीं. वर्तमानकाळांत आशा दिसत आहे, आमचें भविष्य विकसित होत आहे, आम्ही आमचें ध्येय खास मिळवूं. सवैभव भविष्यकालाला योग्य अशी पात्रता आपण मिळवूं या.

लक्षांत ठेवा, आम्हांला आमची योग्यता वाढविली पाहिजे. आम्हांला स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे, स्वदेश मोकळा करावयाचा आहे, आमचें भवितव्य साध्य करावयाचें आहे, आणि असें असूनही आम्हीं इतिहासाच्या शिकवणीचा उपयोग करून घेतला नाहीं आणि आज पुढारी गणल्या जाणाऱ्या महासत्तांपेक्षां उच्चतर जीवन स्वीकारलें नाहीं, तर इतिहासांत आमच्या नांवाला काळिमा लावण्यांत येईल. अपेशी राष्ट्र म्हणून आज आम्हांला संबोधण्यांत येत आहे; पण अनेक शतकें शत्रूंबरोबर युद्ध अखंडितपणें चालविणें हें आमचें एकच कार्य इतकें दिव्य आहे, कीं तेवढ्यामुळेंच आयर्लंडला धवल यश प्राप्त होणार अशी सर्वांची बालंबाल खात्री झाली आहे. इतर राष्ट्रांना उच्चतर जीवन स्वीकारण्याची संधि मिळाली होती पण ती त्यांनीं वायां दवडली. आम्हांला अशी संधि मिळेल तेव्हां ती फुकट जाऊं दिली तर मात्र आयर्लंडला अपेशी हें नांव शोभेल. युरोपचें नेतृत्व एकदां आयर्लंडकडे होतें; स्वातंत्र्य मिळवून हेंच स्थान आम्ही फिरून मिळवूं; आम्हांला फक्त स्वातंत्र्य पाहिजे आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या राष्ट्रांना आहे तसें स्वातंत्र्य आम्हांला हवें आहे. स्वातंत्र्य हव्या त्या साधनांनीं मिळवूं आणि स्वतंत्र झाल्यावर आपण सन्मार्गानें वागूं. स्वातंत्र्य मिळवीत असतांना नीति-अनीतिकडे फारसें लक्ष देणें शक्य नाहीं, या घातुक तत्त्वज्ञानापासून आपण

सर्वथा अलिप्त राहिलें पाहिजे. आमच्या ध्येयसिद्धीच्या मार्गावर या तत्त्वाचा इतका काळोख पडलेला आहे कीं, त्याबद्दल आपण सावधगिरी बाळगूं तितकी थोडीच होणार आहे. या सैतानी तत्त्वाच्या नादीं लागल्यास उच्च जीवन प्राप्त होणें अशक्य आहे. माणसांनीं एकमेकांना फाडून खावें असें हें तत्त्वज्ञान शिकवितें. आज जगांत चाललेल्या अनेक अत्याचारांची जबाबदारी याच तत्त्वावर आहे. आमच्या देशांत आज बोकाळलेले सर्व वादविवाद एकदम मिटवून टाकावे असें माझें म्हणणें नाहीं–पण कोणतेंही कार्य हातीं घेतांना मनोवृत्ति उच्च ठेवणें व अब्रूची जबाबदारी बाळगणें हें आपलें कर्तव्य आहे, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. आपल्या भोंवताल-च्या माणसांकडे बंधुभावाची दृष्टि ठेवून त्यांच्या उद्धाराला सहानुभूतिपूर्वक मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे. नुसत्या राज्यपद्धतीच्या अदलाबदलीनें आपलें पुनरुज्जीवन होणार नाहीं; उच्च मनोवृत्ति व उदात्त ध्येय हाच आमच्या स्वातंत्र्याचा ताम्रपट होय; हेंच तत्त्वज्ञान लोकांच्या मनांवर ठसविण्यांत आलें पाहिजे. इकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. कारण आपण आज ज्या प्रकारचीं कायें करीत आहों, त्यावरूनच भविष्यकालीं आम्ही कोणत्या प्रकारचीं माणसें होऊं हें ठरणार आहे. स्वातंत्र्याचें युद्ध हें धर्मयुद्ध आहे; आज आपण अनीतीनें वागलों, तर भविष्यकालींही आम्ही पवित्र होऊं शकणार नाहीं. नीतिअनीतीचे विचार या वेळीं मनांत आणल्यास आपणांस यश मिळणें जड जाईल असें पुष्कळांना वाटतें हें मला माहीत आहे. ही समजूत चुकीची आहे. ही चूक सुधारणें हें आपलें कर्तव्य आहे. आमच्या देशाचें सामर्थ्य वाढत आहे. आमच्या देशाच्या गळ्याभोंवतीं पडलेली शत्रूची मगरमिठी आज ढिली होत आहे; स्थानिक स्वराज्याचा एक एक हक्क मिळवीत आहों तसतसें आपण स्वातंत्र्याच्या अधिकाधिक जवळ जात आहों. स्वराज्याच्या एकाद्या हप्त्यानें जनतेचें समाधान होणें अशक्य आहे. लोकांची शक्ति सारखी वाढत आहे आणि स्वातंत्र्य मिळविण्याचीं अस्त्रें लोक हस्तगत करीत आहेत. आपल्या पिढींतच पुष्कळ प्रगति झालेली आहे, हें सिद्ध करण्याला एकच पुरावा पुरेसा आहे. वीस वर्षांपूर्वीं आयरिश भाषेला तिरस्करणीय समजत असत. आज मातृभाषेच्या पुनरुज्जीवनाची खटपट जोरानें चालू असून राष्ट्रीय विद्या-

पीठांमधून मातृभाषा हा विषय आवश्यक असावा असें जनतेचें ठाम मत झालें आहे. आम्ही स्वातंत्र्याच्या मार्गाला लागलों आहों आणि आम्हांला जय मिळणारच्च याबद्दल हा पुरावा पुरे नाहीं काय? आम्हांला स्वातंत्र्य मिळणार, याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाहीं. या स्वातंत्र्याचा आम्ही सदुपयोग करूं असें मात्र मला ठांसून सांगतां येत नाहीं. कारण आज जगांत सर्वत्र स्वातंत्र्याचा दुरुपयोगच चाललेला आहे. स्वातंत्र्याचा सदुपयोग हेंच ध्येय आपण डोळ्यांसमोर ठेवलें पाहिजे. आज विद्यमान असलेल्या राष्ट्रांच्या वर्तमानकाळांतील इतिहासापेक्षां आमच्या देशाचा इतिहास अधिक उज्ज्वल होईल, अशाच रीतीनें आम्ही वागूं असा आपण निश्चय केला पाहिजे. आम्हांला वैभव हवें आहे, पण आम्हीं उदात्त जीवनाबद्दल कळकळ बाळगली पाहिजे. आम्ही सामर्थ्य मिरवूं पण तें इतरांवर जय मिळविण्याकरितां नव्हे तर, जगांतल्या दुर्बलांच्या रक्षणाकरितां आणि सबळांच्या बंधुभावाची हमी घेतां यावी म्हणूनच आम्हांला सामर्थ्य मिळवावयाचें आहे. आमच्या राष्ट्रीय संस्थांबद्दल आम्ही अभिमान बाळगूं—त्यामुळें आमच्या राष्ट्राला स्थैर्य प्राप्त होईल, स्वदेशाच्या नागरिकांना सुख प्राप्त होईल—आणि हें झाल्यावर आम्ही युरोपच्या नेतृत्वाची कामगिरी पुन्हा आपल्या शिरावर घेऊं; स्वार्थ, जुलूम, राजकारस्स्थान व लांचलुचपत यांच्या सैतानी पाशांतून जगाची सुटका व्हावी यासाठीं आम्ही जागृति करूं; जनतेच्या डोळ्यांसमोर आम्ही उदात्त ध्येयें ठेवूं आणि चिरंतन अशा स्वातंत्र्याची स्थापना करूं.

प्रकरण तिसरें

नैतिक सामर्थ्य

आयर्लंडसंबंधीं कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करूं लागतांच संज्ञांच्या अर्थाची मोठी अडचण उभी राहते. विचाराला अवश्य असणाऱ्या संज्ञांचे वेगवेगळ्या लोकांनीं वेगवेगळे अर्थ लावलेले असल्यामुळें विचारांचा गोंधळ उडून जातो. चर्चेंतून कांहीं निष्पन्न व्हावयाचें असल्यास वादविवादांत वापरण्यांत येणाऱ्या संज्ञांचे स्पष्ट अर्थ अगोदर ठरविले पाहिजेत. दुर्बलतेमुळें आपल्या हातून घडणाऱ्या चुका आज राष्ट्रभक्ति या नांवाखालीं दडपून देण्यांत येतात. राष्ट्रभक्तींत खरोखरच कांहीं अर्थ असेल तर तिजमुळें राष्ट्रभक्ताचा आत्मा समर्थ झाला पाहिजे आणि कोणत्याही संकटांत डगमगणार नाहीं असें सामर्थ्य त्याचे अंगीं आलें पाहिजे. स्थानिक-स्वराज्याच्या वृद्धीसाठीं चळवळ करणारे लोक 'होमरूल' म्हणजेच स्वातंत्र्य अशी लोकांची समजूत करून देण्याचा प्रयत्न करतात; पण शेजाऱ्यांची आम्हांवर सत्ता आहे तोंपर्यंत—मग ती सत्ता कितीही अल्प असो—आम्ही पारतंत्र्यांतच आहों हें उघड आहे. स्वराज्याची चळवळ करणारे लोक निर्भेळ स्वातंत्र्याचा पुकारा करतात. जणुं काय स्वातंत्र्यामध्यें भेसळ करणें शक्य आहे. स्वातंत्र्याचें ध्येय बाजूला ठेवून अर्धवट हक्कांची मागणी करणाऱ्या व्यक्तींचाच उदो उदो करूं लागतों तेव्हां आपण आपल्याच ध्येयसाधनांच्या मार्गांत अनेक नसते अडथळे उत्पन्न करीत असतों. कांहीं लोक कोणत्याही प्रकारच्या समेटाला तयार होत नाहींत, त्यांची मनोवृत्ति इतकी अडाणी असते कीं, वादविवाद करून त्यांचें मन वळविणें अशक्य असतें. लोक त्यांना नांवें ठेवूं लागले कीं, आपण त्यांच्या मार्गाची उपयुक्तता सिद्ध करूं पाहतों; पण त्यांचें निष्ठासामर्थ्य मिळविण्याचा मात्र प्रयत्न करीत नाहीं. खरा ज्वलज्जहाल हाच खरा सत्यनिष्ठ होय. देशाला स्वातंत्र्य पाहिजे असें म्हणणारांपैकीं कांहीं लोक इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी यांच्या ऐहिक वैभवानें मोहून गेलेले असतात. या देशांनीं हें सामर्थ्य ज्या साधनांनीं मिळविलें तीं अगदीं हीन होतीं असें कोणी प्रतिपादन करूं लागल्यास तें त्यांना पटत नाहीं. खरें स्वातंत्र्य व स्वैर आचार

यामधलि भेद त्यांना उमजत नाहीं. त्या महासत्तांनीं आपलें सामर्थ्य ज्या मार्गांनीं मिळविलें त्याच साधनांनीं स्वदेशाला सवैभव करण्यापेक्षां त्यांच्या पाशवी शक्तिच्या रगड्यांत स्वदेशाची राखरांगोळी उडाली तरी बेहेत्तर आहे. अशा रीतीनें वेगवेगळ्या मनोवृत्तींच्या देशभक्तांबरोबर वादविवाद करतांना आपण आपल्या संज्ञांचा अर्थ स्पष्टपणें मांडला पाहिजे. या संज्ञांपैकीं 'नैतिक सामर्थ्य' या संज्ञेची मी आतां चर्चा करणार आहें; कारण वादविवादांत हा शब्द कोणींही कोणाच्याही तोंडावर बेधडक फेंकून द्यावा इतकी त्याची ओढाताण झालेली आहे.

स्वदेशाच्या सर्व हक्कांची मागणी करण्याची भीति वाटत असल्यामुळें अगर संपूर्ण ध्येयाच्या सिद्धीसाठीं होणाऱ्या महायुद्धांत जन्मभर लढण्याची नाखुषी असल्यामुळें, ओकौनेलच्या* वेळेपासून अनेक राजकारणी पुढाऱ्यांनीं आपला दुबळेपणा झांकण्यासाठीं 'नैतिक सामर्थ्य' या संज्ञेचा दुरुपयोग केलेला आहे. खुद्द ओकोनेलच्या राजकारणाच्या योग्यायोग्यतेची चर्चा करण्याचा माझा इरादा नाहीं; त्याच्यावर कोणी कितीही टीका करो, तो महात्मा आणि महान् देशभक्त होता यांत तिळमात्र संशय नाहीं. याबद्दल ज्यांना संशय वाटत असेल त्यांनीं त्याच्या उतारवयांतील भानगडींकडेच लक्ष एकाग्र न करतां

---

*ओकोनेल (१७७५--१८४७)--आयर्लंडचा स्वातंत्र्यजनक. १७९८ सालीं बॅरिस्टरीला सुरुवात करून यानें मोठें नांव कमावलें. १८२८ सालीं तो पार्लमेंटांत निवडून आला. १८४३ सालीं बेकायदा सभा भरविण्याच्या आरोपावरून त्याला कैद करण्यांत आलें, पण लवकरच जामिनावर त्याची मोकळीक झाली. बरेच दिवस खटला चालून १८४४ सालीं त्याला एक वर्ष कैद व २००० पौंड दंड अशी शिक्षा देण्यांत आली. पुढें पार्लमेंटानें ही शिक्षा रद्द केली. कोणी धजावत नव्हतें, तेव्हां यानें आयर्लंडची बाजू नेटानें पार्लमेंटांत मांडली पण पुढें तरुण जहाल लोक त्याच्या मवाळपणाची चेष्टा करूं लागले ! खटल्यापासून त्याच्या वजनाला उतरती कळा लागली; आणि पुढें पक्षभेद व दुष्काळ यांमुळें त्याच्या शब्दाला महत्त्व राहिलें नाहीं.

त्याच्या तारुण्यांतील कामगिरीकडे पहावें. त्या वेळीं त्यानें हाता घेतलेलें कार्य अत्यंत बिकट होतें, त्याला कोणाचेंही साह्य नव्हतें. उतारवयांत आपल्या वैयक्तिक वजनाच्या जोरावर त्यानें राष्ट्रीय राजकारणाला एक वेगळीच दिशा लावण्याचा प्रयत्न केला आणि तेंच आज आपणांला नडत आहे. कारण ज्यांचे अंगीं नैतिक धैर्याचा लेशही नाहीं, असे लोक नैतिक सामर्थ्याच्या नांवाखालीं राजकारणांत धिंगाणा घालीत आहेत आणि नैतिक धैर्याचे जे महामेरु, त्यांना पाशवी शक्तीचे अनुयायी गणण्यांत येऊन तिरस्कारपूर्वक बाजूला ढकलण्यांत येत आहे. ह्या गोंधळांतून बाहेर पडण्यासाठीं नैतिकसामर्थ्य व नैतिकदुर्बलता यांमधील भेद स्पष्ट केला पाहिजे. 'कोणत्याही स्वरूपांत प्रकट झालेल्या पाशवी शक्तीला हार न जातां तिच्यावर विजय मिळविण्यासाठीं मनुष्याचें मन व हृदय खंबीर च पवित्र असलें पाहिजे. मग या गुणाला तुम्ही नैतिकधैर्य म्हणा; अगर नैतिक सामर्थ्य म्हणा. या शक्तीला मी 'नैतिकसामर्थ्य' ही संज्ञा दिली आहे. ज्याचे अंगीं नैतिकसामर्थ्य आहे अशा मनुष्याला एखादें तत्त्व सत्य व आवश्यक आहे असें पटलें, कीं तो त्याचा पुरस्कार करतो आणि यामुळें त्याचेवर कोणतेही प्रसंग ओढवले तरी तो त्यापासून ढळत नाहीं. असा मनुष्य बेजबाबदार असतो, त्याच्या आशा नादान असतात व या कृतीमुळें स्वतःवर व इतरांवर अनन्वित संकटें ओढ़वलीं तरी तो आपल्या अडाणीपणामुळें पूर्ण बेफिकीर असतो असें मुळींच नाहीं. जें सत्य तेंच कल्याणप्रद, हेंच त्याचें आद्यतत्त्व. आणि सत्तत्त्वाचा योग्य रीतीनें पुरस्कार केल्यास अकल्याण अशक्य आहे, अशीच त्याची दृढनिष्ठा असते. सत्य तत्त्वाच्या सिद्धीसाठीं सरळ मार्गानें चालल्यावर स्वतःवर कोणतींही संकटें ओढवलीं तरी त्यामुळें त्याच्या मनाला विवेकबुद्धीच्या टोंचण्या लागत नाहींत. एखाद्या महान् दिव्यांतून पार पडत असतांना स्वतःचें धैर्य खचेल कीं काय अशी शंका एखादे वेळीं त्याच्या मनांत येणें शक्य आहे; पण उदात्त ध्येय व भव्य ध्येयसिद्धि यांवर त्याची गंभीर निष्ठा असते. मनुष्य एकनिष्ठपणें एखाद्या ध्येयसाधनाच्या खटपटीला लागला म्हणजे हळुहळू त्याचे अंगीं मोठेपणा आपोआपच येऊं लागतो. प्रथम डळमळीत असणारीं माणसेंच हुतात्म्यांच्या पदाला

पोंचलेलीं आपणांस आढळून येतात. महान् ध्येयाच्या अनुयायांच्या अंगीं अवचितपणें विलक्षण सामर्थ्य येतें, यांचीं अनेक उदाहरणें आहेत—पण व्यावहारिक व दुबळ्या लोकांना या चमत्काराचा उलगडाच होत नाहीं. स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या मर्दाला माहीत असतें कीं, आपण सत्यासाठीं लढत आहों; या लढाईंत आपण अगदीं आघाडीला आहों; या युद्धांत आपणांस खात्रीनें जय मिळणार आणि या विजयामुळें संपूर्ण जगताचें कल्याण होणार अशी त्याची निष्ठा असते. शत्रूवर वार करतांना अगर स्वतःचे अंगावर वार पडत असतांना त्याची अशीच भावना असते कीं, या जखमांमुळें आज जे पीडित आहेत त्यांचें पुनरुज्जीवन होणार आहे, आज जे बंदिवान् आहेत ते स्वतंत्र होणार आहेत, आज जे मृत्यूच्या मुखांत जात आहेत, त्यांना मोक्ष मिळणार आहे, आणि भावी पिढ्यांना स्वास्थ्य व सौख्य हीं प्राप्त होणार आहेत. या युद्धांत मनुष्याला अनेक वेळां माघार घ्यावी लागेल किंवा अनेक वेळां चढाई करून पुढें जावें लागेल. युद्धाच्या या सर्व अवस्थांमध्यें मनाचा खंबीरपणा कायम राहिला पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनुष्याचे अंगीं नैतिकसामर्थ्य असलें पाहिजे. सारी पलटण आघाडीला चाललेली असतांना सैन्यांतील कोणताही शिपाई मरणाला भिणार नाहीं. पण एखाद्या खिंडारांत तो एकटाच उभा असेल अशा वेळीं चोहोंबाजूंनीं शत्रु चालून आले तर साधारण मनुष्याचें धैर्य सहज डगमगून जाईल. खऱ्या मर्दुमकीची कसोटी अशा वेळींच लागावयाची असते. आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याकरितां पलटणी उभारावयाचे दिवस अजून दूर आहेत; तोंवर शत्रूंना तोंड देण्यासाठीं जागोजाग पडलेल्या खिंडारांत एकएकटे उभे राहणाऱ्या मर्दांचीच फार जरूर आहे. या कसोटींतून जो पार पडेल तोच खरा वीर, खरा महात्मा ! या कसोटींतून पार पडणें हाच खरा व मोठ्यांत मोठा विजय होय. एकाच सशस्त्र मनुष्याला अनेकांपुढें टिकाव धरणें अशक्य आहे त्याचप्रमाणें एकाच पलटणीला लाखों लोकांवर जय मिळविणें अशक्य आहे; पण संपूर्ण जगतांतल्या सर्व पलटणी जरी एकत्र झाल्या तरी त्यांना शस्त्रास्त्रांच्या जोरावर एकाच खऱ्या मर्दावर विजय मिळविणें अशक्य आहे. आणि शेवटीं हाच एकाकी वीर विजयी होईल.

नीतिच्या नांवाखालीं आजवर इतक्या हीन कृति घडून आल्या आहेत कीं आमच्या पौरुषाच्या रक्षणासाठीं आतां रक्तपाताकडे वळलें पाहिजे असें लोकांना वाटूं लागलें; अवनतीच्या काळांतील अधःपात अधिकाधिक खुपूं लागला तसतशी ही इच्छा वाढतच गेली. पण आतां काळ बदलला आहे; म्हणून सारें वातावरण आपण पुन्हा स्वच्छ केलें पाहिजे. मनुष्याला आपल्या अंगीं असलेल्या पाशवी शक्तीचा उपयोग करण्यास मोह पडण्याला राज्यकर्त्यांचा जुलूमच कारणीभूत होतो. रणांगणांवरील रक्तपातांतच खरी मर्दुमकी आहे अशी आपण खोटी समजूत करून घेतली आहे; शत्रूच्या रक्तांतून पोहत जाण्यांतच खरें पौरुष व वैभव आहे अशी आपण कल्पना करून घेतली आहे; जणुं काय रक्तानें माखलेली रणभूमि हीच सौंदर्याची परिसीमा आहे. आपण आजपर्यंत शांतीचा तिरस्कार करीत आलों—जणुं काय युद्धांतच खरी स्फूर्ति आहे; 'युद्धभूमि ही नरकभूमि आहे' असे एका विख्यात सेनापतीचे उद्गार आहेत. ह्या उद्गारांत अतिशयोक्ति आहे हें मला कबूल आहे; पण त्यांत सत्याचा मोठा भाग आहे व महत्त्वाची धोक्याची सूचना आहे हें विसरतां कामा नये. सूड घेणें न्याय्य आहे असें वाटत असेल त्यानें एकदां आत्मपरीक्षण करून पहावें. एखादा फितूर अथवा गुन्हेगार फांशी दिल्याची बातमी कानांवर येते तेव्हां मनाला धक्काच बसतो, समाधान होत नाहीं. मृत्यु सर्वांना ताळ्यावर आणतो. मृत्यूचें प्रत्यक्ष दर्शन झालेलें नसतें तोंपर्यंतच 'स्वातंत्र्याचें जहाज शत्रूच्या रक्ताच्या नदींतून डोलत चाललेलें आहे' अशा प्रकारच्या कल्पना मनुष्याच्या मनांत येतात व वल्गना त्याच्या तोंडांतून निघतात. रस्त्यांतला एखादा अपघात अथवा चुरशीच्या सामन्यांतील रक्तपाताचा देखावा दृष्टीला पडला कीं हे लोक आपलीं मतें बदलतील अशी मला आशा आहे.

युद्धाचा प्रसंग आलाच तर मात्र रक्तपातासाठीं आपली तयारी असली पाहिजे. आम्ही रक्तपातासाठीं उत्सुक नाहीं; पण तो टाळतां येणें अशक्य असल्यास आम्ही युद्धाला तयार आहों. कारण देहयातनांपेक्षां मानसिक यातना अधिक भयंकर असतात, कारण हव्या तितक्या यातना सहन कराव्या लागल्या तरी स्वातंत्र्य मिळविलेंच पाहिजे असा आमचा निर्धार आहे; कारण शरीरापेक्षां आत्म्याची किंमत अधिक आहे. युद्धाचें हें एकच

समर्थन आहे. आधीन असलेले हक्क गमावण्यापेक्षां, सध्यांच्या गुलामगिरींतच कुजत पडण्यापेक्षां युद्ध करणें हेंच श्रेयस्कर आहे; अशा वेळीं ज्यांचे अंगीं सैन्य उभारण्याचें सामर्थ्य असेल त्यांनीं युद्धाला तयार झालें पाहिजे; तितकें सामर्थ्य हातीं नसेल त्यांनीं उघडपणें बंड पुकारलें पाहिजे; स्वातंत्र्याची हमी हातीं येईपर्यंत ही उठावणी अखंड चालू ठेवली पाहिजे; कारण पारतंत्र्यामुळें होणारा राष्ट्रीय ऱ्हास हा लढवय्या जवानांचे हातपाय छाटले जाण्यापेक्षां अधिक हानिकारक आहे. शरीर क्षणभंगुर आहे, आत्मा चिरंतन आहे; आत्मिक अधःपात हीच मानवी जीवितांतलि मोठ्यांत मोठी हानि होय. गुलामगिरीमुळें मनोवृत्ति हलक्या होतात. पारतंत्र्यामुळें समाजाला कीड लागते. ज्यांचे हातीं अधिकार असतो ते आपली सत्ता टिकवण्यासाठीं लांचलुचपतीची खैरात करतात. क्षणिक फायद्यासाठीं लोभी लोक नीतितत्त्वें झुगारून देतात. गुलामगिरीमुळें सार्वजनिक जीवनाचा अधःपात होतो आणि वैयक्तिक जीवन बेजबाबदार होतें. पारतंत्र्यामुळें उच्च ध्येयांमागें लागलेल्या लोकांची जन्मभर ओढाताण होते; त्यांना हलक्या प्रवृत्तींबरोबर जन्मभर झगडावें लागतें; हळुहळू त्यांची चिकाटी खचूं लागते आणि मोठया उत्साहानें उभारलेला झेंडा जागच्या जागीं सोडून ते व्यावहारिक लोकांत मिसळून जातात. यामुळें देशाच्या भवितव्याबद्दल पूर्वीपासूनच बेफिकीर असलेल्या लोकांच्या संख्येंत भर पडते. निराशेच्या वातावरणांत निरुत्साहाची भर पडली, कीं राष्ट्राच्या अधःपाताची गति द्विगुणित होते. या भयाण अंधकारांत दुर्व्यसनें, नामर्दपणा, असहिष्णुता यांसारख्या विषारी प्रवृत्ति विशेष जोरानें फोंफावूं लागतात; स्वातंत्र्य नष्ट झालेलें राष्ट्र या विषारानें मरणाच्या पंथाला लागतें. परतंत्र देशांतील लोक व त्यांचा आत्मा, यांचें हिडिस चित्र मनासमोर उभें राहतांच शिसारी येऊन चित्त दुसरीकडे वळवावें असें वाटूं लागतें. गुलामगिरी ही स्थिति फार भयंकर आहे; कारण तिजमुळें जें जें उच्च त्याचा अधःपात होतो आणि राष्ट्राच्या उच्च भवितव्याला मरणकाळची घरघर लागते. भूकंप होऊन देशाचीं छकलें उडालीं किंवा सारा देश समुद्राच्या पोटांत गडप झाला तरी तें दृश्य गुलामगिरीइतकें भयंकर नाहीं. पारतंत्र्याच्या महारोगाच्या आधीन होण्याचा प्रसंग येऊं

नये म्हणून लोक हातीं शस्त्रें घेऊन युद्धाला सज्ज होतात. युद्धामध्यें शारीरिक हानि होते खरी; पण गुलामगिरीमुळें शारीरिक हानि होऊन तींत आत्मिक अधःपाताची भर पडते. अशा वेळीं सशस्त्र प्रतिकार समर्थनीय आहे इतकेंच नव्हे तर त्या वेळीं नैतिकसामर्थ्यच शरीराच्या द्वारें प्रकट होत असतें. उच्च तत्त्वाचें पाठबळ नसल्यास शारीरिक सामर्थ्याचा उपयोग करणें हा गुन्हा आहे. नैतिकसामर्थ्य व शारीरिक सामर्थ्य या संज्ञा परस्परविरोधी नाहींत. मूळ भेद नैतिक धैर्य व नैतिक दौर्बल्य यांत आहे; आणि इकडेच आज सर्वांचें दुर्लक्ष्य झालें आहे. योग्य वेळीं योग्य संधि आली असतां सशस्त्रप्रतिकार अपरिहार्य आहे, पण अशा आणीबाणीच्या वेळीं योग्य तारतम्य ठेविलें पाहिजे. केवळ शत्रूच्या रक्ताच्या तहानेनें अत्याचार केल्यास सैतानी सुलतानीचाच मार्ग आपण स्वीकारला असें होईल; पण योग्य वेळीं सशस्त्र प्रतिकारापासून माघार घेतली तर आपला नैतिक अधःपात होईल; या वेळीं कच खाल्ली तर परिस्थिति इतकी भयंकर होईल कीं, शत्रु आमची लांडगेतोड करून आमचा पुरा निःपात करतील. खरा स्वातंत्र्यवीर योग्य वेळीं जोरानें व मर्मस्थानीं वार करण्यास मागेंपुढें पहात नाहीं; कारण त्याची खात्री असते कीं, त्याच्या त्या वेळच्या निश्चयाच्या बळानेंच स्वातंत्र्याची स्थापना व संरक्षण होणार आहे; आत्मसंयमनाची शक्ति हाच पशु व मनुष्य यांमधील मुख्य भेद आहे हें तो सदैव मनांत बाळगतो; प्रतिकार हा सुलतान व गुलाम यांचा मार्ग आहे, औदार्य हेंच मानवी जीवितांचें वैभव आहे, हें तो जाणतो; शत्रूंवर वार करीत असतांना तो त्यांच्या देहासंबंधीं द्वेषबुद्धि मनांत बाळगीत नाहीं तर त्यांनीं जीं दुष्कृत्यें केलीं त्यांचा नायनाट व्हावा एवढीच त्याची इच्छा असते; यामुळें तो स्वतःचें स्वातंत्र्य तर कमावतोच; पण शत्रूलाही उद्धाराचा मार्ग दाखवितो. हा सर्व कल्पनांचा खेळ आहे असें वाचकांना वाटण्याचा संभव आहे; पण ज्याला परिस्थितीचें मर्म समजलेलें आहे त्याला हें स्वप्नवत् भासणार नाहीं. शत्रूबरोबर घनघोर युद्ध चाललेलें असतांही त्याची अशीच भावना राहील कीं, आपला आजकालचा शत्रु हा भविष्यकाळीं आपला सहकारीही होणें शक्य आहे.

युद्धांत पडण्यापूर्वीं पूर्वतयारी म्हणून आपलें ध्येय व तत्त्वें अगोदर

ठरविणें अवश्य आहे; त्याचप्रमाणें वस्तुस्थितचिें खरें ज्ञान मिळविणें त्याहून अधिक जरूरीचें आहे; अजून वेळ आली नाहीं, तेव्हां हें तुरींचें भांडण कशाला अशा सबबीवर या विषयावर विचार करण्याचें आजपर्यंत लांबणीवर टाकण्यांत आलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्या अंगीं नैतिकसामर्थ्य नाहीं. ज्या सामर्थ्याच्या जोरावर आम्ही युद्धांत यश मिळविणार तेंच सामर्थ्य आम्हांला या दास्यांतून मुक्त करण्यास समर्थ आहे. गुलामगिरीमध्यें फक्त घाणेरड्या गोष्टीच फोफावतात, हें आणखी स्पष्ट करून सांगण्याची जरूरी नाहीं; आणि म्हणूनच प्रत्येक प्रकारच्या हीनतेला शक्य तितका विरोध करणें हेंच आपलें आद्य कर्तव्य आहे. स्वतंत्र देशांतही दुर्गुणांचें अस्तित्व असतें; पण स्वातंत्र्याच्या मोकळ्या वातावरणांत त्यांचा विषार तितका बाधत नाहीं. मोकळ्या सूर्यप्रकाशांत रोगजंतु आपोआप मरतात त्याचप्रमाणें स्वतंत्र देशांत दुर्गुण आपोआप नाहींसे होतात. स्वातंत्र्याचा सूर्यप्रकाश प्रवेश करूं शकत नाहीं अशा गुलामागिरीच्या अंधाऱ्या गुहेंत दुर्गुणांचा सैतानी धिंगाणा जोरांत चालतो. त्यांच्या वृद्धीला सर्वस्वीं अनुकूल असें वातावरण फक्त गुलामगिरींतच असतें आणि म्हणूनच पतित समाजांच्या उद्धारासाठीं कार्य करणाऱ्या पुरुषांनीं समाजाच्या अंगचे अगदीं लहानसहान दुर्गुण व दुबळ्या प्रवृत्ति काढून टाकण्यासाठीं डोळ्यांत तेल घालून बसलें पाहिजे व झटून यत्न केला पाहिजे. स्वतंत्र समाजांत असल्या लहानसहान गोष्टींकडे दुर्लक्ष्य केलें तरी चालतें. म्हणूनच समोर अडचण उभी राहिली कीं तावडतोब तिचा निकाल लावला पाहिजे; समोरच्या अडचणींची चालढकल करणें म्हणजे आणखी संकटें स्वतःवर ओढवून घेणेंच होय. निश्चयाच्या बळानेंच आपणांस या सर्व संकटांतून पार पडतां येईल. कोणतें ना कोणतें तरी धोरण पुढें करून समोर उभ्या असलेल्या अडचणी लांबणीवर टाकण्याचा यत्न करण्यांत येतो. कोणी म्हणतात, "सगळें खरें, पण लोकांची एकी कोठें आहे?" दुसरे म्हणतात, "बिचारे अडाणी लोक फशीं पडतील." चालू प्रकरणें दिरंगाईवर टाकणारांना हजारों सबबी पुढें करतां येतात. एका पक्षाला राष्ट्रीय ध्येयाचें व प्रगतीचें एखादेंच अंग मान्य असतें तर दुसऱ्या पक्षाला तेवढेंच अंग अमान्य असून दुसरेंच कांहीं तरी हवें असतें. आपणांला सत्याचा सर्व बाजूंनीं

विचार केला पाहिजे. आम्हांला सत्य—आणि संपूर्ण सत्य हवें आहे. अत्यंत अडचणीचे प्रश्न सोडविणें अवघड असल्यामुळें त्यांचेकडे दुर्लक्ष्य करण्याची सर्वांची प्रवृत्ति असते, ही प्रवृत्ति फार भयंकर आहे; तिजमुळें अनेक अनर्थ ओढवण्याचा संभव आहे; परिणाम कांहींही होवो, उभ्या अडचणींना तोंड दिलेंच पाहिजे. या रीतीनें काम करीत राहिल्यास लोकांची एकी होत जाईल. तरीही लोकांचे अंतःकरणांत संशायाचें बीज रुजत राहील; संशायाचा वृक्ष वाढीला लागला तर भीतीमुळें लोकांची पांगापांग होऊन कार्यनाश होईल. संशायाचा उच्छेद करणें अत्यंत महत्त्वाचें आहे. मतभेदाच्या मुद्दयांची सादर, सहिष्णुतापूर्वक व धिटाईनें चर्चा करून लोकांच्या अंतःकरणांत विश्वास जागृत केला पाहिजे. सध्यांच्या आपल्या कार्याबद्दल लोकांना विश्वास वाटत नाहीं, हें सत्य आहे व तें लपविण्यांत जीव नाहीं. जनतेला विश्वास वाटल्याशिवाय राष्ट्रकार्य यशस्वी होणार नाहीं. आपल्या कार्याला एकाएकीं यश येणें अशक्य आहे, तरी आपण आपलें ध्येय नेहमीं नजरेसमोर ठेवलें पाहिजे. सर्व बाजूंनीं लोकांकडून आक्षेप घेण्यांत येतील. स्वतःच्या सुखासाठीं तडफड करणारे व्यावहारिक, स्वतःच्या नफ्यावर नजर लावून बसलेले व्यापारी, नेहमीं समेट करीत चालणारे धोरणी मुत्सद्दी, प्रत्येक कार्यक्रमांत धोका आहे असें मानणारे धार्मिक निराशावादी वगैरे अनेक प्रकारचे लोक वेगवेगळे आक्षेप घेतील. सुखासक्तांच्या चैनी प्रवृत्तीकडे व व्यापाऱ्यांच्या स्वार्थाकडे दुर्लक्ष्य केलें तरी चालेल, पण मुत्सद्दी व धोरणी लोकांच्या आक्षेपांचें समाधान करणें भाग आहे. माझ्या मतानें मुत्सद्दी लोक सत्याचा सर्व बाजूंनीं विचारच करीत नाहींत. प्रत्येक बाबतींतले आपलें मत ठोकून देण्याची त्यांना संवय असते. ते म्हणतात, "या गोष्टीचा विचार तुम्ही आम्ही खासगी रीतीनें करूं. तुम्ही आम्ही सुशिक्षित आहों; आपल्याला या गोष्टी समजतात; अज्ञानी लोकांना या गोष्टी मुळीं समजतच नाहींत; असें असतां त्यांना एखादी गोष्ट करावयाला सांगणें म्हणजे आपण होऊन नसत्या भानगडी उपस्थित करणें आहे. म्हणून हा मार्ग शहाणपणाचा नाहीं." त्यांना माझें असें उत्तर आहे; "सत्याची स्पष्ट मांडणी करण्याची तुम्हांला भीति वाटते; पण सत्य लपवून ठेवण्याची मला भीति वाटते.

सर्व गोष्टी चव्हाठ्यावर आणल्या तर अडाणी लोकांना धोका पोंचेल याची तुम्हांला धास्ती वाटते; पण कोणतीही गोष्ट लपवून ठेवली तर तुम्हांला धोका येईल अशी मला भीति वाटते. सत्य चव्हाठ्यावर मांडलें तर अडाणी लोक तत्क्षणीं सज्ञान होतीलच असें माझें म्हणणें नाहीं; पण तुमच्या स्वतःच्या मुक्तीसाठीं संपूर्ण सत्य जाहीर करणें हें तुमचें कर्तव्य आहे." मानवी जीवनाच्या सर्वच बाजू आपल्या दृष्टीस पडत नाहींत; म्हणून शक्य तोंवर बारकाईनें पाहणी करून नजरेस येणारे पुरावे, पूर्वग्रह व भीति बाजूला ठेवून, स्पष्टपणें मांडणें हें आपलें कर्तव्य आहे. परिस्थिति अति गंभीर आहे; म्हणून आपलें परीक्षण अत्यंत बारकाईनें व काळजीपूर्वक झालें पाहिजे. या परीक्षणानंतर जे पुरावे नजरेस येतील ते स्पष्टपणें जाहीर करणें हें आपलें कर्तव्य आहे. स्वतःचें मत वेगळें आहे म्हणून मनुष्यानें सत्य लपविण्याचा यत्न करणें हा शुद्ध मूर्खपणा आहे; आणि हें पाप मी कधींही करणार नाहीं. धर्माच्या नांवाखालीं धोक्याची सूचना देणाऱ्या लोकांना माझें एवढेंच सांगणें आहे कीं, त्यांच्या कल्पनेपेक्षां धर्म अधिक गंभीर व सर्वव्यापी आहे. सामाजिक जीवनाच्या अडचणी आहेत त्या तशाच राहूं देणें हें धर्माचें कार्य नाहीं; त्या अडचणी सोडवणें हेंच धर्माचें ध्येय आहे. आपण सरळ मार्गानें सत्य कायें करूं; भीति व श्रद्धा परस्पर-विरोधी आहेत. येशूचें पर्वतावरील प्रवचन झाल्याला दोन हजार वर्षें लोटलीं तरी शहाणपणाचा मार्ग कोणता तें एकमेकांच्या कानांत कुजबुजण्या-पलीकडे आम्ही अजून गेलों नाहीं.

शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, भावी युद्धामध्यें जोमदार मनगटां-पेक्षां जोमदार मनाचीच अधिक जरूर आहे. आमच्या भावना जागृत असल्या पाहिजेत, मात्र विवेकाच्या कह्यांत त्या ठेवल्या पाहिजेत. प्रतिकारबुद्धि बेताल झाली तर दुबळें मन पाशवी शक्तीला आव्हान करितें. तसें आपल्या हातून होऊं नये, राजसत्तेला विरोध करणें नीतीला धरून आहे कीं नाहीं याचा विचार पुढें करण्यांत येईल. या प्रकरणांत मांडलेल्या तत्त्वांचा संपूर्ण अर्थ त्या वेळीं पूर्णपणें ध्यानांत येईल. धीट व तेजस्वी मनुष्य हा एक अभेद्य किल्ला आहे; तसे होण्याचा आपण यत्न करूं या. सैन्यें पराभूत होतील पण तेजस्वी हृदय कधींही

पराभूत होत नाहीं. देह क्षणभंगुर आहे, तो सहज चिरडला जाईल; पण पंचतत्त्वांप्रत मिळून जातां जातां त्या देहांतला आत्मा इतरांच्या हृदयांतलें चैतन्य फुंकर घालून जागें करील आणि हें युद्ध जय मिळेपर्यंत अखंडितपणें चालू राहील. एकनिष्ठ व दृढनिश्चयी मनाच्या मनुष्याला शेवटीं जय हा मिळावयाचाच. खोट्या व फितुरीच्या तत्त्वज्ञानानें त्याची प्रतिकारबुद्धि कमी होणार नाहीं, किंवा मनोदौर्बल्यामुळें त्याचे हातून अत्याचार घडणार नाहींत. तो आपली परंपरा सोडणार नाहीं व स्वतःच्या पवित्र मनांत विष कालवून घेणार नाहीं. आणीबाणीच्या वेळीं तो स्थिर राहील व तो हातीं घेईल तें प्रत्येक कार्य योग्य असेलच. बंधूंनो, आमचे देह पारतंत्र्यांत असले तरी आमचें मत स्वतंत्र आहे. निरुत्साहानें व निराशेनें मलूल झालेल्या थंड्या परिस्थितींत जुन्या चैतन्याची ज्योत फिरून चमकूं लागली आहे. आमच्या अंतःकरणांत उत्साहाची उसळी फिरून येत आहे; स्वदेशाचे हक्क परत मिळविण्यासाठीं, स्वदेशाचें स्वातंत्र्य कमावण्यासाठीं, आजच्या पिढीचें सार्थक करण्यासाठीं आम्ही हें युद्ध हातीं घेत आहों. यश हें ठेवलेलेंच आहे. शत्रूंना खुशाल आपल्या लढाऊ चहाजांची व पलटणींची गणति करूं द्या—रोम आणि कार्थेज* यांची अजिंक्य सेना आज कोठें आहे? त्या सैन्यांनीं 'स्वातंत्र्य' हें महातत्त्व चिरडून टाकण्यासाठीं जंगजंग पछाडलें; तीं सैन्यें नामशेष झालीं पण आज स्वातंत्र्यतत्त्वामुळें जागोजाग मृतवत् झालेल्या समाजांचें चैतन्य जागृत होत आहे. बंधूंनों, छाती पुढें काढून ताठ चाला, व झेंड्याला हात द्या; हरएक युद्धांत जय मिळवून हा झेंडा आपल्याला देशभर फिरवावयाचा आहे. दृढनिश्चय, सुसंगति, सरलता व निर्भयता हे गुण अंगीं आणण्याचा आपण यत्न करूं. यामुळें आपलें मन करारी व अजिंक्य होईल. आणि अजिंक्य अंतःकरण हेंच विजयाचें बीज आहे.

---

*कार्थेजः—हें शहर आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर असून सुप्रसिद्ध आहे. ख्रिस्ती शकापूर्वीं इ० सन ८२२ मध्यें फिनिशियन लोकांनीं हें वसाविलें. ख्रिस्ती शकापूर्वीं १४६ सालीं रोमन लोकांनीं त्याचा विध्वंस केला. शेवटीं इ० सन ६९८ मध्यें अरब लोकांनीं हें शहर नामशेष केलें. रोम व कार्थेज, यांची निकराची स्पर्धा होती व त्यांमध्यें अनेक युद्धें झालीं.

प्रकरण चवथें

बंधु व शत्रु

भावाभावांमध्यें तेढ आली, कीं ते एकमेकांचे शत्रु होतात. आमचे शत्रु हे आमचे बंधुच आहेत—फक्त त्यांचे आमचेमध्यें आज लढा उपस्थित झाला आहे. आयर्लंडांतील सर्व पक्षांमध्यें खरा देशाभिमान पुन्हा प्रस्थापित करतां येईल आणि आमच्या पुरातन शत्रूबरोबर, इंग्लंडबरोबर—आम्हांला कायमचा सलोखा करतां येईल असें आम्हीं म्हणतों. त्याचें समर्थन याच तत्त्वांत आहे आणि त्यामुळेंच आम्हांला असें होईल अशी आशा वाटत आहे. पूर्वग्रहांनीं मनें दूषित झालेलीं असल्यामुळें आयर्लंडांत दुफळी माजली आहे; या पूर्वग्रहामुळेंच आयर्लंड व इंग्लंड यांचें अभेद्य हाडवैर माजलें आहे. देशाचें पुनरुज्जीवन व्हावयाचें असेल, तर देशांत एकी झाली पाहिजे; संपूर्ण जगताच्या पुनरुज्जीवनासाठीं मानवजातीची एकी झाली पाहिजे—याचा अर्थ सर्व जगावर एकाच सत्तेचें आधिराज्य व्हावें असा नाहीं, सर्व मानवजात बंधुभावानें एकजीव झाली पाहिजे. हें भव्य ध्येय साध्य करण्यासाठीं झटणें हें व्यक्तिमात्राचें व प्रत्येक राष्ट्राचें कर्तव्य आहे; मानवजातीचें उगमस्थान एकच आहे, सौंदर्यानें नटलेल्या सृष्टीचा वारसा मानवजातीचा आहे, मानवजातींतील वेगवेगळ्या विभागांचा उत्कर्ष परस्परांच्या सहकार्यावर अवलंबून आहे वगैरे गोष्टींचा आणि सर्वांना साधारण असणाऱ्या आशा व संकटें यांचा वेळोवेळीं विचार करीत राहिल्यास मानव-जातीच्या उदात्त ध्येयावरून आपली नजर ढळणार नाहीं आणि आपल्या तत्त्वज्ञानाची नेहमीं सुधारणा होत राहील. या तत्त्वाकडे दुर्लक्ष करून एखाद्या समाजानें नींच कृत्यें व जुल्मजबरदस्ती केली, तर तो आपल्या देशाच्या अब्रूला कलंक लावील इतकेंच नव्हे, तर यामुळें तो सर्वांचें स्वास्थ्य व सुरक्षितता धोक्यांत आणील. स्वतःवर चढाई करून आलेल्या आपल्या शेजाऱ्यांचे—तात्पुरत्या शत्रूंचे—हल्ले परत फिरविण्यासाठीं एखादा मूळचाच तेजस्वी समाज युद्धाला सज्ज झाला आणि आपल्या स्वभावानुरूप शौर्यानें व औदार्यानें युद्ध करून त्यानें शत्रूला पिटाळून लाविलें, तर त्या पराभवामुळें त्याच्या शत्रूंचीच सुधारणा होईल, त्यांचें जीवन पवित्रतर

होईल आणि अत्यंत उदात्त अशीं सामाजिक ध्येयें साध्य करण्याच्या मार्गाला ते लागतील. युद्धामुळें त्यांचे डोळे उघडले नसते तर घाणेरड्या संसर्गामुळें मलिन झालेल्या त्यांच्या कोंदट अंतःकरणाला असें दिव्यदर्शन झालेंच नसतें. मुळांतच तेजस्वी असलेल्या लोकांना स्वातंत्र्यावर आलेले घाले परतवून लावा असें सांगावें लागत नाहीं, त्याचप्रमाणें स्वातंत्र्ययुद्धाचें तत्त्वज्ञानही स्पष्ट करून दाखवावें लागत नाहीं; स्वातंत्र्यावर घाला आला कीं शत्रूवर हल्ला चढाविण्याची स्फूर्ति त्यांना स्वभावतःच होत असते.

स्वातंत्र्ययुद्धांत सर्व स्नेहसंबंध कसोटीला लागतात. देशांत एकी एका दिवसांत होत नाहीं आणि परराष्ट्रीय स्नेहसंबंध जडण्याला किती तरी अवधि लागतो. स्वातंत्र्ययुद्ध सुरू झालें म्हणजे हे सर्व स्नेहसंबंध फोल आहेत असें मानण्याचा आणि राष्ट्रीय झेंड्याखालीं जमलेल्या राष्ट्रनिष्ठ मर्दांची पांगापांग करण्याचा वेळोवेळीं मोह पडूं लागतो. एकदां चढाईला सुरवात झाल्यानंतर कोणत्याही संकटामध्यें शिथिल होणार नाहींत इतके दृढ स्नेहसंबंध आपण निर्माण केले पाहिजेत. खऱ्या बंधुभावाशिवाय अशी टिकाऊ एकी जमून येणें अशक्य आहे. पण आज इकडे आमचें लक्षही नाहीं. गंभीर व तीव्र स्वदेशाभिमानामुळें वेगवेगळ्या पंथांचीं माणसें एका झेंड्याखालीं एकत्र होतात; तीं एकमेकांबरोबर मनमोकळेपणें वागतात व सहकार्य करतात. थंड्या प्रकृतीच्या व कमी कळकळीच्या लोकांचें मन या विषम प्रवृत्तीच्या लोकांच्या ऐक्याबद्दल साशंक असतें. ते आपल्याला येऊन मिळाले तरी ते फारशा खुषीनें आलेले नसतात. कांहीं लोक तर इतके खप्पी असतात कीं ते, आमच्या झेंड्याकडे फिरकतही नाहींत; त्यांची कल्पना असते कीं आम्ही सर्व फसगत झालेले उडाणटप्पू लोक आहोंत; त्यांना वाटत असतें, कठीण प्रसंग आला कीं आम्ही ऐक्याच्या शपथा गुंडाळून ठेवूं, पूर्वीप्रमाणें जुने भांडणतंटे उकरून काढूं आणि ताज्या दमानें व जुन्या द्वेषांत नव्या विषाची भर घालून एकमेकांवर तुटून पडूं. ही खोटी समजूत नाहींशी करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आयर्लंडांत आज तीन प्रमुख पक्ष आहेत; कॅथलिक्स्, प्रॉटेस्टंटस् व त्रयस्थ,*

---

* कॅथलिक लोक ख्रिस्ताच्या मूर्तीची पूजा करतात व पोपला धर्माध्यक्ष

राष्ट्रीय झेंडयाखालीं जमलेल्या लोकांमध्यें या तीनही पक्षांपैकीं उत्कृष्ट लोक पहावयास सांपडतील. आणि त्यांच्यावरून त्यांच्या पक्षांची योग्य कल्पना बांधतां येईल; वेगवेगळ्या पक्षांतील लोक एकमेकांकडे कोणत्या दृष्टीनें बघतात तेंही आपल्याला अजमावतां येईल. यांपैकीं कोणत्याही एका पक्षाला दुसऱ्याचा कार्यक्रम मान्य नाहीं; त्यांच्या ध्येयांची व्याप्ति भिन्न आहे, ध्येयसिद्धिबद्दल सर्वांना सारखी आशा वाटत नाहीं; आशा सर्वांनाच आहे, सर्वांचे हेतु उदात्त आहेत आणि ध्येय भव्य आहे; विवक्षित मर्यादेंत सर्वांचें सहकार्य होणें शक्य आहे; पण प्रत्येकाचें तत्त्व-ज्ञान या क्षेत्रापुरतेंच नाहीं. अंगीकृत कार्याच्या गांभीर्याबद्दल त्यांच्या कल्पना भिन्न आहेत; स्वातंत्र्याचा उद्गम व अंतिम साध्य यांबद्दलही त्यांची एकवाक्यता नाहीं. पण वैयक्तिक व सार्वजनिक जीवन पवित्रतर व्हावें; व्यक्तीव्यक्तींमधील व्यवहार अधिक सचोटीचा असावा; समाजाचें व राष्ट्राचें ध्येय उच्चतर असावें; सहिष्णुता, धैर्य व स्वातंत्र्य या तत्त्वांचा प्रसार अधिकाधिक व्हावा, याबद्दल सर्वांचें एकमत आहे. आपलें स्वातंत्र्य हिरावून घेण्यांत आलें आहे ही गोष्ट तिघांच्याही हृदयांत सलत आहे. त्यांना एकमेकांबद्दल वाटणारी सहानुभूति जिव्हाळ्याची व चिरस्थायी आहे. वेगवेगळ्या पक्षांचे हे लोक राष्ट्रयुद्धासाठीं एकत्र होतात तेव्हां त्यांच्या चेहऱ्यावर प्रकट होणाऱ्या भावना निरखून पहा. सतत कामामुळें कोणा-ची मुद्रा सतावलेली असते, त्याच्याबरोबर हस्तांदोलन करतांना जणुं काय हा आपला सख्खा भाऊच संकटांत सांपडलेला आहे असें दुसऱ्याला वाटत असतें; जणुं काय आपलें कार्य यशस्वी झालें आहे अशी भावना तिसऱ्याच्या डोळ्यांत चमकत असते. त्यांचीं खासगी भाषणें ऐका; ते एकमेकांना उत्तेजन देत आहेत, स्वार्थत्यागाकडे प्रवृत्त करीत आहेत, निराशेपासून प्रवृत्त करीत आहेत, स्वातंत्र्ययुद्धाच्या उत्साहानें आणि

मानतात. प्रॉटेस्टंट लोक पोपला मानीत नाहींत. आयर्लंडमध्यें कॅथलिक लोकांचा भरणा मोठा आहे. अल्स्टरमध्यें प्रॉटेस्टंट पंथाचें बहुमत आहे. म्हणून आयर्लंडांत उत्तर व दक्षिण यांचा सारखा झगडा चाललेला इतिहासांत दिसून येतो.

भावी महायशाच्या अपेक्षेनें ते धुंद झाले आहेत, असेंच तुम्हांला आढळून येईल. निव्वळ दैवयोगानें एकत्र जमणाऱ्या लोकांमध्यें अशी एकी असणें शक्य नाहीं. सर्वांच्या अंतःकरणांत समभावना स्फुरत आहेत असें वरवर पाहणारासही दिसून येईल. पण ज्यांच्या अंतःकरणांत भावनांचा अभाव आहे त्यांचें शंकासमाधान होणें शक्य नाहीं. राष्ट्रकार्यासाठीं एकवटलेल्या या लोकांचे धर्मपंथ वेगवेगळे आहेत; पण आपापल्या धर्मकल्पनांप्रमाणें ते अंतःकरणपूर्वक धर्मपालन करणारे आहेत. राष्ट्रभक्तीमुळें त्यांची एकी इतकी निकट झालेली आहे कीं, जणुं काय ते एकाच पंथाचे व जातीचे लोक आहेत. जातपंथ वेगवेगळे असले कीं, एकमेकांनीं एकमेकांच्या नरडीचा घोंट घेण्यास धावलेंच पाहिजे अशी कित्येकांची कोती समजूत असते; पण येथें असे लोक एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून अघाडीला चाललेले दिसून येतात. हें कसें झालें? ज्यांचीं धर्ममतें अत्यंत कडक आहेत त्यांच्या दृष्टीनेंच आपण या प्रश्नाकडे पाहूं. तो असेंच सांगेल कीं, हे वेगवेगळ्या धर्मपंथांचे लोक ज्या कार्यासाठीं एकजूट झाले तें कार्य सर्वांना महत्त्वाचें वाटलें, सर्वांनीं तें सचोटीनें पार पाडावयाचें ठरविलें म्हणूनच सर्वांची एकी झाली. तें कार्य फार महत्त्वाचें आहे असें नाहीं; पण लहान लहान कामें हातीं घेऊन तीं पार पाडण्याची शिस्त लागल्यानंतरच मनुष्याला महत्कार्यें हातीं घ्यावयाची स्फूर्ति होत असते. अगदीं निकट असलेलें कार्य हातीं घेऊन तें पार पाडण्यासाठीं मनुष्य सचोटीनें व दृढनिश्चयानें काम करूं लागला, कीं त्याचें कार्यक्षेत्र आपोआप विस्तृत होऊं लागते आणि आरंभीं ज्या ध्येयाची त्याला कल्पनाही नव्हती तें आपोआप त्याच्या दृष्टीसमोर स्पष्ट होऊं लागतें. ज्यांचें कार्यक्षेत्र अत्यंत विस्तृत आहे त्यांना जी दूरदृष्टि आली ती अशाच रीतीनें आली, असेंच तो सांगेल. सर्व आक्षेपकांचें त्याला समाधान करतां येणार नाहीं. ज्या गोष्टी त्याला अत्यंत जिव्हाळ्याच्या वाटतात त्यांबद्दल त्याच्या सहकाऱ्याला तितकी कळकळ वाटणार नाहीं ही एक अडचण आहे खरी; पण ही अडचण प्रथमदर्शनीं वाटते तितकी अवघड नाहीं; कारण त्याचें सहकार्य जिव्हाळ्याचें व तावूनसुलाखून निघालेलें आहे; एकमेकांसाठीं त्यांनीं अनेक त्याग केले आहेत व संकटें सोसलीं आहेत; आणि आज नाहीं उद्यां, हेंच

ऐक्य शहाणपणाचें व उदात्त ठरेल व तें सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यांत येईल असा त्यांना भरंवसा वाटत असतो.

पण वेगवेगळ्या पंथांचे असूनही दृढनिश्चयानें आणि एकानिष्ठेनें ऐक्य अबाधित ठेवणारांची संख्या फारच लहान आहे. उत्तर आणि दक्षिण यांची एकी कशी होईल हा प्रश्न आपल्यापुढें उभा आहे. ज्यांनीं एकी करावी असें आपण प्रतिपादन करतों ते आमची एकी होणें शक्य नाहीं असें जोराजोरानें उसळून सांगत आहेत. ह्या परिस्थितीकडे पुष्कळांचे विचारी डोळे लागलेले आहेत; कांहीं लोक इतके थंड आहेत कीं, देशांत एकी होणें ही गोष्ट त्यांना अशक्य कोटींतली वाटत आहे; कांहीं लोक आपसांतले हेवेदावे उकरून काढीत आहेत व वैमनस्यांत भर टाकीत आहेत; इतकेंच नव्हे तर भांडणतंटे करीत बसण्यांतच मर्दुमकीची शर्थ आहे असें मानीत आहेत. उत्तर आणि दक्षिण यांची एकी होणें अशक्य आहे, आजपर्यंत त्यांनीं एकमेकांचें शत्रुत्व केलें आणि तें यापुढेंही असेंच कायम राहणार अशी श्रद्धाहीन लोकांची ठाम समजूत होऊन बसली आहे. हे दोनही पक्ष पूर्वीच्या वैमनस्यांत रोज रोज भरी टाकीत असल्यामुळें श्रद्धावानांची श्रद्धाही डळमळूं लागली आहे. त्यांची सहनशीलता पुरती कसाला लागणार आहे आणि पौरुषाची खरी कसोटी हीच आहे. ज्यांना पूर्वग्रहांनाच चिकटून रहावयाचें आहे, आत्मसंयमन ज्यांना कवडीमोल वाटतें, शत्रुत्व हेंच ज्यांना प्रशंसनीय वाटतें, शत्रूंचा पुरा निःपात करणें हाच ज्यांचा कार्यक्रम, त्यांना सहनशीलतेबद्दल तिरस्कार वाटावा, सहनशीलता हें दौर्बल्याचें व निराशेचें तत्त्वज्ञान आहे असें वाटावें आणि सहनशीलतेमुळें मनुष्याचें सामर्थ्य दिवसानुदिवस खचत जाणार अशी त्याची समजूत व्हावी, हें अगदीं साहजिक आहे. आपण आपल्याला ख्रिश्चन धर्माचे अनुयायी म्हणवून घेतों; सहनशीलता ही ख्रिश्चन धर्माची मुख्य शिकवण आहे; हा गुण आपल्या अंगीं नाहीं, तो आपल्या अंगीं यावा अशी आपली इच्छा नाहीं, इतकेंच नव्हे तर त्याची आपण उघडपणें तिरस्कारपूर्ण थट्टा करितों. ख्रिश्चन धर्माशीं ज्यांचा काडीइतकाही संबंध नाहीं अशा अनेक लोकांनीं या दैवी तत्त्वाचा आनंदानें

स्वीकार केलेला आहे. महाकवि† शेले काय म्हणतो तें ऐका— "मारडोनियसनें व झरक्षीसनें§ ॲटिका उध्वस्त केलें, मॅसिडोनियाच्या अलेक्झांडरनें* इराणचें साम्राज्य बुडाविलें, त्या वेळीं जे अनन्वित अत्याचार झाले त्यांवरून कोणत्या राष्ट्रानें धडा घेऊन आपल्या प्रतिकारबुद्धीला आळा घातला आहे? अत्याचार दोन्ही पक्षांकडून होतात, मात्र दुसरा पक्ष त्यांना सूड ही संज्ञा देतो. जग अगोदरपासूनच द्वेषानें भरलेलें आहे; सूडामुळें हा द्वेष कमी होईल कीं वाढेल? प्रतिकाराचें व सूडाचें कोणतेंही उदाहरण घ्या, त्यामुळें ठोशास ठोसा या तत्त्वाचा फोलपणाच सिद्ध होतो." शेलेनें या विषयावर पुष्कळ लिहिलें आहे आणि प्रत्येक ठिकाणीं प्रतिकारबुद्धि हा एक निरर्थक लोकभ्रम आहे असेंच त्यानें प्रतिपादन केलें आहे. प्रत्येक उदात्त, उदार व विचारी मनुष्याला नागव्या अत्याचाराचा किळसच येईल. या मुद्दयावर मॅझिनी‡ काय म्हणतो तें ऐका—"आपल्याला नवयुगाची संस्थापना अत्याचारांच्या साह्यानें करावयाची नाहीं. अत्याचारांच्या जोरावर उभारलेली राज्यपद्धति बाह्यतः पूर्वापेक्षां चांगली दिसत असली तरी तिच्या अंमलाखालीं पहिल्यासारखीच जुलुमजबरदस्ती चालू राहणार हें खास." अत्याचाराचें व लढाईचें कृत्य झालें म्हणजे ह्या तत्त्वांची आपण आठवण केली पाहिजे. दोन्ही पक्ष एकमेकांचा सूड घ्यावयास आणि जन्माची आठवण राहील अशी शिक्षा द्यावयास तयार होतील. सहनशीलता बाजूला ठेवून पुरातन वैमनस्य कबूल करावें म्हणून आपल्यास शक्य तितकें चिडविण्यांत येईल; पण निश्चय अढळ ठेवण्याची

---

†शेले—प्रसिद्ध इंग्रज कवि. समाजनियमांचें बंधन झुगारून दिल्यामुळें स्वदेश त्याला सोडावा लागला. स्वातंत्र्याचा तो भक्त होता.

§झरक्षीस—पार्शिया, मीडिया व बाबिलोनचा सम्राट्. त्यानें बाबेलचें राज्य काबीज केलें व ग्रीसवर स्वारी करून अथेन्स जिंकलें; पण ग्रीक लोकांनीं अन्नाचा पुरवठा तोडल्यामुळें त्याला माघार घ्यावी लागली.

*अलेक्झांडर—जगद्विजेता शिकंदर. मॅसिडोनियाचा राजा. यानें पोरस राजावर जय मिळविला (खि० शकापूर्वी ३५६ ते ३२३).

‡मॅझिनी—इटालियन देशभक्त.

हींच वेळ आहे; या वेळीं आपण आपली सहनशीलता अढळ ठेवली तरच आपल्याला सामर्थ्याचें रहस्य कळून येईल.

आम्ही अल्पसंख्याक या निशाणाखालीं जमलेले असलों तरी आम्हांस यशाची आशा आहे. फलप्राप्तीशिवाय आजन्म लढण्याचें लोक नाकबूल करतील; आपली प्रगति होत आहे अशीं चिन्हें दिसावीं, दूर असणाऱ्या विजयश्रीच्या तेजाचे कांहीं किरण आपल्या दृष्टीस पडावे अशी त्यांची अपेक्षा असणें अगदीं साहजिक आहे. सुदैवानें, जरासा शोध केला असतां अशीं चिन्हें आपल्याला दिसून येतील. जुन्या वैरभावाचे भेसुर पुरावे आजही ठळकपणें दिसून येतील हें उघड आहे; आपल्याला भयंकर रण-गर्जना ऐकूं येतील, संतापानें उसळणारे थवे दिसतील; पण आपसांत यादवी करणारांची संख्या कमी झालेली आहे आणि त्यांचा वैरभाव दिवसानुदिवस मंद होऊं लागला आहे हेंही आपल्याला सहज दिसून येईल. वीस वर्षांपूर्वी उसळत असलेले लोक आजही फणफणत आहेत, पण त्यांच्या त्वेषाची तीव्रता कमी झालेली आहे. त्यांचेभोंवतीं वाढत असलेली नवी पिढी त्यांच्या मनोविकारांबद्दल उदासीन आहे. नव्या पिढींतले लोक निष्क्रिय आहेत तरी अजून ते कोणत्याही पक्षाच्या कह्यांत गेलेले नाहींत. योग्य रीतीनें त्यांची समजूत घातली तर त्यांचा उत्साह जागृत होईल; पूर्वग्रहांमुळें त्यांना शिथिलता आलेली आहे; पण स्फूर्तीचा शब्द कानीं पडतांच त्यांचें कर्तृत्व व साहस जागृत होईल. म्हणून निराश होऊं नका. आपण ह्या रस्त्याला लागलों तेव्हां रस्ता सांपडण्यासाठीं आपल्याला किती परिश्रम करावे लागले ते लक्षांत आणा; आपल्या वडिलांचे वेळीं ज्या राजकीय समजुती प्रचलित होत्या त्या आपल्या काळांत नामशेष झाल्या आहेत. या समजुती भ्रामक आहेत असें आपल्याला समजून आलें आणि आपण त्या सोडून दिल्या; यामुळें आपण आपल्या वडिलांची योग्यता कमी करीत आहोंत असें मात्र नाहीं. ते इमानानें जीं जीं युद्धें लढले त्यांचे वतनदार आम्हीच आहों; त्यांच्या स्फूर्तिदायक उदाहरणानें जागृत झालेली निष्ठा आम्ही त्याच ध्येयाच्या सेवेला लावूं. पण त्यांचे हातून ज्या चुका घडून आल्या त्या आम्हांला दुरुस्त केल्याच पाहिजेत; त्यांनीं जें कार्य अपुरें टाकलें तें हातीं घेऊन आम्हींच

पुरें केलें पाहिजे. पूर्वींच्या पिढीनें अपुरें टाकलेलें काम पुढें चालविणें हेंच प्रत्येक पिढीचें प्रधान कार्य आहे. आपल्या हातून अपुरें राहील तें काम पुरें करण्याची जबाबदारी पुढील पिढीवर आहे. तारुण्यांत हें तत्त्व स्वभावतः समजून येतें. प्रत्येक पिढी आपल्या पूर्वजांच्या कार्यांत भर घालीत असते. पूर्वींच्या पिढींत रूढ झालेल्या गैरसमजुती दूर करणें आणि सत्याचा विकास करणें हें चालू पिढीचें कर्तव्य आहे. हीं तत्त्वें प्रत्येक मनुष्याला स्वतःच्या अनुभवावरून समजून येतात. प्राचीन चैमनस्यांचा पुनरुच्चार करणारे लोक म्हातारे होत चालले आहेत; ते लवकरच या जगाला रामराम ठोकतील आणि त्यांचे मागें त्या वैर-भावाचे वारसदार कोणीही राहणार नाहींत, हें त्याला स्वानुभवावरून समजून येतें. पूर्वग्रह कायमचे नाहींसे होणें अशक्य आहे; कारण रोज रोज नवे नवे दूषित ग्रह निर्माण होत असतात; पण आज ज्या पूर्वग्रहां-मुळें आमच्यांत दुफळी माजली आहे; आणि जे आमच्या कार्याचा बिघाड करीत आहेत ते लवकरच नाहींसे होतील. तीव्र वैरभावामुळें केवढे अनर्थ ओढवले आहेत याच्या स्मरणानें तरी नवे वैरभाव उत्पन्न न होवोत आणि भविष्यकाळ सुरक्षित होवो. जुन्या द्वेषांकडे दुर्लक्ष करून—कारण ते लवकरच नाहींसे होणार आहेत—सहस्रावधि लोकांच्या औदासीन्यामुळें आपली उमेद खचूं न देतां, निष्ठेनें आणि चिकाटीनें आपण कार्य करीत राहिलों तर आपल्या देशांत फूट पाडणारे भेदभाव खास नष्ट होतील. उदात्त ध्येयांचें वैशिष्ट्य हेंच आहे. एक काळ असा येतो कीं, ज्या वेळीं त्या ध्येयाच्या प्रकाशानें लक्षावधि लोकांच्या अंतःकरणांतं प्रकाश पडतो, लक्षावधि लोक एकदम उठावणी करतात आणि देशाचा पुनर्जन्म होतो, हें आजवर अनेक वेळां अजमावण्यांत आलें आहे.

आयरिश लोकांना बंधुभावाचें तत्त्व नवीन नाहीं; ज्या तत्त्वाच्या आधारावर आयरिश लोकांची एकी होईल त्याच तत्त्वाच्या साह्यानें आमचा परराष्ट्रीय शत्रूंशीं-आज इंग्लंडबरोबर आमचा लढा चालू आहे आणि हें युद्ध पुढेंही चालू राहील, त्या इंग्लंडशींसुद्धां—समेट होईल, हा निष्कर्ष मात्र, दुर्दैवानें, फार थोड्या लोकांना मान्य आहे. शेजाऱ्याबरोबर स्नेहभाव असणें अगदीं स्वाभाविक आहे. एकाच गल्लींत किंवा गांवांत राहणाऱ्या

शेजाऱ्यापाजाऱ्यांमध्यें स्नेहभावाचें खरें माधुर्य दिसून येतें. एकाच्या अभ्युदयानें दुसऱ्याला आनंद होतो; संकटसमयीं एक दुसऱ्याच्या मदतीला धावतो; दैनिक कार्यांमध्यें एक दुसऱ्याशीं सहकार्य करतो; परस्परांचे हितसंबंध परस्परांना पोषक आहेत अशी त्यांची ऐक्यभावना असते. दोघांपैकीं कोणीही वदमाषी करून या स्नेहसंबंधांत विघाड आणला तर पूर्वीचे स्नेही एकमेकांचे कट्टे हाडवैरी होतात; त्यांच्यामध्यें भांडणतंटे सुरू होतात, एकमेकांच्या मार्गांत ते मुद्दाम अडथळे उत्पन्न करतात, शक्य तितक्या मार्गांनीं ते एकमेकांना सतावतात. द्वेषाच्या विषारी कटुतेचा कोणाच्याही अंतरात्म्याला किळसच येणार; नुकताच उत्पन्न झालेला वैरभाव झुगारून देऊन आपण एकामेकांशीं पूर्वींप्रमाणें स्नेहभावानें वागूं लागावें अशी तळमळ त्यांच्या हृदयाला लागते. तरीही परस्परांच्या स्नेहाला पारखे झालेले हे भाऊभाऊ एकमेकांवर वार करण्यासाठीं खंजीर उगारून तयार असतातच. कित्येक प्रसंगीं ही तेढ इतकी तीव्र असते कीं, ती शमून पूर्वींचा स्नेहभाव पुन्हा निर्माण होणें अशक्य वाटत असतें. जीवनांत माधुरी यावी आणि ती चिरकाल टिकावी अशी इच्छा व आशा असेल तेथें अंतःकरणाच्या गाभाऱ्यांत जुन्या प्रेमाची जोपासना करण्यांत येईल. व्यक्तींमध्यें त्याचप्रमाणें राष्ट्राराष्ट्रांमध्येंही असेंच आहे. हें ध्यानांत ठेवून आपण आपल्या हातून एक नवा प्रमाद घडणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे—हा प्रमाद जुनाच आहे, त्यानें आज नवें स्वरूप धारण केलेलें असल्यामुळें आपल्याला त्याची ओळख पटत नाहीं, इतकेंच. साधनाला साध्य समजणें हाच तो प्रमाद. प्रत्येक देशाला अवश्य असणारें स्वातंत्र्य प्राप्त व्हावें आणि जीवनाचा खरा अर्थ, उद्दिष्ट, पूर्णावस्था व माधुर्य यांचें रहस्य समजावून घेतां यावें, एवढ्याचसाठीं सर्वत्र शांतता, नांदली पाहिजे; वाटेल ती किंमत देऊन मिळविलेली शांतता, शत्रूला शरण जाऊन मिळविलेली शांतता, गुलामगिरीच्या दर्जाची नेभळी शांतता आम्हांला नको आहे. कारण तिजमुळें वरील कार्यें साध्य होणें शक्य नाहीं. एका देशानें दुसऱ्यावर अत्याचार करून त्याचा नाश करूं नये यासाठीं शक्य तेवढी खबरदारी घेणें, कायमची शांतता—हीन नव्हे तर माननीय शांतता—प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा करून देणें एवढेंच

या प्रास्ताविक शांततेचें उद्दिष्ट आहे. या शांततेमुळें आत्म्याचा समतोलपणा कायम राहील. सध्यां आपण युद्धांत गुंतलों आहों, अशा रक्तपाताच्या वेळीं मनुष्याच्या उदार प्रवृत्ति जागृत करण्यानें लढवय्यांच्या मनगटांतला जोर कमी होईल आणि ते आकसानें लढणार नाहींत; अशी कोणी शंका काढतील. उदार प्रवृत्तींच्या जागृतीनें कोणकोणत्या भावना नष्ट होतील तें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं. पण त्यामुळें मनुष्याचें सामर्थ्य नष्ट होणार नाहीं हें मात्र खास. भावाभावांमध्यें यादवी माजते त्या वेळीं कर्तव्याच्या भिन्न कल्पनांमुळें समाजांत भेदभाव उत्पन्न होतो; भाऊ भावाविरुद्ध आणि मुलगा बापाविरुद्ध लढूं लागतो; परस्परांशीं त्यांचा रक्ताचा संबंध असतो; या संबंधामुळें त्यांजमध्यें सहसा वितुष्ट व भेदभाव उत्पन्न होत नाहीं; पण एकदां फूट पडली आणि उघडपणें लढ्याला सुरवात झाली कीं या संबंधामुळें त्यांना दौर्बल्य येतें असें थोडेंच आहे ? आपले शत्रु हे आपले बंधुच आहेत असा आपण एकाद्याला उपदेश करतों तेव्हां त्यानें त्या युद्धांतून माघार घ्यावी अशी आपली अपेक्षा नसते; आपल्याला जें कार्य साधावयाचें आहे त्याचें एक नवीनच स्वरूप त्याला समजून यावें, उदात्त ध्येयाची स्फूर्ति त्याचे अंतःकरणांत जागृत व्हावी आणि त्यानें निग्रहानें कार्य करून ध्येय साध्य करावें, अशीच आपली इच्छा असते.

वैयक्तिक व राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविल्यावर बंधुभाव प्रस्थापित होईपर्यंत झटून कार्य करीत रहावयाचें अशी आपली निष्ठा आहे, मग हें ध्येय जगांतील परिस्थितीच्या मानानें फार उच्च आहे असें प्रतिपादन करण्यांत काय अर्थ आहे ? ह्या ध्येयाच्या अनुरोधानेंच आपण शक्य तितकी प्रगति केली पाहिजे. ज्या ध्येयामुळें आपल्याला स्फूर्ति मिळाली त्याच्या अनुरोधानें कार्य केलें तरच आपण सध्यां ज्या मार्गाला लागलों आहों त्यावर आपली प्रगति होईल. हा मार्ग सोडून दुसरीकडे वळण्याचा आपल्याला अनेक वेळां मोह पडेल; पण ज्या मानसिक सामर्थ्यामुळें आपली दृष्टि शुद्ध व स्थिर राहते तेंच प्रत्येक विरोधी शक्तीचा नाश करील. अंतर्गत एकीच्या कार्याच्या पहिल्या अवस्थेंत आंधळे दुराग्रही लोक चवताळून घोकणी लावतील कीं, बहुसंख्याकांनीं अल्पसंख्याकांच्या हुकमतींत रहावें एवढ्याचसाठीं

हा कावेबाज डाव लढविण्यांत येत आहे. आमच्या उत्कटतेबद्दल सर्वांची खात्री पटेपर्यंत मनोनिग्रहाच्या जोरावर आपण स्थिर राहिलें पाहिजे.. ध्येयाची खरी योग्यता समजून येतांच ते राष्ट्रीय झेंड्याखालीं येतील आणि आपल्या कार्यांतला पहिला भाग यशस्वी होईल. देशांत एकी झाली कीं स्वातंत्र्य आपल्या आटोक्यांत येईल. इतर विरोधक आणखी एक शंका काढतील. "इंग्लंडचें प्रभुत्व मान्य केलें तरच या देशांत शांतता नांदेल असें जर आज सांगण्यांत येत आहे तर इंग्लंडचा स्नेह आम्हांला संपादन करावयाचा आहे असा आग्रह तुम्ही काय म्हणून धरतां ?" या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. लढण्यासाठीं त्याचप्रमाणें तह करण्यासाठींही दोन पक्ष लागतात. गुलामगिरी स्वीकारण्यास तयार झालेला पक्ष शरण जातो. त्या वेळीं त्याचें सामुदायिक अस्तित्व नष्ट झालेलें असतें. आम्हांला गुलामगिरीची मुळींच भीति वाटत नाहीं; कारण देहपातापर्यंत लढून स्वतंत्र्य मिळविण्याचा आमचा निश्चय झालेला आहे; अंगीकृत कार्यांत यश मिळणारच अशी आम्हांला खात्री वाटत आहे. अंतःकरणाच्या उदार प्रवृत्ति जागृत ठेवावयाच्या आणि दृढनिश्चयानें व निकरानें लढावयाचें, शांततेची इच्छा मनांत धरून युद्धाला आरंभ करावयाचा, सहकार्याची तळमळ लागलेली असतांही इंग्लंडबरोबर जडून आलेले वाङ्मयविषयक, राजकीय, व्यापारी व सामाजिक संबंध तोडून टाकावयाचे आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य, समान दर्जा व सार्वत्रिक स्वातंत्र्य यांच्या पायावर नवे स्नेहसंबंध जुळून येईपर्यंत आम्हांभोंवतीं आपल्या प्रभुत्वाचें जाळें अधिकाधिक जखडण्याचा प्रयत्न करीत असलेल्या इंग्लंडबरोबर असेंच फटकून वागावयाचें, या गोष्टी परस्परविरोधी आहेत; अशा कल्पनेनें कांहीं लोक बुचकळ्यांत पडण्याचा संभव आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं जालीम उपाय अंमलांत आणीत असतांना यापुढें शत्रूशीं कधींही मैत्री जुळून येणें शक्य नाहीं असें वाटणें अगदीं साहजिक आहे; पण म्हणून आपल्या प्रयत्नांत कुचराई होतां कामा नये. स्वातंत्र्य हा राष्ट्राचा जीवनाधार आहे. आपण आपल्या तत्त्वांचा स्वदेशांत प्रचार करीत आहोंत तरी तीं शत्रूंच्या देशांतही प्रसृत होतील, या कल्पना भ्रामक आहेत किंवा आपल्याला गुंतविण्यासाठीं हें कपटानें भरलेलें वाग्जाल पसरण्यांत येत आहे, असें आरंभीं आरंभीं त्यांना वाटेल; पण जिव्हाळ्याचा

असा एक क्षण प्राप्त होईल कीं, जेव्हां त्यांना सत्य समजून येईल; आणि त्या क्षणींच नवयुगाचा प्रारंभ होईल. या एका क्षणांत सर्व दुष्ट विचारांचा त्याग होतो, वैरभावाला मूठमाती मिळते आणि स्नेहाचा पुनर्जन्म होतो! आमच्या स्वातंत्र्यांत त्यांच्या सुरक्षिततेला धोका आहे अशी कित्येकांना प्रामाणिक भीति वाटत आहे; ही भीति आपोआप नाहींशी होईल. आम्हांला चिरडून टाकण्यासाठीं अहोरात्र खटपट करीत असण्यांत त्यांना जी सुरक्षितता आहे त्यापेक्षां आमच्या स्वातंत्र्यामुळेंच त्यांना अधिक सुरक्षितता प्राप्त होणार आहे. संशयाच्या अंधारांतूनच विश्वासाचे किरण प्रकट होणार आहेत. आमच्या शत्रूंच्या मनोभावना आमच्याइतक्या उच्च होईपर्यंत आमची कायमची दिलजमाई होणें शक्य नाहीं; हा आमच्या टीकाकारांचा आक्षेप आम्हांला कबूल आहे. हल्लींचें युग धडधडीत स्वार्थाचें आहे आणि अधाशी इंग्लंड आपल्या साम्राज्याच्या मर्यादा वाढविण्यास उत्सुक झालें आहे; अशा स्थितींत इंग्लंडचें परिवर्तन होऊन दैवी, उदात्त व उदार असें नवें इंग्लंड निर्माण होण्याची मुळींच आशा नाहीं, अशी कल्पना करून घेऊन आपण आपलें ध्येय सोडतां कामा नये. आमच्या प्रतिपादनाला विरोध करण्यासाठीं आणि आमचीं तत्त्वें निरर्थक आहेत असें सिद्ध करण्यासाठीं आजचें नीच व जुलमी इंग्लंड खडें राहिलें आहे; पण आमचीं तत्त्वें सूक्ष्मरूपानें शत्रूंच्या छावणींतच प्रकट होतील. शेक्सपीअरच्या* नाटकांत, शेलेच्या भावगीतांत व टर्नरच्या× चित्रांत असे सूक्ष्म संदेश आपल्याला ऐकूं येतात. असामान्य बुद्धिमत्तेच्या इंग्रज लोकांना आयर्लंड व इंग्लंड यांचें साधर्म्य पटेल आणि इंग्लंडला आयर्लंडबरोबर सहकार्य करावयाची तळमळ लागेल. कोणतींही संकटें आलीं तरी आपण मात्र आपला सन्मार्ग सोडतां कामा नये, मग शत्रूच्या मनांत हवें तें असो. राष्ट्रधर्माचा हाच मुख्य अभिप्राय आणि हेंच समर्थन आहे. वसुधैवकुटुंबवृत्तीला निरुत्तर करणारा हाच कोटिक्रम आहे. जीवनाचें माहात्म्य व सौंदर्य यांचें मर्म जाणणें हें प्रत्येक राष्ट्राचें ध्येय असलें पाहिजे.

---

* शेक्सपीअर—इंग्रज नाट्यसम्राट्.

× टर्नर—विख्यात इंग्रज चित्रकार.

पण हें एका राष्ट्राशिवाय सर्वांनीं नाकबूल केलें तर सर्व राष्ट्रांचें वशीकरण होईपर्यंत आणि सर्वांना स्फूर्ति होईपर्यंत त्या एका राष्ट्रानें आपल्या सरहद्दींच्या मर्यादेंतच त्या स्वप्नाची जोपासना केली पाहिजे, हें अंतिम साध्य सध्यां दूरवर तरंगत असलें तरी तें साधण्यासाठीं केलेला एकएक प्रयत्न हें एक एक महत्कृत्यच आहे; मर्दुमकीच्या प्रत्येक कृत्यांत मूर्तिमंत सौंदर्य आणि चिरस्थायी आनंद आहे. चांगल्या लढवय्याला नेहमीं चांगला मोबदला मिळतो. शुद्ध मन, गरम रक्त, तीक्ष्ण कल्पनाशक्ति, जीवनाचें माहात्म्य आकलन करण्याचें सामर्थ्य, मर्दुमकीचें कार्य करीत असतांनां प्राप्त होणारा आनंद आणि अंगीकृत कार्य सफल झाल्यानंतर मिळणारी कीर्ति—हाच मर्दुमकीचा मोबदला होय. त्या कीर्तिशिखरावरून निनादित होणाऱ्या संदेशानें शेवटल्या संशयात्म्याचा संशय नष्ट होईल; तारकांपर्यंत चढून जाण्याची महत्त्वाकांक्षा धरल्यानें आपण पर्वतशिखरांवर खास पोंचूं.

प्रकरण पांचवें

सामर्थ्याचें रहस्य

स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं आपण सामर्थ्य कमावले पाहिजे. पण सामर्थ्याचें रहस्य कोणतें ? आपण जो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहों तो नीटपणें समजण्यासाठीं ह्या रहस्याचें ज्ञान करून घेणें अत्यंत आवश्यक आहे; हें रहस्य एकदां हातीं आलें, कीं त्याच्या आधारानें वैयक्तिक जीवनाची उभारणी करितां येईल; व्यक्तींचें सामर्थ्य हाच राष्ट्रीय जीवनाचा पाया आहे. खरें सामर्थ्य आणि पाशवी शक्ति यांची इतकी सळभेसळ झालेली आहे कीं, दृढ प्रयत्न, खोल दृष्टि आणि अभ्यास यांच्या साह्यानें त्यांना अलग अलग करून सत्य कोणतें तें आपण समजावून घेतलें पाहिजे. सामर्थ्याच्या रहस्यांतच सर्व प्रश्नांचें रहस्य सांपडणार आहे. अखेरचें आणि निकराचें स्वातंत्र्ययुद्ध ज्या रणांगणावर होणार आहे, त्याची सर्व बाजूंनीं पाहणी करून, शत्रुसैन्याच्या मांडणीचे व वृत्तीचे अंतस्थ हेतु ओळखून आपलें स्वतःचें सामर्थ्य किती आहे तें अजमावून पाहून आपण क्रमाक्रमानें सामर्थ्य संपादण्यास सुरुवात केली पाहिजे आणि खऱ्या सामर्थ्याचें अजिंक्य कवच प्राप्त होईपर्यंत हा उद्योग अखंडितपणें चालविला पाहिजे.

सामर्थ्याच्या रहस्याचें ज्ञान करून घेतांना एक भेद आपण लक्षांत ठेवला पाहिजे; खऱ्या सामर्थ्याचीं रूपलक्षणें मनांत ठसण्यासाठीं हा भेद स्पष्टपणें जाणणें जरूर आहे. कल्पना करा कीं एक सैन्य सुसंघटित आहे, त्याचे नेते कार्यकुशल आहेत आणि युद्धक्षेत्राकडे कुच करीत असतांना त्यांतील सैनिकांच्या अंतःकरणांत आशा व उल्हास हीं स्फुरत आहेत. कल्पना करा कीं, याच सैन्याचा पराभव झालेला आहे; पराभूत झाल्यावर ज्यांचा धीर खचला त्यांनीं रणभूमिवरून पळ काढला तरी एक मूठभर शूर लोक जागच्या जागीं उभे ठाकले आहेत, जय मिळण्याची आशा सर्वस्वीं निराधार झालेली असूनही मरेपर्यंत निकरानें लढावयाचा त्यांचा दृढ-निश्चय झालेला आहे. भिन्न भिन्न मनोवृत्तींनीं प्रेरित झालेल्या या दोन प्रकारच्या सैन्यांकडे बारकाईनें पाहिल्यास वर सूचित केलेला भेद आपल्या लक्षांत येईल. त्यांचा तुलनात्मक अभ्यास करतांना सामर्थ्याचें रहस्य

आपल्याला समजून येईल. निकरानें लढावयास उद्युक्त झालेल्या त्या मूठभर लोकांचें शौर्य त्या सुसंघटित सैन्याच्या शौर्यापेक्षां कितीतरी पटीनें अधिक उच्च दर्जाचें आहे. आपण प्रथम त्या सैन्याचा विचार करूं. त्याचें सामर्थ्य किती व कोणत्या दर्जाचें आहे; शिस्त, सुसंघटितपणा, अधिकाऱ्यांचे हुकूम बिनतक्रार व अक्षरशः पाळण्याची संवय आणि या संवयीमुळें उत्पन्न झालेली एकजूट आपणांला सर्वांची मदत आहे या भावनेमुळें प्रत्येकाला वाटणारा सुरक्षितपणा, जमावानें शिस्तवार चालण्यांत वाटणारा उत्साह, लायक नेत्यांच्या कर्तबगारीवरील निष्ठा या सर्व गोष्टींवर सैन्याचें सामर्थ्य व शौर्य अवलंबून असतें. सैनिकांमध्यें एकजूट उत्पन्न झाली आणि त्यांना जुटीनें काम करावयाची संवय झाली, कीं सैन्यामध्यें विश्वसनीय सामर्थ्य हमखास उत्पन्न होतें, असा सिद्धान्त असल्यामुळें, शिस्तीला इतकें महत्त्व आलें आहे, आणि एवढ्याचसाठीं शिस्त मोडणाराला फांशीचीही शिक्षा देण्यांत येते. सैनिकांची संख्या, एकजूट, सहकारिता, एकाग्रपणें काम करण्याची आणि वरिष्ठांची आज्ञा पाळण्याची संवय यांवर सैन्याचें सामर्थ्य अवलंबून असतें हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. अशा सैन्यावर अचानकपणें एखादें संकट ओढवलें—सेनानायकाचा मृत्यु, एखाद्या योजनेची फसगत, अचानक हल्ला किंवा यांसारखेंच युद्धांत हमेशा येणारे प्रसंग ओढवले कीं तत्क्षणीं त्या सैन्याच्या सामर्थ्यांत खिंडार पडतें, सैनिकांना शिस्तीचा विसर पडतो आणि पूर्वींसारखी सुरक्षितता वाटत नाहीं. सर्वांना रणभूमीवरून पाय काढण्याची बुद्धि होते. शिस्तीची संवय हाडींमांसीं मुरलेली असल्यामुळें कांहीं काळपर्यंत ते टिकाव धरून राहतात; पण भीति वाटूं लागली कीं सर्व बंधनें झुगारून देऊन आणि स्वतःच्या संरक्षणाकडे ही दुर्लक्ष करून ते पाठीमागें हटूं लागतात; हळुहळू या पिछेहाटीचें रूपांतर पराभवांत आणि पळापळींत होतें. थोड्या वेळापूर्वी एकजुटीनें लढत असलेलें सैनिक सैरावैरा पळूं लागतात आणि शेवटीं सर्वनाश होतो. सैन्याचें सामर्थ्य बाह्य शिस्तीवर अवलंबून असतें; ह्या शिस्तीमुळें प्रत्येक सैनिकाला आपण समर्थ आहों असा भास वाटूं लागतो; पण या हडेलहप्पींमुळें त्याच्या वैयक्तिक शक्तींमध्यें भर पडत नाहीं. व्यक्तिमात्राच्या अंगच्या शक्ति शिस्तींत आहेत कीं नाहीं याकडे कवायती-शिस्तवाल्यांचें लक्ष्यच जात नाहीं. सैन्यांतली

एकजूट नाहींशी होतांच सारे सैनिक निर्बल होतात आणि घाबरून जातात. त्याच सैन्यांतले कांहीं लोक, पण ज्यांचें शौर्य स्वभावतःच उच्च दर्जाचें आहे, ज्यांपैकीं प्रत्येकाचा स्वयंस्फूर्तीनेंच ठाम निश्चय झालेला कीं, मरेपर्यंत निकरानें लढावयाचें, आपल्या या विरोधाचा कोणता परिणाम होणें संभवनीय आहे हें स्पष्टपणें समजलेलें असूनही जे आपल्या आत्मिक सामर्थ्याच्या जोरावर, मुळींही न डगमगतां, त्या परिणामांना तोंड द्यावयास तयार झाले आहेत, शत्रूंच्या हातीं गेलेल्या विजयश्रीला परत खेंचून आणण्याच्या आकांक्षेनें ज्यांनीं आपल्या ऐहिक सुखाशांवर पाणी सोडलेलें आहे, त्यांचें शौर्य किती उच्च प्रतीचें आहे याचा विचार करा. खरें शौर्य तें हेंच. आणिबाणीच्या प्रसंगीं अधिकाऱ्यांचे हुकूम येईपर्यंत थांबण्यास किंवा कार्यकारणांचा विचार करण्यास सवड नसते अशा वेळींच खरें शौर्य प्रकट होतें. तें प्रत्यक्ष परिस्थितीकडे लक्ष देऊन विजेच्या वेगानें कृतीची दिशा निश्चित करतें. पलटणी पळूं लागल्या आहेत, निशाण धुळींत लोळत आहे, शत्रूचें सैन्य झपाट्यानें चालून येत आहे, अशा वेळीं पळ काढणें किंवा जागच्याजागीं मरणें यांपैकीं कोणतें तरी एक स्वीकारावें लागणार हें उघड दिसत असूनही त्या मूठभर शूर मर्दांना पळ आणि मृत्यु यांच्या दरम्यान आशेची व विजयाची अस्पष्ट छटा दिसूं लागते. या अंधुक आशेच्या जोरावर ते पळ काढून जीव बचावण्याचें साधन तिरस्कारानें झिडकारून टाकितात आणि अंगीकृत कार्यांत अपयश आलें तर पुढें ओढवणाऱ्या मृत्यूचा स्वीकार करावयास सिद्ध होतात. असें शौर्य अंगीं येईल तेव्हांच आपली पारतंत्र्यांतून सुटका होईल. आमच्या देशाच्या इतिहासांत आजवर अनेक वेळां असे प्रसंग येऊन गेले आहेत कीं, जेव्हां स्वातंत्र्य अगदीं जवळ आलें आहे असें आपल्याला वाटूं लागलें होतें, पण तें आपल्या हातीं लागलें नाहीं. लढाईच्या वेळीं दोन्ही सैन्यें समसमान सामर्थ्याचीं असलीं तर त्यांपैकीं एकाला प्राप्त होणाऱ्या यशांत कांहीं वैशिष्ट्य नाहीं; वेगवेगळ्या जागीं वेगवेगळे विजय मिळविण्यांत वैशिष्ट्य नाहीं; मूठभर मर्दांनीं अगणित शत्रूंना ज्या लढाईंत तोंड दिलेलें असतें तें युद्ध समाजाच्या स्मृतींत सदैव ताजें राहतें आणि अशा युद्धांनींच एखादा देश अजिंक्य गणण्यांत येतो. मूठभर

मर्दांनीं मरेपर्यंत शत्रूला थोपवून धरल्याचे प्रसंग एखाद्या मोठ्या विजयापेक्षां अधिक स्फूर्तिदायक कां वाटतात हें एक गूढ आहे; पण ते तसे वाटतात हें सत्य आहे. अशा प्रसंगांचा विचार करतांना राष्ट्राचें चैतन्य जागृत होतें, समाजांत शौर्याचा पुनर्जन्म होतो आणि आपण पुन्हा युद्धासाठीं सज्ज होऊन उभे राहतों.

म्हणून व्यक्तिमात्रानें आपल्या अंगीं असलेल्या काटकपणा, हिम्मत व दृढनिश्चय या शक्तींचा विकास करण्यास झटलें पाहिजे. हें मनांत ठसलें कीं लगेच कार्याला सुरवात होते. कांहीं लोकांची समजूत होऊन बसली आहे—आणि ही समजूत फार घातुक आहे—कीं भविष्यकाळांत स्वातंत्र्ययुद्ध सुरू होईल तेव्हां सर्वांनीं लढावयाचें आणि तोंवर सर्वांनीं तो दिवस उगवण्याची वाट पहात आपापल्या जागीं स्वस्थ पडून रहावयाचें; हा गैरसमज अत्यंत भयंकर आहे. तो दिवस उजाडेपर्यंत आपणांस स्वस्थ बसावयाचें नाहीं. त्या दिवशीं होणाऱ्या निकराच्या युद्धांत उपयोगांत आणण्यासाठीं शक्य तितकें सामर्थ्य या फुरसतीच्या वेळांत आपणांस मिळवावयाचें आहे. राष्ट्रकार्य हें एक वेगळेंच काम आहे; त्याचा सामाजिक, व्यावहारिक, धार्मिक किंवा इतर कार्यांशीं कांहीं संबंध नाहीं ही समजूतही अशीच चुकीची व घातुक आहे. या गैरसमजामुळें फसगत झालेले व इतरांना फसवूं पाहणारे लोक आपला विश्रांतीचा निकामा वेळ राष्ट्रकार्यासाठीं राखून ठेवतात. हे लोक रात्रंदिवस आपले नेहमींचे व्यवहार अशा रीतीनें व इतक्या बेफिकीरपणानें करीत असतात कीं, बिचारें राष्ट्र अस्तित्वांत आहे कीं नाहीं याची तरी त्यांना शुद्ध आहे कीं नाहीं, याबद्दलही संशय वाटूं लागतो. उषःकाल, माध्यान्ह आणि संध्याकाळ यांचा परस्परांशीं आहे तितकाच संबंध भिन्न भिन्न क्षेत्रांमधील मनुष्यमात्राच्या वेगवेगळ्या कार्यांमध्यें आहे; या सर्वांचा एकमेकांशीं मेळ असला पाहिजे. जो उत्तम मित्र असतो आणि उत्तम नागरिक असतो तोच श्रेष्ठ दर्जाचा देशभक्त व उच्च दर्जाचा वीर होऊं शकतो. कांहीं बाबतींत अप्रामाणिकपणानें वागणारा मनुष्य दुसऱ्या एखाद्या बाबतींत प्रामाणिकपणानें वागेलच असें सांगतां येणार नाहीं. राष्ट्रासंबंधींचीं कर्तव्यें नीटपणें पार पाडण्यासाठीं प्रत्येक नागरिकानें प्रामाणिकपणें आणि आस्थापूर्वक झटलें पाहिजे. आणि राष्ट्र-

कर्तव्यें अशा रीतीनें पार पाडतां यावीं म्हणून व्यक्तिमात्रानें आपल्या अंगीं असलेले सद्गुण विकसित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व्यक्तिमात्रानें आपल्या आचरणांत करारीपणा आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे; आणि ह्यासाठीं राष्ट्रकार्याशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं अशा अनेक व्यवहारांत त्याला भाग घ्यावा लागेल. मनुष्याच्या दैनिक व्यवहारांत लहानमोठीं कायें उपस्थित होतात, तीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें त्याच्या मनोवृत्तीला विशिष्ट प्रकारचें वळण देत असतात; यामुळें मनुष्य एखाद्या कार्यक्षेत्रांत कसा वागला हें पाहून तो दुसऱ्या कार्यक्षेत्रांत कसा वागेल याचें अनुमान बांधतां येतें. कामधंदेवाल्या किंवा चारचौघांत जाणाऱ्या येणाऱ्या माणसाची गोष्ट घ्या. कामधंद्यामध्यें किंवा करमणुकीच्या वेळांत त्याचा इतर माणसांशीं संबंध येतो. आपलें काम करीत असतांना त्याची मनोवृत्ति कोणत्या प्रकारची असते किंवा रिकाम्या वेळांतलें त्याचें संभाषण कोणत्या विषयासंबंधीं असतें याचा विचार करा. जेथें लोकांचा परस्परांशीं संबंध येतो अशा दैनिक व्यवहारांत भाग घेणाऱ्या व्यक्तींना एकामेकांबद्दल सहानुभूति असणें जरूर आहे असें कोणालाही वाटेल; पण एक क्षणभर लक्ष देण्याइतक्याही योग्यतेच्या नाहींत अशा गोष्टींबद्दल कुरकुर, तंटेभांडणें, द्वेष माजलेले आपणांस हरघडीला दिसून येतात. कर्तीसवरतीं माणसेंही एखाद्या क्षुल्लक गोष्टीसाठीं कुत्र्यामांजरा-सारखीं भांडतात आणि नंतर त्या भांडणाच्या आकसावर पुढें अनेक दिवसपर्यंत एकमेकांशीं बोलेनाशीं होतात, अशीं उदाहरणेंही आपल्याला आढळून येतात. क्षुद्र मत्सर, वैयक्तिक द्वेष, कुत्सित टीका यांनीं सामाजिक जीवनांत केवढा गोंधळ उडवून दिलेला आहे. एकमेकांबद्दलच्या अगदीं क्षुद्र व हलक्या गोष्टींना एवढें महत्त्व देण्यांत आलेलें दिसून येतें तरी त्यामुळें त्या गोष्टी मोठ्या न ठरतां त्या चर्चेंत भाग घेणारीं माणसें किती क्षुद्र व हलकट आहेत तें मात्र स्पष्ट होतें. मानवी जीवनाचा बारकाईनें अभ्यास करणाऱ्याला मर्दपणा, माणुसकी, मनाचें औदार्य व मोठेपणा यांचा सगळीकडे अभाव असलेला दिसून येतो. परिस्थितीचा मोठ्या मनानें विचार करून एखादें भांडण नुसत्या हंसण्यावर उडवून देणारे लोक फार क्वचित् आढळांत येतात. अशा माणसांची नजर महातत्त्वांवर असते. क्षणिक व

क्षुल्लक गोष्टींकडे ते तिरस्कारपूर्वक दुर्लक्ष करतात. हरघडी होणाऱ्या लहान-सहान कुरबुरींमध्यें मनुष्य आपला क्षुद्र अभिमान इरेस घालतो, या भांडणांमध्यें तत्त्वांचा अंशही नसतो. या गोष्टींचा विचार करून मनुष्यानें आपल्या कार्याची दिशा आंखून घेतली पाहिजे. कोरड्या आणि तात्त्विक दृष्टीनें विचार करतांना योग्य मार्ग ठराविण्यास कोणतीच अडचण दिसत नाहीं. पण प्रत्यक्ष व्यवहारांत हा कोरडा विचार उपयोगी पडत नाहीं. एखादा मनुष्य आपल्याशीं अजाणत्या उर्मटपणानें वागत आहे असें दिसून येतांच एखाद्याचा संताप अनावर होतो आणि त्या दोघांचें कडाक्याचें भांडण होतें; भांडण होऊन गेल्यावर आपण एवढें भांडून कायें मिळविलें याचा तो क्षणभर विचार करील तर त्याला आढळून येईल कीं, आपण व्यर्थ शिरा ताणल्या; क्षुल्लक भांडणांपासून कांहींच लभ्यांश होत नाहीं; कारण त्यांमध्यें कांहींच पणाला लावलेलें नसतें. मी अमुक अमुक मनुष्याला अमुक गोष्ट करूं देणार नाहीं असें संतापाच्या भरांत तो ठांसून जाहीर करील, पण या तत्त्वाप्रमाणें वागण्याचें तो मनांत आणील तर त्याच्याबरोबर उद्धटपणें वागणाऱ्या प्रत्येक भांडकुदळ मनुष्याबरोबर त्याला भर रस्त्यांत भांडत बसावें लागेल. मला अमुक मनुष्यानें मान दिलाच पाहिजे असें तो सांगेल; पण तो प्रत्येक क्षुद्र गोष्ट मनावर घेऊं लागेल तर आपला स्वाभिमान तो आपण होऊन नष्ट करून घेईल. मनुष्यानें व्यवहारांत तारतम्यबुद्धीचा उपयोग केला पाहिजे. प्रत्येक लहानसहान अपमानामध्यें आपल्या आयुष्याचें सर्वस्व इरेस पडलें आहे अशा समजुतीनें मनुष्य तंटेभांडणें उकरून काढूं लागला तर सामाजिक जीवन अशक्य होऊन बसेल. थोडासा विनोद, थोडेंसें दुर्लक्ष यांच्या साह्यानें अनेक भांडणें मिटूं शकतील. क्षुद्र माणसांची दृष्टि इतकी कोती असते कीं, क्षुल्लक गोष्टींपलीकडे त्यांची नजर पोंचूं शकतच नाहीं. त्यांच्या क्षुद्रपणाचा सहानुभूतीनें विचार केल्यास किती तरी भांडणें भांडलीं जाणार नाहींत. पण ही दृष्टि प्रत्यक्ष व्यवहारांत आणणें सोपें नाहीं. विचार जागृत होण्यापूर्वीच ताप्ट मनुष्य बेफाम भडकून गेलेला असतो; संतापाचा संवय झालेलें मन आंवरणें फार अवघड आहे. बुद्धि लगाम खेंचून धरील पण भावना बेफाम उधळलेल्या असतील.

हळुहळू नेटानें प्रयत्न केल्यास मनुष्याला आपल्या मनोवृत्ति आंवरून धरतां येतात; मनुष्याला मन आंवरण्याची संवय झाल्यानंतर आपण अमुक वेळीं अमुक कारणानें इतकें भडकलों होतों अशी आठवण होतांच त्याला हंसू आल्यावांचून राहणार नाहीं. वारंवार संताप आंवरून धरल्यानें आपण इतके निगरगट्ट होऊं कीं, कोणत्याही अपमानानें आपणांस संतापच येईनासा होईल, अशी कोणी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. मन आंवरण्यामुळेंच मनाचें सामर्थ्य वृद्धिंगत होतें. वैयक्तिक शक्तींना शिस्त लावल्यानें त्यांचें सामर्थ्य वाढतें, त्यांचा दर्जा श्रेष्ठतर होत जातो आणि आणीबाणीच्या वेळीं त्यांचें सामर्थ्य विशिष्ट कार्यावर केंद्रीभूत करतां येतें. एकूण लहानमोठ्या गोष्टींचा एकमेकींशीं निकट संबंध आहे; आणि आपण दूरदृष्टि, धैर्य आणि सहनशीलता यांच्या साह्यानें लहानसहान कुरबुरींची तीव्रता कमी केली पाहिजे. क्षुल्लक भांडणांत, त्याचप्रमाणें मोठमोठ्या राजकारणांत व युद्धांत, ह्या शक्तींच्या कमीअधिकपणामुळेंच व्यक्तींची व संघांची कार्यक्षमता निश्चित होत असते.

आतांपर्यंत आपण मनुष्याच्या व्यावहारिक व सामाजिक जीवनाचा विचार केला. आतां आपण त्याच्या राजकारणाकडे वळूं. येथेंही तोच प्रकार दिसून येतो. येथेंही माणसें एकमेकांबरोबर निष्कारण भांडाभांडी व झटापटी करीत असलेलीं दिसून येतात. येथेंही परिस्थितीचें परीक्षण करून कर्त्या माणसांनीं भांडणाचा मोह आंवरला पाहिजे. मग त्यांना कोणींही कोणतींही नांवें ठेवलीं तरी हरकत नाहीं. कोणत्याही राजकीय संस्थेकडे पहा; 'व्यावहारिक कार्यासाठीं संघटित झालेली संस्था' असें राजकीय संस्थांचें वर्णन करण्यांत येतें, तेव्हां एकादें महातत्त्व–जें सर्वांनीं मान्य करण्याच्या आणि उचलून धरण्याच्या योग्यतेचें असतें तें–बाजूला झुगारून देण्यासाठीं व्यवहार' या शिष्टसंमत शब्दाचा उपयोग करण्यांत आलेला असतो. व्यवहाराच्या सोयीसाठीं मूलभूत तत्त्वें एकदां झुगारून दिलीं, कीं संस्थेच्या सभासदांना कोणत्याही कारणावांचून एकामेकांच्या नरडीचा घोट घेण्यासाठीं एकामेकांच्या अंगावर धावून जाण्याला फारसा अवधि लागत नाहीं. प्रत्यक्ष उदाहरण देऊन ही गोष्ट स्पष्ट करण्याची जरूर नाहीं. ती इतकी सर्वसाधारण आहे कीं, कोणत्याही संस्थेचें उदाहरण घ्या, तेथें या गोष्टी चाललेल्या दिसून येतील. सभेचा अध्यक्ष गुळमुळीतपणें नियमांचा अर्थ स्पष्ट करून सांगत

असतो; पण त्या नियमांची अंमलबजावणी कडकपणें करण्यास त्यांची तयारी नसते; सभासद अध्यक्षाची आज्ञा जुमानीत नाहींत, अध्यक्षाकडे दुर्लक्ष करून ते एकामेकांबरोबर बोलत बसतात; कोणींही उठावें, सभेंत शिस्त आणण्यासाठीं अध्यक्षांकडे ओरड करावी, हवें त्यानें नियमांविरुद्ध हवा तितका वेळ वाटेल तें बोलत रहावें. अशा वेळीं एकादा कार्यतत्पर मनुष्य उठून उभा राहतो आणि सभेपुढें कोणता विषय चालू आहे याची सभासदांना आठवण करून देतो. हें चित्र सर्वांच्या परिचयाचें आहे; पण आपल्या आजूबाजूला असलेल्या लोकांच्या विचित्रपणामुळें फक्त आपल्या निकट असलेल्या संस्थेमध्येंच हे प्रकार चालू आहेत अशी सर्वांची गैरसमजूत असलेली दिसून येते. पण खरा प्रकार असा आहे कीं, सगळीकडे हीच रड आहे. तत्त्वांचा त्याग केला आणि गैरशिस्त वागणुकीला सुरवात केली कीं असेंच व्हावयाचें. हें समजत असूनही आपण रोज रोज त्याच त्याच गोष्टी पुनःपुन्हा करीत असतों. याचा अर्थ एवढाच कीं, आपल्या अंगीं एखाद्या गोष्टीचे तर्कशुद्ध परिणाम काय होतील ते जाणण्याची ताकद नाहीं आणि माहीत असलेल्या सत्यासाठीं झगडण्याचा धीर नाहीं. आमच्या राजकीय संस्थांचें स्वरूप वेगळ्या प्रकारचें असावें अशी इच्छा असेल तर प्रत्येकानें स्वतःला शिस्त लावून घेतली पाहिजे. व्यापक कार्याच्या दृष्टीनें स्वतःच्या शक्ति विकसित केल्या पाहिजेत. आपण ज्या महत्कार्याच्या सिद्धीसाठीं सज्ज झालों आहों त्याची व्यापकता व माहात्म्य यांची योग्य कल्पना आपण करून घेतली पाहिजे. त्या ध्येयासाठीं झटण्याची पात्रता अंगीं आणली पाहिजे. क्षुद्रपणाचा आणि कृष्णकारस्थानांचा आपल्याला संपर्कही होतां कामा नये. आपलें वर्तन बाणेदारपणाचें, अंतःकरण खंबीर आणि हेतु उदात्त असले पाहिजेत. ह्या गोष्टी प्रत्येकानें समजावून घेऊन तदनुसार वर्तन ठेवलें पाहिजे आणि प्रत्येक मनुष्य कडक कसोटीला उतरला पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, सार्वजनिक आयुष्यक्रमांत जरूर वाटणाऱ्या गुणांची खासगी जीवनक्रमांतही जरूर लागते. त्याचप्रमाणें धैर्य, सोशिकपणा व दूरदृष्टि या वीर व मुत्सद्दी यांना आवश्यक असणाऱ्या गुणांची सार्वजनिक जीवनालाही जरूर आहे.

वरील तात्त्विक विवेचन अधिक स्पष्ट करण्यासाठीं उदाहरण देतों.

९—सामर्थ्याचें रहस्य

९१
ह. नं. 3283.

आपल्या इतिहासांत हल्लीं आणि प्राचीनकाळीं अनेक वेळां असें घडून आलें आहे कीं, कांहीं माणसें एकाद्या तत्त्वाचा पुरस्कार करण्यासाठीं सार्वजनिक कार्यांत भाग घेतात; पण कालावधीनें तीं माणसें त्याच तत्त्वांचा त्याग करतात. असें झालें म्हणजे आपण त्यांना देशद्रोही मानतों. त्यांचा धिक्कार करतों. त्यांच्यावर तिरस्काराचा आणि जहरी टीकेचा वर्षाव करतों. आपली कल्पना झालेली असते कीं, असे लोक मुळांतच हीन दर्जाचे असतात. हीं माणसें स्वभावतःच दुष्ट असतात असें नाहीं, त्यांनीं स्वतःच्या शक्तींना शिक्षण दिलेलें नसतें व शिस्त लावलेली नसते. अर्थातच, या दुर्बलतेमुळें ते पहिल्या कसोटीच्या प्रसंगींच नामोहरम होतात. इंग्लंडच्या बादशहाच्या राज्यारोहणाचे वेळीं आयर्लंडांतील स्थानिक-स्वराज्यसंस्थांच्या अध्यक्षांनीं दाखविलेल्या कमकुमवतपणाबद्दल लोकमत प्रक्षुब्ध झालें होतें. कित्येकांच्या वर्तनाचा सरळ अर्थ उघड उघड दिसला; पण या बाबतींत बाह्य दृष्टीला दिसत नाहींत अशा ज्या अनेक गोष्टी आहेत त्यांकडे आपल्यांपैकीं कितीजणांचें लक्ष गेलें आहे ? आंत काय चाललेलें असतें हें स्पष्ट करून दाखविण्यासाठीं मी एक उदाहरण देतों. आपण कल्पना करूं या कीं, फेनियन* पक्षाच्या एका व्यक्तीला मेयर निवडण्यांत आलें आहे.

---

* **सिनफेन.**—निर्भेळ-स्वातंत्र्यवादी पक्ष. आयर्लंडची सामाजिक व औद्योगिक उन्नति करावयासाठीं व स्वातंत्र्य स्थापन करावयासाठीं जहाल लोकांनीं हा पक्ष निर्माण केला. आरंभीं आपलें ध्येय साधावयासाठीं सनदशीर चळवळ करावयाची असा या पक्षाचा कार्यक्रम होता; पण लवकरच त्यांचा जहालपणा पुढें आला. घडाडीच्या कार्यक्रमामुळें हा पक्ष फार लोकप्रिय झाला. अल्स्टरच्या लोकांनीं स्वयंसैनिक दल उभारतांच यांनीं राष्ट्रीय सैन्य खडें केलें. रेडमंडला विरोध करून त्यांनीं सैन्यांत भरती होऊं दिली नाहीं. अल्स्टरच्या ८५००० स्वयंसैनिकांपैकीं २०७०० लोक महायुद्धासाठीं खड्या सैन्यांत गेले तर आयर्लंडच्या १७८६४९ स्वयंसैनिकांपैकीं फक्त १० लोक खड्या सैन्यांत गेले. परदेशांतून हत्यारें गुप्तपणें आणवून या पक्षानें १९१५-१६ सालीं बंड उभारलें. सरकारनें साम्राज्यसंरक्षणाचा कायदा मंजूर करून हत्यारें जप्त करावयास सुरवात करतांच बंड सुरू झालें.

निवडणूक झाल्यावरोबर तो आपल्या जाळ्यांत पक्का अडकावा यासाठीं चालू राज्यघटनेनें किती युक्त्या योजून ठेवल्या आहेत तें पहा. हें जाळें अत्यंत बारीक तंतूंचें आणि अत्यंत कौशल्यानें विणलेलें असून एकदां आंत शिरलेला मनुष्य त्यांतून कांहीं केल्या बाहेर निघूं शकत नाहीं. मेयरकडे मॅजिस्ट्रेटचे अधिकार असतात आणि प्रत्येक मॅजिस्ट्रेटाला आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागते–पण आपण कल्पिलेला मेयर हा फेनियन असल्यामुळें सदरहू पक्षांत सामील होते वेळीं त्यानें मातृभूमीशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतलेली असते. येथें पहिली झटापट होते. एकदां या खटाटोपांत पडल्यावर नुस्तें होय किंवा नाहीं म्हणून भागत नाहीं. अधिकाराच्या जागेला आनुषंगिक अशा अनेक गोष्टी असतात. सार्वजनिक कार्यांत पुढाकार घेणाऱ्या प्रत्येक मनुष्याचे भोंवतीं अनेक लोकांचा घोळका जमलेला असतो. या घोळक्यांतल्या कांहींजणांना आपला स्वार्थ साधावयाचा असतो, कित्येकजण त्याचे स्नेही असतात आणि त्यांची स्थिति अत्यंत हलाखीची

सन १९१६ सालीं डब्लिन शहरीं फार निकराचें बंड झालें. सिनफेन-पक्षानें नवी राज्यघटनाही स्थापन केली; पण हें बंड लवकरच मोडण्यांत आलें. बंडानंतर ३४३० पुरुष व ७९ बायका कैद करण्यांत आल्या आणि त्यांना सक्तमुजरीपासून फांशीपर्यंत शिक्षा ठोठावण्यांत आल्या. बंडाचा जोर कमी होत नाहीं हें पाहून सरकारनें तडजोडीसाठीं सारे कैदी सन १९१७ सालीं सोडून दिले. रेडमंडच्या मृत्यूमुळें तडजोडीची आशा नष्ट झाली. लढाई संपल्यावर या पक्षानें सर्व निवडणुकी लढविल्या. सर्व स्थानिक स्वराज्यसंस्था व पार्लमेंटरी प्रतिनिधींच्या १०५ जागांपैकीं ७३ जागा या पक्षानें काबीज केल्या. त्यांच्यांपैकीं कांहीं लोकांनीं चळवळीची तीव्रता वाढविली. पोलिसांवर हल्ले झाले, अनेक अधिकारी ठार व जखमी करण्यांत आले, सरकारी खजिने लुटण्यांत आले. दडपशाहीबरोबरच क्रांतिकारकांचा जोर वाढूं लागला. राज्य हांकणें अशक्य झालें; तेव्हां १९२० सालीं होमरूल बिल मंजूर झालें. १९२१ सालीं झालेल्या निवडणुकींत या पक्षानें १२८ पैकीं १२४ जागा काबीज केल्या. ता. ६ डिसेंबर १९२१ रोजीं या पक्षाच्या कर्तबगारीमुळें 'आयरिश फ्री स्टेट'ची स्थापना झाली.

आहे हें माहीत असल्यामुळें त्यांच्यासाठीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे असें त्याला वाटत असतें. कित्येकांनीं निवडणुकीच्या वेळीं त्याच्यासाठीं मतें मिळविण्याकरितां खटपट केलेली असते. ही खटपट क्वचितच निरपेक्ष असंते. मेयर हा मॅजिस्ट्रेट असल्यामुळें त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना त्याच्या इच्छेला मान द्यावा लागतो. या दुय्यम अधिकाऱ्यांच्या अखत्यारांत असलेलीं अनेक कामें त्याच्या मदतनिसांना करून द्यावयाचीं असतात आणि म्हणूनच हे लोक आपल्या वळणांतल्या माणसाला निवडणुकीसाठीं उभा करतात. स्वार्थाच्या आड येणाऱ्या कोणत्याही तत्त्वाला ते मान्यता देत नाहींत. हे लोक आपणांला त्याचे 'साहाय्यक' म्हणवितात, आपल्या कर्तबगारीमुळेंच तो निवडून आला असें ढोंग करतात आणि अशा रीतीनें वागतात कीं, जणुं काय यांनीं त्याचा आत्माच ताबेगहाण लावून घेतला आहे. स्वतःच्या दृष्टीनें जें योग्य वाटेल तें त्यानें केलें तर तें यांना बरें वाटत नाहीं; पण त्यानें सदोदित आपल्या अनुयायांच्या फायद्याच्या गोष्टी करीत राहावें अशी यांची अपेक्षा असते; यामुळें अधिकाराच्या जागेवर जाऊन बसतांच लढाईला सुरवात होते. आपण कल्पिलेला मेयर खरा फेनियन असल्यामुळें पहिल्या मोहिमेंतच तो शत्रूला शरण जाणार नाहीं. पण या हल्ल्याच्या मागोमागच दुसरी कसोटी चढाई करून येत असते. प्रत्येक मेयरच्या वर्तणुकीवर मध्यवर्ती राजसंस्थेची नजर असते. मॅजिस्ट्रेट या नात्यानें मेयरच्या हातीं असलेल्या अधिकारांत डब्लिन कॅसलमार्फत ढवळाढवळ सुरू होते. दुसरे अधिकारी गुप्तपणें त्याच्याविरुद्ध गाऱ्हाणीं करूं लागतात. 'अमुक बाबतींतलें मेयरचें वर्तन बेकायदेशीर आहे; मॅजिस्ट्रेटचीं कर्तव्यें अमुक आहेत; त्यानें असें असें केलें पाहिजे; त्यानें अजून शपथ घेतलेली नाहीं,' वगैरे. यामुळें पहिल्या दिवशीं सुरू झालेलें युद्ध अव्याहत चालू राहतें. मध्यवर्ती राजसंस्था नव्या लोकनियुक्त अधिकाऱ्यांविरुद्ध येणाऱ्या तक्रारींचा विचार विशेष सहानुभूतीनें करते. कारण असे लोक पूर्वीच्या पक्षांतून फुटून आपल्या गोटांत यावे अशी राज्यकर्त्यांची इच्छा असते. पूर्वीच्या पक्षाला चिकटून राहणारांचे अधिकार कमी करण्यांत येतात, त्यांचें वजन कमी करण्यासाठीं हरतऱ्हेचे प्रयत्न करण्यांत येतात, त्याला पाठबळ देणाऱ्या इसमांची मुद्दाम निराशा करण्यांत येते. ह्या सर्व घडामोडी अगदीं गुप्तपणें चाललेल्या असतात. तरीही आपला मेयर सरकारला शरण

जात नाहीं; पण या प्रकारचा त्रास भोगावा लागेल अशी अपेक्षा नसल्यामुळें त्याच्या मनाची चलबिचल होऊं लागते. इकडे त्याच्यावरले भुरटे हल्ले चालू असतातच. त्याला हळुहळू लहानमोठे समारंभ साजरे करण्याचीं आमंत्रणें येऊं लागतात. खुद्द बादशहाकडूनही एखाद्या मेजवानीसाठीं आमंत्रण येतें. हे समारंभ मोठ्या बहारीचे असतात. प्रवासाचा खर्चही त्याच्या अंगावर पडत नाहीं. अशा प्रसंगीं हजर राहण्याकरितां त्याला व त्याच्या पत्नीला मिठास भाषेंत लिहिलेले खलिते रवाना करण्यांत येतात. आपला मेयर कामकाजाची सबब सांगून हीं आमंत्रणें सभ्यपणें नाकारील, पण त्यांच्या माऱ्यानें तो बिचकून जाईल हें मात्र खास. सध्यां आपला मेयर नुस्ता बावरलेला आहे, तो अजून सरकारच्या जाळ्यांत गुरफटला नाहीं. मेयरला जीं आमंत्रणें येतात तीं सर्वच मेजवान्यांचीं नसतात; यांपैकीं कांहीं प्रसंग असे असतात कीं, नागरिकांचा पुढारी या नात्यानें तेथें हजर राहणें त्याला भाग पडतें. आरोग्य-संस्थांच्या आडोशानें आपल्या बिचाऱ्या मेयरवर एक नवा हल्ला चढविण्यांत येतो. आरोग्य कोणास नको आहे? समाजाचें आरोग्य वाढविण्यासाठीं दैवी इंग्रज, सैतानी आयरिश वगैरे सर्व पक्षांच्या लोकांनीं सहकार्य करणें जरूर आहे. आतांपर्यंत शत्रूच्या हल्ल्यांना दाद न देणारा आपला मेयर क्षुद्र जीवजंतूंच्या पायीं शत्रूच्या गोटांत गेला आणि सरकारच्या जाळ्यांत अडकला. समाजाचें आरोग्य वाढविण्यासाठीं केलेला हा समारंभ मोठ्या थाटामाटानें साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थान आपल्या मेयरसाहेबांनीं मंडित केलें होतें. खुद्द गव्हर्नरसाहेब आपल्या पत्नीसह समारंभाला हजर होते. त्यांच्या आगमनानें समारंभाला मोठीच शोभा आली होती. गव्हर्नरसाहेबांनीं मेयरसाहेबांबरोबर गोडीगुलाबीनें गप्पागोष्टी केल्या. त्यांच्या बायकांच्याही गुजगोष्टी झाल्या—कदाचित् त्या एकाच गांवच्या अथवा एकाच शाळेंत शिक्षण घेतलेल्या बालमैत्रिणीही असूं शकतील—त्यांनीं मोकळ्या मनानें एकमेकींजवळ गुजगोष्टी केल्या. समारंभाचे वेळीं 'अहो रूपं अहो ध्वनिः'-चा प्रकार चालला होता आणि शेवटीं टाळ्यांच्या गजरांत समारंभ बरखास्त झाला. गव्हर्नरसाहेब निघून गेले; पण ते आपल्या मेयरला विसरले नाहींत. मेयरसाहेबांनीं एवढ्या अगत्यानें केलेल्या स्वतःच्या व आपल्या पत्नीच्या आगतस्वागताबद्दल एक स्वदस्तूरचें आभारप्रदर्शक पत्र गव्हर्नरसाहेबांनीं रवाना

केलें. यानंतर कदाचित् या मेयरच्या मुलीचें लग्न होईल किंवा त्याचा एकादा मुलगा मरण पावेल; या खासगी गोष्टींवरही सदरहू गव्हर्नरसाहेबांची नजर असते. त्याचें अभिनंदन करण्याचा किंवा त्याच्या दुःखाशीं सहानुभूति दाखविण्याचा एकही प्रसंग ते वायां जाऊं देत नाहींत; अशा वेळीं सरकारी सहीशिक्क्यानिशीं खलिते रवाना करण्यांत येतात. सहानुभूतीचा धिक्कार करण्याइतका खुनशीपणा कोणाच्या अंगीं असतो? या व अशाच साधनांनीं त्या कसलेल्या योद्धयाचें सामर्थ्य नष्ट करण्यांत येतें आणि अत्यंत कौशल्यानें विणलेल्या सरकारपक्षाच्या जाळ्यांत तो जखडला जातो. मी हें एकाद्या व्यक्तीला उद्देशून लिहीत नाहीं; एकादा मनुष्य सरकारला शरण जातो, तेव्हांचें त्याचें वर्तन किती हास्यास्पद असतें हें दाखविण्याचा माझा हेतु नाहीं. सरकारपक्षांत लोक कसे सामील होत जातात, सरकारनें निर्माण केलेलें मोहजाल किती सूक्ष्म व भयंकर आहे, एवढेंच मला दाखवावयाचें आहे. जो कोणी या जाळ्यांत सांपडेल त्याला आपण जाब विचारलाच पाहिजे. लोकांनीं मोठ्या विश्वासानें एकाद्या माणसाची मानसन्मानाच्या व जबाबदारीच्या जोगवर निवडणूक करून दिल्यानंतर त्यानें आपल्या तत्त्वांचा त्याग केला—मग त्याला कोणत्याही अपरिहार्य अडचणींमुळें तसें करावें लागलेलें असो—तर त्यानें आपल्या वर्तनाचा लोकांना जाब दिलाच पाहिजे. बोलूनचालून हें युद्ध आहे आणि युद्ध ही कसोटी आहे. युद्धांत भाग घेणाऱ्यानें शत्रु व मित्र यांबरोबर करारी रोखठोकपणेंच वागलें पाहिजे; पण मानवी दुर्बलतेहून अधिक घातुक अशा अनेक गोष्टी आहेत, त्यांकडे आपण दुर्लक्ष करतां कामा नये. त्या मोहजालाला विसरूं नका.

आपण ज्या तत्त्वाचा विचार करीत आहों तें स्पष्ट करून दाखविण्यासाठींच वरील उदाहरण दिलेलें आहे. वर ज्या मनुष्याच्या अधःपाताची गोष्ट सांगितली आहे त्याला जें युद्ध लढावें लागलें तें उघड्या मैदानांत समोरासमोर झालें असतें तर त्याचा असा पराभव झाला नसता. आपणावर गुप्तपणें चोरटे हल्ले चढविण्यांत येतील अशी त्याची अपेक्षाच नव्हती. उघड, अस्पष्ट अथवा गूढ धमक्या, गोडीगुलाबीचीं भाषणें, खुषामत, कृपादृष्टि, शिफारस, आर्जव, बाह्यतः निरुपद्रवी अशा रूढि, आडमार्गानें व कपटानें केलेले हल्ले, ह्या सर्वांचा त्याच्यावर मारा सुरू होतो. हा मारा अत्यंत गुप्तपणें, वाच्यता होऊं न देतां, अविच्छिन्न-

पणें आणि अविश्रांतपणें चाललेला असतो. या माऱ्याला आपण बळीं पडूं नये, धमकी व खुषामत यांचा आपल्यावर परिणाम होऊं नये, अशी ज्याची इच्छा असेल त्यानें स्वत:ला शिस्त लावून घेतली पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या अडचणीच्या वेळीं आपण डगमगणार नाहीं अशी शिस्त लावून घेतली पाहिजे. विशिष्ट प्रसंगाला साजतील असे कपडे तयार करवून घेतां येतात पण आणीबाणीच्या वेळीं आचरणांत उतरेल असा करारीपणा ऐनवेळीं निर्माण करतां येत नाहीं. सार्वजनिक किंवा खाजगी आयुष्यांत मनुष्यमात्राचे हातून घडून येणाऱ्या कार्यांत त्याची मनोवृत्ति प्रकट होते, त्याची निष्ठा प्रदर्शित होते आणि हीं कार्यें घडत असतांना त्याच्या शक्तींना विशिष्ट वळण लागत असतें. शिस्तीचा उपयोग अडचणीच्या वेळींच होतो असें नाहीं. आयुष्यांत साधारणपणें घडून येणाऱ्या लहानसहान प्रसंगांतही शिस्तीचें फळ मिळतें. क्षुल्लक गोष्टीबद्दल बेशिस्त माणसें बेफामपणें हमरीतुमरीवर येतात; पण प्रत्येक गोष्टीला किती किंमत द्यावयाची याचें ज्ञान ज्याला झालेलें आहे तो मनुष्य अशा प्रसंगीं अगदीं शांत राहतो. त्या वेळीं मनाच्या सामर्थ्यानेंच त्याला संताप आंवरून धरतां येतो. क्षुद्र वस्तूंना क्षुद्र गणण्यामुळेंच त्याला आयुष्यांतील महातत्त्वांचें परिज्ञान होईल.

सर्वसाधारण लोकांच्या दृष्टीनें दिसत नाहींत किंवा कल्पनेला आकलन करतां येत नाहींत अशा वैयक्तिक किंवा राष्ट्रीय संकटांचें गांभीर्य त्याला आपोआप कळून येतें; यामुळें संकट प्रत्यक्षपणें ओढवतें त्या वेळीं त्याची दृष्टि स्पष्ट, मन चपळ व वर्तन जोरदार असतें आणि हें पाहून शत्रूचा गोंधळ उडतो. हें ध्येय पुढें ठेवून आपण सामर्थ्याचें रहस्य काय आहे याची खूणगांठ बांधून ठेवली पाहिजे. सैन्य सज्ज झालें म्हणजे त्यांतला एक शिपाई या नात्यानें तुम्ही आघाडीवर जाल आणि युद्धांत मोठ्या मर्दुमकीनें तलवार गाजवाल—सैन्यांतला एक घटक या नात्यानें शिपायाला लागणारी शिस्त मौल्यवान् आणि महत्त्वाची आहे. ती तुम्हीं पाळलीच पाहिजे—पण या शिस्तीमुळें फक्त जमावाचें शौर्य निर्माण होतें. लढाईचे वेळीं दोन्ही सैन्यें तुल्यबल असतील तरच या शिस्तीचा खरा उपयोग होतो. पण स्वातंत्र्य मिळवावयाचें असतें, तेव्हां एकामेकांशीं लढूं इच्छिणाऱ्या दोन सैन्यांच्या सामर्थ्यांत जमीनअस्मानाचा फरक असतो. आणि स्वातंत्र्ययुद्धांत

लढणाऱ्या स्वातंत्र्यवीरांची बाजू सर्व दृष्टींनीं गैरसोईची व धोक्याची असते. अशा वेळीं सैन्यांतली शिस्त कामीं येत नाहीं. स्वातंत्र्ययुद्धासाठीं अवश्य असलेलें शौर्य अधिक उच्च दर्जाचें आणि सामर्थ्य अधिक टिकाऊ असावें लागतें. स्वातंत्र्ययुद्धासाठीं नुस्त्या पलटणी उभारून भागत नाहीं. तेथें जमा झालेल्या सैनिकांच्या संख्येवरून या पलटणींच्या सामर्थ्याचें अनुमान सेनापति बांधूं लागेल तर तें खास चुकीचें ठरेल. प्रत्येक सैनिकाचें वैयक्तिक शौर्य व सामर्थ्य किती व कोणत्या दर्जाचें आहे, सैन्याची शिस्त बिघडून भेदरलेले शिपाई सैरावैरां पळूं लागले असतां या पलटणींपैकीं किती लोक जागच्या जागीं उभे राहतील आणि जिवावर उदार होऊन लढतील, यावरूनच त्या पलटणीच्या खऱ्या शौर्याचें खरें अनुमान बांधतां येईल. असें कसदार शौर्य त्या शिपायांच्या अंगीं असेल तरच त्या सेनापतीला आपल्या शत्रूंवर विजय मिळवितां येईल आणि कोणत्याही अडचणीच्या प्रसंगांतून निभावून जातां येईल. या कणखर मर्दांच्या जोरावर त्याला कच खाणाऱ्या शिपायांना धीर देतां येईल, पळ काढणाऱ्या सैनिकांना परत आणून शिस्तींत उभें करतां येईल, हातांतून निसटून जात असलेला विजय पुन्हा मिळवितां येईल आणि अनेक स्थित्यंतरांतून जीव बचावून राहिलेला, उंच व अभिमानानें फडफडत असलेला, स्वातंत्र्याच्या तेजानें दैदीप्यमान झालेला झेंडा रोंवावयाचें भाग्य त्यांच्या वांटयाला येईल.

प्रकरण सहावें

तत्त्वांचें कार्य

ज्ञान कृतींत उतरलें नाहीं तर त्याचा काय उपयोग ? थोडीशी अक्कल असली, कीं, हवीं तेवढीं तत्त्वें निर्माण करतां येतात; त्यांना प्रत्यक्ष कृतीची कसोटी लावली नाहीं तर तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत आढळून येणाऱ्या अनेक तत्त्वांच्या मढ्यांत आणखी एकाची भर घालण्यापलीकडे आपल्या हातून कांहींही होणार नाहीं. वादविवाद करणें, निबंध लिहिणें किंवा सभा भरविणें एवढेंच तत्त्वांचें कार्य नाहीं—मानवी जीवनाचें नियंत्रण करणें हेंच ज्ञानाचें ध्येय आहे. ह्या मुद्द्याकडे दुर्लक्ष करणें म्हणजे वेळ व शक्ति यांचा अपव्यय करणें आहे. या सत्याचा स्वीकार करून अमूर्त ज्ञानापैकीं जीं तत्त्वें आपल्याला पटतात त्यांचें ग्रहण करून, तीं आपल्या जीवनांत प्रत्यक्ष स्वरूपाला आणून समोर उभे असलेले प्रश्न त्यांच्या साह्यानें सोडवून, परस्परविरोधी मतांच्या सत्यासत्याचा निर्णय त्यांच्या अनुरोधानें लावून, त्यांच्या आधारावर कोणत्याही अडचणींना तोंड देऊन आणि हव्या त्या अपेष्टा सोसूनही सत्याशीं एकनिष्ठ राहून आपण लोकांना त्या तत्त्वांचा खरेपणा पटवून देऊं. मग कांहीं लोक त्यांचा पुरस्कार करतील व कांहीं त्यांना विरोध करतील; पण आपल्या कार्यामुळें आपल्या पिढीची खात्री पटेल कीं, आपणांपुढें असलेलें कार्य गंभीर आहे.

तत्त्वें कृतींत उतरविण्यासाठीं प्रथम परिस्थितीचें परीक्षण केलें पाहिजे. सत्यासत्याचा निर्णय करून खरें मत बनविण्यासाठीं आपण वर्तमान परिस्थिति समजावून घेतली पाहिजे. भूतकाळांत घडलेल्या घडामोडींचा निष्कर्ष काढला पाहिजे आणि भविष्यकाळांत आपलीं ध्येयें साध्य होण्यासाठीं युगनियंत्रण करणाऱ्या आणि समाजाला ज्ञान देणाऱ्या महातत्त्वांच्या अनुरोधानें योग्य योजना योजण्याची खबरदारी घेतली पाहिजे. सन १७९८ पासून आजतागाईत घडलेल्या घडामोडींकडे आपण पाहूं. सन १७९८, १८०३, १८४८, १८६७ हीं उज्ज्वल वर्षें* आयर्लंडच्या इतिहासांत उठून दिसतात. आत्मयज्ञाची

*१७९८.—वूल्फटोनचे बंड. आयर्लंडांतील इंग्लंडची सत्ता नष्ट

सिद्धता, सत्य, शौर्य व स्वातंत्र्य यांवर अढळ निष्ठा आणि राष्ट्रस्वातंत्र्याचा झेंडा खात्रीनें विजयशाली होणार असा आत्मविश्वास हीं अत्यंत महत्त्वाचीं स्वरूपें या वर्षांमध्यें घडून आलेल्या घडामोडींमध्यें दिसून आलीं. या वर्षीं आयरिश लोकांना साक्षात्कार झाला होता, त्यांचें रक्त उसळ्या घेत होतें. त्यांचें चैतन्य जागृत झालें होतें. त्या चैतन्यानें दांभिकपणा, फसवेगिरी व क्षुद्रपणा यांचें भस्म करून सर्व शूरांच्या अंतःकरणांत आशा व कर्तृत्व यांचें तेज निर्माण केलें होतें. परक्यांची हकालपट्टी लांबणीवर पडली तरी त्या दिवसांत शत्रूंना आव्हान करणें आणि त्यांचें सामर्थ्य खिळखिळे करणें ही खरोखरीच मर्दुमकीची गोष्ट होती. एवढ्या चळवळी सोडून दिल्या, तर बाकीचा काळ औदासीन्याचा आहे. या काळांत शरीर व आत्मा यांना कुरतडणाऱ्या सर्व रोगांच्या सांथी सर्वत्र पसरलेल्या होत्या. या उदास

करण्यासाठीं वूल्फटोननें फ्रेंच लोकांची मदत घेऊन बंड केलें; पण बंडवाल्यांचा लवकरच मोड झाला.

१८०३.—रॉबर्ट एमेटचें बंड; इंग्लंड व फ्रान्स यांचें युद्ध जाहीर होतांच आयर्लंडला स्वतंत्र करण्यासाठीं फ्रेंच सैन्य पाठविण्याचें वचन नेपोलियननें एमेटला दिलेलें असल्यामुळें युद्ध सुरू होतांच एमेटनें हत्यारेंपात्यारें जमविण्यास सुरुवात केली. ता. २३।७।१८०३ रोजीं बंड व्हावयाचें असें ठरलें होतें; पण संघटनेच्या अभावामुळें हें बंड उठलें न उठलें तोंच तें समाप्तही झालें.

१८४८.—ओब्रायनचें बंड; या वर्षीं युरोपांत राज्यक्रान्तीची वावटळ उठली होती. फक्त तीनचारशें हत्यारबंद स्वयंसैनिकांनिशीं ओब्रायननें बंड उभारलें. एका ठिकाणीं उठावणी झाली कीं, सर्व देशभर जागोजाग बंडें उपस्थित होतील अशी त्याची कल्पना होती; पण तसें कांहींच झालें नाहीं. एक दोन दिवसांतच बंड खलास झालें.

१८६७.—कीली व डिझी या दोन फीनियन कैद्यांना सोडविण्यासाठीं कटवाल्या बंडखोरांनीं मँचेस्टर येथें पोलिसांवर हल्ला केला. या झटापटींत प्राणहानिही झाली. याच सालीं बॅरेट यानें बर्कला तुरुंगांतून सोडविण्यासाठीं डायनामाइटनें तुरुंगाचा तट उडवून दिला. या प्रसंगामुळें आयर्लंड व इंग्लंड या दोनही देशांत भयंकर खळबळ उडाली होती.

दिवसांत सच्च्या दिलाचे लोक आपापल्या जागीं जीव धरून होते इतकेंच; त्यांची पांगापांग झाली होती, संघटना नष्ट झाली होती आणि ते किंकर्तव्य-मूढ झाले होते. पूर्वीच्या पुढाऱ्यांचा निःपात झाल्यावर समाजाचें पुढारीपण हांजीहांजीखोर, दांभिक, बापाच्या चितेवर विडी पेटविणारे, सार्वजनिक सभ्यतेची उजळमाथ्यानें बेइज्जत करणारे अशा लोकांकडे गेलें. यामुळें जीवनाचें सौंदर्य आणि भूतकाळाचें वैभव यांवर काळोखी आली. सर्व देश त्यांच्या हलक्या कारवायांमुळें हैराण झाला. भूतकाळाच्या अवलोकनावरून हे दोन प्रकारचे समाज आपल्याला दिसून आले. चैतन्यानें दैदीप्यमान झालेली पिढी आणि निराशेमुळें काळवंडलेली पिढी; आपल्या पिढीला इतिहासकारांनीं या दोहोंपैकीं कोणतें नांव द्यावें हें ठरविणें आपल्याच हातांत आहे. आयुष्यभर आपण जागच्या जागींच पडून रहावयाचें, कीं आपल्या देशाच्या इतिहासांत आणखी एका चैतन्यपूर्ण प्रकरणाची भर घालावयाची हें आपलें आपणच ठरविलें पाहिजे.

या दोन पिढ्यांचा आपण अधिक सूक्ष्म विचार करूं, म्हणजे त्यांचें वैशिष्ट्य ध्यानांत येईल. चैतन्याचा राष्ट्रीय झेंडा पुन्हा पूर्वस्थळावर रोंवण्याच्या सार्वजनिक प्रयत्नाचा काळ घ्या. या काळांत उल्हासी लोकांच्या कार्यामुळें राष्ट्रीय चैतन्य जागृत झालें होतें. राष्ट्रीय ध्येय साध्य होणार अशी सर्वांना आशा वाटत होती. स्वातंत्र्यभावनेमध्यें जनता तल्लीन झाली होती. राष्ट्रीय ध्येयाची व कर्तव्याची जाणीव सर्वांना होऊं लागली होती. आपला जीवनक्रम उच्चतर व्हावा, कार्य स्थिरतर व्हावें आणि हेतु शुद्धतर असावे अशी जबाबदारी व्यक्तिमात्राला वाटूं लागली होती. हळुहळू व्यक्तींमधील व राष्ट्रांतील क्षुद्रपणा, फसवेगिरी व दगलबाजी हीं नष्ट होऊं लागलीं; राष्ट्राचें स्वातंत्र्य पुन्हा प्रस्थापित होण्याचा काळ जवळ आला आहे असें प्रत्येकाला वाटूं लागलें, भावना व उत्साह जागृत झाल्यामुळें राष्ट्रामध्यें, दृढनिश्चय व धीर उत्पन्न झाला. निरुत्साहाच्या दिवसांतलीं तापटपणाचीं कृत्यें अयोग्य किंवा निरुपयोगी म्हणून बाजूला सारण्यांत आलीं. मोठ्या संकल्पापासून महायुद्धाची स्फूर्ति होते, तें युद्ध निकराचें होतें आणि त्यांत कितीही वेळां पराभव झाला तरी त्याची गणना महायुद्धांतच करण्यांत येते. परिस्थितीच्या विपरीतपणामुळें ध्येयसिद्धींत कितीही बिघाड होवो किंवा विजयप्राप्ति कितीही

लांबणीवर पडो, आपलें ध्येय खात्रीनें साध्य होणारच याला हा मर्दुमकीचा काळ साक्ष आहे; स्वातंत्र्यवीरांचें समर्थन आणि भावी यशाचें अभिवचन यांतच आहे.

आतां स्वातंत्र्ययुद्धांच्या दरम्यान येणाऱ्या निःसत्त्व व निर्जीव काळाचा आपण विचार करूं. ह्या काळाशीं आपला प्रत्यक्ष परिचय आहे, त्याचें थोडेंबहुत वर्णन झालें आहे आणि समाजाला भ्रष्ट व नाउमेद करणाऱ्या या काळाचें अधिक स्पष्टीकरण करण्याची कांहीं जरूर नाहीं. या दिवसांत आपल्या प्रयत्नांची दिशा कोणती असावी अथवा आपण कोणत्या दिशेनें प्रयत्न करूं नये, एवढेंच आपल्याला या परीक्षणापासून शिकावयाचें आहे. स्वातंत्र्यावर निष्ठा ठेवणाऱ्या कित्येक लोकांना या दिवसांत निष्क्रिय राहणें अशक्य वाटतें. युद्ध सुरू होतें तेव्हां हे लोक मोठ्या उत्साहानें रणभूमीवर जातात आणि पराभव होतांच निराशेच्या निष्क्रियतेंत सुंद होऊन पडतात. ते शत्रूंना शरण जाण्याचें नाकारतात खरें; पण शत्रूच्या प्रत्येक उसळीला ज्यांनीं विरोध केला आणि सुरू झालेल्या युद्धांत जे मरेपर्यंत लढले त्यांच्या अंगीं असलेली कसदार निष्ठा व उत्साह यांच्या अंगीं नसतो. एकाद्या विशिष्ट क्षुद्रपणामुळें अगर विश्वासघातामुळें भडकून जाईपर्यंत ते डुलक्या घेत पडून राहिलेले असतात; संतापाच्या भरांत ते आवेशानें एकाद्या कामाला हात घालतात–पण मोठीं कामें आवेशाच्या एकाकी उसळीसरशीं यशस्वी होणारीं नसल्यामुळें त्यांनीं हातीं घेतलेलीं कार्यें तडीला जात नाहींत आणि आपले यत्न निष्फळ झालेले पाहतांच हे लोक पुन्हा लाचार होतात. क्षणोक्षणीं स्फूर्ति देणारी, खरा मार्ग दाखविणारी, युद्धामध्यें एकसारखें लढत राहण्याचा आवेश आणणारी दिव्यदृष्टि त्यांना नसते; ह्या लक्षणांनींच स्वातंत्र्ययुद्धाचा काळ दैदीप्यमान झालेला असतो. आपली पिढी अगदीं कुचकामाची आहे, शत्रूचा काळ सद्दीचा आहे, शत्रूला स्थानभ्रष्ट करणें अशक्य आहे, ह्या गोष्टी ते आपखुषीनें गृहीत धरतात; **शत्रूवर** चढाई करण्याचें एकादें कृत्य ते हातीं घेतात तेव्हां त्या चढाईंत निकराचा आवेश नसतो, कारण त्यांचा प्रयत्न आरंभापासूनच स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं नसतो. इतिहासांत आपली करामत नमूद व्हावी आणि आपल्या पिढीचा उल्लेख आदरानें करण्यांत यावा अशी त्यांची आकांक्षाच नसते. आपण गुलामगिरींत

संतुष्ट नाहीं एवढेंच त्यांना शत्रूच्या निदर्शनास आणून द्यावयाचें असतें. त्यांच्या कार्याची प्रेरक शक्ति अगदीं क्षुद्र असते. सत्तेच्या उपासकांच्या चढेलपणामुळें चिडून ते एकादें पिसाटपणाचें कृत्य करतात; पण त्यांचें कृत्य त्यांच्या स्वतःच्या मनाच्या समाधानासाठींच असतें. जुलूम करणारांची सत्ता नष्ट करण्याकडे त्यांचा रोंख नसतोच, हें आपण स्पष्टपणें ओळखलें पाहिजे. शत्रूला त्रास देण्याकरितां अगर पेंचांत आणण्याकरितां केलेले सर्व प्रयत्न निष्फळ होतात हें जाणून आपण असल्या क्षुद्र प्रयत्नांपासून अलिप्त राहिलें पाहिजे आणि आपल्या काळाचें माहात्म्य प्रस्थापित करण्यासाठीं आपण महत्कार्यांना हात घालून तीं पार पाडलीं पाहिजेत.

आपण कोठें आहों, आयुष्यांत आपलें धोरण कोणतें असावें हें विचारपूर्वक निश्चित केलें पाहिजे. राष्ट्रीय ध्येयाला आपण कित्येक ठिकाणींच, कांहीं सभांमध्यें व कांहीं वेळींमात्र मान्यता दाखविली पाहिजे–असे प्रसंग आपल्या आयुष्यांतला फार थोडा भाग व्यापतात–इतर प्रसंगीं व वेळीं ह्या तत्त्वांवरील निष्ठा गुंडाळून ठेवून स्वार्थासाठीं हव्या त्या लटपटी-खटपटी केल्या तरी चालतील, अशी अनेकांची ठाम समजूत होऊन बसली आहे; हा गैरसमज शक्य तितक्या लवकर नाहींसा करण्यांत आला पाहिजे. ज्या निशाणाखालीं आपण एकदां उभें राहिलों त्याशीं आपण सदैव व सर्वत्र एकनिष्ठ राहिलें पाहिजे; एकदां आपण जीं तत्त्वें मान्य केलीं तीं मोडण्याला केव्हांही मोकळीक नाहीं हें आपण सदैव ध्यानांत बाळगिलें पाहिजे; कारण हींच आपल्या आचारपद्धतीचीं मूलभूत तत्त्वें आहेत. आयुष्य हें युद्ध आहे; जीवनाच्या या लढाईंत तुमचें निशाण हिरावून घेण्याचा प्रयत्न केव्हां करण्यांत येईल; हें कोणालाही आगाऊ सांगतां येणार नाहीं. एकदां मान्य केलेल्या तत्त्वांपासून च्युत होण्याचे प्रसंग तुमच्यावर केव्हां येतील याचा नेम नसल्यामुळें मनुष्यमात्रानें आपली तत्त्वनिष्ठा अढळ ठेवली पाहिजे आणि आपल्या झेंड्याचें रक्षण करावयास सदैव सज्ज असलें पाहिजे. फक्त मतें देण्याचा प्रसंग येईल तेव्हांच आपल्याला सत्य वाटणाऱ्या तत्त्वांना जाहीर तोंडी मान्यता द्यावी आणि इतर वेळीं स्वस्थ असावें अशी तुमची कल्पना असेल तर ती झूट आहे; अगदीं अकल्पित ठिकाणीं त्या तत्त्वांचा पुरस्कार व प्रचार करण्याचा प्रसंग तुम्हांवर येईल. तत्त्वनिष्ठा फार हट्टी आहे. तुम्ही तिचा

पुरस्कार तरी करावा किंवा इनकार तरी करावा. तत्त्वाच्या कचाटयांतून सुटण्याला एकही पळवाट नाहीं. तुम्ही आयुष्यांत कोणताही मार्ग स्वीकारा, तें तत्त्व तुमच्यापुढें टाकून तुम्हांला आव्हान करील. मग वर सांगितलेल्या दोहोंपैकीं एक मार्ग तुम्हांला स्वीकारावा लागेल.

एकादें निमित्त काढून आपलीं तत्त्वें बाजूला ठेवण्याचा तुम्हांला मोह होईल, म्हणून सावध रहा. तुम्हांला निष्क्रिय बसून राहतां येणार नाहीं; परिस्थितीमुळें तुमची ओढाताण होईल; कांहींही न करणें हें तत्त्व झुगारून देण्यासारखेंच आहे. भटभिक्षुक, कवि, शिक्षक, सार्वजनिक कार्यकर्ते, धंदेवाले, व्यापारी प्रत्येक मनुष्याला या प्रश्नाचें उत्तर द्यावें लागेल; प्रत्येक प्रकारच्या आयुष्यक्रमांत खऱ्याखोटयाचा लढा होईल; स्वतःच्या पांडित्यानें स्वतःचेंच समर्थन स्वतःशींच फावल्या वेळांत करावें लागणें म्हणजे या लढाईंत पराभूत होणेंच आहे. सध्यांचा काळ वादविवादाचा आहे अशा दिवसांत एकाद्या तत्त्वाचा पुरस्कार करणें म्हणजे वायफळ चर्चेमध्यें एका बाजूचें समर्थन करणें होय असेंच समजण्यांत येतें; पण त्या तत्त्वासाठीं आवेशानें लढणाऱ्या पक्षाला मिळणें व त्या युद्धांत भाग घेणें हाच त्या तत्त्वाचा खरा पुरस्कार होय. दुसऱ्या कोणत्याही मार्गानें त्या तत्त्वाची सत्यता सिद्ध करणें व याबद्दल इतरांची खात्री पटविणें अशक्य आहे; याच मार्गानें समाजाचें लक्ष वेधलें जाईल, आस्था जागृत होईल आणि बहुजनसमाजाला चढाईची तीव्र इच्छा होईल. ज्या ज्या युद्धभूमीकडे राष्ट्राचा झेंडा आपल्याला बोलावीत आहे तेथें तेथें शत्रूचीं जाळीं पसरलेलीं आहेत. याबद्दल आपल्या इतिहासांत इतके पुरावे आहेत कीं, प्रत्यक्ष उदाहरण देण्याची जरूर नाहीं. राष्ट्रीयत्वाकडे दुर्लक्ष करण्यास उत्तेजन देणाऱ्या भटांची भिक्षुकी विशेष जोरांत चालते. राष्ट्रीयत्वावर बहिष्कार घालणाऱ्या अध्यापकांचा पगार वाढतो व त्यांना मानमरातब मिळतो, राष्ट्राचा घात करणाऱ्या पुढाऱ्यांना मोठमोठ्या जागा व पदव्या मिळतात. व्यापारधंद्यांतल्या लोकांनाही राष्ट्रीयत्वाकडे दुर्लक्ष केल्यास फायदेशीर सवलती देण्यांत येतील असें आमिष दाखविण्यांत येतें. प्रत्येक तरुण व कर्तबगार मनुष्याला कपटी व घातुक मोह घालण्यांत येतात. त्यांना सांगण्यांत येतें, " तुमचे अंगीं कर्तृत्व आहे, आम्ही तुम्हांला पुढें आणूं, तुम्ही फक्त या राष्ट्राच्या भानगडींत पडूं नका, तसें कराल

तर तुम्हांला जन्मभर कानाकोंपऱ्यांत पडून रहावें लागेल, आणखी तुम्ही राष्ट्र-कार्यांत भाग घेतला तर त्याचा कांहीं उपयोग आहे, असें तरी आहे का? व्यवहारा-कडे नजर द्या आणखी आम्ही सांगतों तसें वागा." आपल्या दुर्बल अंतः-करणावर तुम्हीं या मोहाचा पगडा बसूं द्याल तर तुम्ही पराभव पावाल. पतित आयुष्याला सुरवात केल्यानंतर प्रथम काहीं काळपर्यंत तुमचें अभिनंदन होत असतांही तीं जुनीं तत्त्वें तुमच्या अंतःकरणाला टोंचण्या लाबतील. हळुहळू त्या तत्त्वांना आंतल्या आंत गुदमरवून तुम्ही ऐषआरामांत रंगून जाल. तुमचा पराभव झालेला आहे असें बाह्यतः दिसणार नाहीं; पण त्या पराभवांत आशेला कोठेंही जागा राहणार नाहीं. तो पराभव अत्यंत हीन व तिरस्करणीय असाच गणण्यांत येईल; त्यानंतर तुम्हांला केव्हांही डोकें वर काढतां येणार नाहीं. तुम्ही आपलीं तत्त्वें न सोडतां, देऊं करण्यांत आलेली लांच झुगारून देऊन, आपला झेंडा तसाच उंच धरून ठेवाल तर व्याव-हारिक लोक तुमची गणना मूर्खांत व निरुपयोगी प्राण्यांत करतील; पण त्या व्यावहारिक लोकांना कधींही आकलन करतां येणार नाहीं असा विजय मिळविल्याचें श्रेय तुम्हांला प्राप्त होईल—मोठमोठ्या साम्राज्यांनीं महायुद्धांत मिळविलेला जय तुमच्या विजयाच्या पासंगालाहो पुरणार नाहीं. तुमच्या अंतःकरणांत सत्याची ज्योत व चिरंतन सौंदर्याचें तेज प्रकाशित होईल; उत्साहाचें यशोगीत तुम्हांला ऐकूं येईल आणि भावी यशाचें दिव्यदर्शन तुमच्या अंतश्चक्षूंना होईल. शेंकडों वर्षांचीं कार्यें यशस्वी होत आहेत, व्यक्तीचा उद्धार होत आहे, राष्ट्रें संघटित होत आहेत, भटकणाऱ्या जाती संकेत-स्थळीं स्थायिक होत आहेत, असें दिव्यस्वप्न तुमच्या अंतर्दृष्टीला दिसूं लागेल.

आपल्या पिढीचें समर्थन व्हावें अशी आपली इच्छा असेल तर आपण सवलतींना रजा दिली पाहिजे. अनेक प्रामाणिक लोकांची या मुद्द्यासंबंधीं गैरसमजूत झालेली आहे. आपल्या सर्व अपयशांना कारण असलेल्या मनो-वृत्ति समर्थनीय आहेत अशी त्यांची कल्पना झालेली आहे. हें दौर्बल्य कोणतें ? हें समजावून देणें व घेणें इतकें सोपें व सरळ आहे कीं, एकदां समजूत पडल्यावर इतके दिवस आपली गैरसमजूत कशी झाली होती याचेंच आपल्याला आश्चर्य वाटूं लागतें. कांहीं प्रसंगीं मनुष्य तत्त्वांशीं एकनिष्ठ राहतो व इतर प्रसंगीं तो तीं गुंडाळून ठेवतो; अशा प्रसंगीं त्याला सवलत

देण्यांत येते. दर दिवशीं व दर क्षणीं तो त्या तत्त्वांचें पालन करीत नाहीं. स्थानिक-स्वराज्याच्या बाबतींत कसोटीची वेळ येते. राष्ट्राविरुद्ध किंवा राष्ट्राच्या तर्फेनें आपलें मत जाहीर करण्याचा प्रसंग येतो. त्यावेळीं आमचे पुढारी व सार्वजनिक कार्यांत भाग घेणारे व्यापारी आपापल्या पक्षांचा पुढाकार घेण्याऐवजीं अशा प्रसंगीं निमूटपणें गैरहजर राहतात. ते वर्गणी देतात; पण मत मात्र देत नाहींत. जीं तत्त्वें त्यांनीं गुंडाळून ठेवलीं त्यांचेंच ते खासगी संभाषणांत समर्थन करतात आणि ज्यांनीं त्या बाबतींत पुढाकार घेतला त्यांना ते खासगी रीतीनें उत्तेजन देतात. त्यांचीं हीं खासगी मतें चारचौघांपुढीकडे जात नाहींत. या प्रकारांतली सर्वांत घाणेरडी गोष्ट ती ही कीं, माघार घेतली तेथें धिटाईनें पुढाकार घेतला असता तर आपला मोठा तोटा झाला असता, तो टाळण्यासाठीं आपण माघार घेतली, असें ते आपल्या कृत्याचें समर्थन करूं पाहतात. सरळ दृष्टीनें पाहिलें असतां हें समर्थन अगदीं कुचकामाचें आहे. राष्ट्रकार्यांत भाग घेणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें अशा संकटांना तोंड देण्याला नेहमीं तयार असलें पाहिजे, इतकेंच नव्हे, तर वर सांगितल्याप्रमाणें कोणी पळवाटा काढूं लागलें तर त्यांना सवलती देऊं नयेत असें म्हणण्याइतका करारीपणा त्याचे अंगीं असला पाहिजे. कारण मेकड लोक अशा सवलतींचाच फायदा घेतात. जेथवर ज्याला जाणें शक्य असेल तेथवर त्याला तत्त्वें पाळण्याबद्दल उत्तेजन द्यावें; पण स्वतःच्या तत्त्वनिष्ठेवर कधींही मर्यादा घालूं नयेत. मर्यादा घालण्याला एकदां सुरुवात झाली, कीं तुमची कल्पनाही होणार नाहीं अशा गोष्टी त्या मर्यादांच्या आधारानें समर्थनीय ठरूं लागतील, ज्या गोष्टींबद्दल एका काळीं तुम्हांला किळस वाटत होता, त्यांबद्दल तुम्हांला तटस्थपणा मात्र वाटूं लागेल. आपल्या मतांमध्यें फरक पडत चालला आहे हें तुमच्या ध्यानांतही येणार नाहीं; पण हा फेरबदल इतरांच्या लक्षांत येईल. तुमचे जुने मित्र तुमचा धिक्कार करूं लागतील आणि एवढ्याचसाठीं तुम्हीही त्यांना धिक्कारूं लागाल. पण आपल्या मतांची उलटापालट झाल्यामुळें ते आपल्यावर बदलले आहेत असें तुमच्या स्वप्नींही येणार नाहीं. आपलीं मतें मोघम ठेवण्याची अगर त्याशीं विसंगत असलेल्या गोष्टी बोलण्याची तुमची छाती नसते. तुम्हीं बोलून दाखविलेलीं मतें परस्परांशीं विसंगत ठरूं लागतील. असें अर्धवटपणाचें धोरण निरुपयोगी आहे. आपलें धोरण

स्वयंपूर्ण, स्पष्ट, सुसंगत असलें पाहिजे. त्यानें जिज्ञासूंचें समाधान झालें पाहिजे. जिज्ञासू व चळवळे लोक आपल्याला मिळाले, कीं बाकीचे निमूटपणें त्यांच्या मागोमाग आपल्या पक्षांत येतात. जें कर्तव्य आपण अंगावर घेत आहों तें इतकें गंभीर आहे कीं, या बाबतींत कोणालाही कोणत्याही प्रकारची सवलत मिळणार नाहीं हें अगोदरपासूनच प्रत्येकाला स्पष्टपणें समजावून दिलेलें असावें. असा धारा आहे. तरी सवलतींच्या बाबतींत आजपर्यंत आपण इतक्या ढिलाईनें वागत आलों आहों कीं, त्यामुळें गोंधळ उडून आपल्याला वेळोवेळीं व जागोजाग अपयश आलें आहे. आपल्याला ज्या लढाईंत लढावयाचें आहे ती अजून सुरू झालेली नाहीं. प्रत्यक्ष लढाईंचे वेळीं वीरश्रीचा संचार आपोआप होईल, या समजुतीवर आपण आज माणसासारखेही वागत नाहीं. ऐन वेळीं महत्कार्य पार पाडण्याची स्फूर्ति आपल्या अंगीं येईलच अशी आपली कल्पना असते. जें युद्ध आपल्याला लढावयाचें आहे तें हरघडीला चाललें आहे, तें सध्यां चालू आहे, गुप्त जागीं दडविलेला झेंडा उघड्यावर आणून तो ज्या तत्त्वांचा प्रतिनिधि आहे तीं आपल्याला स्वतःच्या जीवनांत आणावयाचीं आहेत, याची जाणीव कोणालाच नसते. हें युद्ध एकाएकीं इतकें जवळ येऊन भिडलेलें पाहून आपल्याला भीति वाटूं लागेल; युद्धाची सर्व सिद्धता झाल्यानंतर पहिली तोफ डागण्यासाठीं शत्रूच्या चढाईची वाट पहात बसणें, हें आपल्या हातानें ओढवून घेतलेल्या पराभवाचे सर्व परिणाम निमूटपणें भोगण्याची आपली तयारी आहे असें दाखविण्यासारखेंच आहे. उद्यां, लढाईंच्या वेळीं अंगांत वीरश्रीचा संचार व्हावा एवढी पात्रता अंगीं आणावयाची असेल तर आपण आज जागें झालें पाहिजे आणि आजपासूनच मर्दासारखें वागलें पाहिजे.

कित्येक वेळीं आपल्याला तटस्थपणा धारण करावा लागेल. लढ्यामध्यें असे अडचणीचे प्रसंग यावयाचेच. दुर्दैवानें आपणांमध्यें असे अनेक निष्कपट लोक आहेत कीं, ज्यांची आयर्लंडचें प्राचीन स्वातंत्र्य पुन्हां प्रस्थापित करावें या ध्येयावर निष्ठा नाहीं. अशा लोकांचें अस्तित्व एका दृष्टीनें फार हितकारक आहे; कधीं काळीं आपण बहकून गेलों तर त्यावेळीं त्यांचा प्रामाणिकपणा आपल्याला ताळ्यावर आणील. त्यांची समजूत पटवून त्यांना आपण आपल्या पक्षांत सामील करून घेतलें पाहिजे; मध्यंतरीं समेट साध्य करण्याकरितां

आपण तटस्थ भूमीवर त्यांच्याशीं विचारविनिमय केला पाहिजे. आपण आपला झेंडा कधींही गुंडाळून ठेवावयाचा नाहीं, असें ठरलें आहेना ? होय, हें तर आपलें आधारभूत तत्त्व आहे. मग या तटस्थ भूमीवर जातांना आपलें निशाण थोडा वेळ बाजूस ठेवावयाचें काय ? नाहीं, कधींही नाहीं. इतरांचीं मनें वळविण्याकरितां आपण त्यांचेकडे जातों म्हणजे आपलीं मतें जबरदस्तीनें त्यांच्यावर लादण्याकरितां जात नाहीं; अशा वेळीं आपलीं जीं काय तत्त्वें असतील तीं आपण अधिक स्पष्टपणें मनांत बागवलीं पाहिजेत नाहींतर इतरांचीं मनें वळण्याऐवजीं आपल्याच मनांत पालट पडावयाचा. अशा वेळीं दोन्ही पक्षांनीं पूर्ण तटस्थवृत्ति स्वीकारली पाहिजे. आपल्या तत्त्वपद्धतीला जें मुळांतच मान्य नाहीं तें आपल्याला मान्य आहे असें कित्येक वेळां आपल्या प्रतिपक्षीयांकडून गृहीत धरण्यांत येतें; त्यांनीं जें गृहीत धरलेलें असतें त्याला विरोध करणें म्हणजे तटस्थवृत्तीचा भंग करणें होय अशी त्यांची समजूत असते. त्यांचें मत आपण मान्यही करूं नये आणि त्या बाबतींत त्यांना विरोधही करूं नये; हाच खरा तटस्थपणा. तटस्थवृत्तींत दोन्ही पक्षांचा दर्जा सारखा असतो. राष्ट्रस्वातंत्र्याशीं ज्यांचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं अशा बाबतींत परस्परांमध्यें तीव्र मतभेद असणें संभवनीय आहे. सर्वांच्या विचार-पद्धतीला साधारण असा जो प्रांत आहे त्यांत प्रवेश करतांच इतरांच्या भिन्न मतांवर आपण हल्ला चढविला पाहिजे अशी कित्येकांची समजूत असते; ही कल्पना फार घातक आहे आणि ती आपण सर्वस्वीं सोडून दिली पाहिजे. तुमचीं मतें तुम्हांला महत्त्वाचीं वाटतात तशींच त्यांनाही आपलीं मतें महत्त्वाचीं वाटत असलीं पाहिजेत. आपल्याविरुद्ध असलेलीं मतें इतरांनीं सोडून द्यावीं असा आग्रह आपण धरतां कामा नये; परस्परांनीं परस्परांच्या मतांना मान द्यावा, हा मार्ग अधिक प्रशस्त आहे. तटस्थभूमीवर जातांना निशाणाचा त्याग करण्याची जरूर नाहीं; तेथें तो व त्याचें निशाण ह्या दोघांनाही अभय आहे; त्या प्रांतांत तो व त्याचा झेंडा या दोहोंवरही चढाई करावयाचा कोणालाही अधिकार नाहीं.

साध्या व्यवहारांतही राष्ट्रीयत्वाचा संबंध आहे हें समजून आल्यावर राष्ट्राच्या हांकेला ओ द्यावयास व ध्येयाचें संरक्षण करावयास आपण हर-घटकेला तयार असलें पाहिजे, शत्रूकडून चढाई करण्यांत येणार आहे अशी

वर्दी आलेली नसतांही आपण सदैव सज्ज असलें पाहिजे. मनुष्याला रोजच्या व्यवहारांत अशा रीतीनें वागण्याची संवय झालेली असते कीं, त्याला हें तत्त्व सहसा मान्य होत नाहीं. हल्लीं अस्तित्वांत असलेली परिस्थिति बदलतां येणें अशक्य आहे असें पुष्कळांचें मत आहे; येथेंच त्यांचा आपला पहिला खटका उडतो; तोडीस तोड म्हणून आपणही आपलीं तत्त्वें जाहीर करून त्यांचें समर्थन केलें पाहिजे. आपल्या विरोधकांपैकीं ज्यांचीं मतें स्पष्ट व जोरदार आहेत अशांची संख्या फारच थोडी आहे. हे सर्व लोक इंग्रज सरकाराला सामील झालेले आहेत, सरकारचे हुकूम हे लोक बिनतक्रार पाळतात आणि अनिश्चित वृत्तीच्या सर्वसाधारण समाजाला आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न करतात, आणि लोकही त्यांना सहज अनुकूल होतात कारण ज्यांचे हातीं सत्ता असते त्यांच्या मताप्रमाणें वागण्याकडे बहुजनसमाजाचा कल असतो. बहुजनसमाजांत खऱ्या तत्त्वांचा प्रसार करणें हेंच आजचें मुख्य कार्य आहे. तत्त्वप्रसारानें त्याचें धैर्य व निश्चय हीं वृद्धिंगत होतील, त्यांचा अभिमान जागृत होईल आणि राष्ट्राच्या कीर्तीला अनुरूप अशीं कृत्यें करण्याला त्यांना हुरूप येईल. ध्येयाचा प्रचार अधिकाधिक होऊं लागेल तसतसा त्यांचा आत्मविश्वास वाढूं लागेल; म्हणून राष्ट्रीय ध्येयाचें समर्थन व प्रसार करणें हें आपलें कर्तव्य आहे. यासाठीं योग्य संधि शोधीत बसावयाचें कारण नाहीं. असे प्रसंग अचानकपणें उपस्थित होतील आणि तुमची कसोटी होईल. कल्पना करा, वेगवेगळ्या मतांचे लोक एकत्र जमले आहेत, सर्वसाधारण गप्पागोष्टी चाललेल्या आहेत, अशा वेळीं एखादा मनुष्य एकदम एखादा विषय काढतो आणि त्यावर कडाक्याचें भांडण सुरू होतें. समजा, आयर्लंडनें स्वातंत्र्याचा हक्क सोडून ब्रिटिश सत्तेला मान्यता द्यावी, यांत सर्वांचाच फायदा आहे, हा त्या भांडणाचा विषय आहे. या विषयावर पुष्कळ भारूड भरकटण्यांत आलेलें आहे आणि मतामतांचा गलबला इतका माजलेला आहे कीं, आयर्लंडच्या संपूर्ण स्वातंत्र्यावर निष्ठा ठेवणारा मनुष्य, सर्वांची या ध्येयावर श्रद्धा असलीच पाहिजे या अपेक्षेनें समाजांतील व्यक्तींच्या मतांची छाननी करूं लागला तर त्याला बहुतेकांच्या डोक्यांत गोंधळ माजला आहे, त्यांच्या कल्पना अस्पष्ट आहेत, या किंवा त्या कोणत्याच बाजूकडे त्यांचें मत ठाम झालेलें नाहीं, जो मनुष्य त्यांचें मन

चळवूं लागेल त्याला ते सहज अनुकूल होतील, असें त्याला आढळून येईल. अशा लोकांना खरीं तत्त्वें स्पष्ट करून सांगणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य आहे. मुद्द्यांची मांडणी स्पष्टपणें करण्याची हातोटी त्याला साधलेली असेल तर त्यांच्या डोक्यांत ठाणें देऊन बसलेल्या अनेक कल्पनांनीं धारण केलेलें मोहक बाह्य आवरण बाजूला सारून त्यांचें अंतर्याम किती हीन, कुचकामाचें आणि अधोगतीला नेणारें आहे, हें त्याला समाजाचे नजरेस आणतां येईल. अशा स्पष्टीकरणानेंच आजूबाजूच्या लोकांचीं मनें तयार होत जातील. अशा तऱ्हेनें लोकांची समजूत पटवून देण्याची तयारी कळकळीच्या मनुष्यानें नेहमीं ठेवली पाहिजे. गप्पागोष्टी चाललेल्या असतांना सहजासहजीं एखाद्या शब्दावरून संभाषणाचा ओघ बदलतो आणि ज्याचीं मतें निश्चित झालेलीं आहेत अशा भावनाप्रधान मनुष्याच्या उत्साही भाषणामुळें थंड प्रकृतीच्या व अनिश्चित मतांच्या माणसांचीं मनें बदलूं शकतात, हें लक्षांत ठेवा. त्या मनुष्यासारखे तुम्ही व्हा. आयुष्यांत तुम्हांला कोठें जावें लागेल, काय करावें लागेल याचा नेम नाहीं; तुमच्या निशाणाला शत्रू हात घालील तेव्हां तुम्हांला आपलें सर्व सामर्थ्य प्रकट करावें लागेल. लढाईचें अरेरावी धोरण न स्वीकारतां तुम्ही निग्रही व्हा, पण तुमच्यावर कोणी चढाई करूं पाहील तर त्याचा हल्ला परतविण्याची सदैव तयारी ठेवा. यामुळें भेकड लोकांचा आत्मविश्वास जागृत होतो. कोणाची निर्भर्त्सना करूं नका; तो एक भयंकर रोग आहे असें समजून त्याच्या संसर्गापासून अलिप्त रहा; पण शत्रू किंवा मित्र यांपैकीं कोणाहीसाठीं तुम्ही आपली बाजू जय्यत तयार करून ठेवा. कोणत्याही स्थळीं व काळीं लोक एखाद्या घातुक कल्पनेच्या आहारीं चालले आहेत असें दिसून येतांच वातावरण स्वच्छ करण्याकरितां, मित्रांना धीर देऊन स्थिर ठेवण्याकरितां सत्याच्या वतीनें तुम्ही दोन शब्द बोला. अशा वेळीं आजूबाजूला असलेल्या लोकांचीं मतें तुमच्याविरुद्ध असूनही ते तुम्हांला आपल्यांतलाच मनुष्य मानीत असले तर त्या शब्दांनीं त्यांचा भ्रम दूर होईल आणि नंतर ते तुमच्या सहकार्याची अपेक्षा बाळगणार नाहींत. आपण कोठें आहोंत हें तुम्हांला समजून येईल. त्याचप्रमाणें आपण तयार आहोंत हें तुम्हांला उमजून येईल. भोंवतालच्या लोकांचा तुमच्याशीं मतभेद असला ते तरी तुम्हांला आदरानेंच वागवतील. भांडणखटक्याचा प्रसंग येण्याचा संभव असो वा

नसो, या रीतिनें तुम्ही आपलीं मतें जाहीर करा. यालाच आपण 'निशाण उभारणें' अशी संज्ञा देऊं.

ध्येयवादी मनुष्यानें आपल्याला कोणकोणत्या प्रकारचा विरोध येईल हें अजमावून पाहिलें पाहिजे. त्याचें ध्येय हा एक आभास मात्र आहे असें त्याला सांगण्यांत येईल; तो स्वतः स्वप्नसृष्टींत रममाण होणारा, लहरी अगर मूर्ख आहे असें म्हणण्यांत येईल. या टीकाकारांची दृष्टि कोणत्या भ्रमानें अंध झालेली आहे त्याचा शोध करण्यांत आणि त्यांच्या ज्ञानाची आपल्या मूर्खपणाशीं तुलना करण्यांत आपला फायदा होण्याचाच संभव आहे. आयर्लंडांत राहण्यांत कांहीं आशा नाहीं असें गृहीत धरून देशत्याग करणाऱ्या मनुष्याकडे पहा. हा मनुष्य स्वतःला मोठा धोरणी समजतो. देशत्यागाचे वेळीं त्याचा आवाज लहान असतो; पण अंगांत रक्त भरपूर असतें; परदेशांतून तो स्वदेशीं परत येतो तेव्हां त्याचा आवाज खूप मोठा झालेला असतो; पण अंगांतलें रक्त आटून गेल्यामुळें मुद्रा फिकट झालेली असते. देशत्याग करतांना त्याला ज्या आशा वाटत होत्या त्या फलद्रूप झाल्या काय? तो ठांसून सांगेल, होय; पण त्याच्या आवाजांत सत्याचा खणखणीतपणा ऐकूं येणार नाहीं आणि त्याचा नूर त्याच्या बोलण्याचा फोलपणा दाखवील. देशत्याग करण्यांत कांहीं फायदा नाहीं असें प्रतिपादन करणाऱ्या पण हातीं घेतलेलें कोणतेंही काम स्थिरपणानें न करणाऱ्या मनुष्याचें उदाहरण घ्या. मूर्खाप्रमाणें भलत्या फंदांत न पडतां आपल्या मागून या, असा हा मनुष्यही तुम्हांला उपदेश करतो. फावल्या वेळात तो खूप धांगडाधिंगा करतो; पण तेवढ्यावरून त्याचा जीव सुखांत आहे अशी कोणीं समजूत करून घेऊं नये. आजूबाजूला कोणी नाहीं या कल्पनेनें तो मनमोकळा वागत असतो त्या वेळीं त्याची स्थिति कशी असते हें निरखून पहा म्हणजे त्याच्या जीवनांतलें प्रेतवत् शैथिल्य तुमच्या नजरेस येईल. सुखासक्त मनुष्य, मग तो श्रीमंत असो वा गरीब असो, त्याच्या डोक्यावर बोजा हा असावयाचाच. तो श्रीमंत असेल तर तो सुखासाठीं सपाटून पैसा उडवील, त्याची सुखाची कल्पना राजविलासी असेल, त्याला पुष्कळ रिकामपण असेल, त्याला सपाटून चैन करतां येईल, पण इंद्रियजन्य सुखांमागें लागलेलीं सर्व माणसें एकाच नमुन्याचीं असतात. आयुष्याचें ओझें त्यांना दुःसह झालेलें असतें. उत्साह, स्फूर्ति,

जिज्ञासा, आशा या भावना त्यांच्या अंतःकरणांतून पार नाहींशा झालेल्या असतात. कोणालाही हेवा वाटावा अशी त्यांची स्थिति खास नसते. येथें एखादा मनुष्य तुमच्या खांद्यावर हात ठेवून सांगेल, "अच्छा, तुमचें म्हणणें मला कबूल आहे. तुम्ही देशत्याग करूं नका आणखी चैनबाजीही करूं नका; थोडेंसें व्यवहारज्ञान अंगीं आणा; स्वप्नसृष्टींत गोळा केलेल्या कल्पना सोडून द्या; शक्याशक्यतेच्या दृष्टीनें विचार करा; भविष्यकाळांत काय होईल हें कोणीं सांगावें ? प्रत्यक्ष परिस्थितीवर नजर देऊनच आपण आयुष्याची मांडणी केली पाहिजे." ह्या गोष्टी ठांसून सांगणाऱ्या आपल्या या हितचिंतकाचे ठायीं विनोदाचा अभाव दिसतो. भविष्यकाळाच्या अनिश्चितपणाच्या आधारावर तुम्हांला आपलें कार्य सोडून देण्याचा तो उपदेश करीत असतो; पण आपण स्वतः जें कार्य करीत आहों तें भविष्यकाळाला खास मान्य होईल असें त्यानें मुळांतच गृहीत धरलेलें असतें. परिस्थिति तुम्हांला प्रतिकूल आहे असें तो सांगतो; पण परिस्थिति स्वतःला अनुकूल आहे हें मात्र त्यानें गृहीत धरलेलें असतें. भूतकाळांत त्याचप्रमाणें भविष्यकाळांत आमचीं तत्त्वें विजयशाली होतील असें आमचें प्रतिपादन आहे. परिस्थिति केव्हां कशी होईल हें कोणालाही सांगतां येणार नाहीं. तुम्ही तत्त्वांना चिकटून राहतां म्हणून तो तुम्हांला स्वप्नवेडा मानतो; पण ज्या मनुष्यांचा कित्ता तो स्वतः गिरवीत आहे त्यांनीं भूतकाळांत किंवा वर्तमानकाळांत कोणतें यश मिळविलें आहे तें दाखवून द्या असें आव्हान केलें असतां तो अगदीं निरुत्तर होईल. खरें पाहिलें असतां आपण सर्वजण आपापल्या स्वप्नसृष्टींत गुंग होत असतों; फरक एवढाच कीं, कित्येकांचीं स्वप्नें घाणेरडीं असतात, कित्येकांची स्वप्नसृष्टि सौंदर्यानें भरलेली, तारकांनीं संप्रकाशित व संगीतानें निनादित झालेली असते.

उत्साहाच्या पहिल्या उसळीसरशीं निशाणाखालीं मोठ्या उमेदीनें दाखल झालेल्या तरुणानें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या युद्धांत मधून मधून असे प्रसंग येतात कीं, जेव्हां अत्यंत आस्थेवाईक, शूर व समर्थ वीरांचाही उत्साहभंग होऊन त्यांना भावी यशाबद्दल निराशा वाटूं लागते. मानवी कार्यामध्यें स्थित्यंतरें हीं व्हावयाचींच. राष्ट्रकार्यांत सामील होणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें आणीबाणीच्या व निरुत्साहाच्या प्रसंगांना तोंड देण्यास तयार असलें पाहिलें. निरुत्साहाच्या

काळरात्रींत सौंदर्य व आशा हीं दिसेनाशीं होतात. उत्साहभंग अनेक कारणांनीं होतो; मनाच्या अविश्रांत दगदगीमुळें शरीराला थकवा येतो किंवा अनेक वर्षांचे परिश्रम निष्फळ झालेले पाहून मन उदासीन होतें. ज्यांना नीति नाहीं, ध्येयाचें माहात्म्य समजलेलें नाहीं, ज्यांच्या मनोवृत्ति हलक्या दर्जाच्या आहेत, ज्यांच्या मनांत मत्सराचें विष भिनलेलें आहे, असे लोक आपल्या पक्षांत सामील झालेले पाहून–इतक्या उच्च निशाणाखालीं जमा झालेले लोक शूर, निष्कपट व उदार असावे, अशी अपेक्षा असल्यामुळें कधीं कधीं मन निराश होतें. स्वातंत्र्ययुद्धाला सुरुवात होण्यापूर्वीं लढण्यासाठीं उत्सुक झालेले हजारों लोक युद्ध पुकारलें जातांच शत्रूचें प्रचंड सामर्थ्य पाहून युद्ध-भूमीचा त्याग करून बाजूला स्वस्थ उभे राहिलेले पाहून आस्थेवाईक मनुष्याची उमेद खचून जाणें साहजिक आहे; आणि ह्या सर्व गोष्टी पुऱ्या नाहींत अशा कल्पनेनेंच कीं काय कोण जाणे, आपला स्वसंतुष्ट आणि व्यावहारिक मित्र वेळीं अवेळीं उपदेशामृताचे घुटके देऊन आपल्या निरुत्साहांत भर टाकीत असतो. उदात्त भावनांबद्दल तो तिरस्कार व्यक्त करतो आणि नित्यसम तत्त्वांना क्षणिक व ताज्या हुल्लडींच्या सदरांत ढकलून देतो. स्वातंत्र्यवीरांना असे अनुभव यावयाचेच. पण निराशेच्या काळ्याकुट्ट अंधकारांतच आशेचा तारा प्रकाशमान होतो. युद्धांतल्या हाणामारीनें दमून भागून गेलेल्यांनीं ह्याची आठवण धरावी. आपल्या बाजूनें लढणारे वीर एकदोनच आहेत, मर्दुमकीची शर्थ केली तरी कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं हें स्पष्ट दिसत आहे, तरीही ते सत्याला जागले तर त्यांची संख्या वृद्धिंगत होईल. प्रत्यक्ष उदाहरणानेंच सत्यभक्तीचा प्रसार होतो. प्रगति खुंटते तेव्हां प्रत्यक्ष परिस्थितिकडे पाहून खंत घेऊं नका; एका काळीं आपण केवढीं कार्यें केलीं होतीं, त्यांपैकीं अवशिष्ट भाग किती राहिलेला आहे आणि यापुढें आपल्याला केवढीं कार्यें करावयाचीं आहेत, यावर नजर द्या. कोणाचा उत्साह शिथिल झाला किंवा कोणी आजउद्यां करूं लागले तर तुम्ही आपला निश्चय तर सोडूं नकाच, पण त्यांच्याकडे थोड्याशा सहानुभूतीनें पाहा. शूराप्रमाणें मरण्यापेक्षां सुसंगतपणें जगणेंच अधिक अवघड आहे. उदार प्रवृत्तीचे लोक आपलें सर्व शौर्य निकराच्या क्षणीं एका केंद्रांत आणून तत्त्वासाठीं प्राणत्याग करतील; पण

तसा निकराचा क्षण केव्हां येईल याचा नेम नसल्यामुळें आणि तसा प्रसंग अगोदर वर्दी देऊन येत नसल्यामुळें खऱ्या स्वातंत्र्यभक्ताला जन्मभर जय्यत तयारी ठेवावी लागते. हा ताण सहन करण्याची आणि एवढा करारीपणा बाळगण्याची शक्ति अंगीं नसल्यामुळेंच पुष्कळांना अपयश येतें. तत्त्वांवर निष्ठा ठेवून जिवंत राहणें हें तत्त्वासाठीं देह ठेवण्याइतकेंच मर्दुमकीचें आहे, हें आपण लोकांना पटवून दिलें पाहिजे. 'मातृभूमीसाठीं आज मरावयाची नाहीं तर जगावयाची जरूर आहे,' या चुणचुणीत कल्पनेचेही स्वार्थसाधु लोकांनीं धिंडवडे उडवले आहेत. तें जगणें ध्येयासाठीं असलें पाहिजे, शौर्य व सत्य यांनीं भरलेलें असलें पाहिजे. जगणें याचा अर्थ नुस्तें जिवंत राहणें व संसार करणें एवढाच नाहीं. जन्माला आल्यापासून मरेपर्यंत सारखी चुकवाचुकव करीत राहणें याला जगणें म्हणत नाहींत. जगण्याचा तसा अर्थ रूढ झाला तर सर्व देश लवकरच कुडकुडणाऱ्या द्विपादांनीं भरून जाईल, त्यांचे अंगीं जिवंत राहण्यापुरतें सामर्थ्य किंवा मरण पत्करण्यापुरता धीर असणार नाहीं. कोणत्याही देशावर याहून मोठें संकट ओढवणें शक्य नाहीं. नैराश्याच्या काळांत हीं सर्व संकटें एकदम येतात. सर्वत्र अंधकार पसरलेला आहे, औदासीन्य आणि विश्वासघात यांचें साम्राज्य पसरलें आहे, शत्रु सारखे हल्ल्यामागून हल्ले चढवीत आहे, तुमचे शूर मित्र थकूनभागून गेले आहेत आणि किंकर्तव्यमूढ झाले आहेत. अशा वेळीं तुम्ही राष्ट्रीय ध्येयाची तरफदारी कडया सुरांत करूं लागांल तर आपण अरण्यरुदन करीत आहों असेंच तुम्हांला वाटेल. पण हजारों वर्षांपूर्वीच्या महात्म्यांनीं आपलीं तत्त्वें जाहीर करतांना उदासीन समाजापुढें असेंच अरण्यरुदन केलें होतें, त्यांच्या शब्दांचें सामर्थ्य आजही अमोघ आहे व त्यापासून आजही राष्ट्राला स्फूर्ति प्राप्त होत आहे. आणि उलटपक्षीं "व्यावहारिक" माणसाचा उपदेश आजचा उद्यांही कोणाच्या लक्षांत रहात नाहीं ह्याची तुम्ही आठवण करा म्हणजे समाजाचें रक्त तापून पुन्हा उसळ्या घेऊं लागेपर्यंत आणि भावना पुन्हा तेजानें झळाळूं लागेपर्यंत तुमचा धीर खचणार नाहीं.

एवढ्या विवेचनापासून निष्कर्ष कोणता काढावयाचा ? आपलें तत्त्वज्ञान आपल्या आयुष्यांत उतरलें पाहिजे. सर्वसाधारणपणें असें होईल तेव्हांच

स्वातंत्र्ययुद्धाला खरी सुरुवात होईल. आजचें कर्तव्य आजच्या सोयीसाठीं उद्यांवर टाकूं नका; भविष्यकाळांत अधिक सोयीची वेळ येईल या सबबीवर आज निष्क्रिय राहूं नका. स्वातंत्र्याला अनुकूल संधि केव्हां येईल याचा कांहीं नेम नाहीं; आपली तयारी नसेल त्या वेळीं अशी संधि उपस्थित होण्याचा संभव आहे. स्वातंत्र्ययुद्धासाठीं कदाचित् आपल्याला सैन्य उभारावें लागेल; स्वातंत्र्ययुद्ध सैन्याशिवाय अशक्य आहे असें गृहीत धरणें ही चूक आहे. लढाईला उभें राहिल्यावर पाहून घेऊं; आजपासूनच ही कर्तव्यांची भगभग कशाला, असा विचार करून आज तटस्थ राहणें ही त्याहून मोठी व अधिक घातकी चूक आहे. इतरत्र त्याचप्रमाणें राजकारणावरही रूढीचें नियंत्रण आहे. इंग्लंडांत 'परदेशांशीं लढाया व इतर राजकीय गुंतागुंती' या विषयावर वादविवाद चालले होते त्याच वेळीं 'राज्यघटना कशी असावी व कोणाला किती स्वातंत्र्य असावें' या विषयावरही लुटुपुटीचे वादविवाद चालू होते; इतक्यांत एकाएकीं मजुरांचा लढा उपस्थित झाला; परचक्राची भीति मागें पडली आणि मजुरांच्या संपामुळें आपसांत यादवी सुरू होणार अशीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें सर्व इंग्लंडचा थरकांप उडाला. आयर्लंडला स्वातंत्र्यासाठीं उठावणी करण्यास ही संधि बिनमोल होती; इंग्लंड स्वतःचेच संरक्षण करण्यास असमर्थ होतें, मग आयर्लंडवरील आपली सत्ता कायम ठेवण्याचें सामर्थ्य त्या वेळीं इंग्लंडच्या हातीं कोठून असणार ? सैन्याशिवाय स्वातंत्र्य मिळविणें शक्य नाहीं ही कल्पना आयर्लंडच्या डोक्यांत इतकी खिळून बसली होती कीं, सैन्याच्या अभावीं आयर्लंड जागच्या जागीं दुबळ्यासारखें पडून राहिलें. या घटनेचें सार काय ? परिस्थिति केव्हां कशी उलटून अनुकूल होईल याचें आगाऊ अनुमान बसवितां येणार नाहीं हें उघड आहे; पण चालू क्षण हाच निर्वाणीचा क्षण आहे असें जाणून आपण नेहमींच तयारी ठेवली तर कोणतीही संधि फुकट जाणार नाहीं. हा निग्रह अधिक मर्दुमकीचा आहे; हें व्रत आपण आतांच आणि कायमचें धारण केलें पाहिजे; आपल्या आयुष्याची मांडणी या तत्त्वाच्या अनुरोधानेंच करण्यांत आली पाहिजे; आपल्या निशाणाशीं कोणींही बेमान होतां कामा नये. हें निशाण कोणत्याही कारणासाठीं खालीं पडतां कामा नये. असें झालें तरच आपली सर्व बाजूंनीं प्रगति होईल आणि आपल्या पिढीला मर्दांची पिढी असें अभिमानास्पद अभिधान मिळेल.

युद्ध सुरू झाल्यावर अनेक स्थित्यंतरें होतील, स्वार्थी लोकांचा हलकेपणा व शत्रूचा विश्वासघात निदर्शनास येईल, यांमुळें आपलें चित्त द्विधा होतां कामा नये. आपलें मन नेहमीं शांत व स्थिर ठेवलें पाहिजे. ज्या अनेकांनीं आपल्याबरोबर सहकार्य केलें नाहीं, त्यांचे हेतु प्रामाणिक असतील किंवा त्यांच्या मनांत भलभलत्या भीति उत्पन्न झालेल्या असतील यांची आपण आठवण ठेवली पाहिजे, आपल्या ध्येयाचें सौन्दर्य, सत्यता व व्यवहार्यता आपण त्यांना दाखवून दिली पाहिजे. ज्यांच्या अंतःकरणांत निष्ठा आहे आणि ज्यांचें ध्येय मोठें आहे त्यांच्या हातून मोठमोठीं कामें घडून येतात, त्यांच्याच परिश्रमानें अशक्य कोटींतल्या अनेक गोष्टी शक्य व साध्य होतात, चालू घटकेसाठीं जगणाऱ्या व्यावहारिक मनुष्याचे हातून महत्कार्यें कधींही होत नाहींत. त्यांच्या कल्पनेची मजल पोंचूं शकली नाहीं इतक्या गोष्टी शक्य कोटींत आहेत, हें आपल्या कार्यानेंच आपण त्यांना पटवून दिलें पाहिजे. आपलें ध्येय किती उदात्त आहे हें एकदां त्यांच्या दृष्टीस आलें कीं, त्यांच्या अंतःकरणांत स्थिर उत्साह, शुद्ध संकल्प व निश्चयी शौर्य निर्माण होईल. मातृभूमीचें पुनरुज्जीवन स्वप्नसृष्टींतून व्यवहार्यतेच्या कोटींत येईल, तें साध्य होण्याचा काळ जवळ येईल, तें साध्य होऊं लागलें आहे असें आपल्याला प्रत्यक्षपणें दिसूं लागेल. दिव्य चैतन्याच्या ज्योतीनें, सर्व अंतःकरणें पुन्हा एकदां संप्रकाशित होतील. आयर्लंडच्या स्वातंत्र्ययुद्धाची शेवटली मोहीम सुरू होईल आणि स्वातंत्र्य प्राप्त होतांच राष्ट्रसंघांतील आपल्या नियोजित स्थानावर आयर्लंड विराजमान होईल.

प्रकरण सातवें

निष्ठा

निष्ठा हा उच्चतम सद्गुण आहे. एकादा मनुष्य आपल्या ध्येयाशीं आजन्म एकनिष्ठ राहिला असें म्हणणें म्हणजे याहून त्याची अधिक स्तुति करणें अशक्य आहे असें सांगण्यासारखें आहे. इतिहासाच्या आरंभापासून आयरिश लोक राष्ट्रीय ध्येयाशीं एकनिष्ठ राहिले आहेत आणि हाच त्यांचा उच्चतम सद्गुण आहे; त्यांना आज बंडखोर अशी संज्ञा देण्यांत येत आहे, म्हणून बंडखोर कोण व खरे मर्द कोण हें स्पष्टपणें ठरविण्याची वेळ आज आलेली आहे. आम्हांवर राज्य करणाऱ्या मूर्ख सरकारनें आम्ही सर्व लोक कट्टे राजनिष्ठ आहों अशी गैरसमजूत करून घेऊन आमच्या राष्ट्रवीरांना राजद्रोही हें विशेषण द्यावयास सुरवात केली तेव्हां आम्हींही त्यांना 'आमच्या देशाचे द्रोही' असें अभिधान देऊन सरकारच्या हेतूंची कुचेष्टा केली. पण ही कुंचेष्टा बंद करून आम्हीं लवकरच आमच्या खऱ्या मनोवृत्ति प्रकट करावयास हव्या होत्या; महात्मा ब्रियन[1], अभिमानी शेन[2], अद्वितीय टोन[3],

१ ब्रियन–(९०६ ते १०१४) आयर्लंडचा राजा. त्या वेळीं आयर्लंडवर डेन्स लोकांची सत्ता होती. ब्रियननें त्यांचेविरुद्ध लढाई पुकारून स्वदेशांत स्वराज्य स्थापन केलें. आयर्लंडचा अद्वितीय राष्ट्रवीर अशी त्याची ख्याति आहे.

२ शेन–सोळाव्या शतकांतील आयरिश बंडखोर सरदार.

३ टोन–(१७६३–१७९८) आयरिश बंडखोर, क्रांतिकारकांचा पुढारी. रोमन कॅथलिक व प्रॉटेस्टंट लोकांची राजकीय एकजूट करण्यासाठीं यानें १७९१ सालीं "युनायटेड आयरिशमेन" ही संस्था निर्माण केली. यापैकीं कांहीं लोकांनीं हत्यारी बंड उभारण्याचा कट केला आणि बंडवाल्यांना मदत करण्यासाठीं फ्रान्सकडे बोलणें लावलें. १७९६ सालीं टोन पॅरिसला गेला; तेथें त्याला लष्करांत ॲड्जूटंट जनरलची जागा देण्यांत आली. याच वर्षीं सुमारें पंधरा हजार फ्रेंच शिपायांसह त्रेचाळीस जहाजांतून टोननें आयर्लंडचा रस्ता धरला. फ्रेंच खलाशी कुचकामाचे असल्यामुळें स्वारी फसली व जहाजें परत आलीं. पुढल्या सालीं डच लोकांची मदत घेऊन

शूर ओवेन रो, मिचेल[४] व डेव्हिस हे सर्व कट्टे देशाभिमानी होते, खरे देशभक्त होते, हें आपण स्पष्टपणें बोलून दाखवावयास हवें होतें. प्रस्थापित झालेल्या अन्यायाविरुद्ध लोक बंड करून उठतात तेव्हां ते सत्यावरील आपली एकनिष्ठा प्रकट करीत असतात. दुष्टांनीं सत्याच्या अब्रूवर उडविलेले शिंतोडे पुसून टाकावयासाठींच त्यांनीं दुष्टांविरुद्ध बंड पुकारलेलें असतें आणि त्यांच्या अंतःकरणांत सत्यभक्ति असते म्हणूनच आपण त्यांना मान देतों. केवळ बंडखोर म्हणवून घेण्यासाठीं बंड पुकारणाऱ्या बंडखोराची आपण कधींही स्तुति करीत नाहीं. या बाबतींत आपले विचार अगदीं स्पष्ट असले पाहिजेत, नाहीं तर अनेक शतकांच्या झटापटीनंतर आपण स्वातंत्र्य मिळवूं तेव्हां वाटेल तो लबाड व देशद्रोही मनुष्य बंड पुकारून आमच्या स्वातंत्र्यावर घाला आणण्याचा व आमच्या शत्रूंना देशांत परत आणावयाचा कट उभारण्याचा प्रयत्न उजळ माथ्यानें करूं लागेल. एकनिष्ठा हा उच्चतम सद्गुण सज्जनांच्या ठिकाणींच संभवतो. आयर्लंडमध्यें आजवर या शब्दाची फार ओढाताण झालेली आहे; या शब्दाचा खरा अर्थ आपण समजावून घेतला पाहिजे आणि आमच्या सर्व राष्ट्रवीरांचे ठिकाणीं हा गुण अस्तित्वांत होता हें ध्यानांत आणून त्या शब्दाला आपण त्याचें खरें स्थान पुन्हां प्राप्त करून दिलें पाहिजे. या दृष्टीनें विचार करूं लागतांच कांहीं नाजूक प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात. या प्रश्नांनीं आजवर अनेकांना घोंटाळ्यांत पाडलेलें आहे व अनेकांचीं डोकीं विकवून सोडलीं आहेत. आमचे हक्क आम्हाला देण्याचें नाकारणाऱ्या सरकारनें निर्माण केलेल्या राज्ययंत्रांचा उपयोग करीत असतांनाच आपले हक्क प्रस्थापित करणें योग्य आहे किंवा नाहीं, आपला कार्यक्रम सर्वस्वीं मूलतत्त्वांना धरूनच असावा कीं त्यांत थोडीबहुत विसंगतता

पुन्हा स्वारी करावयाचा त्यानें प्रयत्न केला पण तोही फसला. १७९८सालीं पुन्हा एकदां फ्रेंचांच्या मदतीनें स्वारी करावयाच्या प्रयत्नांत असतांना ठोन पकडला गेला. लष्करी कोर्टामार्फत चौकशी होऊन त्याला फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली; पण ही शिक्षा अमलांत येण्यापूर्वीच त्यानें चाकूनें गळ्याची शिरे तोडून आत्महत्या केली.

४ मिचेल—१८४८ चा बंडखोर पुढारी.

असली तरी चालेल, आमच्या पक्षाचीं अर्धींमुर्धीं तत्त्वें मान्य करणारा प्रामाणिक मनुष्य आणि आमच्या सर्व तत्त्वांना बरकड मान्यता देऊन घडाडीनें घुढाकार घेणारा अप्रामाणिक मनुष्य यांजबरोबर आपण कोणत्या प्रकारचा संबंध ठेवला पाहिजे हे प्रश्न फार नाजूक आहेत. निष्ठेचा विचार करतांना हे प्रश्न उपस्थित होतात. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं बंड पुकारणारा व स्वातंत्र्याचें संरक्षण करीत असतांना देह ठेवणारा, हे दोघेही सारख्याच योग्यतेचे आहेत अशी या विचारानंतर आपली खात्री पटते. नव्या काळांतही आघाडीला राहतां यावें या इच्छेनें खरा स्वातंत्र्यवीर आपल्या तत्त्वांत बदल करीत नाहीं. तो आपल्या तत्त्वांशीं आजन्म एकनिष्ठ राहतो आणि तोच सर्वांच्या प्रेमाला सदैव पात्र असतो; बंडाच्या आरंभीं त्याला पिसाट, दुष्ट, उडाणटप्पू अशीं विशेषणें बहाल करण्यांत येतात व कांहीं लोक तर त्याच्यावर बहिष्कारही घालतात; पण आरंभापासून शेवटपर्यंत तो एकनिष्ठ असतो. होय, टोन हाच आयर्लंडचा खरा राजनिष्ठ प्रजाजन होय; आणि त्याच्याविरुद्ध शत्रूला साह्य करणारा व प्रोत्साहन देणारा प्रत्येक मनुष्य हाच आयर्लंडाविरुद्ध आणि आयरिश जनतेविरुद्ध कारवाई करणारा बंडखोर आहे.

मूलतत्त्वांच्या दृष्टीनें पृथक्करणाला सुरवात झाली म्हणजे काळ येईल तशी पाठ फिरविणारे विरोधक गोंधळून जातात; आपला विरोध किती कुचकामी आहे हें समजून येतांच तुमच्या कार्यक्रमांत सुसंगतता नाहीं असा एक नवाच मुद्दा ते उपस्थित करतात. चर्चेमध्यें मांडण्यांत येणाऱ्या एकाद्या मुद्द्याचें महत्त्व तुलनात्मक दृष्टीनें किर्तीसें आहे याचा आगाऊ विचार करून ठेवणें श्रेयस्कर आहे. आपली बाजू चलाखीनें मांडतां यावी एवढ्यासाठींच मूलतत्त्वें निर्माण झालेलीं नसतात; मूलतत्त्वांचें प्रधान कार्य दुसरेंच आहे. तत्त्वसंघाच्या केंद्रस्थानीं असें एक प्रधान व मूलाधार तत्त्व असतें कीं, तें इतरांवर प्रकाश पाडून त्यांचें स्पष्टीकरण करतें; त्याचें ज्ञान होतांच मन संप्रकाशित होतें, अंतःकरणाची शुद्धि होते, मनुष्याला उत्तेजन येतें, मनाच्या सर्व शक्ति केंद्रीभूत होतात, त्याच्या अनुरोधानें त्याला जीवनाची संगति लावतां येते, वस्तुमात्राची खरी योग्यता व परिमाण हीं कळून येतात. त्या तत्त्वाच्या अनुरोधानें विचार करूं लागल्यानंतर एक क्षण असा येतो कीं, जेव्हां मनुष्याच्या मनांतले सर्व संशय नष्ट होतात, अंतःकरण श्रद्धेनें भरून जातें. आज-

पर्यंत अनिश्चयाच्या अंधारांत तो कुडकुडत भटकत होता, वेगवेगळ्या तत्त्व-ज्ञानांचा अभ्यास करून चित्ताचें समाधान करूं पहात होता; निराशेच्या घुटक्यांनीं त्याचें जीवन कडू झालें होतें; आपल्या अंतःकरणाला कशाची तहान लागलेली आहे याचीच त्याला माहिती नव्हती; अतःकरणाची तळमळ शांत करण्यासाठीं एकादा रामबाण उपाय मिळविण्यासाठीं तो भटकत होता; पण त्या मूलतत्त्वाचें ज्ञान होतांच त्याची तळमळ शांत होते, त्याला आत्मज्ञान होतें. दिव्यदृष्टि व्यक्तिमात्राचे ठिकाणीं असते, मात्र ती सुप्तावस्थेंत असते, गैरसमजुतीच्या धुक्यांत गुरफटून गेलेली असते, सत्याचें ज्ञान होतांच हें धुकें नाहींसं होतें, दृष्टि साफ होते व अंतःकरणांत स्फूर्ति जागृत होते. ज्याला अशी दृष्टि प्राप्त झालेली आहे तो शाब्दिक चर्चेबद्दल उदासीन असतो. वादविवादाचा त्याला तिटकारा वाटतो असें मात्र नाहीं. वाद-विवादाच्या वेळीं तो आपल्या शक्तीचा पूर्ण उपयोग करतो; पण त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झालेल्या नवशक्तीमुळें त्याला अशा अनेक गोष्टी स्वयंसिद्ध वाटूं लागतात कीं, ज्या सत्य आहेत असें केवळ तर्कशास्त्राच्या जोरावर सिद्ध करून दाखवितां येणार नाहीं त्या गूढ शक्तीमुळें त्याच्या संपूर्ण जीवनाचें परिवर्तन होतें. पूर्वी तो संशयी होता, चुकार होता, अपेशी होता; आतां त्याचा संशय नष्ट झाला आहे, तो मोठ्या निकरानें युद्ध करूं लागला आहे आणि सर्वत्र तो विजयी होत आहे. तो अव्यवहार्य तत्त्वांचें चर्वितचर्वण करणारा कोरडा तत्वज्ञानी आहे असें मानणें म्हणजे त्याच्या कर्तृत्वाचा आपल्याला मागमूसही लागला नाहीं, असा कबुलीजबाब देण्या-सारखेंच आहे. आपलीं मतें जगावर लादण्याकडे किंवा जगाचें मत आपल्या मतासारखें करण्याकडे तत्त्वविवेचकाचा कल असतो. खरा तत्त्वज्ञानी जीवना-चें नियंत्रण करणारें प्रधान-तत्त्व शोधून काढतो आणि आपल्या वैयक्तिक जीवनांत त्या तत्त्वाला प्रत्यक्ष स्वरूप देतो. त्याच्या अंतःकरणांत प्रकट झालेलें तेज इतकें दैदीप्यमान असतें कीं, तें कोणत्याही सिद्धान्ताच्या कक्षेंत रहात नाहीं. त्याचें विजयी तत्त्वज्ञान त्याच्या मनांत असते इतकेच नाहीं, तर तें त्याच्या रक्तांत अभिनव उत्साहानें उसळत असतें. निर्जीव तत्त्वांचें विवेचन करूं इच्छिणारा संशयात्मा कोरड्या चर्चेंत इतका वेळ घालवितो कीं, शेवटीं त्याचें मन गोंधळून जातें, त्याचा बुद्धिभ्रंश होतो. बुद्धिवान्

मनुष्य एकादें तत्त्व निर्माण करील, मोठ्या कुशलतेनें त्याचें समर्थन करील आणि एकाएकीं विरुद्ध बाजूला मिळून स्वतःचेच पूर्वीचे मुद्दे तितक्याच सहजतेनें खोडून काढील. असें होणें शक्य आहे हें त्या संशयी मनुष्याला पटतच नाहीं. परस्परविरोधी पक्षांमध्यें परस्परांचे मुद्दे खोडून काढण्यासाठीं ठराविक माणसांची योजना केलेली नसते काय? त्यांच्या चर्चेंत केवळ बुद्धीची हातचलाखी दिसून येते. श्रोत्यांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याखेरीज ते दुसरें कांहींही करीत नाहींत. पण तत्त्वज्ञान ही आत्म्याची स्फूर्ति आहे. वादविवादाच्या कसोटीला उतरणें हेंच तत्त्वज्ञानाचें समर्थन नाहीं. खऱ्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावानें श्रद्धावान् अंतःकरणांत दिव्यदृष्टि जागृत झाली पाहिजे. मानवी जीवनाचें आकलन झालें पाहिजे, व त्यामुळें वैयक्तिक जीवनांत उत्साह व कर्तृत्व उत्पन्न झालें पाहिजे आणि मनुष्याचें अंतःकरण तेजस्वी उदात्त, ज्ञानमय व धैर्यपूर्ण झालें पाहिजे.

आतां आपण सुसंगततेच्या मुद्द्याचा विचार करूं. ह्या प्रश्नावर आज अनेक रणें माजलेलीं आहेत. "इंग्लंडच्या अधिराज्याला तुमची मान्यता नाहीं, मग इंग्रजसरकारनें काढलेलीं चलनी नाणीं व पोस्टाचीं तिकिटें तुम्ही कां वापरतां? वेस्टमिनस्टरच्या पार्लमेंटची सत्ता तुम्हांला कबूल नाहीं मग त्याच पार्लमेंटानें निर्माण केलेल्या स्थानिक-स्वराज्यसंस्थांचा उपयोग तुम्ही कां करतां?" हे व असे प्रश्न हल्लीं रोजच्या परिपाठांतले झाले आहेत आणि त्यांचें उत्तर अगदीं सोपें आहे. आज आयर्लंडांत तोफा गडगडत नाहींत इतकेंच, युद्धाचीं बाकीचीं सर्व स्वरूपें आज आपल्याला दिसून येत आहेत. स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं आम्हीं युद्ध उभारलें आहे. युद्धाच्या निकरामुळें शत्रूला कित्येक ठिकाणीं माघार घ्यावी लागत आहे; शत्रूला सोडावीं लागलेलीं ठिकाणें अर्थातच आमच्या हातीं येतात. स्थानिक स्वराज्यसंस्था या अशाच रीतीनें आमच्या हातीं लागलेल्या आहेत. युद्धांत काबीज केलेलीं ठिकाणें या दृष्टीनेंच आम्ही आजवर या संस्थांकडे पहात आलों आहोंत. राष्ट्राचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं, शक्तींचा विकास करण्यासाठीं, सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं आणि आज शत्रूच्या हातीं असलेलें अगदीं शेवटचें नाकें काबीज करण्यासाठींच आम्ही या संस्थांचा उपयोग करून घेत आहों आणि हें अगदीं रास्त आहे. शत्रूनें व्यापलेलीं ठाणीं

काबीज करून शेवटच्या विजयासाठीं त्यांचा उपयोग करून घेणें ह्यांतच सेनानायकाचें खरें कर्तृत्व आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर हेंच करावयाचें असतें. युद्धाचा निकाल आपल्याच तर्फेचा होणार हें दाखविणारी हीं निशाणी आहे; प्रत्यक्ष हाणामारींत सामील न झालेल्या पण आपल्याबरोबर सहानुभूति बाळगणाऱ्या लोकांना या खुणांवरूनच युद्धाचा कल कसा आहे हें कळून येतें. आपले सैनिक समेट करण्यासाठीं शत्रूच्या तंबूंत गेले आहेत, आपल्या लोकांनीं शत्रूच्या निशाणाला मान्यता दिली आहे, अशी बातमी रणांगणावरून आली तर संपूर्ण जनतेला भीतीचें कांपरें भरेल. हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. शत्रूनें गोडी-गुलाबीनें आणि राजीखुषीनें दिलेल्या देणग्या स्वीकारणाराला स्वतःचा बचाव करण्यासाठीं कोणताही मुद्दा पुढें करतां येणें शक्य नाहीं. अशा देणग्यांचा उपयोग आयर्लंडच्या हितासाठीं, त्याचप्रमाणें घातासाठींही करतां येईल. त्यांचा स्वीकार करतांना मनुष्याला आपला झेंडा खालीं ठेवावा लागतो आणि म्हणूनच त्याचें कृत्य दूषणीय आहे, हें अगदीं स्पष्ट आहे. स्थानिक स्वराज्यसंस्थांचा उपयोग करणाऱ्या व्यक्तींची विचारसरणी इतकी रोखठोंक नसते. असे गंभीर प्रश्न आपल्यासमोर उभे राहतील अशी त्यांची कल्पनाही नसते आणि या तत्त्वानुसार वागणारे लोक फार थोडे असतात असा आणखी एक मुद्दा आमच्या विरोधकांना पुढें करतां येण्यासारखा आहे. गोष्ट खरी आहे. स्थानिक-स्वराज्य-संस्था सर्वस्वीं जनतेच्या हातीं आहेत. जनतेच्या कल्याणासाठीं आणि राष्ट्रीय ध्येयसिद्धीसाठीं जनतेची तयारी करण्याकरितांच या संस्था चालविण्यांत येत आहेत हेंही तितकेंच खरें आहे. या संस्थांमध्यें काम करणारे लोक राष्ट्राचा सर्वसाधारण विकास करीत आहेत, पूर्वीचें सामर्थ्य व महत्त्व देशाला पुन्हा प्राप्त करून देण्यासाठींच ते झटत आहेत. आपल्या कार्याचा परिणाम किती मोठा होणार आहे याची त्यांना स्पष्ट कल्पना नाहीं; इतकेंच वैगुण्य आहे. ज्यांना या परिणामांची व राष्ट्रीय ध्येयाची स्पष्ट कल्पना असते त्यांचा कार्यक्रम प्रत्यक्ष विकासाचा असतो. आमचा विरोध बमजोर व्हावा या हेतूनें आम्हांला दिलेल्या राज्यसंस्थांमुळें आमच्या विरोधाची तीव्रता वाढतच चाललेली आहे. अधिक हक्क मिळविण्यासाठीं आम्ही अधिक निकरानें झगडतच आहों हें स्पष्टपणें दिसून येतांच पूर्वीप्रमाणें एकतंत्री

राज्य चालविण्याच्या इच्छेनें परकी सरकार आम्हांला मागें हटविण्याचा प्रयत्न करूं लागतें त्यावेळीं जाणतेपणें राष्ट्रोद्धारासाठीं स्थानिक–स्वराज्य-संस्था चालविणारे लोक सरकारला कसून विरोध करतात आणि आपलीं तत्त्वें स्पष्टपणें जाहीर करतात. आमचा लढा सध्यां या अवस्थेंत आहे. मधून मधून राष्ट्रीय चळवळ चिरडून टाकण्यासाठीं सरकारकडून जोराचे प्रयत्न करण्यांत येतात, त्यावेळीं युद्धाची परिस्थिति उत्पन्न होते, अशा वेळीं कित्येक मोर्च्यांजवळ विशेष निकराच्या चकमकी होतात. आपल्या काळांत शेतकरीसंघ निघाले, जमिनीसाठीं लढे झाले. स्वराज्यासाठीं जोराच्या चळवळी झाल्या, विद्यापीठांची सुधारणा करण्यासाठीं आणि मातृभाषेला उच्च शिक्षणक्रमांत स्थान मिळविण्यासाठीं मोठमोठ्या चळवळी झाल्या. या चळवळींमुळें सरकारनें जमिनींचा नवा कायदा, स्थानिक स्वराज्याचा कायदा, विद्यापीठाच्या सुधारणेचा कायदा वगैरे कायदे मंजूर केले आणि आयरिश भाषेला विद्यापीठांतील उच्च शिक्षणक्रमांत मानाची जागा प्राप्त झाली. आमच्या चळवळीमुळेंच सरकारला ही नवी व्यवस्था स्थापन करणें भाग पडलें; हेंच आमच्या प्रगतीचें परिमाण होय; या मनोवृत्तीनेंच आम्ही सुधारणांचा स्वीकार करतों. आणि म्हणूनच आमचा कार्यक्रम समर्थनीय आहे. केवळ सरकारनें निर्माण केलेल्या आहेत म्हणूनच या संस्थांचा व सुधारणांचा आम्हीं त्याग करावा आणि प्रत्यक्षपणें अगर पूर्णपणें सरकारच्या आधीन असलेल्या व्यक्तीसाठीं या सुधारलेल्या संस्था मोकळ्या ठेवण्यांत याव्या, असें कित्येक लोक प्रतिपादन करीत असतात; पण ही विचारसरणी इतकी मूर्खपणाची आहे कीं, तिची अधिक चर्चा करण्याचीही जरूर नाहीं. हरएक बाबतींत आयर्लंडला स्वातंत्र्य मिळाविणें हें कार्य किती गंभीर आहे याची अल्पस्वल्पही कल्पना असलेला मनुष्य सदरहू विचारसरणीला क्षणभरही मनांत थारा देणार नाहीं. हेतूंबद्दल संशय प्रकट करण्यांत येतो तेव्हां जो जबाब द्यावयाचा तो रोखठोक असला पाहिजे. सुसंगततेच्या मुद्द्यावर आमच्या कार्यक्रमाविषयीं आक्षेप घेणाऱ्या मनुष्याला आमचें हेंच अखेरचें उत्तर आहे कीं, आम्ही जागोजाग शत्रूला हटवीत आहोंत. शत्रूच्या ताब्यांतलीं ठाणीं काबीज करीत आहोंत.

सुसंगततेच्या विसंगत कल्पना मनांतून काढून टाकीत असतांनाच, साधारणतः लोकांच्या मनांत न येणाऱ्या आणखी एका बाबतींतली आमची

मनोवृत्ति स्पष्ट केली पाहिजे. स्वातंत्र्ययुद्धासाठीं उभारण्यांत येणारें सैन्य कार्यक्षम असावें व विजयी व्हावें यासाठीं ज्यांना राष्ट्रीय ध्येयाची स्पष्ट कल्पना आहे, या ध्येयार्थी आजन्म एकनिष्ठ राहण्याची ज्यांची तयारी आहे, राष्ट्रीय झेंड्याचा अधिकाधिक गौरव होत जाईल अशाच रीतीनें सदैव लढावयाचा ज्यांचा दृढनिश्चय झालेला आहे असेच लोक स्वातंत्र्यसेनेंत सामील करून घेतले पाहिजेत हें उघड आहे. प्रत्यक्ष उदाहरणांकडे पाहतांच या निवडीचें महत्त्व लक्षांत येईल. मनुष्यस्वभाव आहे असाच राहणार; एकादी चळवळ निघाली, कीं तावडतोब मनुष्यस्वभावांत अनुकूल असा बदल घडून येईल, हें अशक्य आहे. अर्थात् प्रत्येक चळवळींत भाडोत्री भालाईत हे असावयाचेच. हे स्वयंभू पुढारी नेहमीं एक पक्ष सोडून दुसऱ्या पक्षाला मिळावयास तयार असतात. चालू घटकेला जो पक्ष लोकप्रिय असेल त्याला मिळावयाचें हेच अशा लोकांचें आद्यतत्त्व असतें. आपला हेतु तडीला नेण्यासाठीं ते हव्या त्या पक्षाची मनधरणी करतील व तितक्याच सहजपणानें त्या पक्षाचा विश्वासघातही करतील. असें अनेक वेळां घडून आलेलें असल्यामुळें या व्यक्तींचें चारित्र्य सर्वांच्या परिचयाचें झालें आहे. भलत्या मार्गाला लागलेला प्रामाणिक मनुष्य परिस्थितीचें अंतःकरणपूर्वक परीक्षण करून शेवटीं राष्ट्रीय झेंड्याखालीं दाखल होतो, असा मनुष्य हजारांतून ओळखून काढतां येतो. तत्त्वशून्य, बेजबाबदार व स्वार्थी लोक एकाद्या पक्षांत सामील होतात आणि आपल्या कारवाईनें इतरांवर हुकमत गाजवूं लागतात तेव्हां त्या पक्षाचा घात होणार, त्यांच्या कार्याचा नाश होणार असें खुशाल समज़ावें. मोठमोठ्या चळवळींमध्यें अशा लोकांचा प्रवेश कसा होतो हेंच विलक्षण वाटतें; चळवळींच्या आद्यसंस्थापकांना अनुयायी हवे असतात, एकाद्यानें त्यांचीं मतें मान्य केलीं म्हणजे बारीकसारीक गोष्टींची चवकशी करण्याचे भानगडींत ते पडत नाहींत. अनुयायांच्या संख्येच्या जोरावर समाजावर छाप टाकून त्यांना अनेक लोकांचें पाठबळ मिळवावयाचें असतें आणि म्हणूनच लबाड लोकांना नव्या पक्षांत बिनबोभाट्यानें प्रविष्ट होतां येतें. हे दिखाऊ देशभक्तच आपल्या कट्टेपणाबद्दल कंठशोष करीत असतात; त्यांचें वर्तन मोहक व आव बेमालूम असतो. "अनुभविक पुढारी" या नात्यानें त्यांचा विशेष गौरव करण्यांत येतो. सामर्थ्य संख्येंत आहे, या कल्पनेनें आपण मनमोकळेपणानें त्यांना आपल्यांत

घेतों. केवळ संख्याबलावर नजर ठेवण्यांत केवढा धोका आहे इकडे आपलें दुर्लक्ष होतें. आपण आपलीं माणसें नीट पारखून घेतलीं पाहिजेत. लबाड लोकांच्या विरोधापेक्षां त्यांचें साहचर्यच अधिक घातुक आहे हें आपण ध्यानांत बाळगलें पाहिजे. आपल्याला जनतेची खात्री पटवून द्यावयाची आहे. अनेक लोक शांतपणानें आमच्या हालचालींचा अभ्यास करीत असतील. आम्ही प्रतिपादन करीत असलेल्या तत्त्वांमुळें आकर्षित होऊन अधिक जवळ येऊन ते आमचें सूक्ष्म परीक्षण करीत असतील. सर्वसाधारण मनुष्याला दुसरें कांहीं समजत नसलें तरी त्याला तत्त्वशून्य मनुष्य तेव्हांच ओळखतां येतो. आमच्या पक्षामध्यें व सभांमध्यें अशीं माणसें दिसूं लागतांच तो परत फिरतो. मनांत आलेल्या संशयांचें निरसन करून घेण्यासाठींही तो थांबत नाहीं आणि पुढें तो आमच्याकडे ढुंकून पहावयाचीही तसदी घेणार नाहीं. "तुमचे मित्र कोण कोण आहेत तें सांगा म्हणजे तुम्ही स्वतः कसे आहांत याचा मला अंदाज बसवितां येईल." सज्ञानशीलाचें सख्य असतें, या जुन्या सुभाषिताचा समाजावर आपल्या कल्पनेपेक्षां अधिक पगडा आहे. शिवाय सुसंगततेसाठीं आपण या सवंग देशभक्तांपासून अलिप्त राहिलें पाहिजे. आम्हीं स्वातंत्र्यासाठीं युद्ध उभारलें आहे, ऐहिक फायद्यासाठीं व सुखासाठीं आम्हीं हा खटाटोप मांडलेला नाहीं. मनुष्य स्वतंत्र असलाच पाहिजे, आणि जीवन उदात्त व सतेज असलें पाहिजे अशी पौरुषाची आज्ञा आहे, म्हणूनच आम्हीं हें युद्ध आरंभिलें आहे. अशा उज्ज्वल युद्धांत हलकट, कारस्थानी व स्वार्थी बदमाषांच्या सहकार्याची स्वातंत्र्यवीरांनीं अपेक्षा करावी ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे. आपण आपल्या एकनिष्ठेला बाध येऊं देतां कामा नये. आरंभीं आपल्या पक्षाचें संख्याबल थोडें असलें तरी आपण डगमगून जातां कामा नये. बाजारबुणग्यांच्या अफाट जमावापेक्षां खऱ्या कळकळीच्या लहानशा तुकडीचें सामर्थ्य अधिक असतें. या लहानशा तुकडीला अनेक लोक अंतःस्फूर्तीनें साह्य होतील, तिचें सामर्थ्य रोज रोज वाढत जाईल आणि शेवटीं या लहानशा केंद्राभोंवतीं एक अजिंक्य सैन्य खडें होईल.

सुसंगततेच्या दृष्टीनें आपण दिखाऊ देशभक्तांपासून अलिप्त राहिलें पाहिजे असें ठरविलें; याच दृष्टीनें विचार केला असतां, चालचलाऊ अर्धवट सुधारणांवर भर देणाऱ्या प्रामाणिक प्रागतिकांबरोबर कोणत्या रीतीनें वागलें

पाहिजे हेंही आपल्याला निश्चित करतां येईल. इंग्लंड व आयर्लंड यांची फारकत करणें हल्लींच्या परिस्थितींत अशक्य आहे. वसाहतींचें स्वराज्य, ग्रॅटनचें पार्लमेंट किंवा अशींच एकादी अर्धवट राज्यघटना मान्य करावी अथवा सध्यां तो प्रश्न तसाच मोकळा राहूं द्यावा, असें त्यांचें म्हणणें आहे. साधारणपणें हें म्हणणें योग्य दिसतें. त्यांच्याबरोबर समानभूमीवर सहकार्य करावयाचा मोह पडून शेवटीं राष्ट्रीय पक्षाचे लोक प्रागतिकांबरोबर समेट करतात. याचा परिणाम काय होतो ? संपूर्ण स्वातंत्र्यावर निष्ठा असलेले लोक, आज अर्धवट स्वातंत्र्याचा पुरस्कार केल्यानेंच आपल्याला कालांतरानें संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होईल असें मानणारे लोक, आणि अर्धवट स्वराज्य हेंच राष्ट्राचें ध्येय आहे असें मानणारे लोक, असे तीन भिन्न प्रवृत्तींचे लोक एकत्र होऊं पाहतात वरपांगी ऐक्य नष्ट होऊन लवकरच त्यांचे आपसांत लढे सुरू होतात. ज्यांचें ध्येय विशाल असतें त्यांची खात्री झालेली असते कीं, चालू घटकेला करावयाचीं कार्यें त्या ध्येयाच्या दृष्टीनेंच हातीं घेण्यांत आणि पार पाडण्यांत आलीं पाहिजेत, तरच तें ध्येय साध्य होणें शक्य आहे; चालू घटकेला करावयाचीं कामें अंतिम ध्येयाशीं सुसंगत असलींच पाहिजेत, नाहींतर सर्व कार्य विफल होईल अशी त्यांची निष्ठा असते. त्याचीं मूलतत्त्वें इतरांना मान्य नसलीं, तरी त्याला स्वतःला तीं बाजूला ठेवतां येत नाहींत. कसोटीच्या प्रसंगीं आपला झेंडा बाजूला ठेवणें त्याला अशक्य वाटतें. त्याला जीं मूलतत्त्वें स्मृतीसारखीं अनुल्लंघ्य वाटत असतात तीं इतरांना तशीं वाटत नसल्यामुळें आणि त्यांनीं त्यांना मान्यता दिलेली नसल्यामुळें ते त्या तत्त्वांचीं बंधनें मान्य करीत नाहींत. कार्यनाशाचें हेंच मूळ आहे. समेटाच्या करारनाम्यांत ज्यासंबंधीं निश्चित निर्णय झालेला नाहीं असे प्रश्न उपस्थित होऊं लागतांच समानभूमीवर सहकार्यासाठीं एकत्र झालेल्या लोकांमध्यें मतभेद उत्पन्न होतात, वादविवाद विकोपाला जातात, आपसांत तंटेभांडणें सुरू होतात आणि पुन्हा फळ्या पडतात. अर्धवट योजनांसाठीं उभारण्यांत आलेलें सहकार्य विफल होतें. त्या अर्धवट सुधारणाही प्राप्त होत नाहींत आणि सद्धेतूनें एकत्र झालेल्या प्रामाणिक मनुष्यांना परस्परांबद्दल अविश्वास मात्र वाटूं लागतो. व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें असतां हा परिणाम योग्य नाहीं असेंच कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं. या प्रकारावरून एकच अनुमान काढतां

येण्यासारखें आहे. ज्यांना आपल्या ध्येयाची स्पष्ट व संपूर्ण कल्पना आलेली आहे त्यांनीं आपला कार्यक्रम स्वतंत्रपणें आंखावा आणि दृढनिश्चयानें स्वतःच्या जबाबदारीवर कार्य सुरू करावें, हेंच इष्ट आहे. फूट पडतांच कांहीं लोक दुःखोद्गार काढतील, "हां, आणखी फाटाफूट झाली, आयरिश लोकांना एकजुटीनें कार्य करतां येतंच नाहीं, आयर्लंडांत एकी होणें अशक्य आहे." या उद्गारांनीं कळवळा येऊन आपण आपला मार्ग सोडणार नाहीं; भिन्न पक्षांची एकजूट होणार नाहीं पण शक्य असेल व उपयोग होण्यासारखा असेल तेथें प्रामाणिक मनुष्यांना स्वतंत्रपणें सहकार्य करतां येईल. सहकाऱ्यांचा कार्यक्रम जेथें संपेल तेथें त्यांना सोडून दिलें म्हणजे झालें. समेटाच्या करारनाम्यानें उत्पन्न झालेल्या बंधनकारी सहकार्यानें कार्यनाश होतो; पण स्वतंत्र सहकार्यानें तेंच कार्य यशस्वी होतें. आपल्याहून ज्यांचे मार्ग भिन्न आहेत अशा खऱ्या कळकळीच्या इसमांवर वाईट हेतूंचा आरोप कोणींही करतां कामा नये. त्यांचीं आपलीं मतें जुळत नाहींत एवढ्यावरूनच त्यांना अप्रामाणिक ठरविणें सर्वस्वीं असमर्थनीय आहे. देशहिताबद्दल त्यालाही आपल्याइतकीच कळकळ असणें शक्य आहे; त्याच्या हातून घडलेली देशसेवा कदाचित् अधिक महत्त्वाची ठरेल. इतरांना बरोबर घेऊन पुढें जाण्याच्या इच्छेमुळेंच तो कदाचित् आपल्या मतांचा जहालपणा मुद्दाम कमी करीत असेल. त्याच्या मनोवृत्तींचा मवाळपणा कदाचित् आपल्याला पसंत पडणार नाहीं; पण म्हणून त्याला देशाचा दुष्मन मानणें हें अत्यंत अन्यायाचें आहे. यामुळें आपल्या कार्यावर नसतीं संकटें मात्र ओढवतील. परिस्थितीच्या पेंचाला तोड काढते वेळीं आजवर अनेकदां आपण आपसांतच चावाचावी करीत आलों आहोंत. हें लक्षांत ठेवून सर्वांसमोर उभ्या असलेल्या शत्रूकडेच आपण अधिक लक्ष दिलें पाहिजे; पण आघाडीच्या गारद्यांनीं परका राजा, परकी राज्यघटना किंवा परकें पार्लमेंट यांनीं आपले हात बांधून घेऊं नयेत. कार्याला हात घातल्यानंतर अटी स्पष्ट होऊं लागतात आणि त्या फार कडक आहेत असें वाटूं लागतें. अटींचा कडकपणा कार्याच्या माहात्म्यावरच अवलंबून असतो हें लक्षांत ठेवा. एकादी विशाल इमारत उभारीत असतांना कामावर देखरेख ठेवणाऱ्या शिल्पशास्त्रज्ञानें थोडासा निष्काळजीपणा केला अथवा एकादी अडचण वेळींच दूर करण्याऐवजीं केवळ दैवावर

हवाला ठेवून चूक दुरुस्त करण्याचे कामीं चुकारपणा दाखविला तर बाह्यतः अभेद्य दिसणारी ती विशाल इमारत जमीनदोस्त होण्यास फारसा कालावधि लागणार नाहीं. आपण आपल्या झेंड्याशीं एकनिष्ठ राहूं या, म्हणजे आपल्याला कशाचीही भीति बाळगण्याचें कारण राहणार नाहीं. हीं तत्त्वें एकजीव झालीं म्हणजे सर्व देश नवतेजानें प्रकाशित. होईल, राष्ट्राचें जुनें चैतन्य पुन्हा जागृत होईल, हीन जनांचा हीनपणा नाहींसा होईल, भेकड लोकांच्या अंतःकरणांत शौर्य उत्पन्न होईल आणि आरंभापासूनच ज्यांना भीतीचा संसर्गही झालेला नाहीं त्यांचेंच वर्तन समर्थनीय होतें असें सिद्ध होईल. राष्ट्र जागृत होईल, युद्धाला सज्ज होईल आणि विजयश्री मिळविण्यासाठीं मोहिमेवर निघेल.

निष्ठा या भावनेकडे पाहण्याची हीच खरी दृष्टि होय. आपल्या झेंड्यावर या शब्दाची स्थापना करून हेंच आमचें ब्रीदवाक्य असें आपण जगाला जाहीर करूं या. तें सुसंगत, सन्मान्य, निर्भय व चिंतन आहे. आज आपण आपलीं तत्त्वें उत्साहानें, स्पष्टपणें व जबाबदारीनें जाहीर करूं; म्हणजे प्रसंगविशेषीं तात्पुरत्या पिछेहाटीमुळें फांसावर चढण्याची पाळी आली तरी त्या वेळीं आपल्याला त्यांचा विस्तार अथवा संकोच करावयाची जरूर भासणार नाहीं; अथवा शेवटच्या स्वातंत्र्ययुद्धांत विजय मिळाला तरी त्या प्रसंगीं आपली निष्ठा अचल राहील. स्वातंत्र्ययुद्धाच्या प्रत्येक अवस्थेमध्यें ज्यानें आपल्याला चैतन्य दिलें तेंच निष्ठेचें दैदीप्यमान तेज आपल्याला पुढचा मार्ग दाखवील. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हीच निष्ठा आपल्या हातून नवी राज्यघटना निर्माण करवील. राजे, अध्यक्ष व तत्त्वविवेचक यांच्या कारस्थानांनीं व काथ्याकुटानें बेजार झालेल्या जगाला स्वतंत्र राष्ट्राचें खरें घोरण कसें असावें हें हीच शक्ति आपल्यामार्फत दाखवून देईल. जुन्या भीतीनें थरथर कापणारा पण नवतेजाच्या प्रकाशकक्षेंत अर्धवट आलेला चुकार मनुष्य म्हणेल, "हें फार झालें.आम्ही हाडामांसाचीं माणसेंच आहोंत.आम्ही कांहीं देवदूत नाहीं."अगदीं खरें आहे. आम्ही देवदूत नाहीं. मनुष्य दुर्बल आहे,त्याचे विचार चुकतात, त्याचे विकार अनावर होतात. जबर आत्मविश्वासाचे लोकही कधीं कधीं चिखलांत रुतून बसतात. मग ज्यांचीं तत्त्वें ठाम नाहींत व ज्यांच्या कृतींतही स्थिरता नाहीं त्यांची अवस्था काय होईल ? अशा मनुष्याला कशाचाही आधार नाहीं.

त्याला अब्रू नाहीं; त्याचें जीवित असून नसल्यासारखेंच आहे. स्वतःची किंवा इतरांची फसवणूक करण्यासाठीं आम्ही उच्च तत्त्वांची मांडणी करीत नाहीं. हीं तत्त्वें सहजासहजीं कृतींत आणतां येतील असें आम्हांला कधींही वाटलें नाहीं. आमच्याबद्दल त्यानें तशी गैरसमजूत करून घेतली असली तर त्यानें ती वेळींच सोडून द्यावी. आमचीं तत्त्वें किती कडक आहेत हें आम्हांला पूर्ण ठाऊक आहे, त्यांपासून दूर राहणें अशक्य असल्यामुळेंच आम्हीं त्यांचा आश्रय केला आहे हें अढळ सत्य आहे. या तत्त्वांच्या आधारानें चालणारा मनुष्य चुकून घसरला तरी त्यांच्या आधारानेंच त्याला पुन्हा उभें राहतां येतें. हा आधार कधींही दुबळा ठरत नाहीं. पुन्हा पुढें जाण्यासाठीं, फिरून युद्ध करावयासाठीं हींच तत्त्वें त्याला स्फूर्ति देतात आणि विजयाचा मार्ग दाखवितात. अलेक्झँडर जगद्विजयासाठीं निघाला तेव्हां त्यालाही मिळाला नसेल इतका हा वाकबगार वाटाड्या आहे. ध्येय-निष्ठेनेंच मनुष्याला माहात्म्य प्राप्त होतें. अंतःकरणपूर्वक आणि एकनिष्ठेनें कार्य केल्यानें हीनांतला हीन मनुष्य महात्म्यांच्या अग्रस्थानींही अधिष्ठित होऊं शकतो. हलकीं मनें ज्यांचा आधार घेतात असे ते कुचकामी तराफे आपण मोडून तोडून टाकूं आणि देवदूतांचा झेंडा, देव व मानव यांची निष्ठा यांवरच सर्व भार ठेवूं म्हणजे आपणांस तरून जावयास मुळींच अडचण पडणार नाहीं.

प्रकरण आठवें

स्त्रीधर्म

"आपणखी एक मनुष्य म्हणालाः माझें लग्न झालेलें आहे. म्हणून मी येऊं शकत नाहीं."

होय, आपण आजपर्यंत आपल्या निष्क्रियतेचा दोष आपल्या बायकांच्या माथ्यावर लादण्यांत संतोष मानीत आलों आहों. पुरुषाची नजर फक्त स्वतःच्या सुखावर असते. सवड मिळतांच तो एकाद्या कोंपऱ्यांत जाऊन स्वस्थपणें विड्या ओढीत बसतो किंवा चार मंडळी जमवून चकाट्या पिटूं लागतो. स्वतःची सुटका करून घेण्यासाठीं सबबी शोधून काढण्यांतच तो आपली सर्व अक्कल खर्च करीत असतो, याकडे आपलें लक्षही जात नाहीं. आपण सध्यां ज्या प्रश्नाचा विचार करीत आहों, त्याचा आपल्या पौरुषाशीं अत्यंत निकट संबंध आहे. "माझें लग्न झालेलें आहे," ही सोयीची सुखकारक सबब सांगणाऱ्या नीच मनुष्याची उपेक्षा करावी असा नुसता विचारही कोणाच्या मनांत येतां कामा नये.

स्त्री-पुरुषांचा परस्परांशीं संबंध येतो, हा संबंध अधिकाधिक निकट होऊं लागतो, तेव्हां दोन्ही व्यक्ति कौतुकानें वाट पहात असतात कीं, दुसरी आपल्याला कोणता चमत्कार दाखविणार आहे ? स्वतःबद्दलच्या फुशारकीच्या कल्पनांनीं भरून गेलेला स्वसंतुष्ट पण वस्तुतः अडाणी पुरुष स्त्रीच्या सन्निध येतो तेव्हां तिच्या गूढ जीवनाचें रहस्य आपल्याला पूर्णपणें समजलेलें आहे असा त्याला डौल वाटत असतो. हें रहस्य उलगडून दाखविण्याचा माझा इरादा नाहीं. पुत्र, बंधु अगर पति यांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत प्रत्येक पुरुषाचें स्त्रीबरोबर नातें असतें ही सार्धा गोष्ट सांगतांच हा विषय हंसण्याखिदळण्याचा नसून गंभीर आहे हें कोणाच्याही लक्षांत येईल. उद्यां स्वातंत्र्ययुद्ध पुकारण्यांत येणार हें जर निश्चित, तर आपल्याला आजच कांहीं प्रश्नांचा निवाडा केला पाहिजे हें उघड आहे. त्या युद्धासाठीं स्त्रिया कोणतें शिक्षण घेत आहेत ? कोणत्या रीतीनें सज्ज होत आहेत ? स्त्रीबरोबर एकाद्या नात्यानें बद्ध झालेल्या मनुष्याची स्थिति कोणत्या प्रकारची असेल ? आपल्या माया-

पाशांनीं स्त्री त्याला रणांगणावर जाण्याला प्रतिरोध करील, कीं अभिमानानें प्रोत्साहन देईल ? युद्धांत तिची त्याला मदत होईल, कीं त्याला तिचें ओझें होईल ? युद्धाला जातांना त्यांचा वियोग होणें अपरिहार्य आहे. या वियोगामुळें त्यांचा ऐक्यसंबंध निकटतर होईल किंवा नाहीं ? जीवनाच्या अंतरंगाची ओळख त्यांना अधिक स्पष्टपणें पटेल कीं नाहीं ?

आयर्लंडला आदर्शस्थानीं असणाऱ्या एका वीररमणीच्या चारित्र्याचें मी परीक्षण करणार आहें, बारीकसारीक मुद्द्यापुराव्यांचा कीस काढीत बसण्याची माझी इच्छा नाहीं. कांहीं मुद्द्यांचें या विवेचनापूर्वीं स्पष्टीकरण केलें पाहिजे. समाजांत स्त्रीचें स्थान कोणतें हें जाणण्याची आमच्या स्त्रियांना तळमळ लागली आहे. स्त्रियांचा गौरव व प्रभाव वृद्धिंगत व्हावा यासाठीं त्या चळवळ करीत आहेत. उच्चतर स्थान मिळविण्यासाठीं खटपट करणाऱ्या स्त्रियांच्या अग्रगामिनींचें आम्ही अभिनंदन करतों; पण हल्लींच्या स्त्रियांच्या स्थितीबद्दल फक्त पुरुषांनाच सर्वस्वीं जबाबदार धरण्याची चूक त्यांनीं करूं नये. त्रासदायक कर्तव्यापेक्षां आराम अधिक प्रिय असलेल्या मनुष्यांची स्थिति आपण पाहिलेलीच आहे; स्त्रियांमध्येंही ही प्रवृत्ति पहावयास सांपडते. त्यांची आराधना करावयास लहानसहान दागिने, मेवामिठाई व नाटकांचीं तिकिटें यांची जरूर लागते. जीवनांतील खऱ्या सौंदर्याचा रस्ता वेगळाच आहे. या रस्त्यानें जाणाऱ्या स्त्रीचा दर्जा अधिक उच्च असतो; पण येथें परिश्रमही तसेच करावे लागतात. आणि पुरुष हा नेहमींच आपल्या घरावर सत्ता चालवितो असें नाहीं. पुष्कळसे पुरुष आपापल्या घरीं गुलामच असतात. सर्वांना सामाजिक आचार पाळावे लागतात. स्त्रियांच्या निर्मल नाजुकपणाच्या जोडीला तिखट स्वाभिमान असावा आणि पुरुषाच्या सामर्थ्याला उमद्या सभ्यपणाची जोड असावी हा खरा शिष्टसांप्रदाय होय. पण आपण खऱ्या सभ्यपणाचे रीतीरिवाज अजिबात बदलून टाकून नखऱ्यांतच खरी सभ्यता आहे असें मानूं लागलों आहोंत. स्त्रियांना आपल्याबरोबर दारोदार हिंडवणें आणि त्यांचे नाहीं नाहीं ते लाड करणें हीं या नव्या स्मृतीप्रमाणें पुरुषांचीं कर्तव्यें होऊन बसलीं आहेत. स्त्रियांचा संसारांत कांहीं उपयोग नाहीं अशाच रीतीनें त्यांना वागविणें हा आजचा शिष्टसांप्रदाय आहे आणि पुष्कळ स्त्रिया अशा निरुपयोगीच असतात. पृथ्वीला भारभूत झालेल्या

जनानी प्राण्याला पुरुष म्हणावें लागणें हा या नव्या सभ्यतेचाच एक प्रकार आहे. खरी सभ्यता आणि खरें सहकार्य यांची जोडी कधींही फुटावयाची नाहीं. आज आम्ही अशा स्त्री-पुरुषांना आदर्श मानीत आहोंत कीं, त्यामुळें आमच्या स्त्रियांची थोरवी व पुरुषांचें पौरुष नष्ट होण्याच्या पंथाला लागलें आहे.आम्हांला आमच्या पौरुषांत उच्चतर तेज निर्माण करावयाचें आहे.आम्हांला आमच्या दौर्बल्याचा दोष बाह्य परिस्थितीवर टाकतां येणार नाहीं. स्त्रियांची स्थिति अशीच आहे. राज्यकारभारासाठीं प्रातेनिधींची निवडणूक करतांना मत देण्याचा हक्क मिळविण्याची चळवळ करण्यापेक्षां आपल्या भगिनींना तेजस्वी व स्वावलंबी करण्याची खटपट करणें, संकट टाळण्याची तजवीज करण्यापेक्षां संकटाला तोंड देण्याची अगोदरपासूनच तयारी ठेवणें हीं अधिक महत्त्वाचीं कार्यें आहेत हें स्त्रियांनीं जाणलें पाहिजे. या दिशेनें स्त्रियांनीं शिक्षण मिळविलें म्हणजे कोणत्याही देशांत त्यांच्या चळवळीला मान्यता देण्यांत येईल आणि त्यांचा समान दर्जा नाकारण्यांत येणार नाहीं.

उद्यां होणाऱ्या युद्धाची तयारी आजच केली पाहिजे. स्त्रियांनींही या युद्धासाठीं आपली तयारी केली पाहिजे. जगांत इतका क्षुद्रपणा भरलेला आहे कीं, मनुष्यापुढें अनेक वेळां अप्रतिष्ठा सहन करण्याचा प्रश्न येतो किंवा त्याच्या पौरुषाला आव्हान देण्यांत येतें. अशा वेळीं खऱ्या वीरासारखें वागण्याबद्दल स्त्रीनें त्याला उत्तेजन व पाठबळ दिलें पाहिजे. स्त्रियांचें हें कर्तव्य अत्यंत महत्त्वाचें व निकडीचें आहे. मागें हटून कातडी बचावावी कीं मर्दासारखें पुढें व्हावें या विचारांत पुरुष अनेक वेळां घुटमळूं लागतो. अशा वेळीं त्याच्या सन्निध असलेली स्त्री त्याला ज्या प्रकारचा उपदेश करील तसाच तो वागतो. तिचें अंतःकरण त्याच्यापेक्षां श्रेष्ठ दर्जाचें असलें-आणि बहुधा अशीच स्थिति असते—तर तिच्या उपदेशानें त्याची उन्नति होईल. तिचें मन हलकें असलें तर ती त्याला खास अधोगतीला नेईल. दोघांचींही अंतःकरणें उच्च दर्जाचीं असतील आणि स्वभाव उदात्त असतील तर जग कसें सवैभव होईल आणि दुसऱ्या कशानेंही नाहीं तरी एवढ्यावरून आपली खात्री पटेल कीं, सर्वसमर्थ परमेश्वर सत्यरूप आहे व चिन्मय सौंदर्यानें नटलेला आहे. स्त्री व पुरुष या दोघांनींही हें सदैव मनांत बाळगलें पाहिजे. नेकीच्या जोरावर नव्हे तर बगलबच्च्यांच्या जोरावर अधिकार गाजवणाऱ्या एकाद्या क्षुद्र सत्ता-

ऱ्याकडून स्वतःला केव्हां आव्हान देण्यांत येईल याचा कांहीं नेम नाहीं हें त्यांनीं जाणलें पाहिजे. अशी सत्ता मधून मधून गाजावी अस। मानवीसृष्टीला शाप आहे. या सत्ताधाऱ्यांची थुंकी झेलणारे अनेक लोक चैनींत लोळत असतात; नेहमीं अडीअडचणींत धडपडणाऱ्या मर्दापेक्षां त्यांना चैन करणाऱ्या परोपजीवि खुषामत्याचें आयुष्य अधिक पसंत पडतें. या प्रवृत्तीला बर्नार्ड शॉ यानें "दासवृत्ति" हें योग्य नांव दिलें आहे. भविष्यकाळांतल्या मर्दुमकी-साठीं करावयाच्या तयारीची पहिली पायरी म्हणजे या प्रवृत्तीचा उच्छेद करणें हीच होय. राष्ट्राचें पारतंत्र्य नष्ट करावयाचें असेल तर आपण प्रथम ही वैयक्तिक दास्यवृत्ति नष्ट केली पाहिजे. उद्यांसाठीं आपण आज हेंच शिक्षण घेतलें पाहिजे. हें स्त्रियांच्या मनांत बाणलें तर अप्रतिष्ठेच्या मोबदल्यांत सौख्याचा स्वीकार करण्यापेक्षां स्वाभिमानासाठीं उपासमारीचा स्वीकार करण्यांत स्त्रिया निदान पुरुषांइतकी उत्सुकता दाखवतील. म्हणून स्त्रियांना शिक्षण देण्याचें कार्य ज्यांचे हातीं आहे त्यांना आपण विनंति करूं कीं, आमच्या स्त्रियांना दास्यवृत्तीचा तिरस्कार करण्याचें शिक्षण द्या. दास्यवृत्ति स्वीकारल्यामुळें मिळणाऱ्या सुखाची त्यांना ओकारी येईल असें त्यांना शिक्षण द्या.

आतां मी आयरिश स्त्रियांना आदर्श मानण्यास योग्य अशा एका वीर-रमणीकडे वळतों. महत्कृत्यें हातीं घेतांना स्वतःचें अंतःकरण स्थिर करण्या-साठीं किंवा इतरांना धीर देण्यासाठीं आपण स्वाभाविकपणें वीरांचीं व वीर-रमणींचीं उदाहरणें घेतों. अडचणीच्या परिस्थितींत जे शौर्यानें युद्धांत शिरले, ल्या युद्धांत यश मिळवून इमान व मर्दुमकी यांचें स्फूर्तिदायक उदाहरण ज्यांनीं घालून दिलें त्यांच्या आठवणीनें तशाच अडचणींत गोंधळलेल्या मनुष्याला धीर येणें स्वाभाविक आहे. आमच्या वीरांच्या चरित्रांशीं आमचा अत्यंत अल्प परिचय आहे हें फार लाजिरवाणें आहे; आणि आमच्या वीर-रमणींबद्दल आम्हांला मुळींच माहिती नाहीं असें म्हटलें तरी चालेल. म्हणून स्त्रियांपुढें आदर्शस्थानीं ठेवावयास एकाच वीररमणीची निवड केल्यास ती सर्वांना आवडेलच अशी खात्री देववत नाहीं. स्त्रीचें काव्यमय वर्णन सुरू झालें म्हणजे सर्वांचीं अंतःकरणें भावनांनीं भरून जातात. काव्यानें प्रत्येकाचें अंतःकरण द्रवतें; देशप्रीति व प्रेम यांच्या झगड्यांत प्रीतीला माघार घ्यावी लागलेली पाहून भावनांच्या उसळ्यांनीं आपलें चित्त शिथिल होतें. या

भावनांमुळें मनुष्याचें सामर्थ्य कमजोर होतें. त्यामुळें मनुष्याचें रक्त उसळ्या घेत नाहीं, मुठी घट्ट होत नाहींत, निशाणाजवळ खडे होऊन युद्धाच्या अखेरीपर्यंत लढावयास स्फूर्ति होत नाहीं. प्रेमाची व प्रेमभंगाचीं गाणीं आपण आज अनेक वर्षें ऐकत आहोंत. त्या गाण्यांत वर्णन केलेल्या नायिकांपेक्षां अधिक शूर व सुंदर अशा आयर्लंडच्या आदर्शस्थानीं असलेल्या स्त्रीकडे–प्रख्यात देशभक्त वूल्फ टोन याच्या पत्नीकडे–आपण आपलें मन वळविलें पाहिजे.

स्त्रियांच्या विशिष्ट गुणाबद्दल आपण विचार करूं लागलों म्हणजे सौजन्य, कोमलता, सहानुभूति व मायाळूपणा हे गुण आपल्यासमोर उभे राहतात, वीरस्त्रीच्या ठिकाणीं हे गुण उत्कृष्ट स्वरूपांत असतातच. शिवाय त्यांमध्यें सहनशीलता, धैर्य व धाडस या मर्दानी गुणांची भर पडलेली असते. टोनची बायको वीररमणी होती. मुक्तकंठानें तिचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत संकोच वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण शक्य तेवढ्या संकटांनीं तिची कसोटी घेतली होती आणि त्या सर्वांमध्यें ती खऱ्या स्त्रीधर्मापासून तिळमात्रही ढळली नाहीं. पतीवर तिची एकनिष्ठ भक्ति होती. त्यानें हातीं घेतलेल्या महत्कार्यांत त्याला तिच्याकडून नेहमीं उत्तेजनच मिळत असे. तिचें हें कार्य इतकें महत्त्वाचें होतें कीं, शत्रूंनीं तिच्या पतीचा निःपात केल्यानंतर, पतीच्या विजयशाली उत्साहाचा आणि अढळ प्रेमाचा वियोग झाल्यामुळें उमेद खचून जाऊन तिला त्याच्या जीवितकार्याचा व कीर्तीचा विसर पडला असता. तरी ती उच्च स्तुतीस पात्र ठरली असती; पण ती याही कसोटींत हिणकस ठरली नाहीं. पतिनिधनानंतरच तिची खरी एकनिष्ठा निदर्शनास आली. पति हेंच स्त्रियांच्या प्रेमाचें केंद्रस्थान असल्यामुळें टोन जिवंत होता आणि लढत होता तोंपर्यंत तिची त्याच्यावर व त्याच्या जीवितकार्यावर एकनिष्ठा असणें साहजिक होतें. तारुण्यांत तिचा मायाळूपणा प्रामुख्यानें दिसून आला, पण उत्तर आयुष्यांत भोंवतीं अंधार दाटला तेव्हां ती इतक्या धैर्यानें वागली कीं, या वेळींच तिचा खरा दर्जा किती उच्च होता तें स्पष्टपणें दिसून आलें. त्यांचें चरित्र वाचतांना एक सुंदर गोष्ट ठळकपणें दिसून येते ती ही कीं, तीं फक्त साध्या प्रेमाच्या बंधनांनींच बद्ध झालेलीं नव्हतीं. टोन हा संघटनात्मक कार्य करणारा, चिकाटीनें झगडणारा, दूरदृष्टीनें विचार करणारा व कोणत्याही संकटापुढें न डगमगणारा–एकूण लोकनायकाला अवश्य असणारे गुण स्वभा-

ब्रतःच अंगीं असलेला—असा पुरुष होता; पण आपल्या पत्नीला पत्र लिहितांना त्याची मनोवृत्ति आनंदांत तल्लीन झालेल्या बालकाच्या निर्व्याज सरळपणासारखी असे. तो एका पत्रांत लिहितो, 'तुझ्यासाठीं आणि मुलांसाठीं माझें मन वेडें झालें आहे'. याच पत्राचा शेवट येणेंप्रमाणें आहे. 'माझ्या वतीनें तूं त्या लहानग्यांचे एक हजार मुके घे. प्राणप्रिये, परमेश्वराची नेहमीं तुझ्यावर कृपादृष्टि असो'. (खासगी पत्रांतही असे उद्गार काढणाऱ्या या व्यक्तीला कांहीं जणांनीं नास्तिक ठरविलें होतें. त्या लोकांना आतां स्वतःच्या बेजबाबदारपणाबद्दल शरम वाटूं लागली असेल अशी मला आशा आहे.) त्याच्या मनांत अशा प्रकारचे विचार येणें अगदीं साहजिक होतें. अंगीकृत कार्याच्या आरंभीं अमेरिकेंतून फ्रान्सला जाण्याची तयारी करीत असतांना त्याच्या मनांत या अनाथ जीवांचे विचार आले. या आणीबाणीच्या प्रसंगीं आपली पत्नी कशी वागेल ? मानेभोंवतीं हातांचा विळखा घालून, डोळ्यांत पाणी आणून, मुलाबाळांची आणि लग्नाच्या वेळीं घेतलेल्या शपथांची आठवण करून देऊन ती प्रेमासाठीं स्वदेशाला दूर ढकलण्याची आपल्याला गळ घालील काय ? नाहीं. त्याच्या रोजनिशींतला पुढील उतारा पहा. 'माझ्या पत्नीनें आजवर अनेक हालअपेष्टा सोसल्या आहेत; पण त्यामुळें तिचें धैर्य तिळमात्र कमी झालेलें नाहीं. माझ्या शब्दावरील आणि अंगीकृत कार्यावरील तिची निष्ठा अढळ आहे; तिनें मला पुनःपुन्हा बजावून सांगितलें कीं, पत्नीची किंवा मुलांची काय वाट होईल हा विचार मनांत आणून मीं स्वदेशकार्य लांबणीवर टाकूं नये; माझ्या गैरहजिरींत कुटुंबाची सर्व जबाबदारी आपल्यावर आहे. आजपर्यंत अनेक संकटांतून अत्यंत अनपेक्षितपणें परमेश्वरानें आम्हां सर्वांची सुटका केलेली आहे. तो या प्रसंगीं आम्हांला विसरणार नाहीं असेंही तिनें मला सांगितलें'. हे खऱ्या वीरस्त्रीचे निर्वाणीचे शब्द आहेत. त्याची रवानगी करतांना तिचा थरकांप उडाला असेल; पण तिच्या डोळ्यांतलें तेज पाहून थरथर करणारा पुरुष शरमेनें मान खालीं घालील. तिचें तेज अद्वितीय होतें. तेजस्वीपणांत तिचा एकमेवाद्वितीय पति तिच्या तोलाचाच होता, पण याहून अधिक तेज दुसऱ्या कोणत्याही पुरुषाचे ठिकाणीं संभवणें अशक्य आहे. थोडक्याच दिवसांनीं राष्ट्रकार्याचा विध्वंस झाला आणि टोनला आत्मार्पण करावें लागलें, त्यावेळीं तिचा मनोनिग्रह

खऱ्या कसोटीला लागला. शिक्षा सुनावण्यांत आल्यानंतर आयुष्याच्या शेवटच्या क्षणांत तिला लिहिलेल्या पत्रांत त्यानें किती मार्मिक उद्गार काढले आहेत ते पहाः 'प्रियतमे, हीच आपली शेवटची भेट. हें पत्र पुरें करणेंही मला अशक्य झालें आहे. मेरीला अनेक आशीर्वाद सांग. आपल्या मुलांना आईबापांच्या ठिकाणीं आतां तूं एकटीच आहेस हें ध्यानांत ठेव; माझ्याबद्दल तुझ्या अंतःकरणांत प्रेम आहे हें सिद्ध करून दाखविण्याचा आतां एकच मार्ग राहणार आहे; आपल्या मुलांना योग्य शिक्षण मिळावें एवढ्यासाठीं तूं स्वतःचें रक्षण केलेंस तरच माझ्यावरलें तुझें प्रेम सिद्ध होणार आहे. परमेश्वराचा वरदहस्त तुम्हां सर्वांवर सदैव असो'. टोननें फांसावर चढतांना केलेल्या भाषणांत कित्येक महत्त्वाच्या मुद्द्यांबद्दल मुग्धता स्वीकारली होती; पण या मुग्धतेमुळेंच त्या मुद्द्यांचें स्पष्टीकरण झालें. हें पत्रही त्याच धर्तीचें आहे; त्यांत ज्या गोष्टींचा उल्लेख केलेला नाहीं त्याच तें वाचतांना वाचकांच्या मनासमोर उभ्या राहतात. आपल्या वियोगामुळें तिला किती दुःख होईल याबद्दल या पत्रांत अवाक्षरही नाहीं, मग त्याला स्वतःला वाटणाऱ्या दुःखाबद्दल उद्गार कोठून असणार! पण त्या प्रसंगीं दोघांचींही हृदयें पिळवटून निघालीं होतीं यांत संशय नाहीं. "तुझ्याबद्दल आणि मुलांबद्दल माझ्या मनांत जे विचार येतात ते शब्दांत प्रदर्शित करणें अशक्य असल्यामुळें मी तो विषयच सोडून देतों; कोणत्याही प्रकारची कुरकुर करणें हें तुझ्या व माझ्या धैर्याला साजेसें नाहीं—" त्यांच्या अंतःकरणावर दुःखाचें दडपण सदैव असावें अशीच भवितव्यतेची योजना होती. पण या संकटांतून त्यांचीं अंतःकरणें तावून सुलाखून निघालीं. मुलाबाळांच्या जोपासनेची जबाबदारी पत्नीवर टाकून टोन निघून गेला त्या वेळीं ही जबाबदारी ती उत्कृष्ट रीतीनें पार पाडील असा त्याला पुरा भरंवसा होता. स्त्रीधर्म तिला पूर्णपणें अवगत होता याबद्दल तिच्या पतीची केवढी ही शिफारस! तिनें ही जबाबदारी उत्कृष्ट रीतीनें पार पाडली याबद्दल तिच्या उत्तर आयुष्यांत पदोपदीं पुरावे सांपडतात. टोनच्या मुलानें आपल्या आयुष्यांतील कांहीं आठवणी लिहिल्या आहेत; पितृनिधनाचे वेळीं तो अगदीं बच्चा होता; त्यानें मोठेपणीं आपल्या आईबद्दल काढलेल्या उद्गारांवरून तिच्या कर्तृत्वाची पारख होते. 'माझ्या वडिलांच्या आयुष्याच्या अग्रस्थानीं

विराजमान झालेलीं तत्त्वें आणि त्यांच्या हृदयांत स्फुरत असलेल्या भावना माझ्या ठिकाणीं निर्माण होतील असेंच शिक्षण माझ्या आईनें मला दिलें–' हें एकच वाक्य पुरेंसें आहे. पण आणखी कांहीं वर्षें जाऊं द्या. पतीची शेवटची आज्ञा पाळण्यासाठीं ती किती झटली याचे आणखी पुरावे आपल्याला सांपडतील. मुलांवर तिचा फार जीव होता, त्यांचें व स्वतःचें स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठीं, आपल्याला कोणाच्याही मिंधेपणांत रहावें लागूं नये म्हणून ती मोठ्या स्वाभिमानानें सदैव झटत असे ती कोणाच्याही आश्रयाला गेली नाहीं लोकसत्ताक व बादशाही फ्रान्सच्या सेनापतीची विधवा, या नात्यानें तिचा दर्जा फार मोठा होता, आणि म्हणूनच तिनें कोणत्याही व्यक्तीच्या आश्रयाखालीं रहावयाचें नाकारलें. वूल्फ टोनच्या मृत्यूनंतर एका वर्षानें लुसिएन बोनापार्टनें पांचशें लोकप्रतिनिधींच्या सभेपुढें पुढील कळकळीचे स्तुतिपर उद्गार काढले: " टोननें केलेल्या कार्याची आठवण तुमच्या मनोभावना उत्तेजित करण्यास असमर्थ असेल तर त्याच्या उदात्त पत्नीच्या स्वातंत्र्यभक्तीचा व दृढनिश्चयाचा मी उल्लेख करूं इच्छितों. देशासाठीं देह ठेवणाऱ्या आपल्या पतीच्या व भावाच्या थडग्यांजवळ अश्रु ढाळीत असतांना तिच्या हुंदक्यांबरोबरच आयर्लंडच्या बंधमोचनाच्या आकांक्षा प्रकट होत होत्या. दुःखाशीं संमिश्र झालेलें व तिच्या मुखावर झळकणारें आयरिश तेज कसें होतें तें वर्णन करण्याचा मी प्रयत्न करतों. स्पार्टाच्या स्त्रिया अशाच तेजस्वी होत्या. स्पार्टन लोक मुलुखगिरीवरून परत आले म्हणजे त्यांची मिरवणूक पहावयासाठीं सर्व स्त्रिया जमत असत. त्यांपैकीं कोणाचा पति, कोणाचे पुत्र तर कोणाचे बंधु मोहिमेवर गेलेले असत. सैन्याच्या रांगांमधील आपापलीं माणसें हुडकून काढतांना त्यांच्या अंतःकरणांत औत्सुक्य व काळजी यांची चढाओढ चाललेली असे. आपलें माणूस दिसलें नाहीं म्हणजे त्यांच्या तोंडून एवढेच उद्गार निघत, 'त्यानें स्वदेशासाठीं देह ठेवला, त्यानें लोकशाहीसाठीं देहत्याग केला'." फ्रेंच लोकशाहीचा अंत झाल्यानंतर उसळलेल्या खळबळींत तिच्या हक्कांकडे जनतेनें दुर्लक्ष केलें, त्या वेळीं ती स्वतः नेपोलियन बादशहाच्या मुलाखतीस गेली. टोनच्या कार्याची बादशहाला आठवण करून देऊन सैन्यांत प्रविष्ट होण्यासाठीं फ्रेंच नागरिकाचे हक्क आपल्या मुलाला देण्यांत यावे अशी तिनें मागणी केली. बादशहानें तिचें बोलणें मोठ्या आदरानें

ऐकून घेतलें. तिची मागणी मंजर होईल अशी एकाही दरबाऱ्याची अपेक्षा नव्हती; पण त्या सर्वांच्या अपेक्षेविरहित बादशहानें तिची मागणी ताबडतोब मंजूर केली. आतां तिचा एकच पुत्र हयात राहिला होता आणि फक्त त्याच्याचसाठीं तिनें ही एकच मागणी दुसऱ्यापुढें मांडली. तिच्या डोळ्यांदेखत तिचीं दोन मुलें मृत्युमुखीं पडलीं होतीं. तिच्या मुलीचा मृत्यु तर विशेषच हृदयद्रावक परिस्थितींत घडला होता. आणि आतां आपल्या एकुलत्या एका मुलाच्या पाठीशीं ती उभी होती. मुलांचें पालनपोषण करण्याची पतीची आज्ञा तिनें अत्यंत प्रामाणिकपणें पालन केली. मोठ्या अभिमानानें तिनें आपल्या मुलाला मार्गाला लावलें. हें नीटपणें समजण्यासाठीं त्या आठवणीच वाचल्या पाहिजेत आणि मधून मधून विचार केला पाहिजे. आरंभीं मुलांचें पालनपोषण करण्याची जबाबदारी पतीसमोर शपथ घेऊन तिनें शिरावर घेतली; नंतर दुःखांचा कडेलोट झालेला असतांही तिनें या व्रतांत अणुरेणुइतकाही खंड पडूं दिला नाहीं. दृढनिश्चयानें व मनोधैर्यानें तिनें आपलें वचन तडीला नेलें. भयंकर दुखण्यानें दोन मुलांचा बळी घेतल्यानंतर उरलेल्या एकुलत्या एका मुलाची अहोरात्र शुश्रूषा करून तिनें त्याला घट्टाकट्टा केलें. उच्च शिक्षण दिलें. नंतर तो सैन्यांत शिरला त्या वेळीं तिच्या प्रेमाला भरतें आलें, तिच्या मनाला धन्यता वाटली; तरुण टोनला लष्करांत अधिकाराची जागा देण्याच्या बाबतींत एका फ्रेंच प्रधानानें तिच्याजवळ उर्मटपणाचे उद्गार काढल्यावरून ती स्वतः बादशहाच्या भेटीला गेली. आपल्या दर्जाला साजेल अशा रीतीनें वागून आणि आपली मागणी निर्भिडपणें त्याच्यासमोर मांडून तिनें बादशहाच्या मनांत स्वतःसंबंधीं आदर उत्पन्न केला. बादशहासमोर पैशासाठीं तोंड वेंगाडलें असा तिच्यावर आरोप करणाऱ्या क्षुद्रजनांना चूप करण्यासाठीं तिनें मोठ्या अभिमानानें जाहीर केलें कीं, 'आजपर्यंत अनन्वित संकटें कोसळलेलीं असूनही आपण कोणापुढें मदतीसाठीं हात पसरला नाहीं'. सवतींबरोबर झगडत असतांना तिचें औदार्य, कोमलता, धैर्य, एकनिष्ठा वगैरे गुण प्रगट होत असलेले दिसून येतात. आपल्यावरील जबाबदारी पार पाडण्यासाठीं आपण काय केलें पाहिजे याची तिला पूर्ण जाणीव होती. यासाठीं कोणतेही परिश्रम करण्यांत तिनें केव्हांही कुचराई केली नाहीं. पतीनें सोंपविलेलें कार्य पुरें झालें, तिनें आंखून दिलेल्या मार्गानें जाण्यासाठीं मुलगा सज्ज झाला


तेव्हां तिनें त्याला प्रेमानें व अभिमानानें निरोप दिला; अनेक वर्षांपूर्वी कर्तव्य-पूर्तीसाठीं निघालेल्या पतीला याच थरथरणाऱ्या स्त्रीनें धीरानें निरोप दिला होता. आईची व मुलाची ही पहिलीच ताटातूट होती. या प्रसंगाचें वर्णन तिच्याच शब्दांत ऐका: " विल्यम् हा माझाच मुलगा आहे आणि माझा एकुलता एक मुलगा आहे असा ओझरता विचार सुद्धां मी माझ्या मनांत आजपर्यंत येऊं दिलेला नाहीं. तो टोनचा पुत्र आहे आणि त्याच्या पालनपोषणाची जबाबदारी माझ्यावर सोंपविण्यांत आली आहे असेंच मी आजवर मानीत आलें आहें; पण त्या क्षणीं नैसर्गिक पुत्रप्रेमाचा उमाळा मला आवरला नाहीं. मी एका शेतांत बसलें होतें; लांबच लांब व पांढरासफेत रस्ता नजरेसमोर दिसत होता आणि या रस्त्यावर माझा एकुलता एक मुलगा एकटाच चाललेला मला दिसत होता. माझी विचारशक्ति नष्ट झाली. आजपर्यंत भोगलेलीं दुःखें व हालअपेष्टा माझ्या आजूबाजूला चोहींकडे जमल्या आहेत असें मला वाटूं लागलें. माझे डोळे कायमचे मिटावे असें मला इतक्या तीव्रतेनें वाटूं लागलें कीं, त्या क्षणीं तसें कां झालें नाहीं याचेंच मला आश्चर्य वाटलें. मनाचीं परिवर्तनें फार विलक्षण असतात. मी तेथें तशीच विमनस्कपणें बसलें होतें, आतां घरीं परत गेलें पाहिजे असें ठरविण्यापुरतीही विचारशक्ति माझ्या ठिकाणीं राहिली नव्हती, तोंच शेजारच्या गवतांतून एक बुलबुल एकदम वर उडाला; माझ्या डोक्यावर आभाळांत त्यानें किती तरी घिरट्या घातल्या, त्याच्या कंठांतून किती गोड स्वर निघत होते; त्या बुलबुलाचे मोहक बोल ऐकून मी भानावर आलें. माझ्या हृदयाला फार समाधान वाटलें. मी आजवर जें केलें तें बरें केलें असें गाणें तो म्हणत आहे असें मला वाटलें. माझ्या मनाच्या मनाला वाटलें, कीं माझ्या पतीनेंच माझ्या हृदयाला धीर देण्यासाठीं त्या बुलबुलाला त्या वेळीं तिकडे पाठविलें. भानावर आल्यानंतर मी हळुहळू माझ्या एकलकोंड्या बिऱ्हाडाकडे परत आलें." ती निश्चयी स्त्री संध्याप्रकाशांत, गवतांत एकटीच बसून राहिली आहे, गवतांतून उडालेला बुलबुल गोड स्वर घेत आभाळांत उडत आहे, आपल्यावर जीव लावून बसलेल्या आपल्या पतीच्या आत्म्यानेंच आपल्याला धीर देण्यासाठीं हा संदेश पाठविला आहे अशी तिची कल्पना झालेली आहे. त्या प्रसंगाची कल्पना चित्तचक्षूसमोर उभी राहतांच

हृदय खळबळून जातें. या आठवणीनें उत्पन्न होणाऱ्या भावना मनाला कमजोर करणाऱ्या नसतात. आपल्याला स्वदेशाचा व देशबांधवांचा अभिमान वाटूं लागतो. आपला निश्चय दृढतर व एकाग्र होतो. प्रत्यक्ष कृति करून दाखविण्याची प्रबल इच्छा अंतःकरणांत उत्पन्न होते. त्या आठवणीमुळें डोळ्यांत अश्रु उभे रहात नाहींत तर देशकार्याची तळमळ वाटूं लागते. आपल्याला या वीरस्त्रीची किती थोडी माहिती आहे; टोनची आपल्याला बरीच माहिती असते. त्याचें उच्च शील, प्रेमळ मनमोकळेपणा, धाडस, सहनशीलता, दूरदृष्टि, निर्णयशक्ति, अजिंक्य व दमदार उत्साह हे त्याचे गुण आपल्या परिचयाचे आहेत. वूल्फ टोन हा निःसंशय अद्वितीय पुरुष होऊन गेला. पण त्याचीही बरोबरी करणारी एक व्यक्ति होतीच; त्याच्या इतकेंच गांभीर्य व माहात्म्य अंगीं असलेली एक व्यक्ति त्या काळीं विद्यमान होती. विशेष म्हणजे ही व्यक्ति एक स्त्री होती आणि ही स्त्री म्हणजे वूल्फ टोनची पत्नीच होय.

या वीरस्त्रीचें उदाहरण आमच्या स्त्रियांच्याच नव्हे तर पुरुषांच्याही डोळ्यांसमोर आदर्शवत् असणें श्रेयस्कर आहे. देशाभिमानानें मनाच्या कोमल भावना नष्ट होत नाहींत, उलट त्यांचा विकास होतो आणि त्यांना कार्यक्षम व्हावयास अधिक वाव मिळतो हेंच या उदाहरणानें सिद्ध होतें. वीराचे ठिकाणीं प्रीति व कोमलता संभवतच नाहींत, त्यामुळें त्याचा निश्चय कमजोर होऊन कार्यनाश खास होतो अशी आपली कल्पना होऊन बसली आहे. पण ज्या चळवळींत माणुसकी किंवा उदार तत्त्वें नाहींत ती हमखास अघेशी होते हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. मनुष्याचा विकास झालेला नसतो व जीवनाची काव्यशक्ति जागृत झालेली नसते तोंवर त्याचीं कार्यें एकाद्या निर्जीव तत्त्वाच्या अनुरोधानें चाललेलीं असतात. पण सृष्टीच्या शक्तींपुढें कोरडें तत्त्वज्ञान फिकें पडतें आणि लवकरच तो अशा तत्त्वांच्या तावडींतून निसटून जातो, हें तत्त्व सदैव लक्षांत बाळगलें पाहिजे. मनुष्याच्या नैसर्गिक भावनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. अगदीं शब्दशः नाहीं तरी अप्रत्यक्षपणें आजवर आपण उपदेश करीत आलों आहोंत कीं, " आयर्लंडसाठीं, तुमच्या मातृभूमीसाठीं तुम्ही कोणावरही प्रेम करूं नका "—हें अशक्य आहे. आयर्लंडसाठीं तुम्ही आपल्या रक्ताचें अभिसरण होऊं देऊं नका असें सांगण्याइतकेंच

तें फोल आहे. तितकें अशक्य नसलें तरी अत्यंत औंगळ आहे. पुरुष व स्त्री यांच्या सहकार्यानें उच्च व सुंदर असें भवितव्य सिद्ध व्हावयाचें आहे. त्याचेऐवजीं सृष्टिक्रमाला सोडून असलेला आयुष्यक्रम स्थापन करूं पहावयाचें, ज्यामध्यें गुंफेंतील तपश्चर्येचा एकांतवास नाहीं किंवा संपूर्ण जगताचें अधिराज्यही नाहीं असें आयुष्य कंठावयास सांगावयाचें, या ध्येयांत प्रशंसनीय व उदात्त असें कांहींच नाहीं. आपणांपुढें जें उदाहरण आहे तें घालून देणाऱ्या व्यक्तीबद्दल आपण सदैव कृतज्ञ राहिलें पाहिजे. शौर्याचे बाबतींत स्त्रीला वीराच्या बरोबरीनें कार्य कसें करतां येईल हें स्त्रियांनीं यावरून शिकण्यासारखें आहे. टोनचें चरित्र पाहून प्रत्येक पुरुषानें असा निर्धार केला पाहिजे कीं, आपली पत्नी व मुलेंबाळें यांजवर कितीहीं संकटें कोसळलीं तरी बेहेत्तर आहे; पण मी त्यांना गुलाम व नामर्द होऊं देणार नाहीं. खऱ्या कळकळीच्या कित्येक लोकांची मनोवृत्ति अशी असते कीं, अंगीकृत कार्यासाठीं ते स्वतः हव्या तितक्या हालअपेष्टा सहन करावयास तयार असतात; पण त्यांचे ज्या व्यक्तींवर प्रेम असतें त्यांच्या हालअपेष्टा होतील ही कल्पनाही त्यांना सहन करवत नाहीं. कुटुंबांतील मंडळींवर त्यांची हळवी माया असते. कौटुंबिक कर्तव्याच्या चुकीच्या कल्पनेचे पाश त्यांना पुढें जाऊं देत नाहींत, त्यांना उभ्या जागीं निश्चल करून टाकतात. मायेसाठीं कर्तव्य बाजूला ठेवणें म्हणजे अशीच ग्वाही देण्यासारखें आहे कीं, स्त्री-पुरुष हे संसारांतील जोडीदार नसून स्त्री हें पुरुषाच्या गळ्यांत अडकवलेलें लोढणें आहे आणि प्रत्येक बालक ही कमअस्सल व सामर्थ्यहीन पैदास आहे. स्वर्ग व पृथ्वी या दोहोंपैकीं एकाही ठिकाणीं निश्चित स्थान नसल्यामुळें त्या दोहींमध्यें सरपटणारा एक प्राणी आहे. छाती पुढें काढावयास किंवा मस्तक ताठ धरावयास त्याला भीति वाटत आहे. परमेश्वर किंवा मनुष्य यांपैकीं एकाच्याही बाबतींतलीं कर्तव्यें पार पाडावयास तें असमर्थ आहे. ज्यांच्यावर आपलें प्रेम आहे त्यांना अग्निदिव्यांतून पार पडावें लागेल या कल्पनेनें जिवाचा थरकांप करून घेण्याचें कांहीं कारण नाहीं. या दिव्यांत कसोटीला कसें उतरावयाचें, याचें शिक्षण त्यानें स्वसामर्थ्यानुसार आपल्या कुटुंबांतील माणसांना दिलें पाहिजे. मग भवितव्यतेबद्दल त्यानें सत्याच्या माहात्म्यावर पूर्ण विश्वास ठेवावा. कारण, नैसर्गिक सद्गुणांच्या जोरावर मनुष्य संकटांतून

विजयी होऊन बाहेर पडतो. या पूर्वतयारीनें त्याला व त्यांना असें फळ प्राप्त होईल कीं, जें त्याच्या स्वप्नांतही आलें नसेल. कारण, जें युद्ध त्यांना कसोटीला लावणार आहे तेंच त्यांच्या आंगचे सुप्तावस्थेंत असलेले गुण प्रकाशांत आणीत असतें. सहानुभूति, ग्रहणशक्ति, कोमलता व सामर्थ्य असे गुण योग्य प्रसंगाच्या अनुरोधानेंच प्रकट होत असतात. हे गुण त्यांच्या अंगीं असतील अशी कल्पनाही खासगी सहवासांत त्याच्या मनांत आलेली नसेल. या दिव्यामुळेंच त्यांना जीवनाचें गूढ परिज्ञान प्राप्त होईल आणि अधिक विस्तृत झालेल्या दृष्टिक्षेत्रांत मानवजातीचा विकास होत असलेला दिसूं लागेल; या कसोटीमुळें त्यांचे ठिकाणीं ज्ञान, कोमलता व धैर्य यांचें असें बहारीचें संमिश्रण होईल, कीं दोष, कलह व दुःख यांनीं दूषित झालेलें असलें तरी मानवी जीवन उदात्त व सुंदर आहे आणि भविष्यकाळांतही तें उदात्त व सुंदर असेंच असेल असें त्यांच्या प्रत्ययास येईल.



प्रकरण नववें

सरहद्द

आमची सरहद्द दुहेरी आहे. एक भाषेची आणि दुसरी सागराची. जणुं काय आपली खास मेहेरबानगी दाखविण्यासाठींच परमेश्वरानें आयर्लंडला सागराची स्पष्ट सरहद्द दिलेली आहे. जणुं काय त्यानें आयर्लंडच्या जीवनावर वैशिष्ट्याचें मोर्तबच केलें आहे; कोठूनही पाहिलें असतां आयर्लंडच्या क्षितिजावर अमर्याद महासागरच पसरलेला दिसतो. जणुं काय आयर्लंडचें भवितव्य महासागरासारखेंच अमर्याद आहे, असेंच सूचित करावयाचा परमेश्वराचा हेतु आहे. भाषेच्या सरहद्दीच्या बाबतींत थोडेंसें स्पष्टीकरण केलें पाहिजे. मातृभाषेच्या बाबतींत आज अशा कांहीं कल्पना प्रचलित होऊं पहात आहेत कीं, त्या वेळींच खुडून टाकल्या पाहिजेत. आमचे देशाभिमानाचे विचार ज्या वाङ्मयांत प्रकट केले जातात त्यालाच 'आयरिश वाङ्मय' हो संज्ञा द्यावी, मग ते विचार इंग्रजी भाषेंत प्रकट झालेले असले तरी चालतील असें कित्येकांचें मत आहे; गाल भाषेला दुय्यम दर्जा द्यावा असें खुद्द गाल जातीच्या कित्येक लोकांचें म्हणणें आहे. आपले हक्क व कर्तव्यें यांची माहिती मिळविण्याची तसदी घेण्याचीही इच्छा नसल्यामुळें कित्येक गाल लोक राष्ट्रीय चळवळीपासून दोन पावलें दूर राहिले आहेत. आयरिश या नांवांत केवढी जादू भरलेली आहे; देशाभिमान, अधिकार व न्याय यांना अंतःकरणपूर्वक मान्यता मिळविण्यांतच राज्याचें खरें स्थैर्य आहे; या तत्त्वांकडे दोनही पक्षांचें दुर्लक्ष झालेलें आहे. जगावर असंतोषाच्या उद्रेकाचें संकट कोसळणार अशीं चिन्हें दिसत आहेत. तेंच संकट आपणांवरही येणार आहे. पण वरील तत्त्वांना मान्यता दिल्यास त्या संकटापासून देशाला अपाय होणार नाहीं.

आयरिश लोकांनीं निर्माण केलेल्या इंग्रजी वाङ्मयाकडे पहा. वाङ्मयाचें मूल्य ठरविण्याच्या प्रचलित परिमाणांकडे पाहतांच दिसून येईल कीं, वाङ्मयाच्या प्रधान अंगाला मुळींच किंमत देण्यांत येत नाहीं. वाङ्मयांत प्रकट झालेले विचार काय आहेत आणि हे विचार कोणत्या हेतूनें प्रकट करण्यांत

आले आहेत, यालाच विशेष महत्त्व देण्यांत येतें. आणि हे विचार ज्या साधनाचे द्वारें प्रकट झाले त्या माध्यमाला दुय्यम स्थान मात्र देण्यांत येतें. राष्ट्रीय जागृतीमुळें आजवर उपेक्षिलेल्या मातृभाषेकडे जनतेचें लक्ष एकवटलें आहे, इतकें कीं, कधीं कधीं कांहीं लोक केवळ भाषेवरच नजर लावून बसतात, यामुळें भाषणांतील मुद्द्यांकडे त्यांचें दुर्लक्ष होतें. विचार हेंच भाषणाचें प्रधान अंग होय. हे विचार विशेष महत्त्वाचे असतात तेव्हांच माध्यमाचा प्रश्न उपस्थित होतो. कारण बहुजनसमाजाला समजणाऱ्या माध्यमाचे द्वारें प्रकट झालेले विचार सर्वांच्या कानीं जातात व हृदयाला भिडतात. लेखकाचे अथवा वक्त्याचे विचार सर्वांना समजावे आणि त्यामध्यें प्रकट झालेलें सत्य सर्वांच्या दृष्टीस यावें अशी आवश्यकता असते, त्याच वेळीं ते विचार मातृभाषेंतूनच प्रकट व्हावे असा आग्रह धरणें योग्य आहे. पण हा नैसर्गिक अनुक्रम आपल्या नजरेसही येत नाहीं. गाल जातीच्या मनुष्यानें आयरिश भाषेचा पुरस्कार कां करावा याबद्दल त्याची स्वतःची खात्री पटलेली नसेल, तर आपण त्याच्या शंकांचें निरसन केलें पाहिजे. हें केवळ जातीच्या मुर्वतीसाठीं करावयाचें नाहीं, तर सर्वांचीं मनें संप्रकाशित व्हावीं म्हणून गाल लोक जेथें राहतात व गॅलिक भाषा जेथें बोलली जाते, त्या प्रदेशाचें संरक्षण व्हावें म्हणून. डेव्हिसनें हें रहस्य पूर्णपणें ओळखलें होतें; त्यानें म्हटलें आहेः "भाषा हीच चिरस्थायी तटबंदी आणि अत्यंत महत्त्वाची सरहद्द आहे, किल्ले व नद्या यांपेक्षां ही सरहद्द अधिक महत्त्वाची आहे." मातृभाषा हीच आमची सरहद्द, हीच आमची तटबंदी. सर्व आयरिश लोकांना या अभेद्य तटाचा आसरा आहे. केवळ एका विशिष्ट जातीनें ही भाषा निर्माण केली म्हणूनच आम्ही तिला महत्त्व देतों असें नाहीं, तर मातृभाषा हा सर्वांचा साधारण आसरा आहे म्हणून. आयरिश भाषेमुळें आयरिश मनुष्याचें मन किती चैतन्यमय होतें, हें ती भाषा ज्याला बोलतां येते त्याला तेव्हांच समजून येतें. आयरिश भाषा प्रचारांत असलेल्या कोणत्याही तालुक्यांत जाऊन पहा; एकाद्या आयरिश मनुष्याला तुम्ही इंग्रजी भाषेंत कुशलप्रश्न विचारले तर तो मट्ठ तुसडेपणानें तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें देईल. पण त्याच मनुष्याबरोबर आयरिश भाषेंत दोन शब्द बोलून काय चमत्कार होतो तो पहा. त्याच्या अंतःकरणांतली गुप्त कमान जोरानें उसळी घेईल, त्याचा

चेहरा खुलेल, त्याच्या डोळ्यांत तेज चमकूं लागेल, तो खुल्या दिलानें तुमच्याशीं बोलूं लागेल, तुम्हांला प्रेमानें दुवा देईल, विनोदी व हजरजबाबी उत्तरें देईल. त्याला सोडून पुढें गेल्यावरही आयरिश भाषेतलें मधुर शब्दभांडार वाऱ्याच्या झुळकीबरोबर तुमच्या कानीं येईल. मातृभाषेच्या सामर्थ्याचें रहस्य हेंच आहे. तिजमुळें म्हाताऱ्यांना आपल्या तारुण्याचा अभिमान वाटूं लागतो, तरुणांची कल्पनाशक्ति व चैतन्य जागृत होतें आणि नवे नवे विजय संपादण्याची स्फूर्ति हाते. यांत अतिशयोक्तीचा लेशही नाहीं. हें सत्य ठळकपणें नजरेस येत नाहीं; कारण त्या गुप्त कळीवर आपला हात जातच नाहीं. ल्या मंतरलेल्या भूमींत पाऊल टाकावयाची किंवा त्या जादूचा प्रयोग करून पहावयाची आपल्याला बुद्धिच होत नाहीं. पण सत्य शोधावयाची जिज्ञासा आहे त्याला तें सहजासहजीं सांपडण्यासारखें आहे. लहानसहान गांवें दिसावयाला मोठीं मठ्ठ असतात; पण जरा बारकाईनें पहाणारास येथेंही कांहीं चित्तवेधक गोष्टी आढळून येतील. धर्मोपदेशक, वैद्य, वकील, शिक्षक, व्यापारी, कारकून, सर्व धंद्यांचे लहानमोठे स्त्री-पुरुष, उत्साहानें एकत्र होतात. कोठें एकादा धर्मोपदेशक एकाद्या घिसाड्याला शिकवीत असेल तर कधीं एकादा घिसाडीही एकाद्या धर्मोपदेशकाला शिकवीत असेल. सर्वांनीं सामाजिक भेदभाव अजाणतेपणें क्षणभर तरी बाजूला ठेवलेले आहेत आणि नुकत्याच पुनर्जन्म पावलेल्या नवजीवनामुळें सर्वजण आनंदोत्साहांत निमग्न आहेत असें आढळून येईल. या चैतन्यमय जीवनाच्या संवेदनेमुळें कल्पनाशक्ति निर्माण होते, विचारांच्या ओघानें ती दैदीप्यमान होते, समर्थ शब्दांचे द्वारें ती प्रकट होते आणि राष्ट्राला अभिनव सारस्वत प्राप्त होतें. भाषेचें हेंच समर्थन आहे. भाषेवांचून मन कोरेंकरकरीत राहिलें असतें. भाषेमुळें मन जागृत होतें आणि विचार प्रकट होतात. डेव्हिसच्या उक्तीचें महत्त्व आपल्याला वाटतें त्याहून कमी दर्जाचें नाहीं; आयरिश भाषेचा पुरस्कार झाला तर आज मूक असलेलीं अनेक मनें प्रकाशांत येतील. मातृभाषेच्या पुरस्कारानें स्वदेशीयांवर परदेशी संस्कृतीचा पगडा बसत नाहीं. यामुळें स्वदेशाला स्वतःचें सामर्थ्य व दर्जा कायम ठेवतां येऊन परराष्ट्रीय संस्कृतींच्या उत्तमांगांचा बंधुभावानें स्वीकार करावयास उत्तेजन मिळतें; हें इतक्या सूक्ष्मपणें होत असतें कीं, त्याची कार्यकारणपरंपरा स्पष्टपणें लक्षांत येत नाहीं. आयरिश मन

फक्त आयरिश भाषेच्या द्वारेंच उत्कृष्ट रीतीनें प्रकट होऊं शकेल. पण कित्येक खंद्या व इमानी वीरांनीं देशकालपरिस्थितीचीं बंधनें न जुमानतां आपले विचार इंग्रजी भाषेंतूनच जाहीर केले; डेव्हिस, मिचेल, मनगन यांच्या अमूल्य उक्ति इंग्रजींतच आहेत. त्यांनीं आपले ज्वलज्जहाल विचार जाहीर केले खरे, पण बहुजनसमाज पूर्वीसारखाच थंड राहिला; आणि आतां समाजजागृती-साठीं आम्ही आमच्या पुराण मातृभाषेकडे पुन्हा धाव घेत आहों. इतर कार्य-क्षेत्रांत आजवर झालेल्या कार्याला दोष द्यावयाचा या विवेचनाचा हेतु नाहीं. आमच्या सर्व शक्तींना वाव मिळेल असा विस्तृत भविष्यकाल आम्हांला पाचारण करीत आहे; या भविष्यकालांत या शूर व उत्साही लढवय्यांचा आम्ही जयजयकारच करूं. कारण स्वदेशावर निराशेचा अंधार पडला होता त्यावेळीं प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं शत्रूच्याच भाषेचा उपयोग करूनही देशाच्या शत्रूंनाच थोपवून धरलें आणि आयर्लंडसाठीं खिंड लढाविली.

गेल व गाल, दोघांनाही या भूमीवर समान दर्जानें उभें राहतां येईल. या मुद्द्याकडे दोन्ही पक्षांचें दुर्लक्ष झालें आहे आणि त्यावरच आपण अधिक जोर दिला पाहिजे. गॉलिक जातीचे नाहींत असे अनेक लोक आयर्लंडचे रहिवासी झालेले आहेत; त्यांना आयरिश भाषेबद्दल परकेपणा वाटतो. आज आणि यापुढेंही इंग्लिश भाषेलाच प्रधान स्थान दिलें पाहिजे असें ते प्रति-पादन करतात. त्यांना एवढेंच सांगतां येईल कीं, राष्ट्र या दृष्टीनें आयर्लंड-साठीं आणि नागरिक या नात्यानें स्वतःसाठीं तुम्ही आयरिश भाषेचा स्वीकार करा. स्वदेशाची सेवा करावयाची इच्छा बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें स्वभाषेचा पुरस्कार केलाच पाहिजे. ज्या कोणाला इंग्रजी सुधारणेची गोडी लागलेली असेल त्यानें खुशाल इंग्लंडांत परत जावें. तेथेंच त्याचा विलायती घरांवर विकास होईल. आयर्लंडचा रहिवासी पण मनाचा इंग्लिश, असा आयरिश मनुष्य, हा विरोध विचित्र आहे; अशा मनुष्याचा आयर्लंडला तर उपयोग नाहींच, पण इंग्लंडलाही त्याचा उपयोग होणार नाहीं. आयर्लंड व इंग्लंड या दोघांनाही त्याचेबद्दल आपलेपणा वाटणार नाहीं. दोघांकडूनही तो धिक्कारला जाईल. म्हणून गाल जातीचे नाहींत अशा आयर्लंडच्या रहिवाशांनींही आमच्याबरोबरच उभें राहणें इष्ट आहे; जें पटत नाहीं तें अपरिहार्यच म्हणून त्यांनीं त्याचा स्वीकार केलाच पाहिजे असा आमचा आग्रह नाहीं. पण

त्यांचा जन्म आयर्लंडांत झालेला आहे आणि ते आयर्लंडचे नागरिक आहेत, म्हणून हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे. शौर्यानें भरलेला भविष्यकाळ प्राप्त व्हावा म्हणून खड्या झालेल्या राष्ट्रीय सैन्यांत त्यांनीं सामील व्हावें; राष्ट्रीय ध्येय साध्य होणार अशीं आशेचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. राष्ट्रीय सैनिकांना परस्परांबद्दल वाटणाऱ्या बंधुभावांतच या विजयाची हमी आहे. आम्हांला जें राष्ट्र निर्माण करावयाचें आहे. तेथें खुषामतीला जागा नाहीं. वशिल्याच्या जोरावर दिखाऊ मोठेपणा मिळविण्याला वाव नाहीं; पण त्यामध्यें स्वातंत्र्य व पौरुष यांच्या विकासाला पूर्ण संधि मिळेल. पक्षभेदामुळें हें ध्येय अंधुक झाल्यासारखें दिसत असेल पण त्यामुळेंच राष्ट्राचें रक्षण होणार आहे. म्हणूनच सर्वांना साधारण असलेलें 'आयरिश' हें अभिधान आपण धारण केलें पाहिजे.

सर्वांनीं स्वतःला आयरिश म्हणवून घ्यावें ही सूचना कित्येकांना संशयास्पद वाटण्याचा संभव आहे. आपल्याला अत्यंत महत्त्वाचें वाटणारें जीवित-तत्त्व बाजूला सारण्याचा मोह घालण्यांत येत आहे. कॅथलिक, प्रॉटेस्टंट व डिसेंटर या तिघांनींही एक नवें चवथेंच अभिधान धारण करण्यांत कोणी कोणाला शरण जात नाहीं हें खरें; पण सर्वांचीच फसवणूक करण्यांत येत आहे, असा संशय कित्येकांच्या मनांत निःसंशय उभा राहील. हा संशय अजून प्रच्छन्न आहे तरी त्याचें निरसन केलें पाहिजे. कोणत्याही पक्षांतल्या उत्कृष्ट व्यक्तींच्या मनांत ही घाणेरडी कल्पना येणार नाहीं आणि हीच मनोवृत्ति योग्य आहे. पण या नाहीं तर दुसऱ्या कोणत्या समानभूमीवर सर्वांची एकवाक्यता होणें शक्य आहे? अशा समान तत्त्वाशिवाय आयर्लंडचा नागरिक ही संज्ञा निरर्थक आहे हें उघड आहे. एकाद्या व्यक्तीचीं धार्मिक अगर राजकीय तत्त्वें कोणतींही असोत, तीं तत्त्वें त्याला कितीही जिव्हाळ्याचीं वाटत असोत, नागरिक या नात्यानें करावयाचीं कर्तव्यें त्यांच्या आद्य-कर्तव्यामध्यें असलींच पाहिजेत. तो आपल्या विशिष्ट पंथाचा पुरस्कार करतो, कारण त्यामुळें आपल्याला सर्व कर्तव्यें निर्विघ्नपणें पार पाडतां येतील अशी त्याची निष्ठा असते. अर्थातच आयरिश नागरिक हें अभिधान धारण करावयास आपण त्याला सांगतों. त्या वेळीं त्यानें स्वतःला जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या तत्त्वांपैकीं लवलेशही सोडून द्यावा असें आपलें सांगणें नसतें. फक्त त्यानें

आपल्या आस्थेचा प्रत्यक्ष पुरावा द्यावा, एवढेंच आमचें मागणें असतें. आपल्या पंथाचीं तत्त्वें नीटपणें पाळणाऱ्या मनुष्याला नागरिकत्वाचीं कर्तव्यें पाळावींच लागतात असें तो सांगतो. हीं कर्तव्यें नीटपणें पार पाडण्यासाठींच आम्ही त्याच्यापुढें उत्कृष्ट कार्यक्षेत्र ठेवीत आहोंत, त्यानें पुढें येऊन आम्हांला उत्कृष्ट उदाहरण घालून द्यावें.

या बाबतींत आणखी एक गोष्ट सांगावयाची ती ही कीं, तात्पुरती तडजोड करण्याचा विचारही आपण मनांत आणतां कामा नये. न्याय व अधिकार यांची चिरस्थायी स्थापना करावयासाठीं आपल्याला पाया घालावयाचा आहे. तो शोधून काढणें हेंच ध्येय आपण नजरेसमोर ठेवलें पाहिजे. सरकारला योग्य न्याय देणें भाग पाडणाऱ्या व्यक्तींनाच प्रचलित राज्यपद्धतींत न्याय मिळतो. आपल्या हक्काची मांडणी सुव्यवस्थितपणें करून तो लढविण्यास पुरेंसें सामर्थ्य आंगीं असेल त्यालाच योग्य न्याय मिळावा अशी प्रचलित लोकशाहीची अपेक्षा आहे. पण ही लोकशाही नाहीं, ही शुद्ध दडपशाही आहे. सरकारनें आपलें सामर्थ्य वाढविण्याची आणि तें कह्यांत ठेवण्याची योग्य खबरदारी घेतली पाहिजे, त्याचप्रमाणें राज्यपद्धति निर्दोष करावयाची असेल तर दुर्बलांचे हक्क हिरावले जाणार नाहींत अशीही तजवीज केली पाहिजे. दुर्बलांकडे दुर्लक्ष करण्यामुळें आपल्या सत्तेला यत्किंचितही धोका येणार नाहीं या कल्पनेनें दुर्बलांची हेळसांड करणें ही शुद्ध सुलतानी आहे आणि प्रत्येक लोकसत्ताक राज्यांत ही दडपशाही बिजरूपानें अस्तित्वांत आहे. याचा आपण खोल विचार केला पाहिजे. कारण, हा प्रश्न निकडीचा व गंभीर आहे. बलाढ्य पक्षानें पाठबळ दिलेल्या हक्काप्रमाणेंच एकाकी व्यक्तींच्या हक्कांचें संरक्षण करण्यासाठीं नागरिकांनीं एकवटून खटपट करावी अशी मनोभूमिका आपण निर्माण केली पाहिजे. आपल्या वाढत्या सामर्थ्याला स्थैर्य व उत्साह यांबरोबरच सत्य व न्याय यांनीं समतोलपणा येईल अशी तजवीज आपण केली पाहिजे. असें केलें असतां, आपल्या हातून ज्या राष्ट्राची संस्थापना होणार आहे तेथील राज्यपद्धतीला अत्याचारापासून धोका पोंचणार नाहीं किंवा दडपशाहीची बाधा होऊन तिचा नाश होणार नाहीं.

शेवटीं आज जगांत सर्वत्र माजलेला असंतोषाचा विचार केला पाहिजे; पक्षभेद व वर्णभेद यांमुळें सर्वत्र लढे चाललेले आहेत. या खुणांच्या साह्यानें

कालाचा कल कोणीकडे झुकत आहे याचा योग्य निर्णय करून आपण परिस्थितीला अनुकूल असा कार्यक्रम निर्माण केला पाहिजे. आंतरराष्ट्रीय युद्धांच्या नव्या बातम्या रोज पसरत आहेत; बाहेरून परचक्राची भीति आणि आंतून असंतोषाच्या उद्रेकाची भीति, या दुहेरी संकटामुळें मोठमोठीं बलाढ्य राष्ट्रेंही थरथर कांपत आहेत; अशा वेळीं परिस्थितीची धार चुकविण्याचा प्रयत्न करणें केवळ मूर्खपणाचें होईल. आपण आपलें धोरण निश्चित केलें पाहिजे. समाजांतल्या खळबळीपासून आपण अलिप्त राहूं, फक्त आपल्यालाच कोणत्याही प्रकारचा धोका पोंचणार नाहीं, अशी अपेक्षा करणें चुकीचें आहे. समोर दिसणारें संकट कडाडेल तेव्हां त्याला तोंड देतां येईल, इतकें सामर्थ्य आपण मिळविण्याच्या तयारीला आतांपासूनच लागलें पाहिजे. सर्व जगाला सरळ मार्गावर आणणें आपल्याला अशक्य आहे; पण देशाभिमानाच्या साह्यानें एकवटलेलें राष्ट्र निर्माण करून स्वदेशाची पुनर्घटना योग्य रीतीनें केल्यास, जगाची सुधारणा अंशतः तरी केल्याचें श्रेय आपणांस मिळणार आहे. ध्येयवादी मनुष्याच्या उत्साहावर थंड पाणी ओतण्यांत व त्याची हेटाळणी करण्यांतच कित्येकांना आनंद वाटतो. 'तुझें ध्येय हें एक सुखस्वप्नमात्र आहे, तुझें सुराज्य केवळ कल्पनासृष्टींतच शक्य आहे', असें त्याला वारंवार सांगण्यांत येतें. या आक्षेपकांना सहज गप्प करतां येण्यासारखें आहे. त्यांना सांगा कीं, अंतस्थ चळवळी चिरडून टाकण्यासाठीं आणि एकमेकांबरोबर स्पर्धा करावयासाठीं मोठमोठीं राष्ट्रें आपलें लष्करी सामर्थ्य हरघडीला युक्तिप्रयुक्तीनें वाढवीत आहेत. त्यांच्या ध्येयापेक्षां कोणत्याही ध्येयवाद्याचें उद्दिष्ट अधिक बेफाम असूं शकणार नाहीं. नुक्त्याच झालेल्या संपामुळें आयर्लंडचा सर्व व्यवहार थंडा पडला होता. तात्पुरत्या तडजोडीनें संप मिटविण्यांत आला खरा. पण खरा लढा अजून मिटलेला नाहीं आणि खरा लढा पुन्हा केव्हां सुरू होईल याचा नेम नाहीं. इतर राष्ट्रांतही हीच स्थिति आहे. संकट टाळण्यासाठीं त्यांनीं आजवर केलेल्या अर्धवट प्रयत्नांना अपयशच आलेलें आहे; राष्ट्रघटना केव्हां कोसळून पडेल याचा नेम नाहीं. निर्वाणीचें संकट शक्य तोंवर थोपवून धरण्यांतच सर्व राष्ट्रें आपल्या शक्ति खर्च करीत आहेत. समाजघटनेचा चक्काचूर उडण्याचा काळ दिवसानुदिवस जवळजवळ येत चालला आहे आणि ज्या

वेळीं जगाची कल्पनाही नसेल व तयारी शक्य तेवढी कमी असेल तेव्हांच अखेरचा धडाका उडेल. ज्यांची तशी मर्जी लागत असेल त्यांनीं खुशाल आमची हेटाळणी करावी, आपण स्वतःची तयारी करण्याकडेच लक्ष देऊं या. द्रष्ट्यांना उद्धाराचा मार्ग स्पष्ट दिसतो, तसा तो आपल्याला दिसणार नाहीं. आम्हांला सर्वांगपरिपूर्ण वाटणाऱ्या कार्यक्रमानें आदर्श-राष्ट्र खास निर्माण होईलच अशी आपल्याला हमी देतां येणार नाहीं; पण सर्वांगपरिपूर्ण ध्येयाच्या प्रकाशांत आपण शक्य तेवढ्या उच्चतेप्रत जाऊं. अंतिम ध्येयापासून आम्ही कितीही दूर असलों तरी त्या ध्येयापासून प्राप्त होणाऱ्या स्फूर्तीनें आम्हांला विचारशक्तीला संमत असलेलें आणि माणुसकीनें भरलेलें जीवन निर्माण करतां येईल. हल्लीं अस्तित्वांत असलेली एकही राज्यघटना बुद्धीला किंवा हृदयाला पटत नाहीं आणि हेंच आमच्या ध्येयवादाचें समर्थन आहे. आयर्लंडला आपले विचार प्रकट करावयाचे आहेत, ते विचार स्वभाषेंतूनच प्रकट करावयाचे आहेत. आपल्या सरहद्दीवर खडें रहावयाचें आहे; या केवळ कल्पना आहेत. अशी कल्पना करून घेणारा मनुष्य वरील तत्त्व नजरेस येतांच चकित होऊन जाईल. राष्ट्रीय चळवळींचें हेंच सामर्थ्य व समर्थन आहे. आज कांहीं लोक भोंवतालच्या चळवळींची हेटाळणी करीत आहेत पण त्या चळवळींच्या अभिप्रेत अर्थाची त्यांना यत्किंचितही कल्पना नाहीं. आयर्लंड आज आपल्या बालकांना आपल्या झेंड्याखालीं एकत्र होण्यासाठीं बोलावीत आहे. सरहद्दींच्या संरक्षणासाठीं, एकतान व भव्य राष्ट्रीय जीवन निर्माण करण्यासाठीं, झगडून मिळवितां येईल म्हणून नव्हे तर न्याय्य आहे म्हणून नागरिकत्वाचाच हक्क सर्वांना प्राप्त व्हावा यासाठीं, दुर्बलांच्या संरक्षणानेंच आपलें सर्व सामर्थ्य सिद्ध करणाऱ्या राष्ट्राचा पाया घालण्यासाठीं, सत्याचा पुरस्कार करणारें म्हणून समर्थ, स्वतंत्र म्हणून सुंदर, अशा राष्ट्राची संस्थापना करण्यासाठीं; पुराण मातृभाषेच्या संगीतानें नादमय झालेलें आणि सागराच्या जादूनें वेष्टिलेलें राष्ट्र निर्माण करण्यासाठीं आयर्लंड आपल्या बालकांना आवाहन करीत आहे.

प्रकरण दहावें

सारस्वत व स्वातंत्र्य

सारस्वत हें राष्ट्राच्या अंतःकरणाचें सूचिपत्र आहे, राष्ट्रीय विकासाचें परिमाण आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं लढा चाललेला असेल तर जनतेला या युद्धाबद्दल किती कळकळ वाटते हें त्या राष्ट्राच्या वाङ्मयावरून अजमावतां येतें. स्वातंत्र्ययुद्ध निर्वाणीचें आहे कीं अंगचोरपणाचें आहे किंवा जनतेला त्या युद्धाबद्दल यत्किंचित्ही आस्था वाटत नाहीं हें राष्ट्राच्या वाङ्मयावरून सहज समजून येतें. राष्ट्र कोणत्याही अवस्थेंत असलें तरी भावनाप्रधान लोक वाङ्मयांत आपलें अंतःकरण उघडें करतात व राष्ट्राचें अंतःकरण उत्तेजित करतात. जळजळीत भावनांचे चटके बसूं लागतांच जनतेला चळवळ करावी असें वाटूं लागतें आणि हळुहळू स्वातंत्र्ययुद्धाला सुरुवात होते. सारस्वत हें ध्येयसिद्धीचें अत्यंत महत्त्वाचें साधन आहे. सारस्वत हें स्वातंत्र्याचें यशोमंदिर आहे, स्वातंत्र्याचा वालेकिल्ला, झेंडा व ताम्रपट आहे. या महामंदिरांत देशभक्त राष्ट्रदेवतेचें पूजन करतात या मंदिरांतून स्वातंत्र्यवीर रणांगणावर जातात, शत्रूला आव्हान करितात, आणि स्वातंत्र्य-युद्धांत यश मिळवून राष्ट्राच्या भाग्यपटावर स्वातंत्र्याचा लेख लिहितात. सारस्वताच्या सर्वसामर्थ्याबद्दल संशय नाहीं. वाङ्मयाचें सामर्थ्य कोणत्या ध्येयासाठीं उपयोगांत आणलें असतां योग्य होईल याबद्दल मात्र अनेक तीव्र मतभेद आहेत. तत्त्वप्रचारक नाट्यलेखक व केवळ कला या दृष्टीनें कलेचा विचार करणारा कलाकुशल या दोन वर्गांचा मी विचार करणार आहें. कारण, त्यांच्या वादग्रस्त विचारपद्धतीचा आपल्या तत्त्वांशीं संबंध आहे. या दोन वर्गांचीं तत्त्वें शक्य तेवढीं परस्परविरोधी आहेत; तरी दोघांच्याही विचारसरणींत विचित्रपणें एकच चूक झालेली आहे. दोघांनाही प्रत्यक्ष जीवनाची भीति वाटते. वस्तुस्थितीशीं चुकवाचुकव करावयाचा दोघांचाही प्रयत्न आहे. दोघेही जीवनाच्या एकेका अंगाचाच विचार करतात. एकाचे ठिकाणीं कल्पनाशक्तीचा अभाव आहे, तर दुसऱ्याला हृदयच नाहीं. दोघेही शाश्वत सत्याला पारखे झाले आहेत. सत्याच्या सेवेचा मार्ग दुसराच आहे.

वितंडवादाच्या भरांत सत्याचा मार्ग सोडून एक उजवीकडे तर दुसरा डावीकडे चालू लागला आहे. दोघे दोन दिशांना जात आहेत म्हणून आपणां दोघांच्याही हातून तीच चूक झालेली आहे हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. दोघांचेही मार्ग चुकीचे आहेत एवढेंच मला दाखवावयाचें आहे आणि या मुद्द्याचा आपण विचार करणें इष्ट आहे. एकाच वेळीं या दोघांचाही विचार करणें जड जाणार असल्यामुळें मी प्रथम फक्त तत्त्वप्रचारकांचाच विचार करणार आहें. त्यांच्या कृतींत आस्थेचा अभाव आहे, दुसऱ्या पक्षाला न्यायानें वागविण्याची त्यांना हिम्मत नाहीं, आम्हीं आदर्श मानलेल्या वीरांची त्यांनीं कुचेष्टा मांडली आहे, नकली माल मात्र त्यांनीं आम्हांसमोर मांडलेला आहे. असा त्यांचेवर माझा आरोप आहे.

शाश्वत सत्याच्या संदर्भानेंच सारस्वताचें मूल्य ठरविण्यांत आलें पाहिजे. विशिष्ट लेखकाची सत्याबद्दल जी कल्पना असते तिजवरून हें परिमाण ठरवितां येत नाहीं. या व्यापक दृष्टीनें पाहिलें असतां ज्या लेखांत सत्य लपविण्याचा, टाळण्याचा अगर विकृत करण्याचा अपराध घडलेला दिसून येईल; मग सदरहू लेख लेखकानें कितीही प्रामाणिकपणें लिहिलेला असला तरी त्यामध्यें आस्थेचा अभाव आहे, असाच निर्णय देण्यांत येईल. लेखक व लेखन यांमधील हा सूक्ष्म भेद महत्त्वाचा आहे. एकाद्या लेखकाच्या लेखनांत आस्थेचा अभाव आहे असें म्हणणें म्हणजे त्या लेखकालाच आस्थाशून्य ठरविणें होय असा उथळ टीकाकारांचा गैरसमज होईल; पण वस्तुस्थिति अशी नाहीं. या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. आमचीं प्रवर्तक नाटकें अत्यंत कळकळीच्या माणसांनींच लिहिलेलीं आहेत. या नाटकांतील ढोबळ व स्पष्ट असल्यामुळें राष्ट्राची मनोवृत्ति सदोष होत आहे. ब्रिटिश लोकांची कुचेष्टा करण्यांतच आनंद मानण्याची प्रवृत्ति सार्वत्रिक असल्यामुळें या नाटकांचा वर्ग सर्वांच्या परिचयाचा आहे. अशा नाटकांपासून कोणतेंही हित होत नाहीं, उलट अपाय मात्र बराच होतो, व त्यामुळें जीवनाचें स्पष्टीकरण होत नाहीं. कोणाच्याही ज्ञानांत भर पडत नाहीं. ध्येयासाठीं आपण अगदीं झुरत आहों असें लोक बाह्यात्कारीं भासवितात खरे; पण त्यांना खरी कळकळ काडीइतकीही नसते. या ध्येयाबद्दल त्यांनीं अर्धींकच्चीं मतें बनविलेलीं असतात. या पूर्वग्रहांची खुषामत करण्यापलीकडे दुसरें

कोणतेंही कार्य या नाटकांच्या हातून होत नाहीं. ह्यांतच राष्ट्रघाताचें बीज आहे. आपणांपैकीं अनेक लोक मोठमोठ्या तत्त्वांचा तोंडीं पुरस्कार करतात. पण त्यांसाठीं झीज सोसावयाला मात्र त्यांची तयारी नसते. ध्येयासाठीं प्रत्यक्ष कार्य करण्याची कसोटीची वेळ येतांक्षणींच आपण माघार घेतों आणि कोणत्याही प्रकारचा त्याग करावयाची आपली नाखुषी लपविण्यासाठीं दुसऱ्या पक्षाला नांवें ठेवण्यास सुरुवात करतों. अशी मनोवृत्ति प्रचारांत आहे तोंवर राष्ट्रोद्धार अशक्य आहे. समाजाचें चित्त वेधून घेण्यासाठीं, कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठीं, वस्तुस्थितीचें यथार्थ स्वरूप दाखविण्यासाठीं, व्यक्तिमात्राचें अंतःकरण जीवनाच्या आनंदानें परिपूर्ण करण्यासाठींच समाजापुढें नाटक ठेवण्यांत आलें पाहिजे. हल्लींचीं मतप्रवर्तक नाटकें यांपैकीं एकही कार्य करीत नाहींत. त्यांमध्यें आनंद नाहीं व खरेपणाही नाहीं. त्यांमधील पात्रें म्हणजे दुसऱ्याच्या हातांतलीं कळसूत्रीं बाहुलीं व उपहासास्पद सोंगें आहेत आणि या नकली सोंगांमुळें श्रद्धाहीनांच्या अंतःकरणांत ध्येयनिष्ठा उत्पन्न होईल असें मानण्यांत येतें. अंतःकरणांत श्रद्धा नाहीं पण डोक्यांत थोडीबहुत अक्कल आहे असा मनुष्य यांपैकीं एकादें नाटक पहावयास आला तर तो लवकरच किटून जाईल आणि त्यांमधील बाष्कळ विपर्यासानें चिरडीस मात्र जाईल आणि आम्ही प्रामाणिक आहों असें त्यानें उघडपणें कबूल केलें तरी आम्ही पुरे बेअक्कल आहों अशी त्यानें मनाशीं खूणगांठ बांधून ठेवलेली असेल.

राजकीय तत्त्वांच्या प्रचारासाठीं लिहिण्यांत आलेलीं नाटकें यांहून अधिक घातुक आहेत—निदान स्वातंत्र्यभक्तांना त्यांचा निषेध करावयाला पुष्कळ कारणें आहेत. या नाटकांमुळें आमच्या राष्ट्रवीरांची कुचेष्टा मात्र होते. कल्पनाशक्तीचा लवलेशही अंगीं असलेल्या मनुष्याला, या नाटककारांनीं निर्माण केलेले आयर्लंडसंबंधीं अहोरात्र वटवट करणारे नाटकी नायक सहन होणें अशक्य आहे. राष्ट्रवीर तरी मनुष्यकोटींतलेच असतात; पण या नाटकी वीरांनीं नकली ऐट आणलेली आहे. डेव्हिस, टोन किंवा आमच्या दुसऱ्या कोणत्याही महात्म्याचें चरित्र पहा. तें सर्व दयामय व प्रेमपूर्ण होतें. त्यांचें चरित्र पाहतांच कोणालाही त्यांजवर प्रेम करावें असें वाटेल असेच ते होते. डेव्हिसच्या कर्तबगारीमुळें चकित झालेल्या एका चहात्यानें विचारलें,

"डेव्हिस, तुम्ही कधीं प्रेमपाशांत गुरफटलां होतां काय?" डेव्हिसनें अकृत्रिमपणें हजरजबाब दिला, "मी अजूनही प्रेमाच्या जाळ्यांत गुंतलेलाच आहें." टोन हा मर्दुमकीचा पुतळा होता याबद्दल कोणालाही तिळमात्र संशय नाहीं; पण आपलें मन त्याच्याकडे ओढ घेतें त्या वेळीं आपल्या मनांत विचार चालू असतो कीं, "अशा मनुष्याबरोबर फुरसतीचा दिवस घालविण्याची संधि मिळाली, तर केवढी बहार होईल." मुसळधार पाऊस पडत होता, वारा सोसाट्यानें वहात होता, अशा वेळीं मिचेल एका मित्राबरोबर प्रवास करीत होता. वादळाच्या सोसाट्यानें चित्तवृत्ति रंगून गेल्यामुळें मिचेल खड्या सुरांत कविता गाऊं लागला. या टवटवीमुळें त्याचा मित्र चकित झाला. मिचेलचें अंतःकरण आनंदानें भरलेलें होतें. या उल्हासवृत्तीमुळेंच त्यांजवर आपलें प्रेम जडतें, आणि म्हणूनच त्यांचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून त्यांचे गुण आंगीं आणण्याची आपण इच्छा बाळगतों. सदासर्वदा गंभीरपणें उपदेश करण्याकडे प्रवृत्ति असलेल्या मनुष्याची कोणावरही कधींच छाप बसत नाहीं. रिकामा वेळ ज्याच्या संगतींत अत्यानंदांत घालवितां येईल अशा मनुष्याच्या संगतीसाठीं मन तहानलेलें असतें. असा मनुष्य भेटतांच आपण त्याच्या ताब्यांत जातों. आमच्या इतिहासांत ज्यांचीं कार्यें नमूद करण्यांत आलीं आहेत तीं सर्व माणसें मोठीं होतीं. आनंदानें भरलेलें अंतःकरण, निर्मळ मन, तीव्र कल्पनाशक्ति, सूक्ष्म ग्रहणशक्ति आणि विनोदी वृत्ति या गुणांमुळें त्यांच्या मोठेपणांत मोहकतेची भर पडली होती. जीवनावर त्यांचें प्रेम होतें, बांधवांवर त्यांचें प्रेम होतें, सृष्टीमध्यें जेथें जेथें सौन्दर्य व शौर्य हे गुण आहेत त्या त्या वस्तूंवर त्यांचें प्रेम होतें. त्यांची ओळख झाल्यानंतर त्यांच्या आयुष्यांतले अज्ञात प्रसंग आपल्या चित्तचक्षूसमोर उभे राहतात; ते उंच उंच पर्वत चढून जात आहेत; गिरिशिखरांवर खड्या सुरांत गाणीं गात आहेत, नद्यांमधून होड्या वल्हवीत चालले आहेत, कोमल अरुणप्रकाशांत फिरत आहेत, त्यांच्या जीवनाचें अनंताशीं साधर्म्य झालें आहे, त्यांच्या अंतःकरणांत राज्यक्रान्तीचें तत्त्वज्ञान निर्माण होत आहे, आदर्शसृष्टीची उभारणी होत आहे, हीं चित्रें किती रम्य आहेत? त्या बाष्कळ तात्त्विक नाटकांमध्यें या रम्यतेचा अंशही नाहीं. या रम्यतेसाठींच मानवी अंतःकरणाची तळमळ चाललेली असते. कोठें काय कमी पडलें

आहे किंवा जास्त झालें आहे याचें सूक्ष्म स्पष्टीकरण प्रत्येकालाच करतां येणार नाहीं; पण जें रुचत नाहीं तें समोर आलें, कीं हें आपल्याला नको एवढें प्रत्येकाला समजतें. तो तेथून निघून जातो आणि पुन्हा तिकडे फिरकतही नाहीं. या नाटयलेखकांनीं निशाणावर गोळी झाडण्याचा प्रयत्न केला खरा; पण ती गोळी निशाणाला स्पर्शही न करतां हवेंत कोणीकडच्या कोणीकडे उडून गेली आहे. त्यांचें निशाण हुकलें आहे. या नाटकांचे लेखक आणि त्यांनीं निर्माण केलेले नकली वीर दोघेही उपहासास्पद आहेत. यावरून एक महत्त्वाचा धडा आपण घेतला पाहिजे; मनुष्यें कर्तव्यतत्पर व्हावीं अशी इच्छा असेल तर आपण त्यांच्या आयुष्यांत आनंद निर्माण केला पाहिजे.

आपल्याला गंभीर गोष्टींचा विचार करावयाचा आहे म्हणूनच आपण आपला उल्हास जिवंत ठेवला पाहिजे; त्यावांचून आपली वृत्ति समतोल राहणार नाहीं. एकादा छोकरा मोठेपणाचा आव आणण्यासाठीं शीळ घालीत चालतो, त्याचप्रमाणें सर्वसाधारण मनुष्य मोठेपणाचा नकली आव आणण्याचा प्रयत्न करतो. या स्वयंभू पुढाऱ्यांचा शिरकाव झालेल्या अनेक कार्यांचा विचका आपल्या डोळ्यांसमोर झालेला आहे. जिकडे पहावें तिकडे हे नकली महात्मे दिसून येतात. या लोकांनीं राजकारणामध्यें एवढा धुडगूस घातला, कीं त्यामुळें आमचें राजकीय व्याख्यानपीठ गर्हणीय गणण्यांत येऊं लागलें आहे. व्याख्यानपीठांचा योग्य उपयोग राष्ट्रोद्धाराला पोषक असल्यामुळें या लोकांपासून राष्ट्रावर अनर्थ ओढवण्याचा संभव आहे. वाङ्मयांतही तोच प्रकार आहे. मध्यम स्थितींतला मनुष्य आपल्या परिचयाचा आहे; पण याच विषयाचें विवेचन करणाऱ्या कोणत्या साहित्यसेवकानें समाजाला न्यायबुद्धीनें वागविलें आहे ? धर्मांतही हीच रड आहे; धार्मिक कृत्रिमपणा अज्ञेयवादाचें स्वरूप धारण करतो, बुद्धिप्रामाण्याची धग त्याला सहन होत नाहीं; आणि या अज्ञेयवाद्याचा डौलही मोठा गमतीचा असतो. या पीडांपासून, या विपर्यासांपासून आपण राष्ट्राची सोडवणूक केली पाहिजे. विवेकशून्य राष्ट्र स्वतंत्र होणें अशक्य आहे. आपल्या जीवनांत उल्हास व गांभीर्य यांचा संयोग होत गेल्यास लवकरच आपल्या अंगीं वस्तुमात्राचें परिमाण जाणण्याची तारतम्यबुद्धि येईल. निवळ भारदस्त मनुष्याचे अंगीं निस्तेज मठ्ठपणा असतो. गंभीर प्रवृत्तीच्या मनुष्याचे अंगीं उल्हासाचा स्वाभाविक संचय

असतो. गंभीर कार्याला उल्हासाची जोड असणें हें नैसर्गिकच आहे. असें झालें म्हणजेच आपली खरी प्रगति होईल. क्रान्तीच्या पुढाऱ्याचे अंगीं विनोदाचा अभाव असेल तर ती कधींही यशस्वी होणार नाहीं.

विनोदाच्या साह्यानें आपल्याला संकटांना तोंड द्यावयाचें असल्यामुळें ही विनोदबुद्धि फार उच्च दर्जाची असली पाहिजे. महाकवि व महाज्ञानी याप्रमाणेंच खरा विनोदी लेखक क्वचितच जन्माला येतो. आपला विनोद जगाला झुलविण्याच्या योग्यतेचा नसला तरी उच्चतम विनोदाचे प्रधान गुण आपल्या विनोदांत येतील अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. उच्च विनोदाचें लक्ष इतरांची कुचेष्टा करण्याकडे नसतें. खऱ्या विनोदी मनुष्याचे वर्तनांत नेहमीं मनोहर सभ्यताच दिसून येते. ग्राम्य विनोद अपमानकारक असतो. स्वतःच्या मूर्खपणाची चेष्टा करणें हाच ज्ञानाचा खरा आरंभ होय; प्राणीदार विनोदांत शुद्ध मौज असते, ग्राम्य कुचेष्टा कधींही नसते, हीं दोन तत्त्वें लक्षांत ठेवण्याजोगीं आहेत. स्वतःच्या अज्ञानाची चेष्टा करतां करतां इतरांच्या वर्तनांतील हास्यास्पद गोष्टी केवळ विनोदासाठीं सहज बाहेर काढतां येतात. एखाद्याला हास्यास्पद व उपहासास्पद करणें हेंच ग्राम्य विनोदाचें उद्दिष्ट असतें: या हेतूला पोषक होईल अशा रीतीनेंच त्यामध्यें प्रसंगांची मांडणी केलेली असते; आपण इतरांहून वरिष्ठ दर्जाचे आहोंत असा कुचेष्टेखोराचा आव असतो. असा विनोद नेहमीं उपमर्दकारक असतो. मग कोणाचें मन दुखवण्याचा त्याचा हेतु असो वा नसो. समाजाला त्या बोलण्यांतला विनोद समजत नाहीं असें नाहीं; पण त्याच्या विनोदापेक्षां त्याच्या मूर्खपणाचेंच समाजाला अधिक हंसूं येतें. इतरांना हंसविण्याच्या भरांत तो स्वतःच हास्यास्पद होऊन बसतो. समाजाला हंसवितांना तर कधीं चिरडीला नेऊन तो स्वतःबद्दलची सर्व सहानुभूति नष्ट करून घेतो. आपण या नकली मोठेपणापासून सर्वथैव अलिप्त राहिलें पाहिजे. इतरांची कुचेष्टा कधींही करूं नका. पाहिजे तर स्वतःच्या मूर्खपणाची कुचेष्टा करा. शिवाय शेजाऱ्यापाजाऱ्यांची कुचेष्टा करतांना बरींच विधानें अनुमानधपक्यावर करावीं लागतात; पण स्वतःच्या वर्तनांतला विचित्रपणा विनोदी रीतीनें दाखवून देतांना तशी सट्टेबाजी करावी लागत नाहीं. शुद्ध विनोदाचें सामर्थ्य अंगीं येतांच तुम्हांला सर्वांचीं अंतःकरणें सहज आकर्षून घेतां येतील. तुम्ही श्रेष्ठपणाचा आव आणलेला

नसल्यामुळें तुमच्याबद्दल सर्वांना सहानुभूति वाटेल. शेजाऱ्याच्या पाठीवर थाप मारून त्याला म्हणून पहा, "आपण एकाच दर्जाचीं माणसें आहोंत. चल, आपण घटकाभर मौजेनें थट्टामस्करी करीत बसूं." लगेच त्याच्या डोळ्यांत आनंदाची चमक दिसूं लागेल आणि तो आनंदानें तुमच्याबरोबर येईल. त्याला खुर्चीत आणण्यासाठीं तुम्ही त्याच्या बरगडींत बोटें खुपसूं लागाल तेव्हां हा आपल्याला बनवीत तर नाहीं ना, अशी शंका थोडा वेळ त्याच्या मनांत येऊन जाईल, पण लवकरच त्याला या शंकेचा विसर पडेल आणि खुर्चीत येऊन तो तुमच्याशीं मनमोकळेपणें गप्पागोष्टी करूं लागेल. तुमचा आनंदी प्रामाणिकपणा पाहून त्याला वाटूं लागेल कीं, दोस्त असावा तर हा असा–तो समाधानानें व विश्वासानें तुमच्यापुढें आपलें अंतःकरण उघडें करील. कारण प्रत्येक मनुष्याला स्वतःबद्दल बोलावयाची आवड असते. तुम्ही एकमेकांबरोबर मनमोकळेपणानें बोलूं लागाल, आपापलीं रहस्यें उघडीं कराल. मानवी अंतःकरणाचा खरा जिव्हाळा तुमच्या अनुभवास येईल. आपल्याला आज हेंच हवें आहे. मानवी अंतःकरणाची खरी खळबळ वाङ्मयांत प्रतिबिंबित झाली पाहिजे. या उमाळ्यानें तें स्फुरण पावेल व नाचूं लागेल. रडेल, गाऊं लागेल, असें झालें म्हणजे आपण महत्पदाच्या मार्गाला लागूं.

आम्हांला सत्याची जरूर आहे म्हणूनच मतप्रवर्तक नाटककारांना आमचा विरोध आहे. त्यांचे हातून पक्षपात होत नाहीं असें क्वचितच घडतें; आणि पक्षभेदाच्या आवेशाच्या अभावीं त्यांचें बोलणें थंड व अनिश्चित असतें. त्यामुळें कोणाचीही शंकानिवृत्ति होत नाहीं. वेगवेगळीं प्रमाणें पुढें करून ते आमच्या बुद्धीची खात्री पटवूं पाहतात; पण त्यांच्या शब्दांनीं आमच्या भावना जागृत होत नाहींत; भावना ही हृदयाची भाषा आहे. त्यांचे शब्द आमच्या हृदयाला भिडत नाहींत. फक्त आमच्या बुद्धीला स्पर्श करावयाचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांचीं नाटकें म्हणजे पक्षभेदानें भरलेलीं पक्षपाती चोपडीं मात्र आहेत आणि तीं नाट्यक्षेत्रांत अगदीं अप्रस्तुत आहेत; जें कार्य त्यांनीं हातीं घेतलें आहे तें तर सिद्धीला जात नाहींच; उलट त्यांच्या अपयशामुळें राष्ट्रीय ध्येयालाही धोका पोंचतो. कारण राष्ट्रीय ध्येय त्यांच्या नाटकांइतकेंच निर्जीव व थंडगार असलें पाहिजे अशी समाजाची समजूत होऊन बसले.

आणि ध्येय श्रेष्ठ असतें तेव्हां तें चैतन्यपूर्ण, उत्साहमय व आस्थापूर्ण असतें. प्रामाणिक व आस्थेवाईक साहित्यसेवकांनीं नाटकें लिहावींत. मात्र त्यांनीं मतप्रवर्तकांच्या पद्धतीचा उपयोग करूं नये किंवा केवळ कलेसाठीं कलेचा व्यासंग करावयाचा या ध्येयशून्य तत्त्वाचाही पुरस्कार करूं नये. भावनांनीं थरथरणारें मानवी अंतःकरण त्यांनीं आपल्या नाटकांत प्रदर्शित करावें. ही मागणी आम्ही राष्ट्रीय ध्येयाच्या दृष्टीनेंच करीत आहों हें उघड आहे. समजुतदारपणा, सहानुभूति, निरीक्षणशक्ति, कल्पनाशक्ति व धैर्य हे गुण नाटककाराला अवश्य आहेत; हे ज्याच्या अंगीं असतील त्यांनींच या फंदांत पडावें. विशिष्ट मतांची तरफदारी करणारा वकील किंवा उसनें अवसान अंगीं आणणारा भोंदू यांचे अंगीं हे गुण संभवतच नाहींत. वर्तन व कृति यांच्या द्वारें ते आपला मूर्खपणा जगाच्या निदर्शनास आणतात. आपण सत्याचा आणि फक्त सत्याचाच पुरस्कार करूं; प्रसंगावर नजर देऊन सत्याची छाटाछाट करावयाचें आपण मनांतही आणतां कामा नये. जीवनांतील प्रत्यक्ष परिस्थितीला तोंड देण्याची ज्याला डर वाटते त्याची पुढारीपण घेण्याची लायकीच नाहीं. कोणाचेंही प्रतिनिधित्व स्वीकारण्याची, कोणासाठीं दोन शब्द बोलण्याची किंवा कोणत्याही गोष्टीचा अभिप्राय व्यक्त करण्याची त्याला पात्रताच नाहीं; त्याच्याबद्दल आपल्याला विश्वासच वाटत नाहीं. देशाला जागृत करणारा मनुष्य उत्साहानें ओथंबलेला व भावनांनीं खळबळलेला असतो. त्याच्या उत्साहामुळें मोहित होऊन आम्ही त्याचे अनुयायी होऊं. निर्वाणीच्या प्रसंगींही त्याचें सस्मित मुख पाहून फक्त एकादा मूर्खच कल्पना करूं शकेल कीं, ध्येयसिद्धीची पर्वा नसल्यामुळेंच हा हंसत आहे; पण बहुजनसमाजाला त्या स्मितांत विशिष्ट मनोवृत्ति दिसून येईल. या स्मिताच्या जोरावर तो आमच्या अंतःकरणांत आनंद व उत्साह जागृत करील. परमेश्वराची प्रेरणा ती हीच. आनंदाच्या व उत्साहाच्या आवेशानें देश एकदम उसळी घेईल; सर्वांची दिलजमाई होऊन समाज बंधुभावानें एकवटून जाईल, मृतावस्थेंतलीं भांडणें पुन्हा उकरून काढण्यांत येणार नाहींत. देशांत धुमसणाऱ्या अग्नीचा एकदम भडका उडेल आणि इतिहासाची घडण पुन्हा सुरू होईल. दिव्य चैतन्यानें मनुष्यमात्र कार्यतत्पर होईल.

प्रकरण अकरावें

सारस्वत व स्वातंत्र्य

[कलेसाठीं कला]

कलेच्या अभिवृद्धीसाठींच कलेची सेवा करणें हेंच कौशल्याचें ध्येय आहे. या तत्त्वाचा एक विशिष्ट अर्थ रूढ होऊं पहात आहे; त्याचा वेळींच प्रतिकार केला पाहिजे. पण हाच शब्दप्रयोग उच्च व पवित्र अर्थानेंही वापरण्यांत येतो. एकाद्या प्रतिभासंपन्न लेखकानें लेखन हाच आपला व्यवसाय असें ठरवून योग्य मोबदल्याची अपेक्षा न धरतां, आपल्या लेखनशक्तीचा प्रामाणिकपणें सदुपयोग करावयाचें ठरविलें आणि वाढत्या वैभवामुळें त्याला आपल्या दैवी देणगीचा दुरुपयोग करावयाची बुद्धि झाली नाहीं तर आपण त्याला धन्यवाद देऊं. प्रत्येक कामकऱ्याला त्याच्या कामाचा योग्य मोबदला मिळणें जरूर आहे हें आपण केव्हांही विसरतां कामा नये. पण कामाचा मोबदला मिळणार नाहीं हें माहीत असूनही अंगीकृत कार्य पार पाडणें अवश्य आहे असें ठरवून जगांतील सहानुभूतीच्या अभावाला न जुमानतां केवळ सत्कार्याच्या अभिरुचीमुळें आणि सौंदर्याच्या अभिवृद्धीसाठीं तें कार्य निष्ठेनें व धैर्यानें तडीला नेणें या अर्थानें कलेच्या अभिवृद्धीसाठींच कलेची सेवा हा शब्दप्रयोग वापरण्यांत येतो तेव्हां हें ध्येय उच्च व पवित्र आहे असेंच म्हणण्यांत येईल.

पण ललितकलांचे कित्येक उपासक असे आहेत कीं, आपल्या ठिकाणीं निष्ठेचा अभाव आहे; जगताला जागवणाऱ्या आणि समाजचैतन्याला चालना देणाऱ्या जिवंत भावनांचा आपल्या ठिकाणीं अभाव आहे, असें जाहीर करण्यांतच त्यांना प्रौढी वाटत असते. त्यांनीं विशिष्ट तत्त्वांचा पुरस्कार करूं नये हें उघड आहे. मनुष्याच्या अंतरात्म्याशीं आणि मानवी जीवनांत क्रान्ति घडवून आणणाऱ्या महाशक्तींशीं समरस होण्याचें सामर्थ्य अंगीं असल्याखेरीज कोणालाही भावनाप्रधान हृदयाची तळमळ आपल्या कृतींत व्यक्त करतां येणार नाहीं. अर्थात् अशा कृतींत जिवंतपणा कधींही आढळणार नाहीं. जें वाङ्मय थेट हृदयापासून निघालेलें नसतें तें वाचकांच्या अंतः-

करणाला स्पर्श करूं शकत नाहीं; त्यांना उच्च वातावरणांत नेऊं शकत नाहीं. आजकाल प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांमध्यें हीच मोठी उणीव आहे. हीं पुस्तकें वाचून घटकाभर मनाची चलबिचल होते, पण त्यांमध्यें अंतःकरण तल्लीन होत नाहीं. आपल्या लिखाणांत कांहीं तरी उणिव आहे अशी खुद्द लेखकांनाही जाणीव असते आणि केवळ लेखनकौशल्याच्या जोरावर ते ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करतात. त्यांची भाषा निर्दोष व रचना सुबक असते, पण अंतःस्फूर्तीच्या अभावामुळें त्यांचें लिखाण सर्वसाधारण वाङ्मयामधून उठून दिसत नाहीं.

अंतःस्फूर्ति व रचनाकौशल्य यांमधील भेद स्पष्टपणें मनासमोर ठेवल्यावांचून कलेचें खरें महत्त्व अजमावतां येणार नाहीं. 'रायडर्स टु दि सी' आणि 'प्ले-बॉय' या सींजच्या दोन ग्रंथांमध्यें हा भेद दिसून येतो. पहिलें पुस्तक अंतःकरणापासून अंतःस्फूर्तीनें लिहिलेलें आहे. त्यांतील भावगीतांच्या शेवटच्या भरारींत अंतःकरणाचा खरा उमाळा दिसून येतो आणि तीं वाचीत असतांना अंतःकरण तल्लीन होऊन जातें. त्यांच्या लिखाणापैकीं फक्त एवढाच भाग महत्कृतींच्या सदरांत दाखल करतां येतो. फक्त येथेंच तो विश्वरूपाशीं समरस झालेला आहे असें दिसून येतें. पण दुसऱ्या ग्रंथाची स्थिति अशी नाहीं. तक्तपोशीच्या फटींतून ऐकलेले शब्द दुसऱ्या व्यक्तींच्या तोंडीं घालून आपण हा ग्रंथ लिहिला असें त्यानेंच नमूद करून ठेविलें आहे. हल्लीं निर्माण होणाऱ्या वाङ्मयाची अगदीं अशीच अवस्था आहे; त्यामध्यें कृत्रिम लेखनकला आहे असें टीकाकारांनीं खुशाल म्हणावें; पण त्यामध्यें अंतःस्फूर्तीचा जिवंतपणा खास नाहीं.

नाहीं. या वाङ्मयांत चैतन्य नाहीं. पृथ्वीच्या पाठीवर भटकणाऱ्या भटक्याच्या जीवनांतील काव्य आणि मूलभूत तत्त्वांचा शोध, यांविषयीं आज पुष्कळ बोलणें चाललेलें आहे. आद्यतत्त्वांचा ठाव घेणें खरोखरीच अत्यंत महत्त्वाचें आहे. भटक्याच्या जीवनांत काव्याचा लवलेशही नाहीं. तो आयुष्याच्या लढाईंतून पळ काढणारा एक शेंदाडशिपाई मात्र आहे. हें एक महत्त्वाचें मूलतत्त्व आहे. ज्या रणक्षेत्रावर महत्तत्त्वासाठीं महायुद्धें होतात त्या युद्धभूमीवरून त्यानें पळ काढला आहे. केवळ जखमांच्या भयानें व स्वार्थत्याग करावा लागेल या धास्तीनें त्यानें या युद्धांत भाग घेण्याचें टाळलें

आहे. लढाईच्या धुमश्चक्रींत घुसण्याची व जय मिळेपर्यंत लढण्याची त्याला छाती नाहीं. काळोख पडल्यानंतर लुटींतला भाग मिळविण्यावरच त्याची दृष्टि आहे. इकडे जगाची धूळधाण उडाली तरी त्याला त्याची फिकीर नाहीं. तो फितूर आहे, तो नीचांतला नीच मनुष्य आहे. लढाई सुरू असतीं तर त्याला गोळी घालून ठार करण्यांत आलें असतें. युद्धभूमीवरून पळ काढण्याची आपण त्याला सवड दिलेली आहे. आतां त्याला आपल्या वाटेनें जाऊं द्या. निदान तो वीर आहे असें म्हणून त्याचें अभिनंदन तरी करूं नका.

कलासेवकांच्या या विशिष्ट पंथाचें प्रतिनिधित्व 'रेपर्टरी थिएटर'कडे आहे. या पंथासंबंधीं स्पष्टपणें बोलून मन मोकळें केल्यानें अनेकांना हायसें वाटणार आहे. नटव्या लोकांमध्यें हा पंथ बराच बोकाळलेला असून समाजाला अधिकाधिक त्रासदायक होऊं लागला आहे. कलेसाठीं कला या हीन तत्त्वाचे अनुयायी केवळ एकाद्या संघाच्या स्तुतीसाठीं किंवा नागरिकांच्या मनाला धक्का देण्यासाठीं, व्याख्यानें, नाटकें व काव्यें निर्माण करीत आहेत. समाजाच्या मनोवृत्ति दुखविण्यांतच त्यांना कृतार्थता वाटते. एकाद्या नाटकावरून दंगा झाला म्हणजे या लेखकांना मोठें समाधान होतें. जातां जातां एका निराशाजनक प्रवृत्तीचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. ती ही कीं, क्षणभर विचार करण्याच्याही पात्रतेच्या नाहींत, अशा क्षुद्र गोष्टींवरून लोक दंगेधोपे करण्यास प्रवृत्त होतात आणि ज्यांच्यासाठीं आजन्म लढत रहावें अशा महत्त्वाच्या गोष्टींकडे लोक क्षणभरही लक्ष देण्यास तयार नाहींत. लोकांनीं आपल्याला भयंकर मनुष्य म्हणावें, एवढीच या पंथांतील लेखकांची महत्त्वाकांक्षा आहे. आपण कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेले आहों अशी त्यांची स्वतःबद्दलची कल्पना असते आणि समाजाच्या मनोभावना अधिकाधिक दुखवल्या जातील असें वाङ्मय निर्माण करण्याकडेच त्यांची प्रवृत्ति आहे. हें वाङ्मय खरोखर शरमेनें मान खालीं घालण्याच्या लायकीचें आहे. कित्येक वेळां ते भावनांचा उमाळा व्यक्त करण्याचा प्रयत्न करतात; पण त्यांतील कृत्रिमपणा वरवर पाहणारासही दिसून येतो. कित्येक वेळां ते आनंद प्रकट करण्याचा प्रयत्न करतात; पण त्यांना बाष्कळपणा मात्र साधलेला असतो आणि म्हणूनच उच्च वाङ्मयाचें योग्य व खरें परिमाण निश्चित करण्याची जरूर भासत आहे. केवळ कार्याच्या कळकळीनेंच महाकृति निर्माण होतात. पैशासाठीं, कलेच्या अभिवृद्धी-

साठीं, बुद्धीच्या समाधानासाठीं किंवा बाष्कळ हेटाळणीसाठीं लिहिलेले ग्रंथ महत्कृतींच्या दर्जाला पोंचणें अशक्य आहे. सत्, सत्य आणि सुंदर असें जें जें असतें त्यावरील शुद्ध प्रेमामुळेंच उच्च वाङ्मय निर्माण होतें. हेतु कितीही उच्च असले तरीही अपयश येणें संभवनीय आहे; पण ध्येयापासून च्युत होऊं नये म्हणून पुढील तत्त्व डोळ्यांसमोर ठेवण्यासारखें आहे. नाटककार व कादंबरीकार यांनीं स्वतः अनुभवलेलीं सुखदुःखें निवेदन करावीं आणि कवीनें काव्यप्रीती-साठीं आणि काव्यानंदासाठीं काव्य लिहावें.

या मुद्द्याचा विचार करतांना 'अंबे थिएटर'चें नांव साहजिकपणेंच मना-समोर येतें. आरंभीं या सांप्रदायावर स्तुतीचा इतका वर्षाव झाला कीं, त्या-मुळें त्याच्या कार्याचा बराच बिघाड झाला. हा पंथ अस्तित्वांत येण्यापूर्वी नाट्यक्षेत्रांत क्षुद्र कृतींचा इतका भरणा झालेला होता कीं, हुषार लोकांनीं चार दोन बरीं नाटकें लिहितांच त्यांना एकदम महत्कवींच्या सदरांत घाल-ण्यांत आलें. या लेखकांनीं अत्यंत उच्च दर्जाच्या अशा एक दोन कृति निर्माण केल्या आहेत हें आनंदानें व अभिमानानें येथें नमूद केलें पाहिजे. आतां महत्कृति निर्माण होत नसल्यामुळें बाकीच्या बरकड नाटकांना त्यांचा योग्य दर्जा स्पष्टपणें दिला पाहिजे. कारण त्यांची योग्यता यथातथाच आहे. महत्कृति व महात्मा या शब्दांचे खरे अर्थ आपण नेहमीं मनासमोर ठेवले पाहिजेत. म्हणजे आपल्या हातून कोणाचीही अवास्तव स्तुति होणार नाहीं. शेक्स्पीअर व मोलिएर* यांचेसाठीं ते शब्द आपण राखून ठेविले पाहिजेत. इतरांसाठीं दुसरे कोणतेही शब्द वापरावे. त्यांना बुद्धिमान्, चलाख किंवा लायक यांपैकीं कोणतेंही विशेषण लावावें; पण महात्मा हें अभिधान फारच थोड्या व्यक्तींना लावतां येईल. शेक्स्पीअरच्या श्रेष्ठ नाटकांपैकीं कोणताही प्रवेश घ्या आणि हल्लीं निर्माण होत असलेल्या अनेक नाटकांपैकीं कोणत्या-ही प्रवेशाशीं त्याची तुलना करून पहा म्हणजे त्यांमध्यें केवढा जमीन-अस्मानचा फरक आहे हें सहज नजरेस येईल. या आधुनिक नाटकांमुळें घटकाभर मनाची खळबळ होईल; पण शेक्स्पीअरच्या वाचनानें दिव्यदृष्टि प्राप्त होईल. द्वंद्वयुद्धें, मारामाऱ्या, लढाया व रक्तपात यांनीं त्याचीं नाटकें

*फ्रेंच नाट्यसम्राट्.

भरलेलीं आहेत असा कोणी आक्षेप घेईल; पण त्यानें हीं नाटकें कोणत्या काळांत लिहिलीं याचा विचार केला असतां त्यानें असें कां केलें याचा उलगडा सहज होण्यासारखा आहे. त्या काळांतल्या लोकांना असल्या उत्तेजक प्रकारांची फार आवड होती. त्यांना जें हवें होतें तें शेक्स्पीअरनें पुरविलें पण या घटनांमध्यें त्यानें मार्मिकपणाचें जें मिश्रण केलें आहे त्यामुळें प्रेक्षक तल्लीन होऊन जातात. त्यानें निर्माण केलेली सृष्टि व तींत वावरणाऱ्या व्यक्ति या सदैव जगाच्या नजरेसमोर राहतील. त्याच्या संगीतांतील स्फूर्तिदायक निनाद पुन्हा निर्माण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. अंतःकरण अधिक उदात्त करणारी, सर्वसाधारण घटना व क्षणिक क्षोभ यांना खालीं सोडून अंतःकरणाला उच्चतर वातावरणांत नेणारी—कीं जेथें कोरड्या तर्कशास्त्राला घेरी येऊन तें जमिनीवर कोलमडून पडतें, अशी ती महाशक्ति फिरून निर्माण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

क्षुद्र व्यक्तींवर उदात्त नाटकाची उभारणी केव्हांही करितां येणार नाहीं. नाटकांतील प्रमुख पात्रें तरी उदार अंतःकरणाचीं, महत्कार्यासाठीं झगडणारीं व मोठ्या योग्यतेचीं असलीं पाहिजेत. अशा व्यक्तींमध्यें भावनांचीं अथवा कर्तव्यांचीं द्वंद्वें सुरू झालीं किंवा जीवनाच्या कार्यक्षेत्रांत त्यांनीं झटापटीला सुरवात केली, कीं उच्च प्रतीच्या वाङ्मयाला अवश्य असणारीं सर्व अंगें आपोआप उत्पन्न होतात. त्यांच्या लढायांत जातीनें शिरण्याची ज्याला हिम्मत नाहीं अगर त्यांच्या अंगीकृत कार्याचा कैवार घेण्याइतकी सहानुभूति नाहीं त्याला त्यांच्या अंतःकरणांत स्फुरणाऱ्या भावना प्रगट करितां येणार नाहींत. त्यांच्या कार्याबद्दल लेखकाचे विचार काय आहेत हें जाणण्याची वाचकांची इच्छा नसते, तर खुद्द त्या वीरांचे विचार जाणण्याची त्यांना तळमळ असते. त्यांचे अंतर्यामाशीं समरस झालेल्या लेखकाला त्यांच्या भावनांची अनुभूति होते आणि त्यांचे हातून महत्कृत्यें कशीं झालीं याचा उलगडा होतो. आपण राजकारस्थानी आहोंत अगर कांहीं गुप्त खासगी हेतु आपल्याला साधावयाचे आहेत असा आपणांवर कोणीं आरोप केला तर आपलें कसें होईल, अशी ज्याला सदैव भीति वाटत असते त्याचे हातून महत्कृति निर्माण होणें शक्य नाहीं; एकादा मुत्सद्दी नाटक लिहिण्याच्या मिषानें अथवा नाटककाराचा वेष धारण करून राजकारण लढवूं पाहील तर त्यालाही असेंच

अपयश येईल. आयर्लेंडांतील क्रान्तीच्या चळवळीकडे अनेक शतकांपासून अनेक महात्म्यांचीं मनें व अंतःकरणें आकर्षिलीं गेलीं आहेत; या क्रान्तीकडे दुर्लक्ष करणें अथवा तो विषयच टाळण्याचा प्रयत्न करणें म्हणजे महत्पद-प्राप्तीचा मार्ग आपण होऊन सोडून देण्यासारखें आहे. हें तत्त्व प्रत्येक साहित्यसेवकानें ओळखलें पाहिजे. राष्ट्राची क्रान्तीची तळमळ सशब्द करणें हें कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे आणि तें पार पाडण्याला तशाच योग्यतेचा मनुष्य पाहिजे. हव्या त्या तत्त्वप्रचारक नाटककारानें आपल्या नाटकांमध्यें हीं तत्त्वें ओढून ताणून, घुसडून देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे हव्या त्या अलबत्या-गलबत्यानें एकादें मंदिर उभारण्याचें काम अंगावर घेण्यासारखेंच आहे. क्रान्तीची आवश्यकता प्रतिपादन करण्याची जरूरी राहिलेली नाहीं; कारण ती स्वयंसिद्ध आहे. मात्र क्रान्तीचीं तत्त्वें अजून महत्कवीच्या हातून महत्कृतींत समाविष्ट झालेलीं नाहींत. एवढें कार्य झालें म्हणजे लेखकांनीं पृथ्वीच्या पाठीवर अस्तित्वांत असणाऱ्या इतर सत्तत्त्वांचें विवेचन खुशाल करावें. पण आज आमचे साहित्यसेवक केवळ दुय्यम दर्जाचें वाङ्मय निर्माण करीत आहेत आणि त्यांचा हा क्रम असाच चालू राहील अशीं चिन्हें दिसत आहेत. त्यांना क्रान्तीची भीति वाटत आहे आणि क्रान्ति हें आमच्या राष्ट्रीय जीवनाचें सारसर्वस्व असल्यामुळें त्यांना आमच्या राष्ट्रीय जीवनाचीच भीति वाटत आहे. पण महत्पदाच्या मार्गाला लागावयाचें असल्यास त्यांनीं या क्रान्तीच्या मूलभूत भावना सशब्द केल्या पाहिजेत. कवींचें हेंच प्रधानकार्य होय.

होय; आणि म्हणूनच–शब्दलालित्यांत गुरफटलेल्या कविबुवांनो, भावी राष्ट्रीय कवि हा तुमच्यापेक्षां फार वेगळ्या दर्जाचा मनुष्य असेल. शब्द-लालित्य व रचनाचातुर्य यांचेंच प्रदर्शन करण्यासाठीं तो काव्यें लिहिणार नाहीं. बाह्यांगाकडे तो जाणून बुजून दुर्लक्ष करील असा याचा अर्थ नाहीं. पण त्याचे अंतःकरणांतील जाज्वल्य तेजामुळें त्याच्या लेखणींतून उमटलेल्या साध्या शब्दांनाही धगधगीत जिवंतपणा प्राप्त होईल. मंजुळ शब्दरचनेच्या मोहानें तो सत्यापासून केव्हांही दूर भटकणार नाहीं; लिहीत असतांना त्याचें अंतःकरण इतकें आनंदित व एकाग्र झालेलें असेल कीं, समर्पक शब्द त्याला आपोआप सुचत जातील. राष्ट्रीय आकांक्षांपासून अलग राहणाऱ्या

नखरेबाज लेखकांनो, तुमच्यापेक्षां अधिक मधुर शब्द व अधिक रम्य रचना त्याच्या काव्यांत प्रकट होतील. त्याचें हृदय संगीत व शौर्य यांनीं भरलेलें असल्यामुळें ज्याबद्दल नुसतीं स्वप्नेंही पडण्याचें तुमच्या नशिबीं नाहीं अशा उच्च स्थानावर त्याचा सदैव निवास होईल; पण तें स्थान तुम्हांलाही प्राप्त करून घेतां येईल. वीरांचा समुदाय कोणीकडे लोटत आहे हें ओळखून तुम्हीही त्या लोंढ्यांत सामील व्हा; आज मर्दांच्या अंतःकरणांत ज्या आकांक्षा स्फुरत आहेत त्या तुम्ही सशब्द करा आणि राष्ट्राच्या विजयाचें तेज वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करा म्हणजे तें उच्च स्थान तुमचेंच आहे. राष्ट्रीय कवीला तुम्हीं आज जुमानलें नाहीं तरी उद्यां त्याला सर्वजण द्रष्टा मानतील. तो तुमच्यासारखा मिजासखोर व जगापासून फटकून राहणारा नाहीं. तुमच्याशीं बंधुभावानें सहकार्य करण्याला त्याचें अंतःकरण ओढ घेत आहे. तो तुमचें हृदय तल्लीन करील, तुमच्या मनांत अभिनव विचार निर्माण करील, तुमच्या वाणीमध्यें तेजाचा संचार करील व तुमचा उद्धार करील. अंतःकरण चैतन्यमय असल्यामुळें सर्व मनोवृत्ति व मनोभावना त्याला समजतील आणि म्हणूनच सर्वांचीं अंतःकरणें खळबळतील व सर्व भावना सशब्द होतील अशीं काव्यें त्याला निर्माण करतां येतील. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं किंवा स्वातंत्र्यरक्षणासाठीं लढाई चाललेली असेल तर त्याच्यासारखा सहचर मिळावयाचा नाहीं. उत्साहानें चार टोले देण्याचें त्याच्या अंगीं सामर्थ्य आहे त्याचप्रमाणें आनंदानें दोन धक्के घेण्याचीही त्याचे अंगीं हिम्मत आहे. त्याच्यासारखा युद्धकुशल वीर मिळणार नाहीं. युद्ध करतांना सूडाच्या बुद्धीनें प्रेरित झालेला नसल्यामुळें त्याचें मुख काळवंडलेलें नसतें. ठोक्यास ठोका हें तत्त्वज्ञान त्याच्या तोंडून कधींही ऐकूं येणार नाहीं. कारण त्यानें हाणलेल्या एका टोल्याला प्रत्युत्तर म्हणून उलटून टोला देण्याचें सामर्थ्य कोणाचे अंगीं आहे ? ज्या विजयाचीं फळें आपल्याला चाखावयाला मिळणार नाहींत अथवा कदाचित् जो विजय आपल्याला नजरेनें दिसणारही नाहीं तो मिळविण्यासाठीं देह ठेवण्यांत त्याला आनंदच वाटेल. उषःकालापूर्वीच्या कालरात्रींत जगावयास त्याचप्रमाणें विजयाच्या पूर्ण प्रकाशांतही देहत्याग करावयास त्याची सिद्धता असेल. पूर्वी आपल्या खाद्यांला खांदा लावून लढणाऱ्या वीरांची कोमल स्मृति त्याच्या अंतःकरणांत सदैव जागृत राहील. मात्र जुन्या शत्रूंबद्दल त्याचे

मनांत द्वेषभाव राहणार नाहीं. उदात्त हृदयाचीं अशीं माणसें अगदींच दुर्मिळ नाहींत ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. शुद्ध औदार्य व उदात्त शौर्य यांचा मूर्तिमंत पुतळा; त्याच्या शब्दांत बंधुप्रीतीमुळें उत्पन्न झालेली सहृदयता व देवदूताला शोभणारी विनोदाची छटा हींच आढळतील. ज्यांनीं त्याचा द्वेष केला ते त्याचे शत्रु आणि ज्यांनीं त्याच्यावर प्रेम केलें ते त्याचे मित्र, या दोघांनाही सोडून आणि आपले आश्चर्यजनक विचार व आनंददायक संगति मागें ठेवून तो आपल्या मार्गानें जाईल.

प्रकरण बारावें

धर्म

ज्या संबंधीं तीव्र मतभेद पूर्वीं अस्तित्वांत होते आणि आजही ज्यांबद्दल रणें माजलेलीं आहेत असे महत्त्वाचे प्रश्न केवळ तात्पुरत्या तडजोडीसाठीं केव्हांही दृष्टीआड करूं नयेत किंवा दिखाऊ ऐक्यासाठीं बाजूला ढकलूं नयेत; हें एक अत्यंत महत्त्वाचें मूलतत्त्व आहे. वादग्रस्त प्रश्न लोंबत ठेवण्याकडे प्रवृत्ति असेल तेथें समेटाची आशा बाळगणें व्यर्थ आहे. आपण असे प्रश्न धैर्यानें विचाराला काढले पाहिजेत; कारण अशा चर्चेमुळेंच परस्पर-विरोधी पक्षांना एकामेकांबद्दल आदर वाटूं लागेल आणि सर्वांना स्वीकारतां येईल असा सन्मान्य समेट निष्पन्न होईल. धर्म हा एक असा महत्त्वाचा, गुंतागुंतीचा व वादग्रस्त विषय आहे. बहुजनसमाजाला हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा वाटतो आणि म्हणूनच आपल्या धर्मावर घाला घालणारांबरोबर निकरानें लढावयास समाज नेहमीं सिद्ध असतो. या बाबतींत आतांपर्यंत इतके हल्ले व निकराचे फेरहल्ले झालेले आहेत कीं, धार्मिक मतें भिन्न असूनही विशिष्ट कार्यासाठीं त्यांकडे दुर्लक्ष करण्यास तयार असलेल्या अठरापगड लोकांना एकत्र आणण्यांतच खरा शहाणपणा आहे असें आम्हांला वाटूं लागलें आहे. हे भिन्न धर्ममतांचे व परस्परांविषयीं संशयानें ग्रासलेले लोक आजपर्यंत एकांमेकांबरोबर केवढ्या तावातावानें भांडत आलेले आहेत हें मनांत आणलें असतां त्यांना थोडा वेळ व विशिष्ट कार्यासाठींच कां होईना, एकत्र जमविणें हीसुद्धां थोडीबहुत प्रगतीच आहे हें कोणालाही कबूल करावें लागेल; पण कोणत्याही कार्यासाठीं एकत्र जमलेल्या माणसांमध्यें विशिष्ट विषय अथवा व्यक्ति यांचा नुस्ता नामोच्चारही करण्याचा आपल्याला धीर नसावा हीसुद्धां मोठ्या नामुष्कीची गोष्ट आहे. असल्या तात्पुरत्या एकीच्या जोरावर फार तर लहानसहान कामें पार पाडतां येतील; पण राष्ट्रस्वातंत्र्याच्या महासंग्रामांत विजयी होण्याला अशी दिखाऊ एकी पुरी पडणार नाहीं. केवळ दृष्टीआड करण्यानें कोणताही गुंतागुंतीचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं. स्वातंत्र्ययुद्ध उभारणें व तें यशस्वी करणें हें आपलें कर्तव्य असल्यामुळें हे प्रश्न सोडविण्याचा आपण

अगोदरपासून प्रयत्न केला पाहिजे. या युद्धाच्या आवेशामुळें सुप्तावस्थेंत असलेले मनोविकार व संशय जागृत होतील; म्हणून भावी संकट टाळण्याची आगाऊ तजवीज आपण केली पाहिजे. ह्या विषयाचा नुस्ता उल्लेख केल्यानेंही आमच्यापैकीं कांहीं लोक क्षुब्ध होतील. कोणी त्रासिक स्वरानें विचारतील; कीं कांहीं कारण नसतां हा विषय मुद्दाम कशाला उकरून काढतां ? उलटपक्षीं कांहीं लोक या प्रश्नाशीं संलग्न असलेले भांडणतंटे मुद्दाम उकरून काढण्याच्या तयारीला लागतील. या परस्पराविरोधी प्रवृत्ति धोक्याची सूचना देण्यास पुरेशा नाहींत काय ? या प्रश्नाकडे डोळेझांक करून स्वातंत्र्ययुद्धाला एकदम सुरुवात करण्यानेंच आपण विजयी होऊं असें म्हणावयाला कोण तयार आहे ? आज ज्या दुहीची आपल्याला नुस्ती भीति वाटत आहे ती आणीबाणीच्या वेळीं आपल्यापुढें प्रत्यक्ष स्वरूपांत उभी राहणें हें संकट नाहीं काय ? आज आपण या प्रश्नाकडे निवळ काणाडोळा करीत आहों; ही वृत्ति सोडून आपण ह्या प्रश्नाला धैर्यानें हात घालूं या. मी जें सांगणार आहें तें ऐकून कोणींही भडकून जाऊं नये किंवा कोणींही भेदरून जाऊं नये. कारण कोणालाही कोणत्याही प्रकारानें गुंतविण्याचा माझा इरादा नाहीं, परस्पराविरोधी पक्षांना एकामेकांबद्दल आदर वाटावा आणि एकामेकांची विचारसरणी समजावी एवढ्यासाठींच हें प्रकरण लिहिलेलें आहे. त्यांनीं एकामेकांविरुद्ध उठावें या कल्पनेनें हें लिहिलेलें नसून सर्वांनीं "उदारमतवादी" व्हावें म्हणजे आपल्या ढिलाईमुळें तिरस्करणीय व्हावें असा तर माझा मुळींच हेतु नाहीं. जेथें ठाण मांडलेलें असेल तेथून रेसरभही ढळणार नाहींत असे योद्धे आम्हांला हवे आहेत—पण ठाणावरून न ढळणाऱ्या आपल्या शत्रूंबद्दलही आदरभाव बाळगण्याइतकें ज्यांचें अंतःकरण उदार व विशाल आहे असेच योद्धे आम्हांला हवे आहेत. सर्व पक्षांनीं सत्यनिष्ठ व धैर्यशील असावें, यांतच सर्वांच्या स्वातंत्र्याची हमी आहे. आपण ह्याच तत्त्वाचा पुरस्कार केला पाहिजे. धर्मासंबंधीं विचार करतांना सहिष्णुतेला अजिबात फांटा द्यावयाचा अशीच सर्वांची वृत्ति असल्यामुळें या विवेचनानें कोणाचेंही यत्किंचितही समाधान न होण्याचा संभव आहे; पण त्यामुळें हा प्रश्न सोडविण्याची आवश्यकता किती तीव्र आहे एवढेंच स्पष्ट झालें तरीही तें पुरेसें आहे. पुन्हा मूळपदावर यावयाचें म्हणजे आपण या प्रश्नाला तोंड दिलेंच पाहिजे. मात्र त्याचा विचार सहानुभूतीनें,

सहिष्णुतेनें, धैर्यानें व निश्चयानें केला पाहिजे. धैर्य व दृढनिश्चय यांचा त्याग म्हणजेच सहानुभूति, अशी कांहीं लोकांची कल्पना असते तर उलटपक्षीं यत्किंचितही विरोध करणाऱ्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना चिरडून टाकण्यांतच निश्चयाचें बळ आहे अशी कित्येकांची समजूत असते. पण अशा निष्ठुरपणामुळें दुर्बलांचें दौर्बल्यच वाढत जातें. हा प्रश्न किती गुंतागुंतीचा आहे हें दाखविण्यासाठींच मी या मुद्द्यांचा उल्लेख करीत आहें. या प्रकरणांतील विवेचनामुळें कोणाचेंही समाधान झालें नाहीं तर एवढेंच म्हणावें लागेल कीं, अवतारी पुरुषाची दिव्यदृष्टि आणि देवदूताचा समतोलपणा अंगीं असल्याशिवाय या मार्गावरून पाय घसरल्याशिवाय चालतां येणें शक्य नाहीं.

ज्या मतांची सत्यता आपण वितंडवादानें सिद्ध करूं पाहतों. तीं आचरणांत उतरवून त्यांची सत्यता आपण सिद्ध करून दाखवावी. जें आपण बाह्यात्कारीं भासवतों तेंच अंतर्यामींही असावें. आपलीं मतें व आपला जीवनक्रम यांमध्यें सुसंगतता आहे हें सिद्ध करण्यासाठीं शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या दुष्टपणाचा पुरावा पुढें करण्याचा प्रसंग आपणांवर येऊं नये. धर्माच्या बाबतींत मनुष्यमात्रानें कमींत कमी एवढें तरी केलेंच पाहिजे. या मागणींत अवास्तव, अप्रस्तुत किंवा नवें असें कांहींच नाहीं. स्पष्टपणें दिसणाऱ्या कर्तव्यांचेंही पुनःपुन्हा स्पष्टीकरण करणें आज आम्हांला भाग पडत आहे. कितीही प्रामाणिकपणानें या विषयाची मनमोकळी चर्चा केली तरी कित्येकांचा जळफळाट होण्याचा संभव आहे; पण या बाबतींत सर्व पक्षांकडे सारखाच दोष आहे हें दाखवून दिलें असतां कळकळीची चर्चा होऊन कांहीं तरी इष्ट निर्णय निष्पन्न होईल या आशेनेंच मी हें लिहीत आहें. आजपर्यंत आपण एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत आलों आहोंत आणि त्या सर्व आतां आपणां सर्वांच्या परिचयाच्या झाल्या आहेत. त्या बाजूला ठेवून सर्वांनीं आपल्या पायाखालीं काय जळतें आहे हें पाहण्याचा आणि आपल्याच घरांतील अंदाधुंदी नाहींशी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अज्ञेयवादाच्या या नटव्या काळांत प्रॉटेस्टंट व रोमन कॅथलिक या दोन्ही पंथांनीं एकमतानें जाहीर केलें आहे कीं, निरीश्वरवाद आणि समाजसत्तावाद या दोन पाखंडांच्या प्रादुर्भावामुळेंच सर्वत्र धर्मग्लानि पसरली आहे. सर्व पंथांनीं स्वतःचेंच नाणें पारखून पहावें म्हणजे या धर्मग्लानीचें खरें खरें कारण

स्पष्ट होईल एवढीच आमची सूचना आहे. या सूचनेमुळें अज्ञेयवादी शेफारून जाऊं लागले तर त्यांना शुद्धीवर आणण्यासाठीं एवढेंच सांगितलें असतां पुरें होणार आहे कीं, आजपर्यंत आपल्या मतांचें समर्थन करण्या-जोगी एकही गोष्ट तुमच्या हातून झालेली नाहीं. सर्वांचेच मार्ग चुकलेले आहेत असें आरंभींच जाहीर करून सर्वांची एकी करण्याची आशा धरणें, ही पद्धत प्रथमदर्शनीं जरा विचित्र वाटण्याचा संभव आहे. मुख्य मुद्दा हा कीं, वेगवेगळ्या धर्मपंथांचा ज्या धर्मतत्त्वांवर विश्वास आहे तीं तत्त्वें चुकीचीं आहेत अशा आग्रहानें हा हल्ला चढविण्यांत आलेला नाहीं. आमचें एवढेंच मागणें आहे कीं, आपल्या धर्मतत्त्वांची सत्यता तुम्ही आपल्या वर्तनानेंच सिद्ध करून दाखवा. ही विनंति असमंजसपणाची नाहीं. शक्य तेवढ्या नम्रपणानें आणि कळकळीनें ही मागणी करण्यांत येत आहे आणि खऱ्या कळकळीच्या विनंतीनें खऱ्या कळवळ्याच्या माणसांचे मनांत सहानुभूति उत्पन्न होईल. उच्चतर आयुष्याचे नियम पाळण्याचा, प्रत्येकानें आदर्श होण्याचा मनापासून निश्चय केला तर सर्वांना परस्परांबद्दल प्रेमभाव वाटूं लागेल आणि जग नंदन-वनासमान होईल.

बऱ्याच दिवसांपासून आमच्या धार्मिक संस्था पैशाच्या पाठीमागें लागल्या आहेत आणि त्यांची प्रवृत्ति वाढत्या प्रमाणावर आहे; ही गोष्ट अत्यंत उद्वेगजनक आहे. या मुद्द्याचें सांगोपांग विवेचन करावयास एकादा स्वतंत्र ग्रंथही पुरा पडणार नाहीं म्हणून मी त्याचा फक्त उल्लेख करीत आहें, धर्म-संरक्षणासाठी स्थापन झालेल्या संघांचें आणि स्वयंभू पुढाऱ्यांचें लक्ष खुद्द धर्माकडे नसून संघामार्फत काम करणाऱ्या धर्मप्रचारकांची संख्या वाढविण्या-कडे आणि संघाची सांपत्तिक स्थिति सुधारण्याकडे आहे. मानमान्यता मिळविलेला एकादा प्रॉटेस्टंट पंडित आपल्या पंथाचा मोठेपणा व कार्य-क्षमता सिद्ध करून दाखविण्यासाठीं जाडा ग्रंथ लिहून काढतो; त्याला प्रत्युत्तर म्हणून तेवढ्याच दर्जाचा कॅथलिक शास्त्री आणखी एक ग्रंथ लिहून आपल्या पंथाचा मोठेपणा सिद्ध करून दाखवतो. या हल्ल्याप्रतिहल्ल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या लाथाळींत दोघांचीही बेअब्रू आहे हें त्यांपैकीं एकाच्याही लक्षांत येत नाहीं. धर्माचें कार्य आत्मिक, केवळ आत्मिक आहे; धर्म या शब्दाच्या

उच्चारानें या व्यतिरिक्त दुसऱ्याच कल्पना मनांत येऊं लागल्या म्हणजे खऱ्या धर्मापासून आपण च्युत झालों आहोंत असें खुशाल समजावें. 'जें तुला अत्यंत प्रिय वाटत असेल तेथेंच तुझें अंतःकरण आहे'. 'परमेश्वर व सैतान या दोघांचीही सेवा मनुष्याला करतां येत नाहीं'. या जुन्या तत्त्वांना प्रत्युत्तर म्हणून हल्लीं एक नवी म्हण प्रचारांत आलेली आहे; 'पोटाची खळगी भरण्याची विवंचना प्रत्येकाच्या पाठीला लागलेली आहे', या म्हणीचा हल्लींच्या जीवनकलहाच्या काळांत कोणालाही विसर पडणें शक्य नाहीं. अत्यंत चिंताजनक गोष्ट ही आहे कीं, सत्प्रवृत्तीचीं माणसेंही उच्चतर ध्येयांचा त्याग करून या रुपये-आणे-पैच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करूं लागलीं आहेत. आणि लोकांच्या धार्मिकपणाचा फायदा घेऊन स्वतःच्या तुंबड्या भरण्याकडेच धर्मगुरूंचें लक्ष एकाग्र होऊं लागलें आहे. व्यक्तिमात्राला जगण्याचा हक्क आहे आणि प्रत्येक माणसाला जीवधारणाचीं साधनें उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणें हें नागरिक व समाजघटक या नात्यानें आपलें कर्तव्य आहे. धर्मप्रचारकांना अंगभर वस्त्र व पोटभर अन्न मिळेल अशी तजवीज आपण केली पाहिजे; पण धर्मरक्षणासाठीं अस्तित्वांत आलेल्या संस्था एकामेकांबरोबर चुरशीनें चढाओढ करूं लागतील तर तिचा शेवट अधम स्वार्थांत आणि चैनीच्या हव्यासांतच होणार हें उघड आहे; आणि याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे जग हीन, निर्दय व पाशवी होणार, हें अनुमान साध्या तर्कानें सहज काढतां येईल. वरकरणी सबळ दिसणाऱ्या कारणांमुळें उच्च प्रवृत्तींचे लोकही या वातकी स्पर्धेमध्यें वाढत्या प्रमाणांत भाग घेत आहेत हें स्पष्ट आहे आणि या प्रकाराकडे डोळेझांक करणें ही घोडचूक आहे. मार्ग चुकल्यामुळें त्यांचा उत्साह फुकट वहावत आहे. 'उच्चतर ध्येय गांठण्यासाठीं उत्साहानें झटा' हें प्रेषितांचें वचन आपणां सर्वांना खरा मार्ग दाखविण्यासाठींच उच्चारण्यांत आलें आहे.

सामान्य ख्रिस्ती माणसाची अज्ञेयवादाविषयीं जी वृत्ति असते तिचें परीक्षण करण्याची माझी इच्छा आहे. निराश झालेला असतांना तो आर्त स्वरानें आरोळी ठोकील कीं, पहा हो, सर्व जग सद्धर्मापासून च्युत होत चाललें आहे. मात्र या धर्मग्लानीला आपण स्वतः कितपत कारणीभूत झालों आहों याचा

तो क्षणभरही विचार करणार नाहीं. या दृष्टीनें विचार केला तर धर्मग्लानीचें खरें कारण त्याचें त्यालाच कळून येईल. समाजाच्या प्रवृत्तींसंबंधीं बोलतांना निरीश्वरवाद, समाजसत्तावाद, अधर्म वगैरे विषयांबद्दल तो बेजाबबदार व अर्धवट विधानें ठोकून देईल. धर्मग्लानीचें कारण स्वतःच्या व्यतिरिक्त कोठें तरी आहे आणि तें आपल्याला विरोध करीत आहे असेंच तो प्रतिपादन करील, आपण स्वतः अंशतः तरी तिला कारणीभूत झालेले आहों हें तो केव्हांही कबूल करणार नाहीं. माझें त्याला एवढेंच सांगणें आहे कीं, ईश्वराचें अस्तित्व नाकारणाऱ्या त्या पाखंड्याला थोडा वेळ बाजूला ठेव आणि अधिक महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करूं लाग. कॅथलिक व प्रॉटेस्टंट या दोनही धर्मपंथांत असे अनेक लोक आहेत कीं, ज्यांचे अंगीं एकाद्या पाखंड्या-इतकीच धर्मभावना आहे; त्यांना धर्मशास्त्रांतलीं वचनें मुखोद्गत असतील पण त्यांच्या आचरणांत त्यांपैकीं एकही तत्त्व उतरलेलें दिसणार नाहीं; प्रतिपक्षावर टीकेचा भडिमार करतांना पुन्हा पुन्हा उच्चारून दाखविणें, एवढाच या वचनांचा उपयोग आहे असें ते आपल्या वर्तनानें दाखवितात. त्यांना जें स्वातंत्र्य दिलेलें आहे त्याचा उपयोग ते कशासाठीं करतात ? दारू, जुगार व चैन यांसाठीं; सत्कृत्यांना त्यांच्या आयुष्यांत स्थानच नाहीं, इतकेंच नव्हे तर सद्वर्तनाबद्दल ते तिरस्कार मात्र व्यक्त करीत असतात. असें असूनही त्यांना जुन्या वळणाचे धार्मिक लोक गणण्यांत येतें. कॅथलिक लोक आपल्या कोत्या धार्मिकपणाचें दर रविवारीं देवळांत जाऊन प्रदर्शन करतात, मात्र त्यांचें अंतःकरण प्रार्थनेंत नसतें; येतांना ते शक्य तितका उशीर करतात आणि शक्य तितक्या लवकर निसटून जातात. प्रॉटेस्टंट लोक तर बिनदिक्कतपणें बोलून दाखवितात कीं, देवळांत प्रार्थनेला जाणें अथवा पोथ्यापुराणें हरिदासांच्या तोंडून ऐकणें हें बायकांचें काम आहे. स्वतःबद्दलच्या त्यांच्या कल्पना किती चढेलपणाच्या आहेत हें या बोलण्यावरून स्पष्ट होतें. अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं, निरीश्वरवाद्यांचा धिक्कार करतेवेळीं, त्यांचीं तत्त्वें असत्य आहेत हें सिद्ध करून दाखवितेवेळीं, प्रॉटेस्टंट व कॅथलिक हे दोघेही एक होऊन त्यांच्यावर हल्ला चढवितात. असेच लोक आमच्या धार्मिक संस्थांमध्यें भरलेले आहेत. हे लोक धर्माचे आधारस्तंभ आहेत, सद्धर्माचे खरे अनुयायी आहेत असें म्हणून आपण त्यांची नसती खुशामत मात्र करीत आहों.

याच्च धर्मसंस्था नास्तिकांवर बहिष्कार घालण्यासाठीं मोठ्या आवेशानें बडीं ग्रामण्यें उभारतात. बहिष्कृत झालेले व बहिष्कार घालणारे हे दोघेही कवडी किंमतीचे लोक आहेत असें अनेक वेळां दिसून येतें. पण कांहीं नास्तिकांचेंही चारित्र्य उदात्त असतें, धर्माबद्दल त्यांच्या व आपल्या कल्पना भिन्न असतील पण ज्या राजकीय व सामाजिक तत्त्वांमुळें उच्चतर जीवन उत्क्रांत होईल अशी त्यांची निष्ठा असते, त्यांना मूर्त स्वरूप देण्यासाठीं झगडण्याची व आत्मयज्ञ करण्याची त्यांची तयारी असते. त्यांची सत्यनिष्ठा बावनकशी असते आणि त्यांची मैत्री जोडण्यांत अनेक चांगल्या माणसांना भूषण वाटतें. पण आजची परिस्थिति इतकी विपरीत झालेली आहे कीं, अशाही माणसांची जुगाऱ्यांनीं चेष्टा करावी, बदमाषांनीं मस्करी करावी, उडाणटप्पूंनीं नालस्ती करावी, कीं समाजाच्या अस्तित्वावरही गदा आणणाऱ्या समाजकंटकांनीं त्यांच्यावर हव्या त्या दोषारोपांचे शिंतोंडे उडवावे. नास्तिकांच्या पाठीवर कोरडे उडवावयास आम्ही सिद्ध आहों पण ज्यांचे अंगीं तत्त्वनिष्ठेचा लेशही नाहीं आणि ढोंगीपणा मात्र भरपूर आहे अशा लोकांना–फक्त ते धार्मिकपणाचें स्तोम माजवितात म्हणून–त्यांच्या बदफैलीपणाबद्दल फैलावर घेण्यास मात्र आमची तयारी नाहीं. बहिष्कृत नास्तिकाला या लोकांबद्दल काय वाटत असेल ? जुन्या वळणाच्या लोकांचे अंगीं असलेले दुर्गुण व हलकेपणा स्पष्टपणें दिसत असूनही चांगले लोक त्यांची खुशामत करीत आहेत हें पाहून आपलीं मतें चुकींचीं आहेत अशी कल्पना तरी त्यांच्या मनांत कशी उद्भवेल ? दयाशीलता हा सद्गुण आहे आणि दयेच्या माधुर्यानें हृदयाला झालेल्या जखमा भरून येतात असें नीतितत्त्व आहे पण विचाऱ्या नास्तिकाच्या वांट्याला दया कधींच येत नाहीं. आम्ही त्याला शिव्याशाप देतों, त्याच्याशीं अत्यंत अन्यायाचें वर्तन करतों, त्याच्याबरोबर आम्ही एकादा शब्द बोललोंच तर त्यांत सभ्यतेचा लेशही नसतो पण विषारी कडवटपणा मात्र भरपूर भरलेला असतो; आम्ही ढोंग व फसवेगिरी यांच्या डबक्यांत डुंबत आहों आणि हे नास्तिक लोक आमच्यापासून एवढे फटकून कां राहतात याचें आश्चर्य करीत आहों. कॅथलिक व प्रॉटेस्टंट या दोनही पंथांमध्यें उच्च ध्येयार्चीं अनेक चांगलीं माणसें आहेत हें उघड आहे; पण महत्त्वाचा मुद्दा हा आहे कीं, अत्यंत धार्मिक व अत्यंत ढोंगी असे दोघेही वेळीं अवेळीं नास्तिकांविरुद्ध कल्लोळ उडवतात आणि त्यांचेकडे एकाच दृष्टिकोनानें पाहतात. त्यांनीं

अगोदर स्वतःची सुधारणा करावी; पठाणी सावकारांना व बदमाष बडव्यांना त्यांनीं आपल्या देवळांतून अगोदर हुसकावून द्यावें; स्वतःच्या शेताची नीट मशागत करून त्यांत चांगलें पीक येईल अशी तजवीज करावी; 'ज्या झाडाला चांगलीं फळें येत नाहींत तें तोडून विस्तवांत फेंकावें', हें वचन नास्तिक व घुराणमताभिमानी या दोघांनाही उद्देशून उच्चारलेलें आहे हें सर्वांनीं ध्यानांत धरावें.

स्वतःला अज्ञेयवादी म्हणवून घेणारांबद्दलही दोन शब्द सांगितले पाहिजेत. अर्थात् विचारशील व कळकळीच्या अज्ञेयवाद्यांनाच उद्देशून हें लिहिलेलें आहे; स्वतःला समजत नसलेल्या गोष्टींबद्दल बाष्कळ बडबड करणाऱ्या टारगट टीकाकारांबद्दल एक शब्दही न बोललेलें बरें. खोल दृष्टीनें पाहिलें असतां दिसून येईल कीं, कळकळीचीं माणसें मग त्यांचीं वैयक्तिक मतें कोणतींही असोत; सत्कार्य करतांना परस्परांबरोबर सहकार्य करण्याला नेहमीं तयार असतात, किंबहुना स्वतःला माहीत नसतांही ते एकामेकांना त्यांच्या कार्यांत मदतच करीत असतात. अज्ञेयवाद्यांना घुराणमताभिमान्यांमध्यें दारूबाज, जुगारी, बदफैली माणसें दिसलीं असतील; अंतःकरणांत श्रद्धेचा अभाव असल्यामुळें धर्मांबद्दल त्यांच्या तोंडून निघालेल्या कटु शब्दांचा धर्मोपदेशकांनीं आज्ञापत्रें काढून निषेध केला असेल आणि याला प्रत्युत्तर म्हणून बायकापोरांचें समाधान करूं शकणाऱ्या गप्पांना आम्ही बिचकणार नाहीं असें अज्ञेयवाद्यांनीं जाहीर केलें असेल. त्यांना माझें एवढेंच सांगणें आहे कीं, या प्रकाराच्या दुसऱ्या व चांगल्या बाजूकडेही एकवार नजर फेंका. युद्धशास्त्राचें ज्ञान मिळविलेलें असेल तर त्यांना माहीतच असेल कीं सैन्याच्या प्रत्येक पथकांत थोडींबहुत लुटारू गिधाडें असावयाचींच; युद्ध सुरू झालें आणि जीव धोक्यांत घालण्याचा प्रसंग आला कीं हे बाजारबुणगे बाजूला राहतात आणि खरे लढवय्ये तेवढेच धुमश्चक्रीसाठीं पुढें होतात. कांहीं कुचकामी लोक मानसन्मानाच्या व प्राप्तीच्या जागा अडवून बसलेले असतील, पण धर्माचें खरें तेज इतरत्र आहे आणि धर्माला तेज खास आहे एवढें त्यांनीं मनांत बाळगावें. फक्त बायकाच नव्हे तर अत्यंत बुद्धिमान् पुरुषही परंपरेला

मानतात. न्यूमन‡ व पास्कल, डँटे* व मिल्टन†, एरिजेना× व एक्विना† वगैरे महात्मे अनेक वर्षांपूर्वीं हें जग सोडून गेले पण आजमितीसही त्यांच अनेक अनुयायी आपल्यामध्यें आहेत. चेस्टरटन+ व थामसन ÷ यांच्या लेखनांतही परंपरेला मान्यता दिलेली दिसून येते. निर्णयात्मक मत बनविण्यापूर्वीं थोडा वेळ या मुद्द्याचा विचार करा एवढेंच माझें ह्या अज्ञेयवाद्यांना सांगणें आहे. आजूबाजूला दिसणाऱ्या अनेक विसंगत गोष्टींमुळें त्यांच्या मनाचा गोंधळ उडालेला असेल, फक्त हलक्या दर्जाच्या लोकांच्या मनोवृत्तीचेंच त्यांनीं निरीक्षण केलेलें असेल, त्यांच्या कानांत पॉलच्या एखाद्या नालायक वंशजाचे शब्द घुमत असतील; यावर विसंबून ते विचारतील कीं, या हीनपणाला आळा घालणें इष्ट नाहीं काय? या प्रश्नाला उत्तर हेंच आहे कीं, चालू पिढींत हाच प्रश्न विचारणारे अनेक लोक आहेत आणि हल्लींची परिस्थिति कितीही विकट असली, तरी अखेर आपण विजयी होणारच याबद्दल त्यांना तिळमात्रही शंका नाहीं.

---

‡ न्यूमन (१८०१–१८९०)–इंग्लिश धर्मगुरु आणि डब्लिन कॅथलिक विश्वविद्यालयाचा कार्यवाह. 'आयडिया ऑफ ए युनिव्हार्सिटी' या विख्यात ग्रंथाचा कर्ता.

* डँटे (१२६५–१३२१)–इटालियन महाकवि 'डिव्हाइन कॉमेडी' या महाकाव्याचा कर्ता.

† मिल्टन (१६०८–१६७४)–आंग्ल महाकवि व मुत्सद्दी 'पॅराडाइज लॉस्ट' या महाकाव्याचा कर्ता.

× एरिजेना (८००–८७७)–मध्ययुगांतील तत्त्ववेत्ता. पॅरिस येथील विश्वविद्यालयाचा संस्थापक.

† एक्विना (१२२७-१२७४)–प्रसिद्ध तत्त्वज्ञानी. शिक्षणस्वातंत्र्यासाठीं यानें फार धडफड केली.

+ चेस्टरटन–जन्म १८७४. विख्यात इंग्रज लेखक, नाटककार व सुप्रसिद्ध टीकाकार.

÷ थामसन् (१८६०–१९०७)–आंग्ल कवि. १८९३ सालीं भुकेनें व्याकुळ झालेला असतांना त्याच्या रसिक मित्रांनीं त्याला वांचवून प्रसिद्धीस आणलें.

पुराणमतवादी ख्रिश्चन व ख्रिश्चनेतर यांनींही परिस्थितीचें नीट परीक्षण करावें. कट्टे सनातनी व कट्टर सत्यशोधक यांच्या लढ्यामुळें धार्मिक तत्त्वांबद्दल वायफळ वाद मात्र माजलेला आहे. तीं तत्त्वें आचरणांत आणण्याकडे एकाचेंही लक्ष नाहीं. प्राचीन काळीं अस्तित्वांत असलेलें धार्मिक तेज पुनर्जागृत करण्यासाठीं प्राचीन हुतात्म्यांची कळकळ व साधेपणा पुन्हा निर्माण केला पाहिजे. ख्रिश्चन हुतात्म्यांनीं नेरोला* नास्तिक म्हटलें हें आतां आपल्या मनांतही येत नाहीं. पण मृत्यूच्या जबड्यांत ते निर्भयपणें आणि स्तोत्रें गात गात प्रविष्ट झाले, ह्याचा जगाला कधींही विसर पडणार नाहीं. त्याचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवलें तर बाष्कळ टीका करण्याचें आपल्या मनांतही येणार नाहीं आणि त्यांच्या त्या गायनांतलें दिव्य तेज पुनर्जागृत होईल. प्राचीन काळच्या जीवनांत आढळणाऱ्या समाधानाची संगति लावण्यासाठीं नव्या तत्त्वज्ञानाची जरूर नाहीं. त्यामध्यें जिवंतपणा होता; हें पुराणमताभिमान्याला पटतें म्हणूनच तो परंपरेला बिलगून राहतो. त्या काळाची स्मृति आज अगदीं अंधुक झालेली असली तरी त्याला त्याचें दैदीप्यमान तेज दिसल्यावांचून रहात नाहीं. त्यामध्यें त्याला अनंताचा विस्तार दिसून येतो. त्या वेळीं सृष्टीवर माध्यान्हाचा सूर्यप्रकाश पसरलेला होता असें त्याला वाटतें. त्या काळाच्या चिंतनांत तल्लीन झालेला असतांना त्याला वाटतें कीं, जें जें आश्चर्यजनक आहे त्याला त्याचाच संपर्क झालेला आहे आणि जें जें सुंदर आहे तें त्याचेंच रूप आहे; पर्वतशिखरांवरून येणाऱ्या शुद्ध आणि जीवनदायी वायूच्या निश्वासांत त्याचेच निनाद घुमत आहेत, सूर्यप्रकाशांत गात गात गिरक्या घेणाऱ्या पांखरांच्या गोड गाण्यांत त्यांतील संगीत वसंतऋतूंतील प्रभातकाळच्या उल्हासांत त्यांतील आनंद आणि सर्व सुंदर वस्तूंच्या वैभवांत त्याच्याच तेजाची छटा प्रगट झालेली आहे असें त्याला वाटतें. त्या तेजामुळें पवित्र झालेलें त्याचें हृदय, अनेक वर्षांपूर्वी आणि अनेक देशां-

---

* नेरो (३७–६८)— रोमचा बादशहा. यानें आपल्या आईचा खून केला व रोमला आग लावली. रोगराईमुळें देशांतील असंतोष तीव्र होऊन त्याचा खून करण्यासाठीं स्वार आले; पण त्यांच्या तावडींतून सुटून त्यानें आत्महत्या केली.

मध्यें आत्मयज्ञ करणाऱ्या व हालअपेष्टा भोगणाऱ्या हुतात्म्यांशीं एकरूप होतें. तो कोणाचाही इनकार करीत नाहीं. 'जे न्यायी आहेत त्यांचा नाहीं तर जे पापी आहेत त्यांचा उद्धार करण्यासाठीं मी अवतरलों आहें' हे शब्द त्याच्या मनासमोर उभे राहतात आणि ज्यांचा छळ झाला त्या पुराणमताभिमान्यांचाच नव्हे, तर ज्यांनीं छळ सोसला त्या नास्तिकांचा व काफरांचाही त्याच्या औदार्यांत अंतर्भाव होतो.

मी दाखवीत आहें त्या दिशेनें प्रयत्न झाला तर तो ताबडतोब यशस्वी होईल असें माझें म्हणणें नाहीं. विरुद्ध पक्षांतील माणसांमध्येंही कळकळ आहे असें मान्य करणारीं आणि सहानुभूतिपूर्वक विचार करणारीं माणसें मिळालीं तरीही या कामांत पाऊल पुष्कळच पुढें पडलें असेंच मी समजेन. धर्म व तत्त्वज्ञान यांसारख्या विषयांमध्यें पुष्कळ गुंतागुंतीचे व तीव्र मतभेदाचे प्रश्न उपस्थित होतात; या प्रश्नांचा विचार करतांना संकोचाला फांटा देऊन औदार्य व सहिष्णुता यांवर भिस्त ठेवली पाहिजे. असें झालें म्हणजे पाखंड्यांना त्रास देण्यापेक्षां आपलीं धर्मतत्त्वें आचरणांत आणण्याकडेच पुराणमताभिमानी अधिक लक्ष पुरवूं लागतील आणि बेजबाबदार व तिरस्करणीय अशा तीव्र टीकांपेक्षां अधिक आदरणीय असें उदाहरण पाखंड्यांपुढें ठेवल्याचें श्रेय त्यांना मिळेल. त्या तत्त्वांच्या सत्यतेबद्दल कदाचित् त्यांची खात्री पटणार नाहीं पण त्यामुळें ते आपली तिरस्कारबुद्धि खास सोडून देतील. धर्माच्या बाबतींत मतभेद हे होणारच आणि दुसरा कांहीं अधिक चांगला मार्ग निघाला नाहीं तर या मतभेदांमुळें परस्परविरोधी पक्षांमध्यें तंटेभांडणेंही होणारच. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं अखिल राष्ट्राला निकराचें युद्ध लढावें लागेल आणि अशा आणीबाणीच्या वेळीं धर्मभेदामुळें आपसांत यादवी माजली तर आमचा सर्वनाश खास होईल; आणि म्हणूनच हा प्रश्न आपण अगोदर सोडविला पाहिजे. या गंभीर विषयाची अत्यंत मनमोकळेपणें चर्चा होणें अत्यंत जरूरीचें आहे असें मी म्हणतों तें याच कारणासाठीं. कार्यसिद्धीला इष्ट अशा मनोवृत्तीनें चर्चेला सुरवात झाली कीं, मग कसलीच घास्ती उरणार नाहीं—कारण बहुतेक सर्व लोकांच्या अंतःकरणाला सत्कार्याची ओढ लागलेली असते. गंभीर धैर्य व तीव्र कळकळ यांचीच आज फार जरूर आहे; अंतर्यामांत न शिरतां वरवर उकराउकर करणाऱ्या माणसांमुळेंच कडवे दावे

उपस्थित होतात. आपल्या प्रयत्नामुळें व्यक्तिमात्राच्या हक्काला संपूर्ण सुरक्षितता मिळाली–आणि आपल्याला हें कार्य केलेंच पाहिजे–तर आपल्याला सर्वांचा विश्वास सहज संपादन करतां येईल आणि शौर्यानें व भलाईनें भरलेला भविष्यकाळ निर्माण करण्याची आशा बाळगतां येईल. आरंभींच्या अव्यवस्थेंतून परमेश्वरानें सुव्यवस्था निर्माण करून सृष्टीची रचना केली; त्याच प्रकाराची पुनरावृत्ति होऊन हा भविष्यकाळ आदिसौंदर्याच्या किरणांनीं उज्ज्वल होईल.

टीप—हे निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले तेव्हां ग्रंथकर्त्यानें प्रस्तावनेंत या प्रकरणासंबंधीं जोडलेल्या टीपेंतील मुख्य मुद्दे:—

आयर्लंडांत माजलेले धार्मिक लढे इंग्लिश मुत्सद्द्यांनीं देशांत दुही माजविण्यासाठीं जाणूनबुजून उपस्थित केलेले आहेत. कॅथलिक लोकांचें सामर्थ्य कमी करण्यासाठीं प्रॉटेस्टंट लोकांना त्यांचेविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला. अर्थात् हल्लींची दुही अस्वाभाविक आहे. ती आमच्या शत्रूंनीं आम्हांला पारतंत्र्यांत दडपून ठेवण्यासाठीं उपस्थित केलेली आहे आणि म्हणून राजकीय स्वातंत्र्य प्राप्त होतांच आमच्यांतली यादवी आपोआप नष्ट होईल. वेगवेगळ्या जातींनीं व धर्मपंथांनीं आपापल्या संस्था संघटित केल्या; पण त्यांचा उपयोग मात्र राजकीय सामर्थ्य मिळविण्यासाठींच करण्यांत आला. आतां हा मार्ग सोडून देऊन आयर्लंडनें लोकसत्तेच्या संस्थापनेसाठीं नवीं शस्त्रास्त्रें निर्माण केलीं आहेत.

प्रकरण तेरावें

विचारस्वातंत्र्य

युरोपांतल्या दुसऱ्या कोणत्याही देशांतल्यापेक्षां आयर्लंडांत अधिक विचार-स्वातंत्र्य आहे असें मीं सांगितलें तर पुष्कळांना आश्चर्य वाटेल. अप्रमाण वादांतच खरें विचारस्वातंत्र्य आहे असा समज हल्लीं होत आहे; पण अप्रमाण वादाची विचारसरणी व खरें विचारस्वातंत्र्य यांमध्यें जमीन-अस्मानचा फरक आहे. स्वतंत्र विचार व अंधश्रद्धा यांमध्यें आहे तेवढाच फरक या दोहोंमध्यें आहे. हा मुद्दा सर्वमान्य होण्यासारखा नाहीं; पण त्याच्या चर्चेनें वातावरण मोकळें होईल आणि कोणत्याही प्रकारच्या स्वातंत्र्याला मूलभूत असलेल्या आत्मिक स्वातंत्र्याच्या विकासाला आडवे येणारे विरोध नाहींसे करण्याचे कामीं मदत होईल.

अप्रमाणवादाच्या तत्त्वांवर टीका करण्याची माझी इच्छा नाहीं; पण विचारस्वातंत्र्याची चर्चा करतांना आपल्याला त्यांचेकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. अप्रमाणवादासंबंधीं लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे कीं, त्या-अन्वयें तुम्हांला अनेक गोष्टींसंबंधीं स्वतंत्र मतें बनाविण्यास मोकळीक आहे. पण ईश्वरप्रणीत धर्मासंबंधीं मात्र त्यामध्यें अशी सवलत ठेवलेली नाहीं. अशा जळत्या प्रश्नामुळें निर्माण होणाऱ्या पक्षांमध्यें वितंडवादी व दुराग्रही माणसें दोन्ही पक्षांत असतात हें दाखविण्यासाठींच मी या मुद्द्याचा उल्लेख करीत आहें. कोणी एकाद्या प्रश्नाविषयीं निश्चितपणें होकारार्थीं मत देऊं लागला तर त्याला तितक्याच जोरांत नकारार्थीं प्रत्युत्तर देण्यांत येतें. वेगवेगळ्या पक्षांच्या दुराग्रहावर टीका करणें हें आमचें काम नाहीं; पण चालू प्रश्नासंबंधीं स्पष्ट कल्पना येण्यासाठीं एवढेंच ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, तुम्ही स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीनेंही कांहीं तत्त्वें प्रमाणभूत मानूं लागाल तर कट्टे अप्रमाणवादी तुम्हांला तेवढेंही स्वातंत्र्य देण्याला नाकबूल आहेत असें तुम्हांला आढळून येईल. अर्थात् स्वतंत्र विचारांचा पुरस्कार करणारे अप्रमाण-वादीही दुराग्रही आहेत; पण ही गोष्ट त्यांच्या ध्यानांतही येत नाहीं. स्वातंत्र्य हें स्वयंसिद्ध आहे, त्याचें प्रामाण्य सिद्ध करावयाला घुरावा नाहीं.

कोणत्याही तत्त्वाला प्रमाण न मानण्यांतच स्वातंत्र्य आहे. त्यावर कोणत्याही कायद्याचें बंधन नाहीं, वगैरे कल्पना मुळांतच चुकीच्या आहेत. 'वाऱ्यासारखा स्वतंत्र' असा शब्दप्रयोग लोकांच्या बोलण्यांत आहे-पण खुद्द वारा तरी कुठें स्वतंत्र आहे ? निवळ अनिश्चितता म्हणजे स्वातंत्र्य नव्हे.

बौद्धिक स्वातंत्र्याची यथार्थ कल्पना येणें किती इष्ट आहे हें यावरून दिसून येईल. आपल्या आयुष्याचें ध्येय निश्चित करण्याचें आणि तें साध्य करून घेण्याचा प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य म्हणजेच बौद्धिक स्वातंत्र्य होय. अशा ध्येयामुळें आयुष्याची दिशा निश्चित होते. ध्येयाशीं मनुष्याची निष्ठा जेवढी अधिक तेवढें त्याला स्वातंत्र्यही अधिक असतें. या विरोधाभासानें प्रथमदर्शनीं मन गोंधळून जाण्याचा संभव आहे; प्रत्यक्ष दाखल्यानें हा आभास नष्ट होईल. कल्पना करा कीं, भर समुद्रांत जहाज फुटल्यामुळें निराधार झालेल्या मनुष्याला सुकाणूं नसलेल्या एका उघड्या होडीचा आश्रय मिळाला; वारा व लाटा लोटतील तिकडे ढकललें जाणें त्याला भाग आहे; इच्छा होईल तिकडे जाण्याचें त्याला स्वातंत्र्य नाहीं. पण त्याला एक शीड व एक सुकाणूं द्या, कीं लागलीच त्याला आधार मिळेल. आपण कोठें आहोंत आणि आपल्याला कोठें जावयाचें आहे, हें ठरवून त्याला स्वतंत्रपणें आपला मार्ग आंखतां येईल. पाहिजे तर आपल्या होडीला भोंक पाडून त्यानें जलसमाधि घ्यावी अगर ती सरळ खडकावर न्यावी; मनांत येईल तिकडे त्याला जातां येईल. पण स्वातंत्र्य हवें असल्यास त्याला निश्चित मार्गानें आपल्या ध्येयाकडेच गेलें पाहिजे.

हल्लींच्या वादविवादांत ज्या एका गैरसमजुतीमुळें घोटाळा माजलेला आहे तिचा यावरून तलास लागतो. स्वतःचीं मतें बाजूला ठेवून घटकाभर तुमच्या दृष्टीनें पाहण्याला आपण तयार आहों असें एकादा मनुष्य निःपक्षपातीपणाचा आव आणून तुम्हांला सांगूं लागेल तेव्हां समजावें कीं, केवळ प्रतिपक्षीयाच्या मुर्वतीसाठीं त्यानें आणलेलें अवसान उसनें आहे आणि तो स्वतःची व आपल्या प्रतिपक्षीयाचीही फसवणूक करीत आहे. कोणताही सिद्धान्त मांडतांना प्रत्येक मनुष्य आपल्या ठाम मतांच्या अनुरोधानेंच विचार करीत असतो. हरएक मनुष्याच्या देहाभोंवतीं वातावरण असतें त्याचप्रमाणें त्याच्या विचारशक्तीभोंवतीं निष्ठांचें आवरण असतें, तो जाईल तेथें तें

त्याच्याबरोबर असतें; निष्ठांचा पूर्ण त्याग केला तरच त्याला त्यांचेपासून अलिप्त राहतां येईल. प्रतिपक्षीयाशीं एकरूप होऊन जाण्याइतकें त्याला आपल्या मतांपासून दूर राहतां येऊं लागलें तर लवकरच त्याला आपल्या निष्ठांचा कायमचाच त्याग करावा लागेल. सुकाणूं नसलेल्या होडींत बसलेल्या माणसासारखीच त्याची स्थिति आहे; तो वारा व लाटा यांच्या आधीन असतो; इष्ट ठिकाणीं जावयाचें असेल तर त्यानें प्रथम सुकाणूं पैदा केलें पाहिजे व आपला मार्ग निश्चित केला पाहिजे. कोणत्याही प्रश्नासंबंधीं निश्चित मत बनवितांना आपल्या निर्णयावर आपल्या मतांचा परिणाम होणार नाहीं हें त्याचें म्हणणें साफ चुकीचें आहे; ही शुद्ध फसवणूक आहे; ती त्यानें सोडून द्यावी. मानसशास्त्राचे दृष्टीनेंही असें होणें अशक्य आहे. निःपक्षपातीपणाची भ्रामक कल्पना सोडून देऊन सर्वांशीं न्यायानें वागणें हें आपलें कर्तव्य आहे एवढेंच व्यक्तिमात्रानें ध्यानांत ठेवावें. सरळपणाचा व प्रामाणिकपणाचा हा एकच मार्ग आहे. मनुष्य स्वतःचें ध्येय साध्य करण्याच्या प्रयत्नांत असतो त्यावेळीं त्याचा आयुष्यमार्ग ध्येयाच्या तेजानें संप्रकाशित झालेला असतो, जाणतेपणें किंवा अजाणतेपणें त्याचा हात सुकाणावर असतो, सर्व प्रवाहांचें निश्चित व बिनचूक मोजमाप त्याला आपल्या विवेक-बुद्धीच्या अनुरोधानें करतां येतें आणि हें त्याला आपल्या ठाणावरून स्वतःच्या दृष्टीनें व सुकाणावरून हात ढळूं न देतां करतां येतें. यांपैकीं कोणत्याही एका गोष्टीचा त्याग करणें म्हणजे आपल्या ध्येयापासून च्युत होण्यासारखेंच आहे. चांगल्या हेतूनें किंवा अज्ञानामुळें ध्येयच्युत झाल्यानंतर हातांतलें सुकाणूं निसटून समुद्रांत पडल्यानंतर प्रवाहांच्या वेगामुळें तें लवकरच इतकें दूर वहावत जाईल कीं, नंतर इच्छा असूनही तें कदाचित् परत हस्तगत करून घेतां येणार नाहीं.

विचारस्वातंत्र्याची कल्पना जर अशी आहे तर त्याचा इन्कार कशांत आहे ? मनुष्यांना ध्येयाप्रत नेणाऱ्या तत्त्वाभोंवतीं दूषित ग्रहांचें जाळें निर्माण होत असतें. खरीं तत्त्वें बाजूला ठेवून या ग्रहांची तरफदारी करण्याकडेच बहुजनसमाजाचा ओढा असतो; कालांतरानें हे दूषित ग्रह इतके असंख्य व बलिष्ठ होतात आणि त्यांच्या अनुयायांची संख्या व सत्ता इतकी जबरदस्त होते कीं, त्यांना विरोध करण्यासाठीं तेजस्वी माणसाला आपला सर्व उत्साह

व विचारस्वातंत्र्य उपयोगांत आणावें लागतें. ते ग्रह दूषित व प्रतिकाराई आहेत हें माहीत असूनही त्यांच्या कार्याचा आदर करण्याची इच्छा अगर त्याला उत्तेजन देण्याचा उत्साह फार थोड्या माणसांचे अंगीं असतो. मूल-तत्त्वांभोंवतीं वाढणारे हे दुराग्रह बगीचांत माजणाऱ्या विषारी रानासारखे असतात. त्यामुळें बागेंतलीं झाडें, फळें व फुलें मरून जातात. हें रान निर्दयपणें तोडून जाळून टाकल्यावांचून बागेची स्थिति सुधारणार नाहीं. त्याचप्रमाणें ते दुराग्रह बिलकुल कुचराई न करतां मुळासकट उपटून फेंकून दिले पाहिजेत. हें कार्य हातीं घेणाराचे अंगीं धैर्य व सामर्थ्य, त्याचप्रमाणें उत्कट भावना, सहनशक्ति व पिच्छा पुरवणारी चिकाटी हे गुण असले पाहिजेत. कारण दुराग्रहांचें संरक्षण करतांना माणसें अत्यंत निष्ठुरपणें झगड-तात, स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या वीराच्या अंगांत जागृत होणाऱ्या तेजापेक्षां त्याच्या मनांतलें विष अधिक जलाल असतें; आणि वाइटाचें निर्मूलन करण्यास उद्युक्त झालेल्या वीराला विरोध करण्यासाठीं परस्परविरोधी पक्षांतले लोकही एकजूट होतात आणि त्याच्यावर विश्वासघाताचे, आत्मप्रतिष्ठेचे अगर विपर्यासाचे आरोप करण्यांत येतात. त्याचीं तत्त्वें ज्यांना मान्य नाहींत ते त्याच्यावर अप्रामाणिकपणाचा आरोप लादतात; त्याच्या तत्त्वांना बाह्यतः मान्यता देणारांना त्याचा उत्साह व निष्कपटीपणा सहन होत नाहीं आणि म्हणून ते त्याच्यावर फितुरीचा आरोप करतात. असे कितीही विपर्यास करण्यांत आले तरी त्यानें अढळ राहिलें पाहिजे; एवढें धैर्य त्याचे अंगीं असेल तर तो जगाला विचारस्वातंत्र्याचें उत्कृष्ट उदाहरण दाखवून देईल.

अप्रमाणवादी व धर्माभिमानी यांचेमध्यें आढळून येणाऱ्या कित्येक दुराग्रहांचा निर्देश करणें अप्रस्तुत होणार नाहीं. प्रथम अप्रमाणवाद्यांचा विचार करूं. त्यांचे दुराग्रह इतके प्रबल असतात कीं, ते नाहींसे करणें फार जड जातें. बर्नार्ड शॉ* याला आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत

---

* शॉः जन्म १८५६. विख्यात नाटककार. १८८४ सालीं फेबिअन सोसायटीचे सभासद होऊन त्यांनीं समाजसत्तावादाच्या तत्त्वांचा प्रचार केला. 'विडोअर्स हाउसेस' हें त्यांचें पहिलें नाटक १८९२ सालीं इंडिपेंडंट थिएटरांत रंगभूमीवर आलें तेव्हां साधारण प्रेक्षकांनीं त्याचा धिक्कार केला.

शोध लागला कीं, धर्मगुरु जितके वाईट आहेत असें सांगण्यांत येतें तितके ते वाईट नसतात. पण ही गोष्ट आरंभींच मीं गृहीत धरली तर माझे विचार स्वतंत्र नाहींत असेंच अप्रमाणवादी म्हणतील. त्या प्रश्नाचा स्वतंत्र रीतीनें विचार करून स्वतःचें निर्णयात्मक मत बनविण्याचा मला हक्क आहे, इकडे त्यांचें लक्षही जात नाहीं. उलटपक्षीं मी विशिष्ट पंथांत वाढलेला असून तो मीं सोडून दिला तर बौद्धिक गुलामगिरीचे पाश तोडणारा वीर असा त्यांचेकडून माझा गौरव करण्यांत येईल. हा गोंधळ अजब आहे. मनुष्याचा एकाद्या गोष्टीवरील विश्वास नष्ट झाला तर तसें उघडपणें सांगण्याबद्दल त्याची वाहवा करावयाचें कांहींच कारण नाहीं. पूर्वी ज्या तत्त्वांवर आपला विश्वास होता अगर ज्यांवर त्याचा विश्वास आहे अशी इतरांची कल्पना होती. त्यांत कांहीं दम नाहीं असें त्याला आढळून आलें तर त्यापासून आपल्याला अपाय होईल अशी त्यानें धास्ती घेण्याचें कांहींच कारण नाहीं. नुस्ता इन्कार करण्यांत धैर्य नाहीं. धैर्य हें असंदिग्ध आहे. असें धैर्य त्याचे अंगीं असण्याचा संभव आहे. आपण कल्पना करूं, एकाद्या सामाजिक प्रश्नासंबंधीं एकाद्यानें विशिष्ट तत्त्वांचा पुरस्कार केलेला आहे आणि हीं तत्त्वें आचरणांत आणल्यास समाजाचें कल्याण होईल अशी त्याची कल्पना आहे. पण हीं तत्त्वें मान्य करणाऱ्या पंथांतील व्यक्तींच्या मनांत त्या तत्त्वांभोंवतीं दुराग्रहांचें अभेद्य रान वाढलेलें आहे असें त्याला आढळून येईल आणि या पंथानें मान्यता दिलेल्या मंतरलेल्या ताइतांची पूजा करावयाचें त्यानें नाकारलें, त्या पंथानें मान्यता दिलेल्या उदात्त तत्त्वांसाठीं झगडण्याकरितांच मी त्यांत सामील झालों आहें असें तो सांगूं लागला तर त्याचे नवे मित्र त्याला धुडकावून लावतील आणि त्याचा धिक्कार व इन्कार करतील. ज्यांना आपण शत्रु समजलें पाहिजे त्यांच्याच संगतींत आपल्याला रहावें लागत आहे असें त्याला आढळून येईल. आयुष्यांत प्रामाणिकपणें वागण्या-

---

'मिसेस वारन्स प्रोफेशन' ह्या त्यांच्या नाटकाला सेन्सारनें मनाई केली; तरी १९०५ सालीं अमेरिकेंत तें रंगभूमीवर आलें, तेव्हां सर्व नटांवर सरकारमार्फत खटले भरण्यांत आले. न्यू स्टेटस्मन पत्रांत लिहिलेल्या महायुद्धावरील लेखांमुळें ते फार अप्रिय झाले. त्यांना नुकेंच नोबल प्राइझ देण्यांत आलें.

साठीं त्याला विचारस्वातंत्र्याची मदत घ्यावी लागेल. हें स्वातंत्र्य नामधारी व बाह्यात्कारी असून भागणार नाहीं. खरें व निश्चित विचारस्वातंत्र्य अंगीं बाणलेलें असेल तर सुधारणाविरोधकांचा निषेध करण्यापेक्षां अधिक महत्त्वाचीं कार्यें तो हातीं घेईल, त्याला आपल्या कर्तव्यांची जाणीव होईल आणि मूलभूत तत्त्वांच्या दृष्टीनें समर्थन करतां येतील अशींच कार्यें त्याचे हातून होतील.

धर्माभिमान्यांचे दुराग्रह नाहींसे करण्याचें कार्य इतकेंच अवघड आहे. धर्मशास्त्रांवर ज्यांची श्रद्धा नाहीं तीं सर्व माणसें दुष्ट आहेत असें जाहीर करतांना हे लोक सारासारविचार पार गुंडाळून ठेवतात; यामुळें कोणतेंही सत्कार्य साधत नाहीं आणि कोणत्याही दिशेला पाऊल पुढें पडत नाहीं. दुष्ट माणसें असंख्य आहेत. वेगवेगळ्या पक्षांमध्यें सामील झालेल्या सात्त्विक माणसांना एकत्र होतां येईल असाच आपला झेंडा असला पाहिजे. परधर्मीयांच्या निर्भर्त्सनेंत नाहीं तर आपल्या आयुष्यांत व प्रत्यक्ष कृतींत आपली तत्त्वनिष्ठा प्रकट झाली पाहिजे. प्रत्येक संघांतून ढोंगी लोकांची हकालपट्टी झाली पाहिजे हें उघड आहे; पण या कामाला प्रत्यक्षपणें हात घातल्यानंतर आढळून येईल कीं, आपल्या पक्षांतही ढोंगी माणसें आहेत, त्यांना हुसकावून देण्यांत कोणत्याही प्रकारची कुचराई होतां कामा नये. सर्व संस्थांनीं आपापलें शुद्धीकरण करावें हें आज्ञापत्र आपण सदैव समोर ठेवलें पाहिजे. हा हुकूम सर्वांना बंधनकारक असल्यामुळें कोणालाही कुरकुर करण्याला जागा राहणार नाहीं. प्रत्येकानें आपल्या तत्त्वांना कृतींत प्रत्यक्ष स्वरूप द्यावें आणि दुराग्रह बाजूला ठेवावे. हिंस्र सिंहांना बळी पडण्याचा प्रसंग आला तरीही आपल्या तत्त्वांपासून न ढळणारे प्राचीन हुतात्मे निदान खिश्चन लोकांना तरी अनुकरणीय आहेत. त्यांचें उदाहरण दाखवितांच आधुनिक चिकित्सक प्रत्युत्तर देतील कीं, हल्लींच्या युगांत अशी बळजबरी चालणार नाहीं; कीं धर्मासाठीं आत्मबलिदान करावयाची आतां जरूर राहिलेली नाहीं. यालाही उत्तर आहेच. असे आत्मसमर्पणाचे प्रसंग वर्तमानकाळीं येणार नाहींतच असें नाहीं; पण सिंहापुढें उभें ठाकण्यास आम्ही तयार होऊं किंवा नाहीं, याबद्दल मात्र संशय आहे. हल्लींच्या युगांतही दिव्यें करावीं लागतात आणि तीं सोपीं खास नाहींत; पण तसले प्रसंग उपस्थित झाले, कीं त्यांकडे आपण कानाडोळा मात्र करतों. कारण स्वतः दिव्य करण्यापेक्षां इतरांची निर्भर्त्सना

करणें फार सोपें आहे. निष्ठेची हीच कसोटी आहे; ही कसोटी मान्य केल्यास ढोंगी माणसांना मुळींच वाव राहणार नाहीं. आपल्या शिरावरल्या जबाबदारीची जाणीव झाल्यामुळें कळकळीचीं माणसें अधिक सहानुभूतीनें, न्यायानें व औदार्यानें वागतील आणि त्यांचें वर्तन तर्कशुद्ध होईल. संशय व्यक्त करणाऱ्या मनुष्याचे मनांत श्रद्धा नाहीं हें उघड आहे; पण त्यामुळेंच तो श्रद्धेच्या मार्गाला लागेल, हें न्यूमनचें वचन यथार्थ आहे असें त्यांना दिसून येईल. प्रश्न विचारण्यामुळें अश्रद्धा, त्याचप्रमाणें संशयांतून वाट काढण्याचा प्रयत्न हीं व्यक्त होतात. न्यूमन विचारतो कीं, संशय आला असतां त्याचें निरसन करून घेण्यासाठीं तो व्यक्त करण्याइतका दुसरा कोणता चांगला मार्ग आहे? नाहीं तर संशयग्रस्ताला अश्रद्धेतच संतुष्ट रहावें लागेल. त्याच्या शंकांचें निरसन करणें, मनमोकळेपणें त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें देणें, आणखी शंका काढण्याविषयीं त्याला उत्तेजन देणें आणि त्याच्या मुद्द्यांसंबंधानें आपणही शंका काढणें हा मार्ग संशयग्रस्ताचा निषेध करण्यापेक्षां खात्रीनें अधिक चांगला आहे. अशा रीतीनें जिव्हाळ्याच्या माणसांचा सहवास घडूं लागला म्हणजे त्यांच्या मनांत विरुद्ध पक्षांतील व्यक्तीबद्दलही सहानुभूति खास उत्पन्न होईल. हेंच स्वातंत्र्य होय, आणि हें किती उदात्त आहे! असें स्वातंत्र्य निर्माण होण्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे. कडू भांडणें, प्रत्यारोप, छळ व प्रतिकार यांची आपल्याला संवयच झालेली आहे. दुराग्रहाचें विषारी रान इतकें माजलें आहे कीं, त्यामुळें आमचीं तत्त्वें गुदमरून जात आहेत; त्यांच्या अस्तित्वांतच आमच्या तत्त्वांचा इन्कार आहे. आमच्या मानसिक गुलामगिरीचा पुरावा आहे. स्वातंत्र्यानें आमच्या निष्ठा सिद्ध होतील. 'जेथें परमेश्वराचें अधिष्ठान असतें तेथें स्वातंत्र्यही असतें'.

स्वतः स्वातंत्र्याची मागणी करणें आणि सर्वांना स्वातंत्र्य देणें, इतरांच्या श्रद्धांचा इन्कार करण्याऐवजीं त्यांना आपल्या निष्ठांना कृतींत मूर्तस्वरूप देण्याविषयीं उत्तेजन देणें हाच उत्तम मार्ग होय—कारण यामुळेंच सर्वांचा उद्धार होईल, एवढेंच शेवटीं सांगावयाचें आहे. आपल्या मतांचा इतरांनीं-ही स्वीकार केलाच पाहिजे. तीं त्यांना पटत नसलीं तरीही त्यांनीं त्यांचाच घोष करीत राहिलें पाहिजे अशी त्यांजवर जबरदस्ती करणें यापासून कार्यभाग तर साधणार नाहींच पण कार्यनाश मात्र खास होईल.

मनुष्यानें जें ध्येय निश्चित केलेलें असेल व त्याप्रत पोंचण्याचा जो मार्ग त्यानें मुक्रर केलेला असेल तिकडे त्याला जाऊं द्या. मनुष्यानें आपलें ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणें करावा एवढेंच करणें योग्य आहे. त्याचीं तत्त्वें अपुरीं व विसंगत असतील तर स्वतःच्या ध्येयसिद्धीच्या झगड्यांत तें त्याचें त्यालाच कळून येईल. स्वतःच्या कळकळीनें तो आपल्या तत्त्वप्रणालींतिल अपुरेपणा भरून काढील व विसंगतपणा दूर करील. उदात्त प्रकृतीचीं माणसें हाच मार्ग मुक्रर करतील आणि अशांना कोणींही विरोध करूं नये. आपल्या तत्त्वांचें आपल्या आयुष्यांत प्रत्यक्ष कृतीनें समर्थन करावयाची जबाबदारी व्यक्तिमात्रावर आहे. आयुष्य हें एक दैवी साहस आहे. ज्याची निष्ठा शुद्ध, दृढ व उच्च असेल त्यालाच दूरची मजल गांठतां येईल. परमेश्वर भ्याडांचा सन्मान करीत नाहीं. कोणी चोरून नेईल या भीतीनें जो स्वतःची विद्या पुरून ठेवील त्याला ज्ञानाच्या प्रकाशांतून बाहेरल्या अंधारांत फेंकून देण्यांत येईल; आणि जो निर्भयपणें पुढें पाऊल टाकील त्याचेंच समर्थन होईल. 'निष्ठावंताला अशक्य असें कांहींच नाहीं'. संसाराच्या सागरांत आपलें तारूं धैर्यानें ढकलणें हीच आपल्या तयारीची कसोटी आहे. आपण फार पुढें जात आहोंत असें नाहीं तर जितकें पुढें जावयाला पाहिजे तितकें आपण जात नाहीं असा आपल्यावर आरोप करण्यांत येत आहे हें पाहून अप्रमाणवादी आश्चर्यचकित होतील. तत्त्वनिष्ठेची आपली कसोटी पाहतांच ते चकित होईल–पण हीच खरी व एकच कसोटी आहे. देहानें श्वासोच्छ्वास घेण्याचें बंद केलें म्हणजे सारें संपलें असें ज्याला वाटत नाहीं, इतिहास हें आमचें वतन आहे आणि विस्तीर्ण वर्तमान ही आमची रणभूमि आहे, अशी निष्ठा ज्याचे अंतःकरणांत जागृत आहे, त्याला भविष्यकाळ त्याज्य व कस्पटासमान नाहीं तर विस्तीर्ण व मोहक सृष्टीसारखा वाटेल. जीविताची नौका हांकारतांना त्याला खऱ्या नाखव्या-सारखें वागावें लागेल; तो आपलें जहाज जाणूनबुजून धोक्यांत घालीत नाहीं व वेळप्रसंग येतो तेव्हां कोणतेंही धाडस करावयास मागेंपुढें पहात नाहीं. तो इतरांच्या हक्कावर गदा आणीत नाहीं; पण त्याला स्वतःला मात्र जें अक्षय व अनंत त्याप्रत जावयाचें असतें. पण अनेक धर्मा-भिमान्यांना या दृष्टीनें पहावयाची संवय नसते. जुनीं भांडणें फिरून

पेटवणें हा कित्येकांचा धंदाच होऊन बसला आहे. हे लोक आपल्या धंद्यांत खंड पडूं देणार नाहींत. अराजक, नास्तिक व पाखंडी वगैरे दुष्ट माणसांवर बहिष्कार घातला पाहिजे, कारण समाजाच्या नाशासाठींच ते जन्मले आहेत, असें त्यांचें प्रतिपादन चालू राहील. त्यांच्या विचारसरणीवर आक्षेप घेणें सोपें आहे; पण असें न करतांहि आपल्याला त्यांना विचारतां येईल कीं, ज्या सद्गुणांमुळें खिश्चन धर्माला उच्च स्थान प्राप्त झालें आणि ज्यांमध्यें आमच्या धर्माचें वैशिष्ट्य आहे असें आम्ही आजवर प्रतिपादन करीत आलों त्यांना आतां आमच्या जीवितांत कोठें स्थानच नाहीं काय ? या गुणांचा विकास करण्याची जरूरी आतांइतकी कधींही निकडीची नव्हती; असें असूनही ते आमच्या कृतींत शक्य तेवढया कमी प्रसंगीं यावे काय ? जगाला चांगलें उदाहरण घालून दाखवा, अशी अप्रमाणबाह्यांना त्यांच्या गुरूंची आज्ञा नाहीं; पण खिस्ती लोकांना तशी स्पष्ट आज्ञा आहे. मग त्यांनीं कुचराई कां करावी ? मानवी दुर्बलतेच्या आड लपण्याची त्यांची इच्छा असल्यास त्यांच्या वर्तनाचा उलगडा लागतो; पण त्या आज्ञा धुडकावून देण्यांतच खरा पुरुषार्थ आहे असें सांगणारांबद्दलच आमचा आक्षेप आहे.आमच्या तत्त्वज्ञानांत अनेक उदात्त वचनें आहेत,पण त्यांकडे आम्ही पूर्ण दुर्लक्ष करीत आहों. तीं तत्त्वें आमच्या कृतींत कधींही प्रकट होत नाहींत. उच्च तत्त्वनिष्ठा समाजाच्या अंगीं बाणली तर स्वातंत्र्यासाठीं रक्तपाताची किंवा क्रांतीची आवश्यकता राहणार नाहीं. पारतंत्र्याच्या दुष्ट स्वप्नांतून आपण जागे होऊं तेव्हां रक्तपातापासून अलिप्त, सुंदर, उदात्त व धवल अशी क्रान्ति होत असलेली आपल्याला दिसून येईल. आम्ही आज रूक्ष व अफाट वाळवंटांत आहों; नंदनवनापासून शक्य तितके दूर भटकत आहों. अधिक उंचावर चढून आपण आपल्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे. दूषित दुराग्रहांनीं सत्य तत्त्वांची जागा व्यापून टाकलेली आहे. हे दुराग्रह टाकून दिले तर ज्याचें त्यालाच आढळून येईल कीं, ज्या तत्त्वांवर आमची निष्ठा आहे असें आम्ही आजवर बडबडलों, त्यांवर आपला यत्किंचित्ही विश्वास नाहीं व त्यांना आपल्या कृतींत स्थान नाहीं, आपलें बोलणें वायफळ होतें. भेकड शंकाकुशंकांना सरळ व संपूर्ण असें एकच उत्तर आहे, "भिऊं नका, फक्त निष्ठा ठेवा."

प्रकरण चवदावें

लष्करी सामर्थ्य

गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं अगर असलेल्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीं राष्ट्रानें सशस्त्र प्रतिकाराला नेहमीं सिद्ध असलें पाहिजे. या तत्त्वाची सत्यता इतिहासांत अनेक वेळां सिद्ध झालेली असल्यामुळें अधिक पुरावे देण्याची आतां जरूर राहिलेली नाहीं. हल्लीं आपले हक्क प्रस्थापित करावयासाठीं लढाईची तयारी करण्याच्या मार्गांत लष्करी संघटनेचें भयंकर संकट उपस्थित झालेलें आहे. स्वातंत्र्यासाठीं योजावयाच्या साधनांमध्यें तरवार हाच निर्वाणीचा उपाय होय–पण या तत्त्वाला विरोध करण्यासाठीं लष्करी संघटनेला विरोध करणाऱ्या शांततावाद्यांचा पंथ निर्माण झाला आहे, त्यांच्या विचारसरणीमुळें मनाचा गोंधळ होण्याचा संभव असल्यामुळें युद्धाच्या इष्टानिष्टतेचा विचार करण्यापूर्वी त्यांच्या तत्त्वांची छाननी केली पाहिजे. लष्करी सामर्थ्याची बेसुमार वाढ करणें आणि लोकांच्या मनांत क्रूरपणाची प्रवृत्ति उत्पन्न करणें अत्यंत हानिकारक आहे याबद्दल वाद नाहीं. पण लष्करी संघटनेला विरोध करणाऱ्या शांततावाद्यांचें मतप्रवर्तक वाङ्मय पाहिलें असतां ही मोहीम काढण्यांत त्यांचे अंतस्थ हेतु वेगळेच असले पाहिजेत असा संशय येऊं लागतो. हे हेतु उजेडांत आणले पाहिजेत. मोठमोठ्या राष्ट्रांनीं एकजूट होऊन लहान लहान राष्ट्रांना चिरडून घशांत टाकावयाचा कट या मोहिमेच्या बुडाशीं आहे कीं काय हेंही पाहिलें पाहिजे. या प्रश्नासंबंधीं प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयापैकीं दोन प्रसिद्ध पुस्तकांचाच मी विचार करणार आहें. पहिलें नॉर्मन एंजलचें 'महान् मोहजाल' व दुसरें जॅक नोव्हिको याचें 'युद्ध व त्यापासून होणारे फायदे'. नोव्हिकोच्या ग्रंथांत लष्करी संघटनेला विरोध करणाऱ्यांच्या तत्त्वांची मांडणी सरळ व प्रामाणिकपणें केलेली असल्यामुळें त्याचें प्रतिपादन कोणालाही मान्य होण्यासारखें आहे. स्वातंत्र्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे असें ठांसून सांगणारांनीं युद्धविरोधकांचीं मतें नीटपणें पारखून पाहणें जरूर आहे. कारण त्यांपैकीं पुष्कळशीं मतें आपल्याला अनुकूल आहेत. पण एंजलचें प्रतिपादन अगदीं वेगळें आहे. त्यांतून पुढील मुद्दे

बाहेर येतात. स्वार्थ हाच नीतिचा पाया आहे; प्रबल राष्ट्रांनीं एकामेकांचा नाश करण्याला उद्युक्त होऊं नये; कारण यांत त्यांचा कांहींच फायदा नाहीं. त्यांनीं एकजूट होऊन मागसलेल्या देशांमध्यें शांतता प्रस्थापित करून तेथील संपत्ति हस्तगत करावी. या कामांत भांडवलवाल्यांना मुत्सद्द्यांनीं विरोध केला तर आपल्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या जोरावर भांडवलवाले त्यांना हाणून पाडतील; आर्थिक संघटना आंतरराष्ट्रीय असते. कारण संपत्तीच्या प्रसाराला राजकीय मर्यादा अडथळा करूं शकत नाहीं. यावर आम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, भांडवलवाल्यांचे मनांत स्वदेशाची भावना नसेल; पण देशभक्तांचे अंतःकरणांत राष्ट्रीय भावना जागृत असल्यामुळें या नव्या संकटाची सूचना मिळतांच ते एकजूट होऊन भांडवलवाल्यांच्या मनोराज्यांचा मनोरा उध्वस्त करतील; आणि ज्याला 'मोहजाल' म्हणावयाचें एंजलच्या स्वप्नांतही आलें नसेल त्या भांडवलवाल्यांच्या जाळ्यालाच त्याच्याकडून तें नांव देण्यांत येईल.

स्थलसंकोचामुळें या निबंधांत सदरहू पुस्तकाचें विस्तृत परीक्षण करतां येणार नाहीं. म्हणून सदरहू लेखकाचा अभिप्रेत अर्थ व्यक्त करणारे उतारे निवडून ते येथें देण्याचा माझा इरादा आहे. म्हणजे त्याच्या लिहिण्याचा रोंख वाचकांच्या सहज लक्षांत येईल. वर निर्दिष्ट केलेल्या संकटापुरतेंच आपल्याला या ग्रंथाकडे पहावयाचें असल्यामुळें तेवढा भाग स्पष्ट होण्यापुरतेच उतारे निवडले आहेत. लेखकाचें सर्व विवेचन वाचनीय असल्यामुळें मूळ पुस्तक समग्र वाचून पाहण्याविषयीं त्यांना माझी शिफारस आहे. आमच्या प्रतिपादनाला अनुकूल असलेलेच भाग निवडून काढल्याचा आरोप ठेवतां येऊं नये म्हणून भरपूर उतारे घेतलेले आहेत. त्या सर्वांचा रोंख एकाच दिशेकडे आहे आणि असे आणखी अनेक उतारे सदरहू ग्रंथांतून काढतां येण्यासारखे आहेत. खालीं दिलेल्या उताऱ्यांचे मीं तीन भाग पाडले आहेत. १ नीतीचा विचार, २ संपत्तीचें सामर्थ्य व ३ कट. कंसांत घातलेला मजकूर माझा स्वतःचा आहे.

१. **नीतीचा विचार**—स्वार्थ हाच समाजनीतीचा खरा पाया आहे (पृष्ठ ६६). स्वार्थबुद्धीपासून अलिप्त असलेल्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेंतही आर्थिक परिस्थितीच्या नेटामुळें बदल पडत चालला आहे, हें अनेक पुराव्यांवरून सिद्ध

करतां येतें (पृष्ठ १६०). चांचेगिरींत ऐश्वर्य होतें पण व्यावहारिक दृष्टि नव्हती (पृष्ठ २४५). शांततावाद्यांचें तत्त्वज्ञान कोलमडून पडलें याचें मुख्य कारण म्हणजे त्यांनीं स्वार्थ व नीति हीं भिन्न आहेत असें स्पष्ट व सिद्ध करून दाखविलें नाहीं (पृष्ठ ३२१).

२. **संपत्तीचें सामर्थ्य**—भांडवलाच्या गुंतागुंतीमुळें हल्लीं न्यूयॉर्क लंडनवर, लंडन पॅरिसवर व पॅरिस बर्लिनवर अवलंबून आहे. एवढें परस्परावलंबन आजपर्यंत इतिहासांत कधींही दिसून आलेलें नाहीं (पृष्ठ ४७). व्यापाऱ्यांचें नुकसान होईल असें एकादें राजकीय कृत्य करावयाचें ब्रिटिश सरकारनें मनांत आणलें आणि ब्रिटिश भांडवलवाल्यांनीं कसून विरोध करून आणि आपलें वजन खर्च करून सरकारला आपला निर्णय बदलणें भाग पाडलें नाहीं, तर तो एक मोठाच चमत्कार मानण्यांत येईल (पृष्ठ ५३). एकतंत्री राज्यकर्त्यांचीही संपत्तीवर हुकमत चालत नाहीं (पृष्ठ २२६). भांडवल हें स्वभावतःच आंतरराष्ट्रीय आहे (पृष्ठ २६९). [म्हणून भांडवलवाल्यांना वेगळी संघटना करावयाची जरूर भासत नाहीं.]

३ कट—आल्जेरिया काबीज केल्यामुळें फ्रान्सचा फायदा झाला; हिंदुस्थान पादाक्रांत केल्यामुळें इंग्लंडला नफा झाला. या कार्यांत त्यांना यश आलें यांचें कारण एवढेंच कीं, देश जिंकणें हा त्यांचा प्रधानहेतु नव्हता (पृष्ठ ११५). [त्या देशांमध्यें शांतता प्रस्थापित करण्यासाठींच त्यांनीं आपलें सामर्थ्य उपयोगांत आणलें.] जर्मनीचें साम्राज्य जगभर व्हावें अशी आकांक्षा बाळगणाऱ्या जर्मनांची दृष्टि कॅनडाकडे वळत नाहीं; पण आशियामायनरवर त्यांचा डोळा आहे (पृष्ठ ११७-११८). [जर्मनीला आशियामायनरमध्यें शांतता प्रस्थापित करावी लागेल. स्वतंत्र पण अंदाधुंदीमुळें बिस्कळित झालेल्या आशियामायनरपेक्षां जर्मनीच्या ताब्यांत गेल्यामुळें सुसंघटित व सुव्यवस्थित आशियामायनरपासून ग्रेटब्रिटनचा अधिक फायदा होण्यासारखा आहे.]

सर हॅरी जॉन्स्टन यांनीं 'नाइन्टीन्थ सेंचरी' मासिकाच्या डिसेंबर १९१० च्या अंकांत लिहिलेल्या एका लेखांत या प्रश्नाच्या मुळाला हात घातला आहे. जर्मन पुढाऱ्यांनीं त्यांना स्पष्टपणें सांगितलें होतें कीं, जगांतील पुढारलेल्या राष्ट्रांनीं एकजूट होऊन मागसलेल्या जातींसंबंधीं एकच राजकीय धोरण कायम केलें पाहिजे. मागसलेल्या जातींचा बंदोबस्त करण्याची ही भाषा महत्त्वाची

आहे. वसाहतींना हें धोरण पसंत नाहीं. एंजल लिहितो, प्रजेला मन मानेल तसें वागूं द्यावयाचें असल्यास, जितांना स्वातंत्र्य द्यावयाचें असल्यास, दुसरे देश जिंकण्यांत कोणता फायदा आहे? (पृष्ठ ९२). दक्षिण आफ्रिकेसंबंधीं त्यानें फार कडू उद्गार काढले आहेत. ट्रान्सव्हालचें सरकार बोअर पक्षाच्या धोरणानें चालतें (पृष्ठ ९५). ही गोष्ट त्याला सहन होत नाहीं. जर्मनीला तर त्यानें स्पष्ट सूचना दिली आहे कीं, तुम्हांला दक्षिण आफ्रिकेंत आपली सत्ता प्रस्थापित करावयाची असेल तर तुम्हांला ग्रेट ब्रिटनच्या राजकीय धोरणाचें इंगित जाणलें पाहिजे. हें धोरण परोपकारबुद्धीनें ठरविलेलें नसून कडू अनुभवाच्या शिकवणुकीमुळेंच निर्माण झालेलें आहे (पृष्ठ १०४). या राजकारस्थानी पंथाला एक दोन धडे आपल्यालाही शिकवितां येण्यासारखे आहेत. आयर्लंडचा उल्लेख करून एंजलनें आमचा सन्मानच केला आहे. मॉर्निंग पोस्ट वर्तमानपत्रांत एका टीकाकारानें पुढील मजकूर लिहिला होता: 'सत्य कोणतें व असत्य कोणतें याबद्दल आपल्या कल्पना इतरांवर लादूं पाहणाऱ्या बाह्य शक्तीला कसून विरोध करावयाचा, त्यांची आज्ञा जुमानावयाची नाहीं, अशा निर्धारांचे नागरिक प्रत्येक महाराष्ट्रांत निर्माण होतात. मानवी स्वभावाच्या उच्चतेमुळेंच अशीं माणसें जन्माला येतात'. या लेखाला उत्तर देतांना एंजल म्हणतो: सदरहू मजकूर मॉर्निंग पोस्टमध्यें प्रसिद्ध झालेला पाहून कोणालाही आश्चर्य वाटेल. या विचार-सरणीमुळें हिंदुस्थान, ईजिप्त व आयर्लंड या देशांमध्यें ब्रिटिश सत्तेविरुद्ध चाललेल्या चळवळीचें समर्थनच होत आहे (पृष्ठ २५४). या उद्गारांवर अधिक टीका करावयाची जरूर नाहीं. हें पुस्तक जों जों पुनः पुन्हा वाचावें तों तों त्यांतील अंतस्थ हेतूचा दुष्टपणा अधिकाधिक स्पष्ट होऊं लागतो. हा हेतु उजेडांत आणण्यानेंच या कटवाल्यांनीं उपस्थित केलेल्या संकटाचा जोर ओसरणार आहे. या मागसलेल्या जातींपैकीं निदान एक तरी अशी आहे कीं, ती नागव्या स्वार्थामागें लागलेली नाहीं आणि भांडवलवाल्यांचा कट उलथून पाडण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं आहे. रस्किननें* म्हटलें आहे

* रस्किनः (१८५४–१९००) इंग्लिश निबंधलेखक. १८७० सालीं ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींत स्लेड प्रोफेसर इन् फाइन् आर्ट या जागेवर याची नेमणूक झाली होती.

कीं, पुनर्जन्म हा पुष्कळांना गैरसोयीचा वाटतो; सदरहू जातींच्या बाबतींत या वचनाची सत्यता प्रत्ययास येईल.

लष्करी सामर्थ्याला विरोध करणारांमध्यें कित्येक श्रेष्ठ दर्जाचीं माणसें आहेत. त्यांचीं वचनें सत्यानें भरलेलीं आहेत. नोव्हिकोच्या ग्रंथाला एंजलनेंच प्रस्तावना लिहिलेली आहे, हें आम्हांला विचित्र दिसतें. कारण त्या दोघांचीं मतें अगदीं भिन्न आहेत. मागसलेल्या जातींचा बंदोबस्त करण्यावर नोव्हिकोचा इतका कटाक्ष नाहीं. त्यानें बंगाली लोकांच्या राष्ट्रीय चळवळीचें समर्थन केलें आहे. तो म्हणतोः कल्पना करा कीं, त्यांचे हक्क अबाधित राहिले असते तर त्यांची मान ताठ राहिली असती; त्यांचा स्वाभिमान व प्रभाव जिवंत राहिला असता आणि त्यांनीं 'परमेश्वर व माझे हक्क' हेंच वचन शिरीं धारण केलें असतें (पृष्ठ १२). त्याच्या शब्दांत तीव्र वक्रता आहे, त्याचप्रमाणें उमाळ्याची उष्णताही आहे. तो पुढें लिहितोः फ्रेंचांनीं व इतरांनींही आपले हक्क प्रस्थापित करण्यासाठीं जिवाभावानें झटावें, अंगांत रक्ताचा एक बिंदु शिल्लक असेपर्यंत झगडावें; मी जें लिहीत आहें त्याचा रोंख जे आपल्या हक्कासाठीं झगडत आहेत त्यांचेकडे नसून जे इतरांचे हक्क हिरावून घेत आहेत त्यांचेवर माझा कटाक्ष आहे (पृष्ठ ७०). नीतीचा मुद्दा त्यानें मांडलेला नाहीं; तरी तो म्हणतो कीं, राजकीय पारतंत्र्यामुळें जितांचे अंगीं दुष्टतम दुर्गुण उत्पन्न होतात (पृष्ठ ७९). उच्च कार्यासाठीं देह ठेवणाऱ्या महात्म्यांची त्यानें वाखाणणी केली आहे. बेअब्रूच्या जिण्यापेक्षां कीर्तीचें मरण स्वीकारणाऱ्या हुतात्म्यांकडे माझें अंतःकरण ओढ घेतें (पृष्ठ ८२). ही सहानुभूति आदरणीय आहे. शांततेचा प्रामाणिक पुरस्कार करणारे व लेखक या पदवीला पात्र असलेले लोक याच रोंखानें लिहितात. इमर्सन‡ हा शांततेचा कळकळीचा पुरस्कर्ता होता; तरी आपल्या युद्धावरल्या निबंधांत त्यानें लिहिलें आहेः 'चैनी व भेकड यांच्या पोषणासाठींच शांतता प्रस्थापित करावयाची अगर राखावयाची असेल तर ती अत्यंत हीन दर्जाची व कुचकामी ठरेल. यापेक्षां लढाई पुष्कळ चांगली. हीन शांततेचा भंग झाल्यावांचून रहात नाहीं'. राजकारणावरील निबंधांत

‡ इमर्सनः (१८०३–१८८२) अमेरिकन तत्त्ववेत्ता व निबंधलेखक.

लो म्हणतोः 'स्वातंत्र्यासाठीं व विजयासाठीं सज्ज झालेल्या राष्ट्रांतील वीरांच्या हातून एवढीं महत्कृत्यें घडून येतात कीं, त्यांबद्दलचे आंकडेशास्त्रज्ञांचे अंदाज सपशेल चुकीचे ठरतात; साधनांच्या परिमाणानें मोजलेल्या सामर्थ्याला असाध्य अशा करामती त्यांचे हातून घडून येतात'. होय. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं एकजूट होऊन या वचनाची सत्यता सिद्ध करून दाखविण्याची आमची हिम्मत व उमेद आहे.

प्रकरण पंधरावें

साम्राज्य

आयर्लंडला स्वराज्य मिळणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागल्यापासून साम्राज्यतत्त्वाचें समर्थन करणारीं अनेक विंचित्र निमित्तें पुढें येऊं लागलीं आहेत. हें एक सुचिन्हच समजलें पाहिजे. कारण साम्राज्याबरोबर पूर्वीपेक्षांही अधिक निकरानें झगडण्याचा प्रसंग आपल्यावर लवकरच येईल असा संभव आहे. आजपर्यंतच्या लढ्यांत पुष्कळ गफलती होत्या. उदाहरणार्थ, आपण साम्राज्याच्या अस्तित्वावरच घाला घालीत आहों अशी कल्पनाही मनांत न येतां कांहीं साम्राज्यवादी आयर्लंडला स्वराज्य मिळावें म्हणून खटपट करीत होते. आतां होमरूल स्थापन होणार असा रंग दिसत आहे. अशा वेळीं या प्रश्नाची चर्चा झाल्यानें वातावरण बरेंच निवळेल, स्वदेश व साम्राज्य यांमधील लढ्याची स्पष्ट कल्पना होऊन त्यामध्यें आपण कोणती बाजू घ्यावी हें ज्याचें त्याला समजून येईल. स्वदेशासंबंधीं आम्हांला जें काय सांगावयाचें आहे तें आम्ही सांगूंच; पण त्यापूर्वी आम्हांला साम्राज्यवादाच्या तत्त्वांचा समाचार घेतला पाहिजे. साम्राज्यवाद्यांकडून अनेक खोट्यानाट्या कंड्या पिकविण्यांत येत आहेत आणि अनेक ढोंगें उभीं करण्यांत येत आहेत. म्हणून साम्राज्याच्या नांवाखालीं चाललेली जबरदस्ती, क्रौर्य व ढोंगीपणा उजेडांत आणला पाहिजे; कोणतीही कुरापत काढून आमच्यावर हल्ला चढविण्याची संधि साम्राज्याला मिळणार नाहीं अशी तजवीज केली पाहिजे. कारण अशी सवड ठेवणें फार धोक्याचें आहे. आम्हांला जें माहीत आहे आणि प्रत्यक्ष संबंधामुळें जें आमच्या निदर्शनास आलें आहे त्यावरून आम्ही म्हणूं शकतों कीं, साम्राज्य हें मूलतः अनिष्ट व अपायकारक आहे. त्याच्या मगरमिठींतून सुटका करून घेऊन आपण स्वतंत्र झालें पाहिजे. इतकेंच नाहीं तर आपण पुन्हा कधींही त्याच्या कचाट्यांत सांपडणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. आपण स्वतंत्र झालें पाहिजे, इतकेंच नाहीं तर जगांतलें कोणतेंही राष्ट्र स्वातंत्र्यासाठीं साम्राज्याबरोबर झगडत असेल तर त्या देशाला आपण उत्तेजन दिलें पाहिजे. या लढ्यांत तुम्ही खात्रीनें यशस्वी व्हाल असें सांगून धीर दिला पाहिजे.

मॅकॅव्हेलीनें* आपल्या एका ग्रंथांत साम्राज्यवादाच्या तत्त्वांची स्पष्टपणें मांडणी केली आहे. या ग्रंथाचें परीक्षण केलें असतां, ज्यांचे डोळे उघडे असतील त्यांच्या मनांतलें मोहजाल तांबडंतोंब नष्ट होईल. त्याचा प्रांजलपणा आधुनिक साम्राज्यवाद्यांना सहन होत नाहीं. त्याच्या वचनांतील दुष्टपणामुळें आपल्या अंगावर शहारे येतात असें ते ढोंग करीत असतात; पण या ढोंगानें आम्ही फसणार नाहीं; मेकॉलेनेंही† असेंच ढोंग केलें आहे. त्याचें विवेचन पुढें करण्यांत येईलच. मॅकॅव्हेलीच्या 'राज्यकर्ता' या ग्रंथांतले कांहीं उतारे पुढें दिले आहेत. त्यांचा नीट विचार करणाराला सहज दिसून येईल कीं, आयर्लंडांतील इंग्लिश सत्तेच्या बाबतींत त्याचे उद्गार अगदीं यथार्थ आहेत. साम्राज्य ही राजकीय संघटना मूलतःच अपायकारक आहे. तिचा हरएक ठिकाणीं प्रतिकार केला पाहिजे. तिच्याबरोबर अखंडितपणें लढलें पाहिजे आणि तिचा निखालसपणें त्याग केला पाहिजे, असेंही त्यांवरून दिसून येईल. अगदीं लहानपणापासून सैतानी कृतींचा व वैभवाचा तिरस्कार करावयास आपल्याला शिकवण्यांत येतें, साम्राज्याच्या बाबतींतही तीच मनोवृत्ति आपल्या अंगीं बाणली पाहिजे. प्रथम आयर्लंडवर इंग्रजांनीं केलेल्या स्वारीचा विचार करूं. परदेश काबीज करण्याबद्दल मॅकॅव्हेली म्हणतोः " एकादा देश परकीय सत्तेच्या ताब्यांत गेल्याबरोबर परतंत्र झालेल्या लोकांपैकीं कनिष्ठ दर्जाचे लोक व दुर्बल सरदार नव्या राज्यकर्त्यांच्या पक्षाला मिळतात. वरिष्ठ दर्जाच्या लोकांबद्दल त्यांना हेवा वाटत असतो आणि त्यांच्यावर चढाई करण्याच्या इच्छेनेंच ते परक्यांना सामील होतात. विजयी राजानें त्यांना संतुष्ट केलें पाहिजे व त्यांच्या आशा पुऱ्या केल्या पाहिजेत; म्हणजे ते नव्या राजसत्तेशीं एकरूप होऊन जातात. मात्र या लोकांचें सामर्थ्य फार वाढणार नाहीं एवढी खबरदारी घेतली पाहिजे. त्यांना फारसे अधिकार देऊं नयेत; म्हणजे त्यांच्या

---

* मॅकॅव्हेलीः (१४६९–१५२७) इटालियन मुत्सद्दी. राज्यकर्ता, युद्धकला, फ्लोरेन्सचा इतिहास वगैरे ग्रंथांचा लेखक.

† मेकॉलेः (१८००–१८५९) इंग्रज इतिहासकार, निबंधलेखक व मुत्सद्दी. इंडियन पीनल कोड तयार करण्यासाठीं नेमलेल्या पंचांचा अध्यक्ष. त्याचे इतिहास व निबंध सुप्रसिद्ध आहेत.

मदतीनें व स्वतःच्या सामर्थ्याच्या जोरावर राजाला ओजूबाजूचीं राज्यें ही कावीज करतां येतात आणि सार्वभौमत्व मिळवितां येतें.” ‘फोडा आणि जिंका’ ही म्हण जुनीच आहे. परदेशांत प्रवेश करून घेण्याला कोणती तरी सबब पुढें करणें नेहमीं फार फायद्याचें असतें. धर्माची सबब पुढें करून चंचुप्रवेश करून घेणाऱ्या राजांची मॅकॅव्हेलीनें फार वाखाणणी केली आहे. एकदां प्रवेश झाल्यानंतर जोमदार धोरण स्वीकारलें पाहिजे. “परदेशांतील सत्ता हातीं येतांच राज्यकर्त्यांनीं इष्ट वाटतील तेवढे खून करावे आणि जरूर तेवढीं क्रूर कर्में करावीं.” हें वाचतांना क्रॉमवेलचीं कृत्यें आपल्या चित्त-चक्षूंसमोर उभीं राहतात.*

“ निर्दयपणामुळें प्रजा आपल्या हुकमतींत रहात असेल तर क्रौर्याबद्दल होणाऱ्या नाचक्कीकडे राज्यकर्त्यानें पूर्ण दुर्लक्षच करावें. कारण एकादें स्वतंत्र शहर काबीज केल्यानंतर त्याच्या तटबंदीवरून नांगर न फिरविणें ही घोडचूक आहे आणि अशा चुकीमुळें राज्यकर्त्याचा नाश होण्याचा संभव आहे. कारण बंड करावयाची इच्छा होतांच नागरिक लोक स्वातंत्र्यासाठीं व पूर्वापार चालत आलेले कायदे पुन्हा प्रस्थापित करण्यासाठीं राजसत्तेला

* १६४१ सालीं आयर्लंडांतील कॅथलिक लोकांनीं बंड करून सुमारें ५००० इंग्लिश जमीनदार व वसाहतवाले यांची कत्तल केली. त्यानंतर खुद्द इंग्लंडांतच यादवी माजल्यामुळें इंग्रजांना आयर्लंडकडे लक्ष देतां आलें नाहीं. इंग्लंडांत लोकसत्ताक पक्ष प्रबल होता त्या वेळीं आयर्लंडांतील राज-पक्षीयांनीं राजपुत्र चार्लस् याच्या नांवाची द्वाही फिरविली. आयर्लंडांतील नष्ट होत आलेली इंग्लिश सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठीं पार्लमेंटमार्फत क्रॉमवेलची रवानगी करण्यांत आली. १६४९ च्या ऑगस्ट महिन्यांत तो आयर्लंडांत उतरला आणि लवकरच त्यानें साऱ्या देशांत दरारा बसविला. ड्रॉघेडा व वेक्सफर्ड येथील शिबंदीची व राजपक्षातर्फे लढणारांची त्यानें सरसहा कत्तल उडवली. अजूनही आयर्लंडांत कोणाचें अनिष्ट चिंतावयाचें असल्यास ‘तुझ्या छातीवर क्रॉमवेल बसो’ असें म्हणतात. त्याच्याच हुकुमा-वरून दक्षिण आयर्लंडांतील लोकांना कॅनाटच्या निर्जल, नापीक व ओसाड परगण्यांत हांकून देण्यांत आलें व अनेकांना गुलाम म्हणून विकण्यांत आलें. अशा रीतीनें रिकाम्या केलेल्या प्रदेशांत त्यानें प्रॉटेस्टंट लोकांच्या वसाहती वसविल्या.

विरोध करावयास तयार होतात आणि परकीयांना कितीही काळपर्यंत व केवढ्याही चांगुलपणानें वागवलें तरी या भावना त्यांच्या मनांतून केव्हांही नष्ट होत नाहींत." सरसहा कत्तल करणें शक्य नसल्यास खुषामत व मेहेरबानगी यांची योजना करावी असेंही त्यानें सुचविलें आहे. "लोकांना आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठीं त्यांच्या मनांत खोट्या आशा उत्पन्न कराव्या अगर त्यांना थोड्याबहुत देणग्या द्याव्या; यानें कार्यभाग होत नसेल तर त्यांची सरसहा कत्तल करावी." इल्लींचे लांचलुचपतीचे व पदवीदानाचे प्रकार याच तत्त्वाच्या अनुरोधानें चाललेले आहेत. त्यानें आणखी सांगितलें आहे कीं, "फार दिवसांपासून स्वातंत्र्याचा उपभोग घेत असलेला देश एकदां काबीज केल्यानंतर तेथें आपली सत्ता दृढमूल करण्यासाठीं राज्यकर्त्यानें तेथल्याच लोकांना नोकरीवर ठेवावें आणि स्थानिक लोकांच्या हातूनच तेथील कारभार चालवावा." नोकरीसाठीं अधिकाऱ्यांचे मागें लागणारे लोक, राजघराण्यांतील माणसांचे दौरे आणि राजनिष्ठा व्यक्त करण्यासाठीं तयार केलेलीं सत्कारपत्रें यांची आपल्याला हें वाचल्यानंतर आठवण होते. जिंकलेल्या देशांत आपली सत्ता कायम करण्यासाठीं कोणते उपाय योजावे यांचेंही त्यानें विवेचन केलेलें आहे. "नवा देश जिंकून वो आपल्या साम्राज्यांत सामील केल्याबरोबर राज्यकर्त्यानें तेथील प्रजेच्या ताब्यांतलीं शस्त्रास्त्रें जप्त करावीं. युद्धाचे वेळीं स्वतःच्या वतीनें आपल्या देशबांधवांबरोबर लढणाऱ्या लोकांना शस्त्रें वापरण्याची परवानगी देण्याला कांहीं हरकत नाहीं. प्रजेचा प्रखरपणा क्रमाक्रमानें कमी करून लोकांना आळशी व दुर्बल बनवावें; लोकांच्या अंगची मर्दुमकी नष्ट झाल्यानंतर आपल्या समर्थ सैन्याला विरोध करावयाची कल्पना कोणाच्या स्वप्नांतही येणार नाहीं आणि आपलें प्रभुत्व तेथें पूर्णपणें प्रस्थापित होईल अशी राज्यकर्त्यानें खात्री बाळगावी." हें वाचल्यानंतर आमच्या अंगीं दुर्बलपणा कसा आला व आम्हांवर हत्यारांचा कायदा कां लादण्यांत आला याचें स्पष्टीकरण होतें. अर्ध्या प्रजेच्या हातांत हत्यारें नाहींत आणि अर्धी प्रजा लांचलुचपतीमुळें मिंधी झालेली आहे, अशा स्थितींत एकाही मनुष्याबरोबर नेकीनें वागावयाची राज्यकर्त्यांना जरूर वाटत नाहीं. मॅकॅव्हेली म्हणतोः "एकदां दिलेलें वचन पाळण्यामुळें आपल्या सत्तेला कोणत्याही प्रकारचा

अपाय होण्याचा संभव असला अगर ज्या अडचणीमुळें एकादें वचन द्यावें लागलें ती दूर झालेली असली तर शाहण्या व दूरदर्शी राज्यकर्त्यानें इभ्रतीच्या भरीं न पडतां खुशाल वचनभंग करावा." या बाबतींत कोणत्याही प्रकारचा गैरसमज होऊं नये म्हणून त्यानें आणखी स्पष्टीकरण केलें आहे. " आपल्या मनाचा कल कोणीकडे झुकत आहे हें कोणालाही ओळखतां येणार नाहीं आणि आपल्या ढोंगाची बतावणी बेमालूम होईल अशी राज्यकर्त्यानें खबरदारी घेतली पाहिजे." प्रसंगानुरोधानें प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यांत आणि इतरत्र दिलेलीं असंख्य वचनें आमच्या राज्यकर्त्यांनीं कां पाळलीं नाहींत याचा यावरून सहज उलगडा होतो." आपल्या इज्जतीचा नांवलौकिक होईल अशी राज्यकर्त्यांनीं खबरदारी घेणें इष्ट आहे पण त्या बाबतींत मॅकॅव्हेलीनें दिलेली सूचना फार महत्त्वाची आहे. " सौम्यपणा, दया, सभ्यता, धार्मिकपणा व आस्था हे गुण आपल्या वर्तनांत आहेत असें दाखविण्यानें राज्यकर्त्यांच्या लौकिकांत भर पडते; पण वेळप्रसंग आल्यास अगदीं विरुद्ध रीतीनें वागतां येईल अशी त्यांनीं आपल्या मनाची तयारी ठेवली पाहिजे." अजूनही शंका असेल तर आणखी ऐका: " देशामध्यें दुर्व्यसनांचा फैलाव झाला तरी राज्यकर्त्यानें तिकडे लक्ष देऊं नये, कारण त्यांवांचून त्याच्या राज्याला बळकटी येणें अशक्य असतें." मॅकॅव्हेलीचें तत्त्वज्ञान आतां पुरें झालें; आणि रानटी लोकांची सुधारणा करण्यासाठीं बाहेर पडलेले साम्राज्यवादी म्हणतात कीं, हीं दुष्ट तत्त्वें ऐकून आमच्या अंगावर शहारे येतात; पण या दोघांचाही दुष्टपणा व ढोंगीपणा आतां आमच्या दृष्टीस येऊं लागला आहे. 'राज्यकर्ता' हें पुस्तक वाचून आम्हांला तर असें वाटलें कीं, खुद्द आयर्लंडांतील इंग्रजांच्या सत्तेचें आणि त्यांच्या राज्यपद्धतीच्या उपांगांचें परीक्षण करून एकाद्या सूक्ष्म निरीक्षकानें हीं तत्त्वें निर्माण केलीं असावीं. या स्पष्टीकरणाबद्दल आपण मॅकॅव्हेलीचे आभारच मानले पाहिजेत. त्यानें राज्यकर्त्यांना केलेल्या उपदेशावरून त्या काळच्या सिंहासनस्थ दरवडेखोरांच्या शासनपद्धतीचें आणि आमच्या साम्राज्याच्या अंतस्थ कारभाराचें स्पष्ट दिग्दर्शन होतें.

मॅकॅव्हेलीनें चार शतकांपूर्वीं व इटलींत लिहिलेल्या या ग्रंथांतील तत्त्वें आजच्या परिस्थितींतही तंतोतंत लागू पडतात, यापासून आपण एक धडा

शिकण्यासारखा आहे. या ग्रंथांत साम्राज्यवादाच्या तत्त्वांची पद्धतशीर मांडणी केलेली आहे असेंच आपण समजलें पाहिजे आणि साम्राज्याबरोबर कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवावयाचा नाहीं असें ठरविलें पाहिजे. पूर्वी साम्राज्यांच्या संस्थापनेसाठीं व अभिवृद्धीसाठीं जे उपाय योजण्यांत येत होते ते यापुढें आमच्यावर योजण्यांत येणार नाहींत अशी खबरदारी घेण्यांत येईल, असा मुद्दा पुढें येण्याचा संभव आहे. साम्राज्याच्या समर्थनासाठीं नव्यानेंच पुढें आलेल्या या लोकांना आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, कारस्थानांच्या जोरावर तुम्ही दुसऱ्या देशांत आपली सत्ता प्रस्थापित करून जुने उपाय तेथें नव्यानेंच अंमलांत आणाल. ही भ्रष्टता आम्हांला सहन होणार नाहीं. इतर राष्ट्रांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठीं आम्ही तुम्हांला मदत करणार नाहीं. इतकेंच नव्हे तर परतंत्र राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं उठावयाला आम्ही उत्तेजन देणार. यामुळें चालू युद्ध वाढणार असेल तरी आम्ही डरणार नाहीं. हें युद्ध कितीही लांबलें तरी तें शेवटाला नेण्याची हिम्मत आमच्या अंगांत आहे. आमच्यावर आजपर्यंत अनेक प्रकारचा जुलूम करण्यांत आलेला आहे आणि हा जुलूम अत्यंत नीच प्रकारचा असल्यामुळें त्याच्या वेदना आम्हांला अधिकच झोंबत आहेत. समर्थांच्या जुलूमजबरदस्तीमुळें मनाला संताप येतो; पण नीच लोकांनीं केलेल्या जुलुमामुळें होणाऱ्या वेदना जिवाला सहन होत नाहींत. ऑमवेलच्या क्रौर्याचा एक वेळ आम्हांला विसर पडेल; पण मेकॉलेचा दांभिकपणा मात्र आमच्या हृदयांत सदैव सलत राहील. त्यानें लिहिलेलीं कांहीं वाक्यें वाचून आमच्या देहाची आग होते आणि आमच्या आकांक्षांना विरोध करणाऱ्या सर्व शक्तींचें भस्म होईपर्यंत त्या ज्वाळा शांत होणार नाहींत. मिल्टनवरील निबंधांत त्यानें इंग्लिश राज्यक्रान्तीबद्दल बरेंच अवडंबर माजविलें आहे व आपल्या लक्षणांना साजतील असे पुढील उद्गार काढले आहेतः "आमच्या साम्राज्याच्या एका भागांत त्या वेळीं इतकी विपरीत परिस्थिति होती कीं, तेथील प्रजेचें दुःख आमच्या सुखाला पोषक होतें आणि आमच्या स्वातंत्र्याला त्यांच्या गुलामगिरीची आवश्यकता होती." या मगरूरीवर ताण करणें अशक्य आहे. हे उद्गार नीट ध्यानांत ठेविले पाहिजेत. हें साम्राज्यांतील 'श्रेष्ठ भागीदाराचें' तत्त्वज्ञान आहे. खुनाची तहान भागविण्यासाठीं आमचे गळे आहेत याबद्दल परमेश्वराचे आभार मानून त्यानें ऑमवेलच्या पद्धतीनें

आमचे गळे कापले असते, तर त्याच्यानंतरच्या पिढ्यांना त्याची चीड आली नसती; पण खरें हलाहल त्याच्या दुसऱ्या विचारसरणींत आहे. असें असूनही मॅकॅव्हेलीचा ग्रंथ वाचून आपल्या अंगावर शहारे येतात असें मेकॉलेच्या सांगण्यांत येतें. मॅकॅव्हेलीवरील निबंधांत त्यानें म्हटलें आहेः "इटलीचा इतिहास व वाङ्मय यांशीं विशेष परिचय नसलेल्या मनुष्याला, ज्यामुळें मॅकॅव्हेलीचें नांव इतकें बद्दू झालें आहे तो ग्रंथ वाचून, आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. भीतीमुळें त्याच्या अंगावर कांटा आल्यावांचून राहणार नाहीं. इतका नागवा व बेशरम दुष्टपणा; थंड, पोक्त व सशास्त्र आसुरीपणा, अत्यंत हीन मनुष्याचे ठिकाणींही संभवत नाहीं. हे गुण फक्त सैतानाचे ठिकाणीं संभवतात." पण याच लेखांत त्यानें एक महत्त्वाचा विचार प्रकट केला आहे. मॅकॅव्हेलीच्या सुप्रासिद्ध ग्रंथांत त्याला एकच दोष दिसला; तो हा कीं, त्या काळांत प्रचलित असलेलीं कांहीं राजकीय तत्त्वें सत्य आहेत असें गृहीत धरून त्यानें त्यांची मांडणी विशेष उठावदार रीतीनें केली आणि दुसऱ्या कोणत्याही लेखकाला करतां आलें नाहीं इतक्या जोरदार रीतीनें त्यानें त्यांचें स्पष्टीकरण केलें, हें अगदीं खरें आहे; या वाक्यावर विशेष जोर द्यावयाचा त्याचा हेतु नव्हता, पण त्यांत प्रकट झालेला विचार अगदीं सत्य आहे. मॅकॅव्हेलीनें प्रकट केलेले विचार असत्य आहेत असें नाहीं; त्या विचारांची मांडणी त्यानें इतक्या स्पष्टपणें व इतक्या निर्भीडपणें केली, हाच त्याचा गुन्हा, असें मेकॉलेचें मत आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मुत्सद्दयांच्या नजरबंदीच्या खेळाचें रहस्य त्यानें उघडें करून दाखविलें आणि ह्या गुन्ह्यामुळेंच तो निर्भर्त्सनेला पात्र आहे.

मॅकॅव्हेलीचा ग्रंथ वाचून आपण आश्चर्यचकित झालों आणि आपला थरकांप उडाला, हें लक्षांत आणून त्याचे पुढील शब्द वाचा: " जगाचा थोडासाही अनुभव असलेल्या मनुष्याला माहीत असतें कीं, कालस्थलाबाधित सत्याइतकी सर्वस्वीं निरुपयोगी गोष्ट दुसरी कोणतीही नाहीं. फक्त अक्षराला चांगलें वळण लागावयासाठीं तयार केलेल्या किल्यांमध्यें घालण्याकरितां तीं उपयोगी पडतात. एकूण नीतितत्त्वें मुत्सद्दयांनीं आपल्या कृतींत आणावयाचीं नसतात; मुलांनीं त्यावरून अक्षर गिरवावयाचें एवढाच त्यांचा उपयोग वक्रोक्तीच्या नांवाखालीं या उद्गारांचें समर्थन करण्याचा प्रयत्न होईल; पण

या मार्गानेंही त्यांचें समर्थन नीटसें होणार नाहीं; आणि जरी करतां आलें तरी या उद्गारांमध्यें लेखकाचें अंतरंग इतकें स्पष्ट दिसत आहे कीं, शब्दावडंबरानें भरलेल्या अनेक गंभीर ग्रंथांतूनही तितकें व्यक्त होणार नाहीं. या उद्गारांमध्यें ब्रिटिश सरकारच्या मनोवृत्तीचें स्पष्ट दिग्दर्शन झालेलें आहे, असें आम्हांला वाटतें. हीं तत्त्वें इंग्रजांच्या पूर्ण परिचयाचीं आहेत, तीं त्यांच्या वर्तनांत हरघडीला दिसून येतात आणि ते त्यांचा त्याग कधींही करणार नाहींत. आयरिश लोकांनीं या विचारसरणीला आजपर्यंत कधींही मान्यता दिली नाहीं, हल्लीं ती त्यांना मान्य नाहीं व पुढेंही होणार नाहीं. आम्ही या तत्त्वांचा पुरस्कार कधींही करणार नाहीं. जुने अत्याचार इतिहासांत सामील होत जातात तसतशीं त्यांच्याबद्दल आपणांला वाटत असलेली तीव्रता कमी होत जाते. पण दांभिकपणाची भाषा वापरण्याला सुरुवात झाली, कीं ती नष्ट होत आलेली तीव्रता पुन्हा जागृत होते. ही आग एकदां भडकली कीं, ब्रिटिश साम्राज्याबरोबर असलेले सर्व संबंध नष्ट होईपर्यंत ती शांत होणार नाहीं.

खुद्द मेकॉलेच्या शब्दांनीं आयरिश लोक फारसे फसणार नाहींत; पण बर्नार्ड शॉ व स्टुअर्ट मिल* यांसारख्या शिष्टांच्या ग्रंथांत मधून मधून आढळणाऱ्या उद्गारांवरून वाचकांची फसगत होण्याची भीति आहे. दांभिकांच्या वाग्जालाचा मनुष्याला स्वभावतःच तिटकारा वाटतो; या उपजत-बुद्धीमुळें पुष्कळ वेळां मनुष्याचा बचाव होतो. पण प्रामाणिक माणसांच्या उद्गारांमुळें पुष्कळ वेळां आपली फसवणूक होण्याचा संभव असतो. कारण त्यांचा रोख आपल्याला आगाऊ अजमावतां येत नाहीं. दुसऱ्यांच्या व्यवहारांत चंचुप्रवेश करण्याकरितां एकादी कुरापत काढण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न नेहमीं चाललेला असतो; त्यांना तशी संधि मिळूं देण्यांतच खरा धोका आहे. परक्यांच्या देशांत बोट शिरकावण्याची उत्कृष्ट सबब मिलनें आपल्या स्वातंत्र्यावरील निबंधांत दाखवून दिली आहे. "रानटी लोकांवर राज्य चालविण्याची खरी पद्धत म्हणजे एकतंत्री सुलतानशाही हीच होय;

---

* मिल : (१८०६–१८७३)–इंग्रज तत्त्वज्ञ, निबंधलेखक व उपयुक्ततावादाचा पुरस्कर्ता. स्वातंत्र्य, प्रातिनिधिक राज्यपद्धति, स्त्रियांची गुलामगिरी वगैरे ग्रंथांचा कर्ता.

मात्र प्रजेची सुधारणा करणें हाच या शासनपद्धतीचा उद्देश असला पाहिजे." 'जॉन बुलचें दुसरें बेट' या ग्रंथाच्या 'होम-रूल' आवृत्तींत शॉनें अशाचं अर्थाचे उद्गार काढले आहेत : "माझे आंतरराष्ट्रीय हक्क तिबेटनें नाकारले तर तिबेटावरून गाढवांचे नांगर फिरविण्यास मी संमति देईन." खरें पाहिलें असतां स्वदेशांतच एकाद्या तत्त्वाची अंमलबजावणी करणें ही आपल्या अखत्यारांतली गोष्ट आहे; पण परदेशांतले लोक रानटी आहेत या सबबीवर ती तेथें अमलांत आणणें ही गोष्ट अगदीं भिन्न व गैर आहे. तिबेटांतल्या लोकांनीं एकादा अत्याचार केला तर याबद्दल शॉला खरा संताप येणें अगदीं स्वाभाविक आहे. 'जॉन बुलचें दुसरें बेट' याच्या पहिल्या आवृत्तीला जोडलेल्या 'मुत्सद्द्यांना दोन शब्द' या प्रस्तावनेंत त्यानें अगदीं स्पष्टपणें आणि कोणाचीही भीडमुर्वत न धरतां असा संताप व्यक्त केला आहे. पण परदेशांवर चढाई करण्याची इच्छा मनांत बाळगणाऱ्या मुत्सद्द्यांवर त्यांतील टीकेचा यत्किंचित्ही परिणाम झाला नाहीं. परदेशावरून गाढवांचे नांगर फिरविण्यासाठीं त्यांना सबबी काढून देण्याची शॉची तयारी आहे तोंपर्यंत त्यांच्यावर अशा टीकांचा परिणाम होणें अशक्य आहे. मोरक्को, ट्रिपोली, सायबेरिया व आफ्रिका या देशांतील रानटी लोकांची सुधारणा करण्यासाठीं फ्रान्स, इटली, रशिया, जर्मनी व इंग्लंड या राष्ट्रांबरोबर सहकार्य करावयाची त्याची तयारी आहे, तोंपर्यंत त्यानें परदेशांतील अत्याचारांचा कितीही निषेध केला तरी त्याचा कांडीइतकाही उपयोग होणार नाहीं; फार तर ते अत्याचार होऊन गेल्यानंतर त्यानें काढलेले उद्गार ऐकून कांहीं लोक कळवळ्यानें चार अश्रु ढाळतील. रानटी लोकांवर क्रूर जुलूम करण्याला संमति दिल्याबांच्यून त्यांची सुधारणा करण्याच्या कार्यांत आपल्याला सत्ताधाऱ्यांबरोबर सहकार्य करतां यत्नयाचें नाहीं असें त्याला आढळून येईल. "ज्याला आपल्या मातृभूमीच्या पावित्र्याची जाणीव झालेली आहे आणि इतरांच्या अंतःकरणांतही अशीच पवित्र व शुद्ध भावना आहे याची ज्याला जाणीव झालेली आहे असा मनुष्य अत्यंत तिरस्कारानें ज्या शब्दावर थुंकतो तो शब्द 'साम्राज्य' हा होय," असें शॉ कळकळीनें सांगूं लागला म्हणजे साम्राज्याचा डोलारा उभारणारे मुत्सद्दी खासगी संभाषणांत दांत काढून त्याच्याबद्दल तुच्छता दाखवीत असतील. 'प्रातिनिधिक राज्यपद्धति' या

अंग्यांत मिलनें इंग्रज लोकांचें गुणवर्णन केलें आहे; शॉच्या डोक्यांत असल्या भ्रामक कल्पना नाहींत हें येथेंच सांगितलें पाहिजे. मिल म्हणतोः "स्वातंत्र्याचा खरा अर्थ जर कोणी जाणला असेल तर तो फक्त इंग्रजांनींच. त्यांच्या हातून पूर्वी कोणत्याही चुका झालेल्या असोत, परकीयांबरोबरील व्यवहारांतलें त्यांचें वर्तन विवेक व नीति यांना धरून असतें; दुसऱ्या कोणत्याही देशांत असें दिसत नाहीं, इतकेंच नव्हे तर असें शुद्ध घोरण ठेवणें शक्य, जरूर अथवा इष्ट आहे अशी कल्पना दुसऱ्या कोणत्याही प्रबल सत्तेच्या मनांतही येत नाहीं." रानटी लोकांची सुधारणा करण्यासाठीं हे लोक त्यांच्यावर अत्याचार करतात इतकेंच नाहीं तर अगदीं मेकॉलेइतक्या मऊपणानें ते त्यांची सुधारणा करण्यासाठीं झटतात. हे विचार वाचून आपल्याला संताप येतो; पण त्या संतापांत करमणूक व आश्चर्य यांचेंही मिश्रण असतें. या प्रश्नाचा अभ्यास करतांना संताप भडकेल व तिरस्कार जागृत होईल असे पुष्कळसे उद्गार ऐकण्यांत येतात. पण मिलचें वर दिलेलें सुभाषितरत्न वाचून आणि तो तें अत्यंत गांभीर्यानें सांगत आहे हें पाहून कोणालाही हास्याच्या उकळ्या फुटल्यावांचून राहणार नाहींत. "नोकरीसाठीं हांजी हांजी करणें एकाही इंग्रजाच्या हातून कधींही होणार नाहीं." हे शब्द अत्यंत प्रामाणिक अशा एका इंग्रजाच्या लेखणींतून निघालेले आहेत, हें लक्षांत आणलें म्हणजे आपण किती सावध राहिलें पाहिजे हें समजून येईल. साम्राज्याबद्दल असले बाष्कळ पण घातुक प्रलाप पसरविण्यांत येत आहेत; म्हणून आपण त्यांचा नीट विचार केला पाहिजे आणि सदैव सावध राहिलें पाहिजे.

शेवटीं स्वराज्याची चळवळ चालविणाऱ्या पुढाऱ्यांबद्दलही दोन शब्द सांगितले पाहिजेत. स्वराज्य मिळाल्यानंतर आम्ही साम्राज्याशीं राजनिष्ठ राहूं असें भविष्य हल्लीं वर्तवण्यांत येत आहे आणि तें आजपर्यंत इतक्या वेळां जाहीर करण्यांत आलें आहे कीं, तें कानीं येतांच लोकांना हंसूं येऊं लागलें आहे. या भविष्यावर विश्वास ठेवण्याइतका भोळेपणा पुष्कळ इंग्रजांचे अंगीं आहे आणि हें अगदीं साहजिक आहे; पण त्यावर विश्वास ठेवण्याइतकीं मूर्ख माणसें आमच्यांतही असावींत ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे. इतिहास व अनुभव यांपैकीं एकाचेंही या भविष्याला पाठबळ नाहीं.

कदाचित् स्वराज्याच्या चळवळींतल्या पुढाऱ्यांनीं स्वतःच्या आयुर्मानावरून हें भविष्य वर्तविलें असेल; आपल्याला दहावीस वर्षांपेक्षां अधिक दिवस प्रत्यक्ष कार्य करतां यावयाचें नाहीं हें ओळखून तेवढ्या काळापुरतेंच अनुमान त्यांनीं बसाविलेलें असेल. पण दहावीस वर्षांनंतर कार्यक्षेत्रांत येणारीं माणसें उत्साही व युद्धप्रवण अशींच असणार; आणि तोंपर्यंत आम्हांला स्वातंत्र्य मिळालेलें नसेल तर त्या वेळीं आमची जय्यत तयारी होईल. उतार वयांतल्या लोकांच्या उडीपेक्षां आमची झेंप अधिक पल्लेदार असणारच. स्वतःच्या कर्तबगारीवर त्यांनीं घातलेल्या मर्यादा आम्हांलाही बंधनकारक नाहींत—येथें याहून अधिक सांगण्याची जरूर नाहीं. पुढच्या पायरीबद्दल ज्याला संशय वाटत असेल त्यानें आमच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांतील घडामोडींचें निरीक्षण करावें. प्रथम आम्हांला जेरीस आणावयासाठीं आणि नंतर आमचा बीमोड करण्यासाठीं राज्यकर्त्यांकडून प्रयत्न करण्यांत आले. हे प्रयत्न फसल्यानंतर आम्हांला वळविण्यासाठीं सामोपचार सुरू करण्यांत आले. लहानसहान हक्क मिळवीत आम्ही जमिनीच्या मालकी हक्कासाठीं झगडा सुरू केला. जमिनींच्या बाबतींत अनेक कायदे मंजूर करण्यांत आल्यामुळें आमचे नैसर्गिक हक्क आम्हांला प्राप्त झाले. नंतर स्वराज्याची चळवळ सुरू झाली. दडपशाहीच्या जोरावर ही चळवळ चिरडून टाकण्याचा प्रयत्न फसल्यामुळें सरकारनें भलेपणा दाखवून आमच्या आकांक्षा गुदमरवण्याचा यत्न सुरू केला. आम्हांला स्थानिक-स्वराज्याचे हक्क देण्यांत आले पण यामुळें राष्ट्रीय स्वराज्य अगदीं अपरिहार्य झालें. आतां स्वराज्य अगदीं आमच्या हाताशीं आलेलें असून स्वातंत्र्याच्या शेवटच्या पायरीवर पाऊल टाकावयाचा आमचा विचार चाललेला आहे. ज्यानें म्हणून आयर्लंडचा इतिहास वाचला आहे, ज्याला प्रगतीची यत्किंचितही कल्पना आहे, अनुभवाच्या आधारानें नवे धडे शिकण्याची पात्रता ज्याचे अंगीं आहे, त्याची खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं कीं, स्वराज्याचें आगमन हा अंताचा आरंभ मात्र आहे.

प्रकरण सोळावें

सशस्त्र प्रतिकार

प्रास्ताविक

स्वातंत्र्याच्या मीमांसेंत सशस्त्र प्रतिकाराचा विचार अपरिहार्य आहे. जनतेची मागणी सत्य व न्याय्य आहे हें तर्कशास्त्राच्या आधारानें सिद्ध करून दाखविण्याचाच काय तो अवकाश, कीं लगेच त्या मागणीला सत्ताधाऱ्यांकडून मंजुरी मिळावयाची, अशी व्यवस्था असती, तर जगांत जुलूमजबरदस्ती अस्तित्वांतच राहिली नसती; पण सत्याची वाणी जुलमी सत्ताधाऱ्यांच्या कानीं जात नाहीं आणि साधकबाधक प्रमाणांनीं एकादें तत्त्व सिद्ध करून दाखविलें तरी त्याला मूर्त स्वरूप देण्याला ते तयार नसतात; म्हणून मनगटाच्या बळानेंच जुलमी सत्ताधाऱ्यांचा प्रतिकार केला पाहिजे; आणि म्हणूनच सशस्त्र बंडाला नैतिक मूलाधार आहे किंवा नाहीं, याचा विचार केला पाहिजे.

प्रत्येक कार्यक्रमाकडे व्यवहार्यतेच्या दृष्टीनें पाहण्याचें ढोंग करणारे चिड-खोर टीकाकार हल्लीं सर्वत्र दिसूं लागले आहेत. बंडाचा प्रश्न निघतांच ते विचारतीलः "आजच्या परिस्थितींत सशस्त्र प्रतिकाराची चर्चा करण्याचा काय उपयोग? शत्रूंशीं लढण्याची कोणाला इच्छा असली तरी अशक्य म्हणून ती कल्पना त्याला सोडून दिली पाहिजे आणि खरें पाहिलें असतां अशा युद्धाची उभारणी करण्याची इच्छा कोणालाही नाहीं. तुम्हांला स्फुरण आलें असेल, तर तुम्ही सुरवात कां करीत नाहीं?" ही तिरसटपणाची टीका कशीही असली तरी ती व्यवहार्य खास नाहीं आणि म्हणून तिकडे पूर्ण दुर्लक्ष केलें तरी चालण्यासारखें आहे. फार दिवस चाललेला आपला राष्ट्रीय लढा एका झपाटयासरशीं, एकाच निर्णायक युद्धांत शेवटाला न्यावा अशी जिव्हाळयाची इच्छा मनांत बाळगणारा, पण हा मार्ग अव्यवहार्य आहे अशा कल्पनेनें हताश झालेला एक वर्ग देशांत आहे. या वर्गाची मनोवृत्ति वरील टीकेंत प्रदर्शित झालेली आहे. फक्त व्यवहार्यतेकडे लक्ष ठेवून या प्रश्नाचा विचार करूं लागलें असतां अनेक मुद्दे आपल्यासमोर उभे राहतात.

आयर्लंडनें आजपर्यंत अनेक वेळां अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत निकराचीं युद्धें केलेलीं आहेत आणि वेळ पडल्यास तशाच परिस्थितींत आणखी लढाया लढण्याची आयर्लंडची तयारी आहे. तुटपुंज्या तयारीनें आणखी एकदां अजिंक्य इंग्लंडच्या समोर दंड थोपटून उभें राहणें हा आजचा प्रश्न नाहीं. इंग्लंडला इतकें सुलभ युद्ध लढावयाला मिळूं नये हें इष्ट आहे. मुद्द्याची गोष्ट ही आहे कीं, आम्ही आज आहोंत तसेच निष्क्रिय राहिलों तरीही घसरत घसरत आम्हांला इंग्लंडजवळ जावें लागेल. आम्हांला इंग्लंडच्या बतीनें तरी लढावें लागेल, नाहीं तर त्याच्या तावडींतून सुटण्यासाठीं घडपड करावी लागेल. इंग्लंडशीं संबंध आहे तोंपर्यंत आम्हांला तटस्थ वृत्तीनें राहतां येणार नाहीं. म्हणूनच आपलें लष्करी धोरण निश्चित करण्याचा विचार व्यवहार्य आहे. शिवाय हा अत्यंत निकडीचा प्रश्न आहे. इंग्लंडवर कोणतेंही संकट आलें तरी त्याची बाजू सोडावयाची नाहीं हें धोरण इंग्लंडपासून सुटका करून घेण्यासाठीं धाडस करण्याइतकेंच जोखमाचें आहे. गेल्या थोडक्याच वर्षांत परिस्थितींत पुष्कळ फरक पडला आहे. इंग्लंडची स्थिति अत्यंत नाजूक झालेली आहे. इंग्लंडमध्यें गृहकलह माजले आहेत व त्यांवर परचक्र येण्याचींही चिन्हें दिसत आहेत. मजुरांच्या प्रश्नामुळें उत्पन्न झालेला कलह कोणत्या थराला जाईल याचा नेम नाहीं. मताभिलाषी स्त्रियांच्या धांगडधिंग्यामुळें इंग्लंडच्या प्रधानाला रशियाच्या सुलतानाइतकेंच स्वतःच्या जिवाला जपावें लागत आहे. सार्वत्रिक असंतोषाचा केव्हां भडका उडेल याचा नेम नाहीं. परिस्थिति एकदम बिकट झाली तर राज्यकारभाराचीं सूत्रें ज्यांच्या हातीं आहेत त्यांचा गोंधळ उडण्याचा संभव आहे. फक्त इंग्लंडचीच स्थिति इतकी बिकट झालेली आहे असें नाहीं. सर्व प्रमुख राष्ट्रांची अशीच अवस्था आहे. अशा स्थितींत गृहकलहाची आग भडकली तर राज्यकारभार लुला पडण्याचा संभव आहे आणि परक्या राष्ट्रांबरोबर युद्ध पुकारण्याची तयारी केली तरी याहून अधिक वाईट परिस्थिति निर्माण होणें शक्य नाहीं. एक गोष्ट स्पष्ट आहे,ती ही कीं, या घालमेलींतून बाहेर पडून कोणत्याही प्रकारच्या भानगडींत भाग न घेण्याच्या इच्छेनें एकान्तांत स्वस्थ बसून राहणें आपल्याला अशक्य आहे. रणभूमीवर युद्धासाठीं उभें राहणें आपल्याला भाग आहे, मग तें युद्ध आम्ही आमच्या स्वातंत्र्यासाठीं पुकारलेलें असो किंवा तें आमच्या राज्य-

कर्त्यांनीं धुकारून आम्हांला आपल्या हुकमतींतलीं बाहुलीं म्हणून रणांगणावर नेलेलें असो. असें आहे तर आपल्या ध्येयासाठीं लढावयाची तयारी करणें हाच मार्ग वरिष्ठ आहे हें स्पष्ट आहे. तें कसेंही असलें तरी आजच्या परिस्थितींत या प्रश्नाचा व बंडखोरीच्या नैतिक समर्थनाचा विचार करणें अप्रस्तुत व अव्यवहार्य आहे असें म्हणावयास कोणालाही जागा नाहीं.

निदान एका अल्पसंख्याक पक्षाला तरी ही चर्चा करणें इष्ट आहे असें वाटेल अशी आमची खात्री आहे. परिणामकारी व्हावा या हेतूनेंच हा वादविवाद चालविण्यांत आला पाहिजे. अधीरपणानें एकादा अधिकउणा शब्द बोलण्यांत आल्यामुळें अगर एकाद्याची बदनामी होईल असा शब्द अविचारानें तोंडांतून चुकून निघून गेल्यामुळें, यांना मिळावें कीं यांच्यापासून अलिप्त रहावें या विचारांत घुटमळणारे आणि थोडक्याशा प्रयत्नानें जे आपल्याला मिळाले असते, असे अनेक लोक आपल्याला निखालसपणें सोडून जातील. यांपैकीं कांहीं लोक केवळ पापभीरुत्वामुळें तर कांहीं निवळ भीरुत्वामुळें थबकून राहिलेले असतील. त्यांना सत्य स्पष्ट करून दाखविल्यास ते आमच्या पक्षाला येऊन मिळतील व त्यांना शिस्तींचें शिक्षण दिल्यास आमच्या बाजूच्या उत्कृष्ट वीरांमध्यें गणना करण्याइतके ते शूर ठरतील. अमेरिकेंतल्या यादवीच्या युद्धांत* प्रत्यक्ष घडलेलें एक हृदयद्रावक उदाहरण इमर्सननें कंकार्ड येथील वीरांच्या स्मारकाच्या समर्पणविधीच्या वेळीं केलेल्या भाषणांत दाखवून दिलें आहे. त्याच्या माहितीचा एक तरुण होता; आपण अगदीं नामर्द आहोंत अशी त्याची ठाम कल्पना झालेली होती. असें असूनही त्यानें संकटांना तोंड द्यावयाचें शिक्षण घेतलें. जेथें धोका असेल तेथें मुद्दाम जाऊन त्याच्याशीं झगडून आपली भीति

---

* निग्रो गुलामांचे बाबतींत अमेरिकेंतील संस्थानांमध्यें तट पडून १८६० सालीं प्रे० आब्राहाम लिंकनच्या निवडणुकीचे वेळीं दक्षिणेकडील संस्थानें संघांतून फुटून बाहेर पडलीं. त्यांनीं वेगळा संघ निर्माण करून उत्तरेकडील संस्थानांबरोबर युद्ध पुकारलें. ही यादवी १८६१ ते १८६४पर्यंत चालू होती. १८६५ सालीं दक्षिणेंतील संस्थानांचा मोड झाला. युनायटेड स्टेट्स् हें राष्ट्र पुन्हा निर्माण झालें आणि अमेरिकेंतील गुलामगिरी नष्ट झाली.

घालवावयाची अशी त्यानें संवय करून घेतली. लढाईचे वेळीं 'त्यानें न्यूयॉर्क येथील पलटणींत आपलें नांव नोंदविलें, तो रणभूमीवर गेला आणि लहान वयांतच तो घारातीर्थीं पतन पावला'. हें उदाहरण अत्यंत हृदयद्रावक व उद्बोधक आहे. त्याचें इंगित समजावून घेऊन आपण तें नेहमीं मनांत बाळगलें पाहिजे. 'समंजस सावधपणाच्या या मनोवृत्तीनेंच महायोद्धे निर्माण होतात' लोकांचें शारीरिक सामर्थ्य कसें वाढेल इकडेच आपण लक्ष देत आहों, त्यांचें आत्मिक सामर्थ्य वाढविण्याकडेही आपण लक्ष पुरविलें पाहिजे. शारीरिक शिक्षणाच्या बाबतींत आपण बारकाईनें विचार केलेला आहे. वेगवेगळ्या स्नायूंचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं वेगवेगळे व्यायाम व संघ-व्यायाम काढले आहेत; आणि हें योग्यही आहे; कारण, अठरापगड लोकांच्या घोळक्याला शिस्तीचें शिक्षण देऊन आपणांला त्यांचें सैन्य निर्माण करावयाचें आहे. अनाथ दुर्बलतेंतून संघटित सामर्थ्य उत्पन्न करावयाचें आहे. दुर्बल मनाचीही आपण तितकीच काळजी घेतली पाहिजे. आत्मविश्वासाचा अभाव, विवेकबुद्धीचा हळवेपणा, भीति, काळजी वगैरे बाबतींत फार खबरदारी ठेवली पाहिजे. इमर्सननें ज्याचा उल्लेख केलेला आहे तो तरुण आरंभीं असाच दुर्बल होता. लोकांची खात्री पटवून देऊन त्यांचें मन वळविण्यासाठीं आपण चिकाटीनें प्रयत्न केला तर तयार झालेलीं माणसें युद्धाचे वेळीं आघाडीवर जाऊन तरवार गाजवून दाखवितील. हा प्रयत्न करीत असतांना आपण समतोलपणा कायम ठेवला पाहिजे, हरएक बाबतींत सहानुभूति दाखविली पाहिजे. एकूण, आपण शरीराची जेवढी काळजी घेतों तेवढीच मनाचीही काळजी घेतली पाहिजे हें उघड आहे.

सशस्त्र प्रतिकाराचे बाबतींत धर्माभिमान्यांकडूनही विरोध होण्याचा संभव आहे. विवेकाचा अतिरेक, भ्याडपणा, चलबिचल या सर्वांचें या वर्गांत एकीकरण झालेलें दिसून येईल. या मनोवृत्तीच्या लोकांना उत्तर देण्याचें काम सर्वांत बिकट आहे. स्वतंत्र राष्ट्रांना युद्ध करावयाचा हक्क आहे याबद्दल कोठेंही दुमत नाहीं. मात्र बंड करावयाचा हक्क, आणि तो न्याय्य असेल तेव्हांही, सर्व परतंत्र राष्ट्रांना आहे याबद्दल मतभेद आहे. आम्हांला हा हक्क आहे असें आजवर कबूल करण्यांत आलेलें नाहीं आणि आजही आमच्या या हक्काला मान्यता मिळालेली नाहीं. विरोधकांच्या प्रत्येक शब्दाला प्रति-

शब्द देऊन, प्रत्येक मुद्द्याबद्दल त्यांची खात्री पटवून आपण त्यांचेकडून आपल्या निर्णयांना मान्यता मिळविली पाहिजे. पण स्वातंत्र्यावरील आमचा हक्क केवळ तर्कशास्त्राच्या जोरावर सिद्ध करून दाखविण्याचा आमचा इरादा आहे असं मात्र यावरून कोणीं समजूं नये; दुसऱ्या साधनांनीं हें सिद्ध करून दाखवावयाची आमची तयारी आहे. युद्धाचा प्रसंग येईल तेव्हां आम्ही वचनें देत बसणार नाहीं; पण आमचे निर्णय जाहीर करूं. एवढें मात्र खास कीं, तर्कशास्त्राची जेवढी मजल आहे तेथपर्यंत आमची मागणी शास्त्र-शुद्ध आहे असें आम्ही सिद्ध करून दाखवूं. राष्ट्रीय जीवनाला अत्यावश्यक असलेला गूढ तेजाचा स्फुलिंग तर्कशास्त्राच्या प्रमेयांत नाहीं आणि आमचें ध्येय प्रतिपादनाच्या मर्यादेंत जखडलेलें नाहीं. आम्ही हमी घेतों कीं, आमचे विरोधक जे जे मुद्दे काढतील त्यांना आम्ही समर्पक उत्तरें देऊं; त्यांनीं काढलेल्या पुराव्यापेक्षां अधिक बलवत्तर प्रमाणें त्यांच्यासमोर मांडूं–पण आमचें ध्येय यापेक्षां अधिक उच्च व विशाल आहे. युद्ध करण्याच्या सर्व-साधारण हक्काचें मला स्पष्टीकरण करावयाचें नसून फक्त बंड करावयाच्या हक्काचें मला समर्थन करावयाचें आहे, आणि हा विचार खुद्द आयर्लंडच्याच दृष्टीनें करावयाचा आहे. व्यापक दृष्टीनें या प्रश्नाची चर्चा करावयास एक वेगळा ग्रंथही पुरा पडणार नाहीं. अव्यवहार्य पांडित्याचें प्रदर्शन करावयाचें नसल्यामुळें मी या प्रश्नाचा विचार शक्य तोंपर्यंत फक्त आमच्याच दृष्टीनें करणार आहें. विशेषतः कॅथलिक पंथांतल्या लोकांना पटेल अशाच रीतीनें मी या प्रश्नाची मांडणी करणार आहे; याचें कारण अगदीं उघड आहे. कॅथलिक लोकांनीं प्रमाण मानलेल्या शास्त्रीपंडितांचे याबद्दल काय विचार आहेत तेंही मी दाखवून देणार आहें. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा पुढील अवतरणावरून दिसून येईल. मेथूनचे धर्मोपाध्याय डॉ० मरे यांना पुष्कळ कॅथलिक लोक प्रमाण मानतात. आपल्या धार्मिक निबंधांत* त्यांनीं पुढील उद्गार काढले आहेतः "या प्रश्नासंबंधीं धर्मपीठांनीं एकही आज्ञापत्र काढलेलें नाहीं या विषयाची व्याख्या व विवेचन आजवर झालेलें नसल्यामुळें हा प्रश्न अजून खुला आहे. अनेक धर्मगुरूंनीं या विषयाची चर्चा केलेली आहे, तरी त्यांचेपेक्षां यासंबंधीं मौन धरणारांची संख्या अधिक आहे, असें

* Essays Chiefly Theological Vol—4.

मला पहावयाला मिळालेल्या पुराव्यावरून मी म्हणूं शकतों." हा मुद्दा महत्त्वाचा आहे. कांहीं धर्मोपाध्यायांनीं या तर कांहीं जणांनीं त्या बाजूला मतें दिलेलीं आहेत, पण कॅथलिक धर्मपीठानें या बाबतींत निर्णयात्मक आज्ञापत्र काढलेलें नाहीं. अर्थात् हा प्रश्न खुला आहे. फक्त कॅथलिक पंडितांच्या लेखनांतलेच उतारे मी देणार आहें, कारण आयर्लंडांतील जनतेचें प्रातिनिधिक सैन्य निर्माण करावयाचें झाल्यास त्यांत कॅथलिक सैनिकांचींच संख्या अधिक असणार; आणि कॅथलिक अधिकाऱ्यांकडून तंबी मिळाल्यानुळेंच आयर्लंडांतील कॅथलिक लोकांनीं राष्ट्रीय उठावणीला विरोध केलेला आहे. ही परिस्थिति जितकी नाजूक तितकीच बिकट आहे, आणि म्हणून या प्रस्तावनेंत एका मुद्द्यावर विशेष जोर देणें अवश्य आहे. एकादी अडचण नाजूक व भयप्रद आहे म्हणून ती टाळावी असें नाहीं किंवा प्रसंगावर लक्ष देऊन चालढकल करावी यांतही अर्थ नाहीं. प्रत्यक्ष रणक्षेत्रांत सैन्यें लढाईला उभीं असतात तेव्हां लष्करी हालचालींच्या व डावपेंचांच्या दृष्टीनें माघार घेण्याला हरकत नाहीं. एकदम शत्रूवर तुटून पडण्याला किंवा गनिमीकावा करून शत्रूला हूल दाखविण्यालाही मनाई नाहीं; पण तत्त्वांच्या बाबतींत डावपेंच लढविण्याला मनाई आहे. येथें फक्त समोरच्या व सरळ मार्गानेंच गेलें पाहिजे. हा मार्ग आपणच शोधून काढला पाहिजे आणि नंतर तिळमात्रही न ढळतां अगदीं शेवटपर्यंत त्यावरून धैर्यानें पावलें टाकीत गेलें पाहिजे.

प्रकरण सतरावें

सशस्त्र प्रतिकार

कायद्याचा खरा अर्थ

अनाधिकारी सत्तेचा इन्कार करावयास उठण्यापूर्वी शुद्ध सत्तेबद्दलची आपली कल्पना स्पष्टपणें मांडून आणि अशी सत्ता उचलून धरावयाची व तिच्याशीं इमान राखावयाची आमची तयारी आहे असें जाहीर करून आपलें पाऊल आपण पक्कें केलें पाहिजे. म्हणून कायदा या शब्दाचा खरा अर्थ प्रथम स्पष्ट केला पाहिजे. कायद्याची व्याख्या येणेंप्रमाणें करतां येईलः 'समाज-कल्याण हें ज्यांचें ध्येय आहे आणि राजसत्तेकडून जे जाहीर करण्यांत आले आहेत असे विचारशक्तीनें युक्तायुक्ततेच्या दृष्टीनें घालून दिलेले नियम.' या व्याख्येला दुजोरा येण्यासाठीं कांहीं आधार देतों. "विचारशक्तीच्या निर्णयाशीं एक-वाक्यता असेतोंपर्यंतच मनुष्यनिर्मित कायद्यांचे ठिकाणीं खरा कायदेशीर-पणा असतो; या दृष्टीनें पाहिलें असतां त्यांचा उगम त्रिकालाबाधित दैवी शासनांतच आहे."* ध्येय, कर्ता अगर स्वरूप या बाबतींत सदोष आणि म्हणून अन्याय्य असलेल्या कायद्यांसंबंधीं सेंट थॉमसनें‡ लिहिलें आहे कीं "या प्रकारांना कायदा म्हणण्याऐवजीं अत्याचार हेंच अभिधान दिलें पाहिजे; कारण सेंट ऑगस्टिनचें§ वचन आहे कीं 'जो कायदा न्याय्य नाहीं तो कायदाच नाहीं'."* बालमेझ म्हणतो, 'विचारशक्तीच्या निर्णयाशीं एकवाक्यता हाच कायद्याचा मूलाधार आहे. कायद्याचा उगम विचारशक्तींत आहे; विचार व समाज यांच्या संघटनानें कायदा निर्माण होतो'.† याच

---

* एक्विनाचें नीतिशास्त्र—भाग १, पृष्ठ २७६. * पृष्ठ २९२.

‡ सेंट थॉमसः बारा ख्रिश्चन प्रेषितांपैकीं एक.

§ सेंट ऑगस्टिन : (३५४–४३०) लॅटिन धर्मपीठाच्या चार प्रमुख सत्पुरुषांपैकीं एक. तरुणपणीं हा अगदीं बदफैली होता; पुढें तो सुधारला व सारें आयुष्य त्यानें धर्मकारणांत वेंचलें. त्याचें आत्मचरित्र प्रख्यात आहे.

† युरपियन सुधारणा. प्रकरण ५३.

प्रकरणांत त्यानें सेंट थॉमसचें एक वचन दिलें आहे आणि तें आपल्याला मान्य असल्याचें त्यानें कबूल केलें आहे. 'राज्य राजासाठीं नाहीं तर राजा हा राज्यासाठीं निर्माण केलेला असतो'. यावरून त्यानें पुढील नैसर्गिक निष्कर्ष काढला आहेः "समाजाच्या कल्याणासाठींच राजसत्ता प्रस्थापित केलेल्या असतात; प्रचलित शासनपद्धति कोणतीही असली, तरी हेंच ध्येय पुढें ठेवून अधिकाऱ्यांनीं कारभार केला पाहिजे." प्रजेचें कल्याण हेंच राज्य-कारभाराचें ध्येय होय, असें मिलनें आपल्या प्रातिनिधिक राज्यपद्धतीवरील ग्रंथांत कबूल केलें आहे. ख्रिस्ती शकाच्या सुरवातीपूर्वीं होऊन गेलेल्या प्लेटोचें† मत असेंच होतें. नागरिकांना उत्कृष्ट सौख्य प्राप्त व्हावें म्हणूनच नमुनेदार नगर वसाविण्यांत यावें असें त्यानें सांगितलें आहे. काल्डरवूड* लिहितोः "नैसर्गिक हक्क व कर्तव्यें यांच्या अबाधितपणाला मान्यता दिली पाहिजे, या अटीवरच राजकीय सत्तेची संस्थापना करतां येईल." वेगवेगळ्या पंथांतल्या व काळांतल्या विचारी पुरुषांची या बाबतींत पूर्ण एकवाक्यता आहे. आमच्या बाबतींत या अटी पुऱ्या होईपर्यंतच आम्ही लढणार आहों. स्वतंत्र व सर्वस्वीं आयरिश राज्य स्थापन झालें, कीं आम्ही स्वयंस्फूर्तीनें व पूर्णपणें त्याशीं राजनिष्ठ राहूं. आम्हांवर अधिकार चालवील असा कायदा तेव्हांच निर्माण होईल. सत्ता या कल्पनेचाच इन्कार करावयास आम्ही उभे राहिलेले नाहीं. आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, हल्लीं अनधिकारी माणसें अधिकाराच्या जागांवर अधिष्ठित झालेलीं आहेत आणि आम्हांला मान्य नसलेलें निशाण फडकत आहे; आणि हेंच सांगावयास आम्ही उभे ठाकलों आहों.

प्रचलित राजसत्तेला विरोध करावा किंवा नाहीं याविषयीं बालमेझ म्हणतोः "प्रचलित सत्ता कशीही असो, प्रजेनें तिच्या आधीन राहून तिचे हुकूम पाळलेच पाहिजेत, असें प्रतिपादन करणाऱ्या विरुद्ध पक्षाचीं मतें

---

† ग्रीक तत्त्ववेत्ता. लोकशाही या प्रसिद्ध संवादाचा कर्ता. (रिपब्लिक, पुस्तक चवथें).

* स्कॉटिश तत्त्ववेत्ता व इतिहासकार. (Handbook of Modern Philosophy. Applied Ethics, Section 4).

आपण हाणून पाडलींच पाहिजेत."* या प्रसिद्ध स्पॅनिश पंडितापेक्षां अधिक स्पष्ट विवेचन आम्हांला करतां येणार नाहीं. वरील अंध अनुयायांच्या प्रतिपादनाला त्यानें आपल्या अधिकारी शब्दांत जोरदार उत्तर दिलें आहे. "असत्याच्या पायावर उभारलेल्या कमअस्सल सत्तेला हुकमत गाजविण्याचा अधिकारच नाहीं. अधिकार याच कल्पनेंत हक्क ही कल्पना अंतर्भूत आहे. प्रजेच्या हक्कांचें अस्तित्व नाकारणारी राजसत्ता म्हणजे निवळ दंडुकेशाही होय. तिची उभारणी निवळ पाशवी सामर्थ्यावर झालेली असते." तो पुढें म्हणतोः "फक्त शस्त्रास्त्रांच्या बळावर एकादा देश काबीज करणाऱ्याला त्या विजयामुळें त्या देशावर मालकी हक्क प्राप्त होतो असें मुळींच नाहीं. त्याला ढळढळीत अन्यायानें नागरिकांपैकीं विशिष्ट वर्गाची संपत्ति लुबाडून घेतां येईल, जुलमानें बेसुमार खंडण्या वसूल करतां येतील, प्रजेचे न्याय्य हक्क हिरावून घेतां येतील. सामर्थ्याच्या जोरावर त्याला हीं अन्यायाचीं कृत्यें पार पाडतां येतील; पण म्हणून तीं कृत्यें न्याय्य होतीं असें कधींही ठरणार नाहीं." इतक्या स्पष्टपणें व निश्चितपणें त्यानें आणखी पुष्कळ विवेचन केलेलें आहे. आमच्या विरुद्ध पक्षांतले बडे बडे लोक याबद्दल कोणत्या अद्वातद्वा गोष्टी बोलतील तें आम्हांला माहीत आहे. खुद्द बालमेझनेंच त्यांच्या शब्दांना उत्कृष्ट उत्तर देऊन ठेवलेलें आहेः "पामीरा येथील आचार्य डॉन फेलिक्स अमाट यानें लिहिलेल्या 'युद्धोन्मुख धर्माची रूपरेखा' हा ग्रंथ त्याच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाला. त्यांत त्यानें पुढील शब्दयोजना केलेली आहे. 'सुलतानाचें देणें सुलतानाला द्या' असें खुद्द येशू खिस्ताचें सोपें व अर्थपूर्ण वचन आहे; त्यावरून स्पष्टपणें प्रस्थापित होतें कीं, प्रजेनें राजसत्तेचे हुकूम पाळलेच पाहिजेत हें सिद्ध करण्याला आणि त्या हुकुमांची अंमलबजावणी सक्तीनें होईलच अशी हमी देण्याला, राजसत्तेचें अस्तित्व हा एकच पुरावा पुरेसा आहे. मात्र खुद्द रोममध्यें आद्य धर्मपीठानें मनाई हुकूम काढून या ग्रंथाच्या प्रसाराला बंदी केली होती." एवढीच अर्थपूर्ण टीका करून बालमेझ म्हणतोः "या मनाई हुकुमाची प्रेरणा कोणत्याही हेतूमुळें झालेली असो; एवढें मात्र स्पष्ट आहे कीं, आपल्या हक्कांविषयीं जागरूक असलेल्या माणसांनीं अशा तत्त्वांचें समर्थन करणाऱ्या ग्रंथाचे बाबतींत धर्मपरिषदेच्या आज्ञापत्राला

* European Civilization-Chapter 55.

अनुमति देऊन त्यांजवर बहिष्कारच घातला पाहिजे." अस्तित्वांत-असलेल्या राजसत्तेच्या बुजगावण्याबद्दल एवढें विवेचन पुरें आहे. राजसत्ता बळकावण्याचा डाव सिद्धीला गेला, एवढ्यावरूनच ती सत्ता न्याय्य व कायदेशीर आहे असें ठरत नाहीं. तिच्या आज्ञांचा प्रत्यक्ष प्रतिकार होत नाहीं म्हणून त्या आज्ञा आम्हांला तत्त्वतः प्रमाण आहेत असेंही सिद्ध होत नाहीं. ते हुकूम बिनतक्रार मान्य करण्याचें ढोंगही आम्हांला करतां येणार नाहीं; यावरून एवढेंच म्हणतां येईल कीं, प्रतिकाराची मोहीम सुरू करण्याची वेळ अजून आलेली नाहीं. युद्धाला तोंड लागण्यापूर्वी रचावयाच्या व्यूहांतली ही एक रचना आहे.

आयर्लेंडांतील राजसत्ता इंग्रजांनीं बलात्कारानें बळकावलेली आहे आणि म्हणून त्यांच्या अधिकाराचा आम्ही इन्कार करीत आहों. आरंभीं बळकावलेल्या सत्तेला प्रजेनें अनुमति दिली म्हणजे तिला हळुहळू न्याय्यसत्तेचा दर्जा प्राप्त होत जातो, असा कोणीं आक्षेप काढला तर त्यावर उत्तर आहेच. आम्हीं ब्रिटिश सत्तेला मान्यता देत आलों आहों असें या आक्षेपांत गृहीत धरलेलें आहे; याचा आम्ही स्पष्टपणें इन्कार करीत आहों. या बळकावणीला आम्हीं केव्हांही मंजुरी दिलेली नाहीं, याची साक्ष आमचा इतिहास पटवीत आहे. या साध्या इन्कारानें ज्यांचें समाधान होणार नाहीं त्यांना आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, आरंभापासून पायाशुद्ध असलेल्या राजसत्तेनें अधिकारांचा दुरुपयोग करावयास सुरवात केली तर तिलाही विरोध करून नष्ट करणें रास्त आहे. आयर्लेंडचें राज्य इंग्रजांनीं बळकावलेलें आहे ही गोष्ट आम्ही अजून गृहीत धरीत आहों; तें त्यांना न्यायानें प्राप्त झालेलें आहे अशी कल्पना केली तरीही आमच्या विरोधकांना आम्ही निरुत्तर करूं शकतों. डॉ० मरे म्हणतातः " न्याय्य पायावर उभारलेली व अस्तित्वांत असलेली राजसत्ता आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करूं लागली असतां तिला विरोध करावा कीं नाहीं या प्रश्नाबद्दल आमच्या धर्मोपाध्यायांपैकीं बहुतेकांचें मत आहे कीं, अशा परिस्थितींत त्या सत्तेला प्रतिकार करणें सर्वस्वीं कायदेशीर आहे; आणि अत्यंत बिकट प्रसंग ओढवल्यास सार्वभौमाला अगर अधिकारी मंडळाला पदच्युत करावयास कोणतीही तात्त्विक हरकत नाहीं. हा निकराचा मार्ग स्वीकारण्यापूर्वी पुढील अटी पुऱ्या झालेल्या असल्या पाहिजेत.

(१) राज्यकर्त्यांचा जुलमाचा अतिरेक झालेला असून तो प्रजेला असह्य झालेला असला पाहिजे.

(२) धडधडीत जुलूम होत आहे हें सच्छील व सद्विचारी माणसांना स्पष्टपणें दिसून आलेलें असलें पाहिजे.

(३) राजाचा प्रतिकार केला असतां अगर त्याला पदच्युत करण्याचा प्रयत्न केला असतां होणाऱ्या हानीपेक्षां त्याच्या जुलमाचें स्वरूप अधिक भयंकर असलें पाहिजे;

(४) सदरहू बेबंदशाहीला ताळ्यावर आणण्यासाठीं निर्वाणीच्या उपायाशिवाय दुसरा कोणताही मार्ग खुला राहिलेला नसला पाहिजे.

(५) विजयाबद्दल नैतिक विश्वास वाटत असला पाहिजे.

(६) सदरहू क्रांतीला बहुजनसमाजाची संमति असली पाहिजे.

(७) बंडाची उभारणी व मोहीम बहुजनसमाजाच्या उठावणीनेंच झालेली असली पाहिजे.

या कार्यक्रमाला देशांतील एखाद्या अल्पसंख्याक पक्षानें विरोध केला तरी बहुजनसमाजाचा निर्णय बेकायदेशीर ठरत नाहीं."

मरेसाहेबांनीं यांपैकीं कांहीं अटींचें विवेचन विशेष विस्तारानें केलेलें आहे. त्यांतील अत्यंत महत्त्वाचा तेवढाच भाग मीं दिलेला आहे. या सर्व अटी आयर्लंडांतील परिस्थितीला किती अचुकपणें लागू पडतात हें कोणालाही सहज दिसून येईल. बंड करण्यापूर्वीं परिस्थिति किती बिकट झालेली असावी याचें आमच्या आजच्या घुढाऱ्यांना निदान करावयास सांगितलें असतें तर त्यांनीं यापेक्षां अधिक कडक अटी खात्रीनें घातल्या असत्या. खरें सांगावयाचें म्हणजे या घुढाऱ्यांपैकीं बऱ्याच जणांना विजयाबद्दल विश्वास वाटत नसल्यामुळें क्रान्तीची चळवळ आणखी कांहीं काळपर्यंत थोपवून धरावी असें त्यांना वाटतें–पण युद्धांत विजयाची पूर्ण हमी देणें केव्हांही अशक्य असतें.

अन्यायांच्या अतिरेकामुळें एकादी राजसत्ता नष्ट होते तेव्हां त्या देशांत सत्य व न्याय यांच्या पायावर उभारलेली नवी राज्यव्यवस्था संघटित करावी लागते; यासाठीं आपल्याला राजसत्तेच्या मूलभूत तत्त्वांकडे पाहिलें पाहिजे. राजांना त्यांचा अधिकार परमेश्वरापासून प्राप्त झालेला असतो हें तत्त्व आतां

कोणिही कबूल करीत नाहीं; पण या जुन्या वादाच्या अभ्यासानें राजसत्तेच्या मूलतत्त्वांवर घुष्कळ प्रकाश पडण्यासारखा आहे. सत्ता चालविण्याचा अधिकार राजांना परमेश्वरापासून मिळालेला असतो, "या तत्त्वाचा धैर्यानें इन्कार करून सुआरेझनें* जनतेच्या अधिराज्याच्या तत्त्वाची संस्थापना केली. जनतेच्या संमतींतूनच राजसत्तेचा प्रत्यक्ष उद्भव झालेला आहे. राजसत्तेचा अधिकार अनिर्बंध आहे या ‡मेलँकथॉनच्या तत्त्वालाही त्यानें विरोध केलेला आहे. लोकांनीं आपल्यावर विश्वासानें सोंपविलेलीं जबाबदारीचीं कामें पार पाडण्याला आपली पात्रता नाहीं हें दाखवून देणाऱ्या राजांना पदच्युत करावयाचा जनतेला हक्क आहे, हें त्यानें मान्य केलें आहे." †सुआरेझचें विवेचन व राजसत्तेच्या दैवी उत्पत्तीचें खंडन स्पष्ट, सूत्ररूप व निर्विकार आहे असें हॅलॅमनें† कबूल केलें आहे. या गुणांमुळेंच त्याच्याबद्दल सर्वांना आदर वाटतो. त्याच्या लेखनांतील एक उतारा घेऊन हॅलॅमनें राजसत्तावादी इंग्रज धर्मगुरूंची पत नाहींशी केली आहे. "स्वभावतःच राजसत्ता ही

---

* सुआरेझः १५४८–१६१७ स्पॅनिश धर्मशास्त्रज्ञ व तत्त्ववेत्ता. पोप पांचवा पॉल यांच्या सांगण्यावरून यानें १६१३ सालीं राजसत्तेवर एक ग्रंथ लिहिला. त्यांतील तत्त्वें राजनिष्ठेला बाधक आहेत असें पाहून पहिल्या जेम्स राजानें त्याच्या प्रती मांगाकडून चव्हाठ्यावर जाळविल्या आणि या पुस्तकाला बंदी केली. सुआरेझ लिस्बन येथें वारला.

‡ मेलँकथॉनः (१४९७–१५६०)—जर्मन धर्मशास्त्रज्ञ व तत्त्ववेत्ता; विटेन्बर्ग येथील विद्यापीठांतील ग्रीकचा अध्यापक व लूथरचा मित्र. १५२१ सालीं लूथरला वॉर्टबर्ग येथें कैदेंत घातलें तेव्हां यानें सुधारणावाद्यांचें नेतृत्व स्वीकारलें; खुद्द पोपनें विनंति केलेली असूनही त्यानें नवीं तत्त्वें सोडून द्यावयाचें नाकारलें.

† De wulf, History of Medieval Philosophy, Third Edition. p. 495.

† हॅलॅमः (१७७७–१८५९)—प्रसिद्ध इंग्रज इतिहासकार. इंग्लंडच्या शासनपद्धतीचा इतिहास, मध्ययुगीन युरोप व युरोपियन वाङ्मय या प्रसिद्ध ग्रंथांचा कर्ता.

एकाच व्यक्तीच्या मालकीची असूं शकत नाहीं. देशांतील सत्तेवर जनतेचाच हक्क आहे, हा निर्णय अगदीं निश्चित आहे. सेंट थॉमस, प्रमुख धर्मोपाध्याय व धर्माधर्मविवेचक आणि आमचे कायदे या सर्वांचे निर्णय आम्ही प्रमाण मानतों; या सर्वांनीं एकमतानें मान्य केलें आहे कीं, कायदेकानू करण्याचा आपला अधिकार जनतेनेंच राजाच्या हवालीं केलेला असतो आणि हें फक्त सोईसाठीं केलेलें असतें. कारण सर्व माणसें जन्मतः समसमान असल्यामुळें कोणत्याही एका व्यक्तीला इतरांवर हुकमत चालविण्याचा अधिकार नाहीं. कारण राजानियंत्रणाच्या अधिकारावर कोणाचाही वारसा नाहीं. एका विशिष्ट मनुष्यानें दुसऱ्यावर अधिकार कां चालवावा आणि दुसऱ्यानें मात्र त्यावर हुकमत कां चालवूं नये याचें कारण कोणालाही सांगतां येणार नाहीं."† वर निर्दिष्ट केलेल्या निबंधांत डॉ० मरे यांनीं सर जेम्स मॅकिंटॉश यांचा उल्लेख केलेला असून राजसत्तेच्या निरंकुशत्वाचें खंडन करणारांमध्यें ते प्रमुख होते आणि प्रॉटेस्टंट पंथांतील तत्कालीन लेखकांपैकीं सर्वांत श्रेष्ठ होते असें म्हटलें आहे. खुद्द मॅकिंटॉशसाहेब या तत्त्वाबद्दल म्हणतातः "राजसत्तेचे हुकूम बिनतक्रार पाळणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य आहे. याला एकही अपवाद नाहीं, असें प्रतिपादन करणें हा बेजबाबदारपणाचा कळस होय." 'सार्वभौम राजसत्तेचा प्रतिकार' या आपल्या निबंधाचे शेवटीं डॉ० मरे यानें मॅकिंटॉशच्या लेखनांतील एक उतारा दिलेला आहे आणि त्यांतील विचार अत्यंत भारदस्त व शहाणपणाचे आहेत अशी प्रशंसा केलेली आहे. राजसत्तेवर विजय मिळविण्यांत लोकपक्षाला येणाऱ्या अडचणी, अपजयामुळें लोकांवर ओढवणारीं भयंकर संकटें यांचें मॅकिंटॉशनें यथासांग वर्णन केलें आहे. आतांपर्यंत मीं जें लिहिलें आहे त्यामध्यें या अडचणींचें स्वरूप उघड करून दाखविण्याची मीं खबरदारी घेतलेली आहे. अडचणी क्षुद्र आहेत असें भासवून फसवणूक करण्याचा कोठेंही प्रयत्न केलेला नाहीं. पण बंड अवश्य व अपरिहार्य होईल तेव्हां सदरहू उताऱ्यांतील पुढील विचाराला सर्वांनीं मान्यता दिली पाहिजे. " जुलमामुळें अवश्य झालेलें आणि यशाच्या वाजवी शक्यतेमुळें योग्य ठरलेलें बंड उभारणें हें राष्ट्रीय पुण्यकृत्य आहे. बंड उभारण्यामध्यें नेहमीं इतके धोके असतात कीं, एवढें धाडस करणाऱ्या बंडखोरां-

† Hallam. Litrature of Europe. Vol. III Chap. 4.

बद्दल प्रत्येकाला आश्चर्य व आदर वाटेल यांत संशय नाहीं." होय. असा आनंदाचा शेवट झाल्यानंतर नवी राजसत्ता स्थापन करावयाचा हक्क व जबाबदारी जनतेचीच आहे.

या विवेचनावरून निर्णय काढतां येतो तो हा कीं, योग्य रीतीनें व जनतेच्या कल्याणासाठीं स्थापन झालेली राजसत्ता हीच न्याय्य होय. सत्ता बळकावून बसणारांना विरोध केला तरी चालेल; इतकेंच नाहीं तर त्यांना विरोध केलाच पाहिजे. आरंभीं शुद्ध असलेल्या राजसत्तेला जुलमाची संवय लागली तर तिला विरोध करून पदच्युत केलेंच पाहिजे. जुलूम अथवा अधिकाराचा दुरुपयोग यामुळें एकादी राजसत्ता नष्ट झाली, कीं तिच्या जागीं नव्या सत्तेची स्थापना जनतेनेंच केली पाहिजे. "बेबंदशाहींतूनच स्वातंत्र्य निर्माण होतें," असें पुष्कळ वेळां निष्काळजीपणानें म्हणण्यांत येतें; पण हें तत्त्व फार घातुक आहे. जुलमामुळें बेबंदशाही हमखास अस्तित्वांत येते असें म्हणणें यापेक्षां अधिक रास्त आहे. झुंडशाही सुरू झाली कीं, ती शमविण्यासाठीं सुलतानाच्याही हातीं राजसत्ता सोंपविण्याला लोक कबूल होतात; पण दृढनिश्चयाच्या बळानें समर्थ आणि शिस्तीच्या शिक्षणानें संघटित झालेली जनता एकतंत्री सुलतानशाही किंवा निर्नायक झुंडशाही यांपैकीं एकाचाही स्वीकार न करतां स्वातंत्र्य मिळवावयाचा निश्चय करते तेव्हां राष्ट्र नैसर्गिक शासनाचे अनुमतीनें कार्य करीत आहे असेंच म्हटलें पाहिजे. टर्नरनें आपल्या तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत सेंट थॉमसचें वचन दिलें आहे: "जुलमानें त्रस्त झालेल्या प्रजेला आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्याचा हक्क आहे. पुन्हा जुलूम होणार नाहीं अशी व्यवस्था करावयाचें काम कोणत्याही एकाच व्यक्तीनें नाहीं तर लोकांनीं निर्माण केलेल्या व कायद्याप्रमाणें चालणाऱ्या तात्पुरत्या अधिकारीमंडळानें केलं पाहिजे." होय, आणि मूर्ख व बेफाम लोक उन्मादानें बरळूं लागतील कीं, कोणत्याही प्रकारच्या सत्तेला आमचा विरोध आहे, त्या वेळीं शांत राहून सत्तेच्या मूलाधाराचें ज्ञान आपल्याला झालेलें आहे असें आपण दाखवूं. सत्य हाच सत्तेचा आधार आणि स्वातंत्र्य हीच सत्तेची अधिष्ठात्री देवता; यांबद्दल आपल्याला अत्यंत आदर वाटत आहे हें आपण सिद्ध करून दाखवूं.

प्रकरण अठरावें

सशस्त्र प्रतिकार

आक्षेप

राजसत्तेला विरोध कां करावा याचें आतांपर्यंत समर्थन केलें; आतां यावरील आक्षेपांचा विचार करावयाचा आहे. मूलतत्त्वांचें स्पष्ट दिग्दर्शन झाल्यानें जिज्ञासूंना समाधान वाटतें; पण बुद्धिमान् विरोधकांचे आक्षेप ऐकून त्यांच्या मनाची पुन्हा चलबिचल होण्याचा संभव आहे. कोणी त्यांना दूरदर्शित्वाचा समंजस उपदेश करतील तर कोणी क्रान्तिकारकांबद्दल भरमसाट विधानें करून आपल्या शब्दांची सत्यता सिद्ध करण्यासाठीं प्रसिद्ध व्यक्तींच्या वचनांच्या साक्षी पुढें मांडतील किंवा क्रान्तिकारकांवर वैयक्तिक दोषारोप करतील. प्रत्यक्ष प्रसंग उपस्थित झाला असतां तो टाकून लोक तात्त्विक चर्चेकडे वळतात, हा प्रकार पुष्कळांच्या ध्यानांत आलेला आहे. पण तात्त्विक चर्चा सुरू झाली म्हणजे सत्याचा विचार करावयाचें सोडून लोक प्रत्यक्ष प्रसंगांकडे अगर विशिष्ट व्यक्तींकडे वळतात. या प्रकाराकडे मात्र लोकांचें जावें तितकें लक्ष जात नाहीं, ही गोष्ट मोठी विचित्र आहे. इतिहासांत प्रकट झालेलें सत्य अगर भावी संकट यापेक्षां प्रत्यक्षपणें समोर उभी असलेली अडचण क्षणिक असली तरी अधिक महत्त्वाची भासते. क्षणिक व शाश्वत यांमधील भेद कसा जाणावा हें समजल्यानें गोंधळलेलें मन ताळ्यावर येऊन आत्मविश्वास पुन्हा जागृत होतो. या दृष्टीनें विचार केल्यास आकस्मिक रीतीनें उपस्थित होणारे आक्षेप नाहींसे करून आपल्याला पाया पक्का करतां येईल.

अत्यंत अदूरदर्शी लोकांकडूनच नेहमीं दूरदर्शित्वाची हांकाटी होत असते. प्रासंगिक अडचण कशीबशी टाळण्यासाठींच त्यांची सारी धडपड चाललेली असते आणि हेंच त्यांचें ध्येय असतें. आपला दुबळेपणा झांकण्यासाठींच ते धीमेपणाचा उपदेश करीत असतात. जिन्हाळ्याच्या कळकळीचीं माणसें या टाळाटाळीनें चिडून जातात, धीमेपणाबद्दल त्यांना इतका तिटकारा वाटूं लागतो कीं, सबुरीचा मार्ग सर्वस्वीं त्याज्य होय असाच त्यांचा

निश्चय होतो. दूरदर्शी म्हणविणाऱ्या लोकांनीं याचा नीट विचार केला तर त्यांचे डोळे उघडण्याचा संभव आहे. त्यांच्या उपदेशाचा समाजावर यत्किंचितही परिणाम होत नाहीं आणि त्यामुळें कांहीं चांगल्या माणसांची बदनामी मात्र होते. समंजस शांतपणा समर्थांचे ठिकाणीं असतो तेव्हांच त्याला सद्गुण म्हणतां येतें; दुर्बलांच्या सहनशीलतेला भेकडपणाच म्हटलें पाहिजे. यावर एकादा विरोधक म्हणेल कीं, हें सारें तात्त्विक दृष्ट्या बरोबर दिसतें; पण प्रत्यक्ष उदाहरणें पहा म्हणजे या तत्त्वांचा किती दुरुपयोग झालेला आहे हें तुम्हांलाही दिसून येईल. या आक्षेपाला साजेसें प्रत्युत्तर देणें सोपें आहे. डॉ० मरे यांनीं बौद्धिक मर्यादा या विषयावर लिहितांना म्हटलें आहे: बेजबाबदार व अविचारी माणसें नैतिक तत्त्वांचा दुरुपयोग करतील किंवा विशिष्ट प्रकारच्या श्रोत्यांना विशिष्ट परिस्थितींत तीं सांगितलीं असतां त्यापासून अपाय होईल. हा आक्षेप नीतितत्त्वांचे बाबतींत अगदीं कुचकामाचा आहे. हें उत्तर अगदीं सरळ आहे; तरीही आपले विरोधक कांहीं तरी पुटपुटतील व निराधार पुनरुक्ति करून वेळ मारून नेण्याचा यत्न करतील. त्यांना बालमेझच्याच शब्दांत उत्तर दिलेलें बरें. "दूरदृष्टीच्या नांवाखालीं असत्य तत्त्वें घुसडून देण्यांत येणार नाहींत अशी खबरदारी घेतली पाहिजे. राजसत्ता व समाज उलथून पडण्याला कोणत्या चुका कारणीभूत होतात हें आपण लोकांना स्पष्टपणें समजावून सांगितलें पाहिजे, म्हणजे दुर्दैवी अपयशामुळें लोकांना आलेला संताप शांत होईल." या प्रश्नांचें संशोधन करण्याचें टाळणाऱ्या लोकांबद्दल बालमेझ म्हणतो: "मी हें सांगण्याची परवानगी घेतों कीं, या लोकांचा दूरदर्शीपणा सर्वस्वीं फुकट जातो; अडचणी टाळण्यासाठीं त्यांनीं केलेल्या आगाऊ तरतुदीचा काडीइतकाही उपयोग होत नाहीं. त्यांनीं या प्रश्नाकडे दुर्लक्ष केलें, तरी इतरांकडून त्यांचें संशोधन होतें, प्रचार होतो आणि ते अशा रीतीनें निकालांत निघतात कीं, स्याबद्दल आपल्याला खेदच व्हावा." फ्रान्समध्यें सुलतानशाही चालू होती व प्रजा जुलमानें गांजून गेली होती; त्या काळाबद्दल टर्नर म्हणतो: "न्याय व सहिष्णुता हीं तत्त्वें लोकांच्या मनावर बिंबविण्याचें काम धर्मपीठांचे आहे. पण लोकांच्या दृष्टीनें तीं राजसत्तेबरोबर इतकीं संलग्न झालेलीं होतीं कीं, सर्वांना त्यांचेबद्दल भीति व तिरस्कार वाटत होता." यापासून बोध एवढाच घ्याव-

याचा कीं, अन्याय व दुष्टपणा यांचा सर्वत्र फैलाव झालेला असतांना तात्पुरत्या उपशामक उपायांचा उपयोग होत नाहीं. अशा वेळीं सद्‌गुणांच्या डोंगाखालीं कोणत्याही प्रकारच्या दौर्बल्याला उत्तेजन मिळणार नाहीं अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. आजच्या परिस्थितींत ज्यांचा प्रत्यक्ष प्रतिकार करतां येत नाहीं त्यांचा आपल्याला निदान इन्कार तरी करतां येतो. या मुद्द्याकडे दुर्लक्ष करणें हा अदूरदर्शित्वाचा अत्यंत अपायकारक प्रकार होय. येथें आमच्याघुरतें तरी जाहीर करण्याची संधि घेतों कीं, आमच्या ठिकाणीं असलें अदूरदर्शित्व यत्किंचितही नाहीं.

क्रान्तिकारक या शब्दाचा आजवर अनेकांनीं इतक्या निष्काळजीपणानें उपयोग केलेला आहे कीं, आतां त्याचे अनेक अर्थ होऊं लागले आहेत.. हा शब्द सापेक्ष आहे हें नेहमीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. विश्वासघात अगर जबरदस्ती यांमुळें एकाद्या राष्ट्राचें स्वातंत्र्य नष्ट होतें आणि एका काळीं समृद्ध असलेला देश जुलमामुळें धुळीस मिळतो, या घटनेलाही क्रान्ति हेंच नांव देण्यांत येतें. मनुष्याला अधोमार्गाला नेणारी ही प्रक्रान्ति हीन असते. जुलमी राज्य स्थापन झालेलें असल्यामुळें जेथील जनता झिजून जात आहे तेथील लोकांनीं उठावणी करून नैसर्गिक शौर्य, सामर्थ्य व चिकाटी यांच्या जोरावर आपलें स्वातंत्र्य परत मिळविलें तर या घटनेलाही क्रान्ति हेंच अभिधान देण्यांत येतें. मात्र ही क्रान्ति कल्याणप्रद असते. हेतु, पद्धत व ध्येय यांवरूनच क्रान्तिकारकांची योग्यता ठरविली पाहिजे आणि हीं सर्व योग्य असतील तर त्यांनीं उभारलेलें बंड हें—मॅकिंटॉशच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे सत्कृत्य आहे. अशा क्रान्तीमुळें सत्याला मानवी जीवनांतील आपलें पूर्वींचें सन्माननीय स्थान पुन्हा प्राप्त होतें.

आम्ही ज्या हक्कांचें समर्थन करीत आहों त्यांचा बोसुएनें* इन्कार केला आहे असें खुद्द बालमेझनेंच लिहिलेलें असल्यामुळें बॉझेनें इतरत्र प्रकट केलेले व आमच्या विषयाशीं आनुषंगिक असलेले विचार आपण पाहिले पाहिजेत.

---

* बोसुए: (१६२७–१७०४)—फ्रेंच धर्मगुरु, वक्ता व लेखक. प्रॉटेस्टंट व रोमन कॅथलिक यांची एकी करण्याच्या उद्देशानें त्यानें धर्मोपदेशकाची जागा पत्करली होती.

साम्राज्याबद्दल त्यानें लिहिलें आहेः "परमेश्वराच्या प्रेरणेमुळेंच साम्राज्यांची उलथापालथ होते व त्यांमध्यें क्रान्ति घडून येतात; राजांची मानखंडना व्हावी व ते ताब्यावर यावे एवढ्याचसाठीं तो अशी प्रेरणा देत असतो." हें वाचून स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं घाडस करूं नये असें कोणाला वाटेलसें दिसत नाहीं. ग्रीक्स व रोमन्स यांचें स्वदेश व स्वातंत्र्य यांवर किती गाढ प्रेम होतें व त्यांचे अंगीं किती काटकपणा होता, याबद्दल त्यानें काढलेले उद्गार इतके उत्कट आहेत कीं ते वाचून कोणत्याही देशांतील लोकांची स्वातंत्र्य-प्राप्तीची आकांक्षा अधिकच प्रज्वलित होईल. ग्रीस देश स्वतंत्र व अजिंक्य होता आणि ग्रीक लोकांच्या अधःपाताला सुरवात झालेली नव्हती, त्या काळांतल्या ग्रीसबद्दल तो म्हणतोः "ग्रीससंबंधीं लक्षांत ठेवण्याजोगी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या घोरणांतील दूरदर्शित्व व चिवटपणा ही होय. कोणत्या वेळीं आपलें सर्वस्व इरेला घालावें, आत्मसंरक्षण कसें करावें, आत्मयज्ञ कोठें, कसा व किती करावा, हें त्यांना या घोरणामुळें समजून येत असे. यापेक्षां अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचें धैर्य, देश-प्रीति व स्वातंत्र्यभक्ति यांमुळें त्यांचें शौर्य अजिंक्य झालें होतें." अधःपाता-पूर्वीच्या रोमबद्दल व रोमन स्वातंत्र्याबद्दल तो लिहितोः "स्वातंत्र्य हेंच त्यांचें धन होतें; पृथ्वीवरील सर्व संपत्तीपेक्षां ते स्वातंत्र्याला अधिक मान देत असत आणि स्वातंत्र्याच्या रक्षणापुढें त्यांना कशाचीही पर्वा वाटत नसे." आणखी पहाः "रोम सदासर्वदा स्वतंत्र रहाणारच असा आत्मविश्वास बाळगणें हें रोमन लोकशाहीचें आद्यतत्त्व होतें." रोमच्या अखंडित एक-निष्ठेबद्दल त्यानें लिहिलें आहेः "रोमच्या धीमेपणाचें हें उज्ज्वल फळ पहा; संकटांशीं सारखें झगडत राहिल्यामुळें त्याचे अंगीं काटकपणा आला व त्यांना आत्मसंरक्षणाचें सामर्थ्य प्राप्त झालें. यामुळें त्यांचे अंतःकरणांत निष्ठा निर्माण झाली होती कीं जोंवर आशा नष्ट झालेली नाहीं तोंपर्यंत कोणतेंही संकट उपस्थित झालें असतां डगमगून जाण्याचें कारण नाहीं." आणखी ऐकाः "परिस्थिति कितीही बिकट झालेली असली तरी त्यांना दौर्बल्याचा अगर भेकडपणाचा सल्ला रुचत नसे." प्राचीन काळच्या स्वतंत्र राष्ट्रांबद्दलचे त्याचे हे उत्साहदायक शब्द वाचून कोणाचीही स्वातंत्र्यभक्ति कमी होण्याचा यत्किंचितही संभव नाहीं; इतकेंच नव्हे तर उच्च परंपरेमुळें निसर्गतःच अंगीं

असलेला उत्साह त्यांमुळें वृद्धिंगत होईल; आणि उत्साह वाढला, कीं हृदयांत निष्ठा जागृत होते. " चिकाटीनें यत्न करा आणि विजयशाली व्हा; म्हणजे उद्यां युद्ध आटोपल्यावर व लढाई जिंकल्यानंतर कट्टे शत्रु देखील तुमचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागतील."

शेवटीं एवढेंच सांगावयाचें कीं, आम्हीं त्रिकालाबाधित तत्त्वांची सत्यता प्रस्थापित केलेली आहे; परिस्थिति बदललेली असली तरी तत्त्वांची सत्यता नष्ट होत नाहीं, कारण परिस्थिति ही निसर्गतःच क्षणिक व चंचल आहे. पुढील उताऱ्यांत हेंच स्पष्टपणें सांगितलेलें आहे. " आधुनिक काळांत ऐतिहासिक व सामाजिक शास्त्रांचें संवर्धन मोठ्या कसोशीनें करण्यांत आलेलें आहे. या शास्त्रांनीं सिद्ध केलें आहे कीं, कालमानाप्रमाणें व स्थलमानाप्रमाणें प्रत्यक्ष परिस्थिति भिन्न असते व बदलत जाते, कारण अनेक अस्थिर शक्तींच्या क्रियेमुळेंच परिस्थितीचें स्वरूप निश्चित होत असतें. म्हणून नैसर्गिक हक्कांची मांडणी करतांना केवळ नैतिक ध्येयाच्या दृष्टीनेंच त्रिकालाबाधित सत्यें प्रस्थापित करूं नयेत; या तत्त्वांना मूर्त स्वरूप देतां यावें म्हणून प्रासंगिक परिस्थितीचाही त्यामध्यें विचार केलेला असावा.* " होय; आणि आजच्या ऐवजीं या तत्त्वांना मूर्त स्वरूप द्यावयाचें असल्यास आजच्या नव्हे तर उद्यांच्या परिस्थितीच्या अनुरोधानेंच त्यांचा विचार करणें अधिक इष्ट आहे. हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें त्यावर विशेष जोर दिला पाहिजे. वीस वर्षांपूर्वीची व आजची परिस्थिति यांमध्यें जमीन-अस्मानचें अंतर आहे. उद्यांची परिस्थिति किती भिन्न असेल, वीस वर्षांच्या लहानशा अवधींत केवढा आश्चर्यकारक फेरबदल झालेला असेल, हें यावरून सहज अजमावतां येण्यासारखें आहे. १८४८ सालीं दुष्काळांतल्या उपासमारीनें आणि बंडांत आलेल्या अपयशामुळें आयर्लंड अगदीं निपचित पडलें होतें; तें इतकें चिरडलें गेलें होतें कीं, यापुढें त्याबद्दल कसलीही आशा राहिलेली नाहीं असेंच कोणालाही वाटलें असतें. पण फक्त वीस वर्षांच्या आंतच आणखी एका बंडाची उठावणी झाली आणि आयर्लंडांतील राजसत्ता अगदीं पायापर्यंत हादरली. डी वूल्फचे पुढील उद्गार ध्यानांत बाळगण्याजोगे आहेतः " समाज-

* De Wulf. Scholasticism, Old and New. Part 2, Chap. 2, Sec. 33.

शास्त्राच्या—विस्तृत दृष्टीनें ज्या शास्त्रसमूहाला हें नांव देण्यांत येतें त्या शास्त्राच्या—विकासामुळें नैसर्गिक हक्कांच्या शास्त्राच्या पद्धतींत बदल होत आहे." या संक्रमणाकडे पाहिलें असतां दिसून येईल कीं, उद्यांच्या दृष्टीनें ज्याला पाहतां येतें तोच खरा शहाणा. प्रत्यक्ष परिस्थितीचीं वेगवेगळीं स्वरूपें उजेडांत येत जातात; तीं जमेस घेऊन "प्रत्येक प्रश्नाचा पुराव्यावरून अभ्यास केला पाहिजे; आणि परिस्थितीच्या दृष्टीनेंच त्यांचा निर्णय लावला पाहिजे. फक्त चालू परिस्थितीच्याच दृष्टीनें नव्हे तर इतिहासांत तो प्रश्न ज्या ज्या स्वरूपांत प्रकट झालेला आहे त्या त्या दृष्टीनें त्याचा अभ्यास केला पाहिजे," असें डी वूल्फनें सांगितलें आहे आणि हें मान्य करण्याला कांहींच हरकत नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां दिसून येईल कीं, आयर्लंड वं ब्रिटिश-साम्राज्य यांची फारकत झाली पाहिजे असें जे प्रतिपादन करीत आले आहेत त्यांनींच फक्त, ऐतिहासिक पुराव्याचा आधार घेतलेला आहे. चालू परिस्थिति क्षणिक आहे आणि भविष्यकाळांत ती बदलेल हें फक्त त्यांनींच जाणलें आहे. जे प्रत्यक्ष परिस्थितीच्या मोहानें भारले गेले त्यांनीं वारा वाहील तशी पाठ फिरवून माघार घेतली. राष्ट्रांना हजारों वर्षांचें आयुष्य असतें; आमच्या इतिहासांत इंग्रजी अंमल ही फक्त प्रासंगिक परिस्थिति आहे आणि आयरिश लोकांचें स्वातंत्र्य हें तत्त्व अविनाशी व निर्विकल्प आहे.

प्रकरण एकोणिसावें

उपसंहार

तत्त्वांची सत्यता सिद्ध केल्यानंतर आणि विरोधकांच्या आक्षेपांना उत्तरें दिल्यानंतर शत्रूच्या तटबंदींत भगदाडें पाडणाऱ्या वीरांबद्दल दोन शब्द सांगितले पाहिजेत. ते आमच्यापासून दूर उभे असलेले दिसतात, याचें कारण आम्ही मागें राहिलों हेंच होय. ते असे अलग राहिले याचें कारण प्रमाद हें नसून एकनिष्ठा हेंच होय. कारण, सत्याबद्दल नाहीं तर विवक्षित स्वरूपांत प्रकट झालेल्या सत्याबद्दल त्यांना संशय वाटला. ज्यांचेसाठीं मानवी कायद्यांची रचना केलेली असते, ज्यांना विजयाची नैतिक निश्चितता व सर्व समाजाचें तात्कालिक पाठबळ असल्यावांचून प्रत्यक्ष कार्याला सुरुवात करणें व्यर्थ आहे असें वाटतें, अशा सर्वसाधारण लोकांपैकीं ते नव्हते. आमच्या लाचार आशांच्या पूर्ततेसाठीं लढणारे वीर व भावी विजयाची स्फूर्ति देणारे द्रष्टे यांच्या माहात्म्याचें वैशिष्ट्य हेंच आहे कीं, सर्वसाधारण माणसांच्या अपयशामुळें त्यांना लढाईच्या धुमश्चक्रींत पुन्हा एकदां घुसण्यास अधिक अवसान येतें. आपल्या काळांत प्रचलित असलेल्या गैरसमजुतींना ते हार गेले नाहींत; एकाद्या नव्या लहरीच्या उसळीसरशीं ते विरोध करावयाला उभे राहिले असें नाहीं; पूर्वीच प्रकट झालेल्या पण आज ज्यांचा लोकांना विसर पडला आहे अशा तत्त्वांमधील सत्य प्रत्ययास आल्यामुळें आणि भविष्यकाळांत हीं तत्त्वें विजयशाली होणार असें दिव्य भविष्य अंतर्दृष्टीला दिसल्यामुळें त्या तत्त्वांचा प्रकाश त्यांनीं आपल्या हृदयांत धारण केला आणि तो भविष्यकाळाकडे फेंकला तेव्हां आज अज्ञात असलेलें भविष्यकाळांतील वैभव त्यांच्या नजरेस आलें आणि म्हणूनच ते या युद्धासाठीं सज्ज झाले. सर्वसाधारण माणसें सर्वांच्या सहकार्याशिवाय पाऊल पुढें टाकावयास धजत नाहींत; पण आपलें कार्य सुरू झालें, कीं सर्वांची सहानुभूति व सहकार्य आपल्याला आपोआप प्राप्त होईल असा त्यांना अगोदरपासूनच आत्मविश्वास वाटत असतो. आपण सत्याचे कैवारी म्हणून उभे रहात आहों हें त्यांना माहीत होतें. सत्याला विरोध करणाऱ्या कोणत्याही शक्तीचा निभाव लागणें शक्य नाहीं अशी

स्यांची खात्री होती, अंगीकृत कार्यांत त्यांना नेटाचा प्रयत्न करावा लागला, क्लेश व दुःख सहन करावें लागलें खरें–पण यांमुळेंच त्यांना सूक्ष्म ज्ञान प्राप्त झालें. सर्व सत्पुरुषांना हें ज्ञान प्राप्त झालेलें असतें. या ज्ञानामुळें त्यांना समजून आलें होतें कीं, जगणें हें जर चांगलें असेल तर मरणें हेंही तितकेंच चांगलें आहे; त्यांना जीवनाबद्दल तिरस्कार वाटत होता, किंवा एकाद्या क्षुद्र गोष्टीसाठीं ते जीवनाचा त्याग करावयास तयार झाले होते, असा याचा अर्थ नाहीं. जीवनाच्या उच्च वैभवाची जाणीव त्यांच्याइतकी दुसऱ्या कोणालाही झालेली नव्हती. जीवनाच्या सौन्दर्यानें त्यांच्याइतके मोहित व जीवनाच्या संगीतानें त्यांच्याइतके तल्लीन दुसरे कोणीही झालेले नव्हते. पण त्यांनीं जाणलें होतें कीं, जो मरणाला भितो त्याची जगावयाची पात्रताच नाहीं. या गंभीर व बहुमोल तत्त्वाचा विसर पडेल तेव्हां सारी सृष्टि नष्ट होईल, इतकें तें महत्त्वाचें आहे हें त्यांना माहीत होतें. या ज्ञानामुळें सृष्टींतली सर्वांत जुनी भीति त्यांच्या अंतःकरणांतून सर्वस्वीं नष्ट झाली होती आणि या-मुळेंच त्यांना आयुष्यांतील अत्युच्च आनंदाची अनुभूति झालेली होती. त्या मैसूर युगांत अगदीं लहानसहान शिक्षांपासून तों फांसावर लटकण्यापर्यंत वेगवेगळ्या शिक्षा भोगण्याचे प्रसंग त्यांचेवर आले; पण मृत्यूची झडप पडतां-ना त्यांचा थरकांप उडाला नाहीं. कारण आपल्या आयुष्याचें सुवर्ण झालें आहे अशी त्यांना जाणीव होती. आयुष्याचा सद्व्यय केलेला असल्यामुळें मरण अंदाजापेक्षां अगोदर ओढवण्याचा प्रसंग आला तरी त्यांचें मन हादर-लें नाहीं. मैत्री व प्रीति या उच्च गुणांचें स्वारस्य त्यांच्या अनुभवाला आले-लें होतें. जीवंतांच्या हक्कांकडे अगर मृतांच्या स्मारकांकडे नजरही न वळवतां अगदीं शेवटपर्यंत जावयाची त्यांची तयारी होती हेंच त्यांच्या आनंदाचें व विजयाचें रहस्य होय आणि त्यांचें प्रकृतिसिद्ध ज्ञान, शिस्त, देशाभिमान व कळकळ यांमुळें लोकजागृति होऊन आणि सर्व समाज संघटित होऊन निर्माण झालेलें राष्ट्रीय सैन्य स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ रणांगणावर लोटून विजयी होईल तेव्हां ज्यांनीं खिंडारांत लढतांना देह ठेवले त्यांच्या आत्मयज्ञामुळेंच आपल्या शस्त्रधारी हस्तांना विजयश्री प्राप्त झाली हें विजयाच्या महन्मंगल क्षणीं सर्वांच्या ध्यानांत येईल.

जगावर ज्यांचे अनंत उपकार झालेले आहेत अशा वीरांबद्दल जगांतील

अत्युत्कृष्ट वक्तृत्वानें काढलेले उद्गार वाचावयाची संधि मिळते तेव्हां आपलें मन आनंदानें आणि अंतःकरण कृतज्ञतेनें भरून येतें. ज्यांच्या विजयाबद्दल फारशी आशा उरलेली नाहीं अशा सत्कार्यांसाठीं युगायुगांमध्यें व राष्ट्रा-राष्ट्रांमध्यें लढणाऱ्या वीरांचें समर्थन व त्यांच्यावरील दोषांचें निरसन करतांना अत्युत्कृष्ट वक्ता डिमॉस्थेनिस* याची असाधारण वक्तृत्वशक्ति परमोच्च कोटीला पोंचलेली आहे. ज्यामुळें घुढें पराभव झाला असा मार्ग स्वीकारण्या-चा त्यानें अथीनियन लोकांना उपदेश केल्याबद्दल त्याचा प्रतिस्पर्धी एशिनस यानें त्याची फार निर्भर्त्सना केली होती; त्याला उत्तर देतांना डिमॉस्थेनिस म्हणतोः "आमची तेजस्वी कीर्ति, खानदानी परंपरा व वैभवशाली भवितव्य यांची चाड असल्यामुळें या मार्गानें गेलें असतां आपला पराभव होईल असें अगोदर कळलेलें असतें तरीही आमच्या लोकशाहीला दुसरा कोणताही मार्ग स्वीकारतां आला नसता. वस्तुस्थिति अशी आहे कीं, लोकशाहीला अंगीकृत कार्यांत अपयश आलेलें आहे; पण यशापयश ही आपल्या हातची गोष्ट नाहीं. परमेश्वराची तशी इच्छा असेल तर कोणालाही कोणत्याही परिस्थितींत अपयश येईल." नंतर तो अथीनियनांना विचारतोः "आपल्या पूर्वजांनीं ज्याच्या रक्षणासाठीं हव्या त्या संकटांना तोंड दिलें हें आपल्या हातून जाण्याचा प्रसंग आलेला असतांना आपण यत्किंचितही धडपड न करतां स्वस्थ कां राहिलों? आपले वंशज असें करीत आहेत हें आपल्या पूर्वजांना दिसतें तर ते आपल्या तोंडावर थुंकण्यालाही कबूल झाले नसते." परके आपल्या शहरांत येत आहेत आणि आपला अधःपात झालेला आहे याचा विचार करावयास सांगतांना तो म्हणतोः "बेअब्रूच्या शांततेपेक्षां आमच्या पूर्वजांनीं अखंड व निकराचें युद्ध पत्करून आपली कीर्ति निष्कलंक राखली असती; आणि म्हणूनच आमच्या हल्लींच्या अधःपाताचें स्वरूप विशेष भयंकर दिसत आहे. या विषण्ण विचारांतून बाहेर पडतांना त्यानें स्वाभिमानानें भरलेले घुढील उद्गार काढलेः "केवळ सुरक्षिततेसाठीं पारतंत्र्याचा स्वीकार करावा आणि अन्यायी व बलिष्ठ-

---

* डिमॉस्थेनिसः (इ. सनापूर्वी ३८५–३२२) अथेन्सचा प्रसिद्ध वक्ता. मॉसिडोनचा राजा फिलिप याच्या चढाईला विरोध करण्याचा उपदेश करून त्यानें ग्रीसच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्याचा प्रयत्न केला.

घन्यांच्या हुकमतींत रहावें असा उपदेश आजपर्यंत एकालाही आमच्या लोकशाही-च्या गळीं उतरवतां आला नाहीं. प्रामुख्य, कीर्ति व वैभव यांसाठीं आमचें राष्ट्र युगायुगांमध्यें एकनिष्ठेनें झटलें आहे." थेमिस्टोक्लिसची* आठवण देऊन आणि त्याच्या मनोवृत्तीनें लढणाऱ्या वीरांना आपले पूर्वज किती मान देत याचा उल्लेख करून तो म्हणतोः "होय. पारतंत्र्यांतही सुखासमाधानानें राहतां येईल असें शिकवणाऱ्या वक्त्यांची व सेनापतींची त्या काळांतल्या अथीनियन लोकांना जरूर नव्हती. स्वातंत्र्याशिवाय जिणें व्यर्थ होय अशी निष्ठा असल्या-मुळें पारतंत्र्याचा ते तिरस्कारच करीत." आपल्या श्रोत्यांबद्दलही त्यानें स्तुतिपर उद्गार काढलें आहेत. " मला एवढेंच जाहीर करावयाचें आहे कीं, हीं उच्च तत्त्वें सर्वस्वीं तुमचीं आहेत. माझे दिवस येण्यापूर्वीं लोकशाहीची मनोवृत्ति व तेज अशा प्रकारचें होतें." वक्तृत्वाच्या एका शिखरावरून दुसऱ्या शिखरावर उड्डाण करीत असतांना व लोकशाहीला असा उपदेश केल्याबद्दल आपली निर्भर्त्सना करणाऱ्या ॲशिनसला आव्हान करतांना त्याने पुढील उद्गार काढले. " अथीनियन लोकांनो, स्वातंत्र्यासाठीं व सर्वांच्या सुरक्षिततेसाठीं युद्धाची तयारी करण्यांत कोणतेंही पाप नाहीं; मॅरॅथॉनच्या× महा संकटांत, प्लॅटाच्या रणभूमीवर, सलामीसच्या‡ आरमारी युद्धांत, आर्टिमेसियमच्या लढाईंत आणि अशाच अनेक निकराच्या युद्धांत जे वीर तळहातावर शिरें घेऊन लढले त्या सर्वांना सारखाच मान देण्यांत येतो. त्यांचीं सार्वजनिक स्मारकें जागोजाग उभारलेलीं आहेत; ते शूर वीर होते म्हणूनच त्यांना मान देण्यांत

---

* थेमिस्टोक्लिसः (इ. सनापूर्वीं ५१४ ते ४४९)—अथीनियन वीर व मुत्सद्दी. अथेन्सच्या आरमाराचा व वैभवाचा संस्थापक. झरक्षीसच्या स्वारीचे वेळीं तो लोकशाहीचा पुढारी होता; या लढाईंत त्यानें अद्वितीय शौर्य प्रकट केलें.

× मॅरॅथॉनचें युद्ध, या युद्धांत फक्त ९००० ग्रीक सैनिकांनीं ५०००० पार्शियनांचा पराभव केला.

‡ सलामीसचें युद्ध इ. सनापूर्वीं ४८० मध्यें थेमिस्टोक्लिसच्या नेतृत्वा-खालीं लढून ग्रीक लोकांनीं झरक्षीसच्या इराणी सैन्याचा पराभव करून आपलें स्वातंत्र्य रक्षिलें.

येतो, जयापजयाच्या दृष्टीनें या सन्मानांत भेदभाव करण्यांत येत नाहीं. या आमच्या पूर्वजांची शपथ घेऊन मी सांगतों कीं, अथीनियन लोकांनो, स्वातंत्र्यासाठीं युद्ध उभारण्यांत यत्किंचितही पाप नाहीं." ओ नील, टोन, ओडोनेल, मिचेल वगैरे आयरिश वीरांचे अंगीं माहात्म्य होतें हें दाखविण्यासाठीं अशा वक्तृत्वाची जरूर आहे असें नाहीं; तरीही ते शब्द वाचतांना चित्त प्रक्षुब्ध होतें आणि रक्त उसळ्या मारूं लागतें. महत्कृत्यें करणाऱ्या महात्म्यांबद्दल प्रत्येकाला आदर वाटतो आणि बाह्य अपजयामुळें या आदरबुद्धींत उणेपणा येत नाहीं. महात्म्यांबद्दल आदरभाव हें मनुष्यमात्राच्या हृदयांतील चिरस्थायी तत्त्व आहे; अगदीं पुरातन काळापासून आजतागाईत हें तत्त्व सर्वांनीं मान्य केलेलें आहे; कारण अंतःकरणाच्या जिवटपणामुळेंच शेवटीं विजय खात्रीनें प्राप्त होतो अशी प्रत्येकाला निष्ठा वाटत असते. थर्मापिलीच्या† रणभूमीवर आत्मसमर्पण करणाऱ्या वीरांच्या स्मारकावर जे शब्द खोदण्यांत आले होते असें हिरोडोटसनें सांगितलें आहे, अत्युत्कृष्ट शिलालेख अशी ज्याबद्दल रस्किननें ग्वाही दिलेली आहे आणि मिचेलच्या चरित्राचें सार म्हणून त्याच्या चरित्रकारानें जे शब्द उद्धृत केले आहेत, ते आपण याच दृष्टीनें वाचले पाहिजेतः "हे अनोळखी मनुष्या, लासिडिमोनियनांना* जाऊन सांग कीं, त्यांचे शब्द प्रमाण मानल्यामुळें आम्ही येथें पडलों आहों." या शौर्यपूर्ण शब्दांतील गर्भित अर्थ ज्याला समजेल त्याला कळून येईल कीं, हा संदेश पराभवाचा नसून विजयाचा द्योतक आहे, असें मिचेलच्या चरित्रकारानें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे.

होय; आणि शेवटीं एवढेंच सांगावयाचें आहे कीं, आपण ज्यांचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवीत आहों त्या महापुरुषांच्या कीर्तीला साजेसा मुजरा करीत असतांना आपण स्मरण ठेवलें पाहिजे कीं, आम्हीही एका महान् परंपरेचे वारसदार आहोंत, कीं जो झेंडा परंपरेनें आमच्या हातीं आलेला आहे. तो किती उज्ज्वल आहे हें बोलून दाखविण्यांतच आपलें वैभव आहे असें मानण्या-

† थर्मापिलीच्या खिंडींत लिऑनिडास राजाच्या नेतृत्वाखालीं फक्त ३०० स्पार्टन वीरांनीं झरक्षीसच्या इराणी सेनेला थोपवून धरलें होतें.

* स्पार्टा शहरीं ज्याची राजधानी होती तो प्रदेश.

पेक्षां तो हातीं घरावयासही आम्ही लायक आहों हें सिद्ध करून दाखविण्यांतच खरी शिफारस आहे. या झेंड्याचें सामर्थ्य सर्वश्रेष्ठ आहे, कोणत्याही काळांत व कोठल्याही स्थळांत त्याच्यासाठीं आपल्याला लढतां येईल, आणि आपल्याला कल्पनाही नसेल अशा प्रसंगींही त्याचा इन्कार करण्याचें आपल्याला आव्हान करतां येईल. यांविषयीं आपल्या अंतःकरणांत असलेल्या भावनांच्या जिवंतपणावरूनच हा झेंडा किती वेळां यशस्वी होईल आणि तो केवढ्या उंचीवर रोंवण्यांत येईल, हें ठरणार आहे. या झेंड्याला नवें यश व वैभव प्राप्त होईल किंवा त्याची अब्रू मातीमोल होईल हें आपण जें घोरण स्वीकारूं त्यावरूनच निश्चित होणार आहे. मी घुन्हा सांगतों कीं, या गोष्टी आपण सदैव ध्यानांत ठेवणें अत्यंत इष्ट आहे. कारण प्राचीन काळच्या वीरांची मनमुराद वाखाणणी करावयाची पण त्यांचें स्वातंत्र्याचें ध्येय मात्र नाकबूल करावयाचें असा रिवाज हल्लीं प्रचारांत येऊं लागला आहे; आणि या ध्येयांतच आमचें जीवनसर्वस्व आहे असें आम्हांला वाटतें. स्वातंत्र्यप्राप्तीमुळेंच पुरातन काळचें तेजस्वी वातावरण पुन्हा निर्माण होईल अशी आमची निष्ठा आहे. आम्ही स्वातंत्र्याचा पुरस्कार व प्रचार करतों, वेळप्रसंगीं त्यासाठीं लढतों आणि शेवटीं स्वातंत्र्याचाच जय होणार असें भाकीत करतों;—पण आम्ही मूर्ख, अननुभवी व व्यवहारशून्य असे नवखे तरुण आहों, म्हणूनच आम्ही असें करतों, असें म्हणण्यांत येतें. या आक्षेपाला कोणतें उत्तर द्यावें? आमचा झेंडा, त्याचा इतिहास व त्याचें भवितव्य यांशीं हें उत्तर विसंगत असतां कामा नये. जे आमची हेटाळणी अगर कींव करतात त्यांना आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, तुमच्या ध्येयाबद्दल आम्हांला तिरस्कार वाटतो आणि तुमच्या क्षुद्रपणाबद्दल आम्ही तुमची कींव करतों. खुल्या निवडणुकींत आमचा जय झाला तरी त्यांची गैरसमजूत होण्याचा संभव आहे; म्हणून निवडणुकीच्या द्वारानें नव्हे तर प्रत्यक्ष कार्यें करून, अधिक स्वातंत्र्य असतें तर अत्युच्च जागांसाठीं त्यांच्याबरोबर स्पर्धा करावयाची आमची पात्रता आहे, असें आपण त्यांना दाखवून देऊं; पण विनयाच्या ढोंगासाठीं नव्हे तर केवळ भलेपणासाठीं आपण या बाबतींत फुशारकी मारण्याचें टाळलें पाहिजे. विवेकशून्यता, पोकळ आढ्यता व थापबाजी यांनीं आमचें जीवन व वाङ्मय अगदीं गुदमरून गेलें आहे; म्हणून त्यांत आपण या नव्या

मूर्खपणाची भर घालतां कामा नये. आत्मविश्वासांत आपण उच्च सौजन्याचें संमिश्रण करूं. आपल्या ध्येयांतच आपला सारा मोठेपणा सांठलेला आहे असें आपण मानूं. आपण क्षुद्र व क्षमाप्रार्थक धोरण स्वीकारलें तर आपल्या ध्येयाचा मोठेपणा राहील काय ? नाहीं. जेथें जेथें हा आपला झेंडा खालीं पडलेला असेल तेथें तेथें तो आपण वर उचलून धरला पाहिजे; जेथें त्याला आव्हान करण्यांत येईल तेथें तो परजून फडफडविला पाहिजे; जेथें तो उच्च स्थानावर अधिष्ठित झालेला असेल तेथें त्याला मुजरा केला पाहिजे; जेथें त्याचा विजय झालेला असेल तेथें त्याचें पूजन करून हर्षनिर्भर झालें पाहिजे. त्याच्या सन्मानासाठीं आपण सदासर्वदा स्वाभिमानी, उत्साही, दीर्घोद्योगी व आनंदी राहिलें पाहिजे. त्याच्या कीर्तीसाठीं कोणतेंही आव्हान स्वीकारण्यासाठीं आपण नेहमीं तयार राहिलें पाहिजे. निद्रित स्मृति जागृत करा. प्राचीन काळचें तेज पुन्हा प्रज्ज्वलित करा. मनुष्यमात्राचे ठायीं प्रकृतिसिद्ध असलेले उच्च गुण विकसित करा; म्हणजे सर्वांचे अंतर्यामीं एकच भावना खेळूं लागेल. ही भावना इतकी दमदार असेल कीं, ती कोणत्याही पराभवानें डगमगून जाणार नाहीं. ही भावना हजारों जणांनीं सशब्द केलेली आहे; पण एमेटच्या अभिजात शब्दांत ती अत्यंत उत्कृष्टपणें प्रकट झालेली आहे. "जेव्हां माझा देश स्वतंत्र होऊन "—लक्षांत ठेवा, त्यानें 'जेव्हां' हा शब्द वापरलेला आहे, 'जर' हा शब्द योजण्याची कल्पनाही त्याच्या मनाला शिवली नाहीं.—" जेव्हां माझा देश स्वतंत्र होऊन जगांतील राष्ट्रांमध्यें योग्य स्थानीं अधिष्ठित होईल तेव्हांच माझ्या थडग्यावर मृत्युलेख लिहावा."* हें स्वातंत्र्य अनुमानिक नसून निश्चित आहे. प्रत्येक पिढीमध्यें मंद बुद्धीचीं व थंड अंतःकरणाचीं माणसें हीं असावयाचींच, आपल्या पिढींतही अशीं माणसें आहेत. त्यांचा यावर विश्वास बसणार नाहीं—पण आमची स्वातंत्र्यावर निष्ठा आहे. स्वातंत्र्य हेंच आमचें जीवनसर्वस्व आहे आणि आम्हांला स्वातंत्र्य मिळणारच अशी आमची बालंबाल खात्री आहे. होय, आम्हांला स्वातंत्र्य मिळणार हें आम्हांला माहीत आहे, हें एमेटलाही माहीत होतें आणि तें आपल्याला मिळालें आहे हें उद्यां सर्वांना दिसून येईल. आम्ही

---

*फांसावर जाण्यापूर्वी केलेल्या शेवटच्या भाषणांत त्यानें हे उद्गार काढले.

याच ग्रंथाचे लेखक

श्री० सदाशिव आत्माराम जोगळेकर, एम्.ए.

यांचीं

इतर पुस्तकें

प्रकाशक

गणेश महादेव आणि कंपनी

चौबळवाडी, मुंबई–नं. ४

विक्रीस तयार

१ मानवी कर्तव्यें	१–०–०
२ जोसेफ मॅझिनी चरित्र	२–०–०
३ स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें	१–८–०

लवकरच तयार होणारीं

१ क्रान्ति-मीमांसा

२ महाराष्ट्रांतील शेतीची आर्थिक स्थिति

३ अठराशें सत्तावन

मानवी कर्तव्ये

[दे० जोसेफ मॅझिनी याच्या Duties of Man या निबंधसंग्रहाचें भाषांतर.]

इटालियन राज्यक्रान्तीला प्रेरणा देणाऱ्या द्रष्ट्याच्या तत्त्वज्ञानाचें सार-सर्वस्व या निबंधांत ग्रथित झालेलें आहे. इतिहासाचें सिंहावलोकन करून मॅझिनीनें निर्माण केलेलीं हीं तत्त्वें त्रिकालाबाधित असल्यामुळें जगांतील अत्युत्कृष्ट ग्रंथांमध्यें मानवी कर्तव्यांची गणना करण्यांत येते. या ग्रंथांतील प्रकरणांच्या पुढें दिलेल्या नांवांवरून त्याची कल्पना येण्यासारखी आहे.

(१) इटालियन कामकरीवर्गास. (२) परमेश्वर. (३) कर्तव्यविवेकाचें महातत्त्व. (४) मानवजातीसंबंधीं कर्तव्यें. (५) राष्ट्रकर्तव्यें. (६) कुटुंब-कर्तव्यें. (७) स्वतःसंबंधाचीं कर्तव्यें. (८) स्वातंत्र्य. (९) शिक्षण. (१०) संघटना व प्रगति. (११) कामकरीवर्गाचा प्रश्न. (१२) उपसंहार.

सदरहू भाषांतराला दे० डॉक्टर सावरकर यांनीं स्फूर्तिदायक प्रस्तावना लिहिलेली आहे. भाषांतराचें काम किती सफाईदार, जोरदार व अस्सल-बरहुकूम झालें आहे हें पुढें दिलेल्या अभिप्रायांवरून दिसून येईल.

आवृत्ति दुसरी—कापडी बांधणी—पृष्ठसंख्या १५२.

किंमत फक्त १ रुपया.

[या पुस्तकास इंदूरच्या महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मण्डळाकडून बक्षीस मिळालेलें असून मध्यप्रांतसरकारनें हें बक्षिसांसाठीं व लायब्ऱ्यांसाठीं मंजूर केलें आहे.]

'मानवी कर्तव्यें' या भाषांतरावरील कांहीं अभिप्राय

मॅझिनीचें सर्व तत्त्वज्ञान ईश्वरनिष्ठेवर अधिष्ठित झालें असल्यानें नास्तिक बनत चाललेल्या पाश्चात्य देशांपेक्षां 'मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण' अशा रीतीनें धर्म व राजकारण यांची जोड घालून देणाऱ्या समर्थाच्या महाराष्ट्रास 'मानवी कर्तव्यें' या पुस्तकांतील शिकवण लवकर पटेल. भाषांतराचें काम श्री० जोगळेकरांचे लेखणींतून इतकें खुबीदार उतरलें आहे कीं, त्या योगानें मूळ ग्रंथाच्या सरसतेंत भरच पडली आहे. त्यामुळें हें पुस्तक भाषांतररूप न मानतां मराठी वाङ्मयांतील अत्यंत उपयुक्त वाचनपुस्तकांत याची गणना केली जाईल. —केसरी.

✠ ✠ ✠

मॅझिनी हा जरी इटलीच्या स्वातंत्र्याबद्दल तळमळणारा महापुरुष होऊन गेला, तरी त्याच्या राष्ट्रभक्तीच्या मुळाशीं अखिल मानवजातीच्या कल्याणाचा उदात्त हेतु होता. याच दृष्टीनें त्यानें वरील निबंध लिहिले असल्यामुळें ते इटालियन लोकांसच काय, पण पृथ्वीवरील कोणत्याही देशांतील लोकांस बोधप्रद वाटल्यावांचून रहाणार नाहींत. मॅझिनीसारख्या कर्मवीरास हक्कापेक्षां कर्तव्यासाठीं झगडण्यांत पुरुषार्थ वाटत असून आपल्या निबंधांत त्यानें त्याच मुद्द्यावर विशेष जोर दिला आहे. मॅझिनीचे या पुस्तकांतील सारेच निबंध वक्तृत्वपूर्ण आहेत, तरी पण त्यांतील विचारसरणी तितकी खात्री पटविणारी नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणणें भाग आहे. अशाही पुस्तकाचें भाषांतर रा० जोगळेकरांसारख्यांच्या लेखणींतून उतरलें नसतें तर सदर पुस्तकाची उपयुक्तता पुष्कळ अंशानें कमी झाली असती

—लोकसंग्रह.

✠ ✠ ✠

मूळ पुस्तक कांहीं अंशीं कठिण असतांही त्याचें रूपांतर अत्यंत सोपें, सरळ व मूळ ग्रंथाइतकें जोरदार झालें आहे याबद्दल श्री० जोगळेकरांचें आम्ही अभिनंदन करतों. —राजकारण.

✠ ✠ ✠

हें प्रौढ विद्यार्थ्यांनीं वाचावें आणि तें वाचतांना इटली देशाची परिस्थिति व आपली सध्यांची परिस्थिति यांच्यांतलें साम्य व वैषम्य या दोहोंचा नीट विचार करावा. —आनंद.

✠ ✠ ✠

इटलीला स्वातंत्र्य प्राप्त करून देणारा मॅझिनी, याचे विचार स्वातंत्र्येच्छु जनांस आदरणीय वाटतील. —विविधज्ञानविस्तार.

✠ ✠ ✠

भाषांतराचें काम श्री० जोगळेकर यांनीं फार सुबोध, सफाईदार आणि जोरदार केलें आहे आणि डॉ० सावरकर यांनीं स्फूर्तिप्रद व ओजस्वी प्रस्तावना लिहिली आहे. —स्वातंत्र्य, नागपूर.

✠ ✠ ✠

हीं तत्त्वें देशकालपरिस्थितीनें अबाधित असल्यामुळें त्यांचा प्रसार जितका जास्त होईल तितका इष्टच आहे. प्रस्तुत पुस्तकाचा प्रसार शक्य तितक्या झपाटयानें होईल अशी आम्हांस आशा आहे. —स्वधर्म.

✠ ✠ ✠

या पुस्तकांत प्रत्येकाच्या परमेश्वरविषयक, आत्मीय, कुटुंबीय, स्वदेशीय व मानवविषयक अशा सर्व कर्तव्यांचा उहापोह केलेला आहे. रा० जोगळेकर यांची भाषांतराची भाषा थंड परंतु हृदयभेदी अशी आहे. कोणीही एकवार वाचल्याशिवाय राहूं नये इतकीच आम्ही अगदीं थोडक्यांत शिफारस करतों. —राष्ट्रसेवक.

✠ ✠ ✠

भाषांतरित बिषयाशीं भाषांतरकर्त्याचें तादात्म्य झालेलें असल्यामुळें भाषांतराचे दोष या पुस्तकांत फारसे उतरले नाहींत. भाषा सरळ आणि सोपी असून अंतरंगाप्रमाणें पुस्तकाचें बाह्यांगही चित्तवेधक आहे. —हिंदमहिला.

✠ ✠ ✠

सुषुप्त इटलींतिल तरुणांना खडबडून जागें करून ज्यांनीं कार्योन्मुख केलें, तेच विचार आम्हांला निःसंशय जसेच्या तसेच राहूं देणार नाहींत. म्हणून जोगळेकरांचें पुस्तक प्रत्येकानें एक वेळ वाचावें म्हणजे प्रत्येकाला आपापला कर्तव्यमार्ग जास्त स्पष्ट दिसूं लागेल. —दक्षिण-विद्यालय त्रैमासिक.

स्वातंत्र्य, लक्ष्मीचा प्रेषित, राष्ट्रधर्माचा आद्यप्रवर्तक, इटलीचा जनक

जोसेफ मॅझिनी

[चरित्र, काल व विचार]

इटलीची राज्यक्रान्ति हा आधुनिक इतिहासांतील अत्यंत अद्भुत काल होय. देशवीरांच्या आत्मसमर्पणामुळें अत्यंत स्फूर्तिदायक, ऑस्ट्रियाच्या जुलमामुळें अत्यंत करुण आणि परस्परविरोधी तत्त्वांच्या व व्यक्तींच्या झगड्यामुळें अत्यंत बोधप्रद अशा या क्रान्तीचा संपूर्ण इतिहास मराठींत उपलब्ध नव्हता. मॅझिनीनेंच या क्रान्तीचा पाया घातला व त्याच्या चरित्रांत या क्रान्तीचा इतिहास समग्र गोंवतां येतो. मॅझिनीच्या चरित्राशीं निगडित झालेला इटलीच्या क्रान्तीचा इतिहास वाचावयास मिळेल अशीच या चरित्राची मांडणी केलेली आहे. मॅझिनीच्या जीवनाला आरंभ झाला त्या वेळीं इटलीच्या राष्ट्रीय जीवनांत धुगधुगी मात्र शिल्लक राहिलेली होती म्हणून पहिल्या भागांत चरित्राला प्राधान्य व राष्ट्रीय उत्क्रान्तीला दुय्यम स्थान दिलेलें आहे. इटलीचें राष्ट्रीय जीवन जसजसें जोरदार होत चाललें तसतसें मॅझिनीच्या वैयक्तिक जीवनाला दुय्यम स्थान दिलेलें आहे. मॅझिनीचे विचार त्याच्याच शब्दांत प्रसंगानुरोधानें दिलेले आहेत. धर्म, नीति, राजकारण व राष्ट्रधर्म या विषयांवरील त्याचे विचार साररूपानें एकत्र करून शेवटीं वेगळ्या प्रकरणांत दिलेले आहेत. इटलीच्या स्वातंत्रसाधनाचा संगतवार इतिहास भूमिकेंत दिला आहे. चारित्राची विभागणी पुढील प्रकरणांत केलेली आहे.

(१) भूमिका. (२) जिनोआ. (३) तरुण इटली. (४) हद्दपार मॅझिनी. (५) तरुण युरोप व जीवनाचें रहस्य. (६) लंडननिवास. (७) राज्यक्रान्ति.

(८) लोकसत्ताक रोम. (९) सैतानांचें साम्राज्य. (१०) मॅझिनी व काव्हूर. (११) स्वातंत्र्ययुद्ध व विश्वासघात. (१२) राष्ट्रैक्य व राष्ट्रस्वातंत्र्य. (१३) विविध विचार. (१४) महात्म्य.

या चरित्राला दे० तात्यासाहेब केळकर यांनीं प्रस्तावना लिहिलेली आहे ही एकच गोष्ट त्याच्या महत्त्वाची साक्ष देण्यास पुरेशी आहे. महाराष्ट्रांतील सर्व वृत्तपत्रकारांनीं सदरहू चरित्राची एकमुखानें प्रशंसाच केलेली आहे हें पुढील निवडक अभिप्रायांतील उताऱ्यांवरून दिसून येईल.

कापडी, सोनेरी बांधणी—पृष्ठसंख्या ३२३

जोसेफ मॅझिनी, गॅरिबॉल्डी व काव्हूर यांचे फोटो.

किंमत फक्त २ रुपये.

'मॅझिनी' चरित्रावरील कांहीं अभिप्राय

हिंदुस्थान देश स्वातंत्र्यप्राप्तीकरितां अविश्रांत चळवळ करीत आहे. त्या वेळीं 'स्वातंत्र्यलक्ष्मीचा प्रेषित, राष्ट्रधर्माचा आद्य प्रवर्तक व इटलीचा जनक' अशा मॅझिनीचें चरित्र मराठी वाचकांस वाचावयास मिळावें ही शुभसूचक गोष्टच होय. मॅझिनीच्या चरित्राची निरानिराळ्या विभागांत वांटणी करून ग्रंथकर्त्यानें परिश्रमपूर्वक विषयाचें विवेचन केलें आहे. पुस्तकलेखनाचे कामीं मॅझिनीच्या आत्मचरित्राच्या सहा भागांवरच विशेष भर दिलेला असल्यामुळें व जरूर तेथें मॅझिनीच्या स्वतःच्या उद्गारांतच प्रसंगवर्णन केलें असल्यामुळें मराठी वाचकांस मॅझिनीची ओजस्वी भाषा व विचारसरणी हींही अनुभवावयास मिळतात. श्री० जोगळेकर यांच्या या दुसऱ्या पुस्तकाचेंही वाचक चीज करतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. —केसरी.

इटलींच्या स्वातंत्र्यक्रान्तीची व तिचा जनक जोसेफ मॅझिनी याची संगतवार माहिती करून देणारें असें हें चरित्र लिहून श्री० जोगळेकर यांनीं मराठी वाङ्मयांत चांगलीच भर घातली आहे. —नवा काळ.

ज्या लेखकानें मॅझिनीच्या मानवी कर्तव्यांचें भाषांतर केलें त्याला मॅझिनीच्या चरित्रांतील रहस्य उत्तम समजलें असल्यामुळें हें चरित्र लिहिण्याची उत्सुकता व अधिकार त्याच्या ठिकाणीं स्वभावतःच जास्त आहे...श्री० सावरकरांचा मॅझिनी जप्त झाल्यावर मराठींत विश्वसनीय, संपूर्ण मॅझिनीच्या उज्ज्वल भावनामय तत्त्वज्ञानाचें यथार्थ चित्र रेखाटणारें दुसरें मॅझिनीचें चरित्र झालें नव्हतें. ती उणीव श्री० जोगळेकरांनीं भरून काढली आहे. अंतरंग व बहिरंग या दोन्ही दृष्टींनीं त्यांचें हें चरित्र वाचनीय आणि संग्राह्य झालें आहे. —महाराष्ट्र.

रा० जोगळेकरांच्या भाषेंत एक प्रकारचा दमदारपणा आणि ठसकेबाजपणा आढळून येतो...ग्रा ग्रंथानें महाराष्ट्र-वाङ्मयांत चांगल्या प्रकारची भर पडली आहे. —लोकमान्य.

मॅझिनीचें चरित्र म्हणजेच इटलीच्या स्वातंत्र्य-झगडयाचा अत्यंत स्फूर्तिदायक असा इतिहास, अशी स्थिति असल्यामुळें कोणत्याही उदयोन्मुख राष्ट्रांतील लोकांना तें एकाद्या पोथीसारखें पूज्य वाटतें. त्यांतूनही श्री० जोगळेकर यांच्या जोरदार पण गंभीर अशा लेखणीची त्याला जोड मिळाल्यामुळें दुधांत साखर पडल्यासारखें होऊन पुस्तक वाचावयास एकदां हातीं घेतल्यावर तें अपुरें टाकून देणेंच अशक्य होतें. अशा तऱ्हेनें एका अत्यंत स्फूर्तिदायक अशा महात्म्याचें चरित्र मराठींत लिहून महाराष्ट्रसाहित्याची श्री० जोगळेकर यांनीं जी अमूल्य सेवा केली आहे त्याबद्दल आम्ही त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. —बलवंत.

ह्या ग्रंथाची भाषा विषयास साजेशी गंभीर व स्फूर्तिदायक आहे. स्वराज्य-संपादनाची तीव्र लालसा उत्पन्न झालेली आहे अशा मराठी वाचकांनीं या उद्‌बोधक चरित्राचें एकदां तरी पारायण केल्यावांचून राहूं नये.—लोकमत.

✠ ✠ ✠

प्रस्तुत चरित्रग्रंथ हा निव्वळ एका व्यक्तीच्यासंबंधाच्याच हकीगतीनें भरलेला नाहीं. परतंत्र्यांत खितपत पडलेल्या आपल्या देशबांधवांस स्वातंत्र्याचा दिव्य संदेश सांगणाऱ्या आणि तत्सिध्द्यर्थ आमरण देह झिजविणाऱ्या महात्म्याचें अर्थात् एका स्वातंत्र्योन्मुख राष्ट्रानें परकी सत्तेशीं केलेल्या स्वातंत्र्ययुद्धाचें साग्र वृत्त त्यांत कथन केलें आहे...प्रस्तुत चरित्रग्रंथावरून स्वातंत्र्यप्राप्तीस्तव स्वतंत्रतेच्या तत्त्वाची शिकवण समाजांत किती खोल जावी लागते, स्वातंत्र्यप्राप्तीचा आणि स्वतंत्र कृतीचा मार्ग किती कंटकमय असतो, त्यासाठीं स्वार्थत्यागाची कशी शिकस्त करावी लागते, अपजयांतूनच यशश्रीचा उदय कसा होतो तें सर्व नीट कळेल...हीं सर्व तत्त्वें वाचकाच्या मनावर नीट ठसतील अशीच पुस्तकाची रचना आहे. स्वातंत्र्यविषयक तत्त्वज्ञानाचा प्रवर्तक या नात्यानेंच मॅझिनीची विशेष प्रसिद्धि आणि हें त्याचें तत्त्वज्ञान लेखकानें जागोजाग मॅझिनीच्या हातचेच लेख व पत्रें यांतील उताऱ्यांचें भाषांतर देऊन विशद केलें असल्यामुळें पुस्तकाच्या सरसतेंत भरच पडली आहे. या लेखांचा आणि पत्रांचा अभ्यास केल्यानेंच कीं काय, ग्रंथलेखकाची एकंदर भाषाही त्यांतील भाषेप्रमाणें ओजस्वी व परिणामकारक बनली आहे. मराठी भाषेंतील चरित्रग्रंथांत अशी बहुमोल भर टाकल्याबद्दल कोणीही महाराष्ट्राभिमानी रा० जोगळेकर यांचें अभिनंदनच करील. —स्वातंत्र्य.

✠ ✠ ✠

मॅझिनी चरित्रापासून स्त्रियांना स्फूर्ति मिळाल्यास तीच त्यांच्या मुलांच्या रक्तांत उतरेल. स्वातंत्र्याची लालसा एकदां रक्तांतच भिनली कीं ती आचरणांत येण्याचा मार्ग सुलभ होतो. या दृष्टीनें हें चरित्र स्त्रियांनीं अवश्य वाचण्यासरखें आहे. —हिंदमहिला.

✠ ✠ ✠

प्रस्तुत पुस्तकांत मॅझिनीचें चरित्र व त्या काळचा इतिहास हीं दोन्ही सुसंगत रीतीनें आणि सुंदर भाषेत जागजागीं मॅझिनीच्या लेखांतले उतारे ग्रथित करून दिलीं असल्यानें व शेवटीं मॅझिनीचे उदात्त विचार साररूपानें जोडले असल्यानें पुस्तक वाचनीय, मननीय, उपयुक्त व संग्राह्य झालें आहे.

—आनंद.



या ग्रंथाची भाषा सरळ व चांगली असून चरित्रकाराचा मुख्य नायकाच्या विचारांशीं उत्तम परिचय झाल्यामुळें सदर ग्रंथ लिहितांना त्यांची लेखणी सफाईदार रीतीनें काम करतांना दृष्टीस पडते. या पुस्तकांत तात्त्विक चर्चा वारंवार दृष्टीस पडते; परंतु त्यामुळें वाचकांना गैरशिस्त विचार न केल्यामुळें कंटाळा येत नाहीं. रा० जोगळेकर यांनीं हें चरित्र लिहून मराठी भाषेच्या ग्रंथभांडारांत उपयुक्त भर घातली आहे व याबद्दल त्यांचें आम्ही अभिनंदन करतों.

—इंदुप्रकाश.



श्री० जोगळेकर यांनीं चरित्राची मांडणी मोठ्या मार्मिकपणानें केली आहे. त्यांची विवेचनपद्धति व भाषाशैलीही उत्तम आहे. श्री० तात्यासाहेब केळकर यांनीं या चरित्रास प्रस्तावना लिहिली आहे. या एकाच गोष्टीनें पुस्तकाचें महत्त्व कोणासही कळून येणार आहे. या प्रयत्नाबद्दल श्री० जोगळेकर यांचे मानावे तितके आभार थोडेच आहेत.

—मौज.



चालू स्वराज्याच्या काळांत लोकांच्या मनास स्वराज्यपोषक विचारांचें वळण लावण्यासाठीं जे प्रयत्न करण्यांत येत आहेत त्यांपैकीं वाङ्मयदृष्ट्या केलेले प्रयत्न फार महत्त्वाचे होत...भाषेचा सुंदरपणा व सुटसुटीतपणा या दोन गोष्टींनीं पूर्ण असल्यामुळें या पुस्तकानें महाराष्ट्र-वाङ्मयामध्यें इष्ट अशीच भर पाडली आहे.

—विविधज्ञानविस्तार.



मॅझिनीच्या चरित्राची आवश्यकता साऱ्याच परतंत्र राष्ट्रांतील लोकांना असल्यामुळें रा० जोगळेकर यांनीं हें चरित्र लिहून ती उणीव दूर केली आहे. प्रत्येक वाङ्मयभक्तानें व देशभक्तानें हें चरित्र अवश्य वाचावें.

—चित्रमयजगत्.

✠ ✠ ✠

उत्तम चरित्रास अवश्यक असणारे मनोरंजकता, सामग्र्य व विस्तृतता-हे तीनही गुण या चरित्रांत दिसून येतात. त्याबरोबरच लेखकाच्या मनाचा समतोलपणा व तारतम्यबुद्धि व उचित विवेचनाची हातोटी याही गोष्टी तितक्याच ठळकपणानें ध्यानांत येतात. चरित्रनायक व त्याच्या वेळची परिस्थिति या दोहोंचा एकत्रित विचार करून चरित्रें लिहिणें केव्हांही कठीण असतें. कारण कालाचा विचार चालू असतांना व्यक्ति अजिबात विसरून जाण्याचा संभव जास्त, तर व्यक्तीचा विचार करतांना कालही बाजूस रहावयाचा संभव अधिक असतो. म्हणून प्रस्तुत लेखकानें व्यक्तीचें जीवन रेखाटतांना त्या प्रमाणांत कालास गौणत्व देऊन, कालाचा विचार प्रामुख्यानें चालू असतां त्या मानानें व्यक्तीला गौणत्व दिलें आहे. हें त्याच्या लेखनकौशल्याचें पूर्ण निदर्शक आहे...जितक्या कुशल मार्मिकतेनें व भक्त्युत्कट परिश्रमानें लेखकानें चरित्राचें अंतरंग सजविलें तितक्यास साजेसें बहिरंगही झालेलें आहे ही अत्यंत संतोषाची गोष्ट आहे. —दक्षिण-विद्यालय त्रैमासिक.

✠ ✠ ✠

Mr. Joglekar has added by his 'Life of Mazzini' an excellent volume to the biographical literature in Marathi. Mr. Joglekar writes an attractive and chaste Marathi and his book is assured of popularity.

—Maratha.

✠ ✠ ✠

The 'Life of Mazzini' is admirable.

—Indian Nationalist.

✠ ✠ ✠

The question of winning independence inside or outside the British Empire has been discussed more than once in the press and on the platform. The book is, therefore, welcome. It is doubly welcome because it is full of information called from standard work on the subject, neatly arranged and interspersed with extracts from the writings of Mazzini. The author has nowhere allowed the exhuberance of sentiment to overide his judgement and has rightly emphasised the merits and demerits of the Dreamer, Patriot of Italy as Mazzini is often called by Western writers.

—Modern Review.

लवकरच निघणारीं पुस्तकें

— १ —

क्रान्ति-मीमांसा

उत्क्रान्तीच्या तत्त्वाची सत्यता प्रथमतः प्राणिशास्त्रापुरतीच सिद्ध करण्यांत आली. लवकरच हें तत्त्व सर्व शास्त्रांना सारखेंच लागू पडतें असें अनेक शास्त्रज्ञांनीं आपापल्या विषयापुरतें सिद्ध करून दाखविल्यामुळें गेल्या शतकांत सर्व शास्त्रांची पुनर्घटना करण्यांत आली. सर्व बाजूंनीं समर्थन झाल्यामुळें या तत्त्वाच्या व्यासीच्या मर्यादा विस्तृत होऊन त्याचें प्रभुत्व प्रस्थापित झालें. उत्क्रान्तीच्या क्रान्तिकारक तत्त्वाचा राजकारणांतही प्रवेश होऊन क्रान्तिकारकांचीं तत्त्वें, साधनें व ध्येयें फोल ठरूं लागलीं. वेगवेगळ्या शास्त्रांमध्यें अधिक संशोधन होऊं लागलें आणि उत्क्रान्ति-तत्त्वाची सत्यता व प्रभुत्व मर्यादित आहे असें सिद्ध झालें. या मर्यादा राजकारणालाही लागू पडतात हें दाखविण्यासाठीं आणि मानवी प्रगतीला क्रान्तीचीही आवश्यकता आहे हें सिद्ध करण्यासाठींच सदरहू ग्रंथ लिहिण्यांत आला आहे.

क्रान्तीचें कार्य प्रगतीला पोषक आहे हें दाखविण्यासाठीं गेल्या शतकांत झालेल्या क्रान्तीच्या इतिहासाची रूपरेखा आरंभीं दिलेली असून पुढें क्रान्तीचें तात्त्विक विवेचन केलें आहे. क्रान्ति व उत्क्रान्ति, क्रान्तीची उत्क्रान्ति, क्रान्तीचीं साधनें व तत्त्वें, क्रान्तिकारक व्यक्ति, वगैरे अनेक विषयांचें साधार विवेचन सर्वसाधारण वाचकाला मनोरंजक आणि समाजशास्त्राच्या अभ्यासकालाही महत्त्वाचें वाटेल अशा रीतीनें केलेलें आहे.

— २ —

महाराष्ट्रांतील शेतीची आर्थिक स्थिति

महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची स्थिति सालोसाल अधिकाधिक हलाखीची होत आहे; त्यांच्या शिरावरील कर्जाचा बोजा वाढत आहे; आर्थिक चढाओढीतील ताण त्यांना असह्य होऊं लागला आहे; त्यांच्या जमिनी सावकारांच्या हातीं जात आहेत; खेडींपाडीं उध्वस्त होत आहेत; आमचें दुय्यम धंदे लयाला जात आहेत; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आमचा गांवगाडा खिळखिळा होत आहे; आणि त्याची पुनर्घटना वेळींच झाली नाहीं तर महाराष्ट्रांतील शेतीची संघटना उध्वस्त होऊन जाईल. असें असूनही शेतीचा उत्कर्ष होत आहे असें पहाणीचे अधिकारी हरएक तालुक्यांत सिद्ध करून दाखवीत आहेत; व महाराष्ट्रांत रयतवारी जमीनधाऱ्याची पद्धति चालू असल्यामुळें त्यांच्यां शिफारशीप्रमाणें दर तीस वर्षांनीं सारा वाढविला जात आहे. यामुळें शेतीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास हा महाराष्ट्राच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न होऊन बसला आहे. प्रस्तुत ग्रंथांत याच प्रश्नाचें पुढील प्रकरणांत सांगोपांग विवेचन केलेलें आहे.

[१] शेतीचें अर्थशास्त्र. [२] महाराष्ट्रांतील शेतजमीन. [३] पीकपाणी व शेतीचीं साधनें. [४] गांवगाडा. [५] मजुरी. [६] दुय्यम धंदे. [७] बाजार व बाजारभाव. [८] शेतकरी व सावकार. [९] जमीनमहसूल. [१०] शेतकरी व सरकार. [११] शेतकीची पुनर्घटना.

प्रत्येक प्रकरणांत दिलेली माहिती खुद्द सरकारी अहवालांतील आंकड्यांवरूनच तयार केलेली आहे. मजुरी व सावकारी यांचा ब्रिटिश अंमलाच्या आरंभापासूनचा इतिहास दिलेला आहे. बाजरी, ज्वारी, तांदूळ व गहूं, यांच्या गेल्या ऐशीं वर्षांतल्या किंमतींचे आंकडे महाराष्ट्रापुरते प्रथमच तयार केलेले असून वाढत्या किंमतींवरून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारत

आहे असा निर्णय काढणें चुकीचें आहे असें सिद्ध करून दाखविलें आहे. शेतीच्या सुधारणेसाठीं सरकारनें आजपर्यंत केलेले प्रयत्न अत्यंत अपुरे असून जमीनधाऱ्याची वसुली मात्र सरकार अत्यंत कडकपणें करीत असल्यामुळें शेतकऱ्यांवरील बोजा वाढत आहे असें दाखविलें आहे. शेवटच्या प्रकरणांत शेतीची पुनर्घटना कोणत्या दिशेनें केली असतां शेतकऱ्यांचा फायदा होईल हें सप्रमाण दाखविलें आहे. महाराष्ट्रांतील शेतीविषयीं अत्यंत उपयुक्त व विश्वसनीय माहितीनें भरलेला असा हा एकच ग्रंथ असून तो लवकरच प्रसिद्ध होणार आहे.



अठराशें सत्तावन

अठराशें सत्तावनच्या बंडाचा विश्वसनीय व संपूर्ण इतिहास मराठी भाषेंत अजून झालेला नाहीं. ही उणीव भरून काढण्यासाठींच हा ग्रंथ लिहिलेला आहे. अनेक इंग्रजी ग्रंथांचें सूक्ष्म अध्ययन करून आणि सर्व बाजूंनीं विचार करून लिहिलेला हा इतिहास महाराष्ट्रीयांस अत्यंत प्रिय होईल. या बंडाच्या ज्वाळा महाराष्ट्रांतही भडकल्या होत्या; त्यांचा समग्र वृत्तान्त या ग्रंथांत प्रथमच देण्यांत येणार आहे. हें बंड म्हणजे स्वातंत्र्ययुद्ध होतें, कीं निव्वळ शिपायांचें बंड होतें याचाही विचार केलेला असल्यामुळें ऐतिहासिक सत्यासत्यनिर्णयाच्या दृष्टीनें हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा होईल यांत संशय नाहीं.

विजय प्रेस, पुणें.

REFBK-0003283



माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें ।
परि अमृतातेंही पैजा जिंकें ।
ऐशीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥

गणेश महादेव आणि कंपनी, गिरगांव–मुंबई

यांचीं पुस्तकें.

	किंमत रु. आ.
(१) कादंबऱ्याः—	
१ स्वराज्याची पूर्वपीठिका	२–४–०
२ ,, श्रीगणेशा (२ आ.)	२–४
३ ,, घटना ,,	२–४
४ ,, स्थापना ,,	२–४
५ स्वराज्याचा कारभार ,,	२–४
६ स्वराज्यावरील संकट ,,	२–४
७ स्वराज्याचें परिवर्तन ,,	२–४
८ स्वराज्यांतील दुफळी	२–४
९ अजिंक्यतारा (आ. २ री)	१–८
१० शृंगेरीची लक्ष्मी	२–०
११ कुठें?	१–०
१२ मराठशाहीची ढाल	१–८
१३ राक्षसी रणसंग्राम	१–०
१४ मानसपूजा	१–०
१५ गौरीशंकर	१–८
(२) नाटकेंः—	
१६ सं. नवजीवन	०-१०
१७ ,, सैतानी संक्रांत	१–०
(३) काव्य-ग्रंथः—	
१८ गोमांतक	२–०
१९ माधवानुज	२–०
(४) ऐतिहासिकः—	
२० मुसलमानी रियासत (भा. १)	३–०
२१ मुसलमानी रियासत (भा. २)	३–८
२२ मराठी रियासत म. वि. १	३–०
२३ ,, ,, ,, २	३–०
२४ ,, ,, ,, ३	२-४
२५ ,, ,, ,, ४	३–०
२६ ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध	३–८
(५) धार्मिकः—	
२७ श्रीएकनाथ चरित्र (आ. ३)	०-१२
२८ भक्तिमणिमाला	१–८
२९ स्वामी रामतीर्थ खंड १	२–८
३० ,, ,, २	२–८
पुढील चार खंड क्रमशः प्रसिद्ध होतील.	
(६) निबंध वगैरेः—	
३१ मानवी कर्तव्यें	१–०
३२ निवडक लेख	२–८
३३ ग्रेटब्रिटनची शासनपद्धति	०-१०
३४ हिंदुत्व	१–०
३५ विनोदसागर, तरंग १ ला	१–०
३६ स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें	१-८
(७) चरित्रेंः—	
३७ महात्मा गांधी	२–४
३८ निकोलाय लेनिन	०-१२
३९ जोसेफ मॅझिनी	२–०
४० वीर वैरागी	१–०
४१ राणा हमीर	०-१२

श्री० नाथमाधव यांच्या स्वराज्यावरील (सन १८१८ पर्यंतच्या कालावर)

आणखी सुमारें २० कादंबऱ्या क्रमशः प्रसिद्ध होतील.